
# आनंदलहरी

## द्विसाहस्त्री - २



दि १७-१२-८४

।।श्री गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम्।।

# द्विसाहस्त्री-२

(कर्मकांड व भक्तीकांड)

प.पू.श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजकृत
श्री गुरुचरित्रावर प.पू.श्री. दत्तमहाराजांनी केलेली प्रवचने

संकलन
श्री.गोपाळ गोडसे

संपादन
डॉ.सौ.माधुरी पणशीकर

प्रकाशक
श्री भगवती प्रकाशन

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रकाशन दिवस**
१७ डिसेंबर,१९९४
शनिवार,मार्गशीर्ष शु.१५,
श्रीदत्त जयंती, शके१९१६.

**मुखपृष्ठ**
आमोद दामले

**मुद्रक**
के.जोशी आणि कंपनी
१७४५/२, सदाशिव पेठ,
पुणे-३०

**प्रकाशक**
श्री भगवती प्रकाशन
६/१, साईविहार,
कर्वेनगर, पुणे-५२

**किंमत रु. २५**

# ।। श्री गणेश दत्त गुरुभ्यो नमः ।।

**वैज्ञानिक** ज्ञानाचा स्फोट झालेल्या आधुनिक युगात आध्यात्मिक ग्रंथांचे स्थान काय? असा प्रश्न वारंवार केला जातो. विज्ञान प्रत्यक्षप्रमाण महत्वाचे मानते. इंद्रियगोचरता आणि निष्कर्ष पुनःपुनः प्रयोगाने सिध्द करणे हे विज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. उलट अध्यात्माचा विषय ' ब्रह्म ' हा इंद्रियगोचर नाही आणि तर्काने सिध्द करता येत नाही. म्हणून श्रेष्ठ आध्यात्मिक जीवनदृष्टी स्पष्ट करण्याकरता श्रीमद् शंकराचार्यांनी ' विवेकचूडामणि ' सारखा ग्रंथ लिहला. श्री अरविंद म्हणतात, " we arrive at the conception and at the knowledge of divine existence by exceeding the evidence of the senses and piercing beyond the walls of the physical mind."

ह्या अतींद्रियाकडे बघण्याची दृष्टी आध्यात्मिक ग्रंथ देतात. विज्ञानामुळे लौकिक ऐहिक जीवनात पुष्कळ सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. वैद्यकीय संशोधनामुळे अनेक रोगांवर औषधे सापडली. माणसाची आयुर्मर्यादा वाढली. पदार्थ- विज्ञान, रसायनशास्त्रही विविध प्रयोग करुन मानवी जीवन सुखी करण्यात प्रयत्नशील आहे. तरीही माणूस अंतर्यामी सुखी नाही, समाधानी नाही, असे आजच्या जगाचे एकूण चित्र दिसते. ऐहिक जीवनातून मिळणाऱ्या सुखाच्या मर्यादी ज्ञानी, विवेक व्यक्तीच्या ध्यानात येतात, अशा व्यक्ती अंतीम सत्याच्या शोधार्थ तळमळतात.

गौतमबुध्द राजपुत्र होता, सर्व सुखे हात जोडून त्याच्या सेवेला उभी होती. सुंदर पत्नी होती, मुलगा होता. तरीही ह्या सर्वांचा त्याग करुन तो रानावनात का गेला? ऐहिकाचे वैय्यर्थ ध्यानात येऊन शाश्वत सुखाच्या दिशेने त्याने प्रयत्न केला. नित्य, निर्लेप, आनंदस्वरुप असलेले ते शाश्वत सुख किंवा परमात्म तत्त्व हाच आध्यात्मिक ग्रंथांचा केंद्रबिंदू असतो. ह्या ग्रंथांच्या वाचनाने आपण आपल्या आयुष्याचा अंतर्मुखतेने वेध घेतो.

प्रस्तुत-' **द्विसाहस्त्री** ' ग्रंथातली प.पू.दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचनेही अशीच आपल्याला अंतर्मुख करतात. ती वाचतांना आपल्या विचारांचे उन्नयन होते कारण प.पू. महाराजांच्या शब्दामागे स्वानुभवाचे पाठबळ आहे. त्यांच्या सहवासात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की त्यांना ' अशिव ' असे काहीच दिसत नाही कारण हे विश्व त्या विश्वंभराचाच आविष्कार आहे,' सर्वं वासुदेवमिती' हा त्यांचा दृढ विश्वास आहे. प.पू.महाराजांकडे बघतांना 'विवेकचूडामणि ' मधला श्लोक आठवतो,

**"मुंजादिषीकामिव दृश्यवर्गात्**
**प्रत्यंचमात्मानमसंगम क्रियम् ।**
**विविच्य तत्र प्रविलाप्य सर्वं**
**तदात्मना तिष्ठति यस्स मुक्तः ।। "**

म्हणजे मुंज नावाच्या गवतातून आतील सळकांडी ज्याप्रमाणे वेगळी करतात तद्वत् देहेंद्रियादि दृश्यसंघातापासून आत्म्याला वेगळे जाणून, सर्व अनात्मवर्गाचा लय करुन, त्या अधिष्ठान साक्षीरुपाने जो रहातो तो जीवन्मुक्त समजावा.

तथापि असे ज्ञानी संत आपल्या आचरणातून धर्म,स्पष्ट करत असतात. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**" एथ वडिल जेजे करिती। तया नाम धर्मु ठेविती ।**
**तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ।। १५८.३ ।।**
**हे ऐसे असे स्वभावे । म्हणोनि कर्म न सांडावे ।**
**विशेषे आचरावे । लागे संती।। " १५९.३।।(ज्ञानेश्वरी)**


स्वतः जीवन्मुक्त असूनही निष्काम बुध्दीने फलाशाविरहीत कर्म कसे करावे याचा आदर्श प.पू. महाराजांनी आपल्या कृतीद्वारे सामान्य जनांसमोर उभा केला.

परिव्राजकाचार्य टेंबेस्वामीमहाराजांच्या ' द्विसाहस्त्री ' ह्या संस्कृत ग्रंथावरची प.पू. दत्तमहाराजांची प्रवचने श्रध्दा, भक्ती, ज्ञान, विवेक अशा निरनिराळ्या गुणांचा विचार कथेच्या अनुषंगाने करणारी आहेत. मानवी जीवनाला मंगल, कल्याणप्रद दिशा दाखवणारे गुण त्यांना आपल्या मनावर ठसवायचे असतात. मग भास्करभटांची आणि गुरुंच्या आज्ञेने शेत कापणाऱ्या शेतकऱ्याची कथा सांगताना ' अप्रतिहत भक्तीं ' चे महात्म्य सांगितले जाते. तर ' ह्या वाळलेल्या फांदीला पाने फुटेपर्यंत पाणी घाल आणि तुझे कुष्ठ जाईल ' ही कथा सांगतांना श्रध्देचे श्रेष्ठत्व मनावर बिंबवले जाते. ह्या प्रवचनांची शैली प्रवाही असून, रोजच्या बोली भाषेत ती सांगितलेली आहेत. आपल्या पारमार्थिक जीवनाचा मार्ग उजळून जावा म्हणून गुरुचरित्रातल्या कथांचे मर्म प.पू. महाराजांनी उलगडून दाखवले आहे. ते मर्म सहृदय वाचकाला रोमांचित करुन,' आनंदाचे डोही, आनंद

तरंग' असा अनुभव प्राप्त करुन देते.

लौकिक जीवनाकडून अलौकिकाकडे वाटचाल करण्यासाठी प.पू.महाराजांनी आपले बोट, धरुन ठेवण्यासाठी पुढे केले आहे. आपणच ते गच्च पकडायला हवे. अर्थात ते पकडण्याची शक्तीही त्यांनीच द्यायची आहे. ती मिळावी ही त्यांच्या चरणी नम्र प्रार्थना !

**डॉ.सौ.माधुरीपणशीकर**
**११,गुडविलबिल्डींग**
**मनमालाटँकरोड**
**माहीम,मुंबई१६**









प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

तरं

कर
पुढे
पव
त्य

जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञानअंधार निरसी।
जीवात्मया परमात्मयासी। ऐक्यता कारी।।
विघडले देव आणि भक्त। जीव शिवपणें द्वैत।
तया देवभक्ता येकांत। करी तो सद्‌गुरु।।

जेथें सारासार विचार। तेथ होय जगोध्दार।
नवविधाभक्तीचा आधार। बहुत जनांसी।।
म्हणोनी नवविधा भजन। जेथे प्रतिष्ठिलें साधन।
हें सद्‌गुरूचें लक्षण। श्रोतीं वोळखावे।।


तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।
नानासाधने समर्था। सद्‌गुरूपासीं।।
अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान। बाह्य निष्ठेचे भजन।
तेथे बहु भक्त जन। विश्रांति पावती।।

ओम् नमो सद्गुरु तूं ज्योतिषी। एकात्मतेचे घटित पाहसी।
चिद्ब्रह्मेंसी लग्न लाविशी। ओम् पुण्येंसीं तत्त्वतां॥
वधूवरां लग्न लाविती। हें देखिलें असे बहुतीं।
आपुली आपणा लग्नप्राप्ती। हे अलक्ष्य गती गुरुराया॥

ओम् नमो सद्गुरु धन्वंतरी। ज्याची दृष्टीचि निरुज करी।
त्यावांचोनि संसारीं। भवरोगु दुरी न करवे।
ज्या भवरोगाचेनि दर्पें। फुंफात तापलीं त्रिविधतापें।
'मी माझें' येणें संकल्पें। वाग्जल्पें जल्पती॥

जय जय सद्गुरु परम। जय जय सद्गुरु पुरुषोत्तम।
जय जय सद्गुरु परब्रह्म। ब्रह्मा ब्रह्मनाम तुझेनी॥
जय जय सद्गुरु चिदैक्यस्फूर्ती। जय जय सद्गुरु चिदात्मज्योति।
जय जय सद्गुरु चिन्मूर्ती। मूर्तामूर्ती चिद्रूप॥

# श्री सद्‌गुरु मांदियाळी




श्री दत्तात्रेय



पू. श्रीपादश्रीवल्लभ




पू. नृसिंह सरस्वती




पू. वासुदेवानंद सरस्वती

।। गुरो तुझी ही पदवारीधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ।।


# श्री सद्‌गुरु मांदियाळी



पू. लोकनाथतीर्थ स्वामी



पू. दीक्षित स्वामी



पू. गुळवणी महाराज



पू. धुंडिराज महाराज

॥ सदैव माझे मन वाणी शुध्द । करो तुझे नाम पवित्र सिध्द ॥

ओम् नमो जी श्रीगुरुराया। म्हणोनि सद्भावें लागें पायां।
तवं मीपण गेलें वायां। घेऊनियां तूंपणा॥
नवल पायांचें कठिणपण। वज्रें न तुटे लिंगदेह जाण।
त्याचेंही केलें चूर्ण। अवलीळा चरण लागतां॥

ओम् नमो श्रीगुरु शिवशिवा। नमनें जीवत्व जीवा।
नुरविसी, तेथें देहभावा। कैसेनि रिघावा होईल॥
जीवें घेऊनि जीवा। देहत्व मोडूनि देहभावा।
याहीवरी करविसी सेवा। हें लाघव देवा नवल तुझें॥

एवं स्वस्वरूप द्यावयासी। उदारत्व तुजपासीं।
हें न ये गा आणिकांसी। हृषीकेशी कृपाळुवा॥
तो तूं परम उदार ऐसा। राया रंका समभावें सरिसा।
भावो तेथ भरंवसा। तू आपैसा आतुडसी॥



प. पू. ताईमहाराज चाटुफळे

'जागृती' जागे तुझेनि हरिखें। 'स्वप्न' स्वप्ना तुझेनि देखे।
'सुषुप्ती' सुखावे जेणें सुखें। पूर्ण संतोखें तुझेनि ॥
मी जे जे 'विषय' भोगीं। तें भोक्तेपण तुझे अंगी।
तुझेनि निजसंयोगीं। मी पणें जगीं वर्तविशी मज ॥

सुखेंचि तुझें नाम घेतां। घातु करिसी जीविता।
जीवु घेऊनि तत्त्वतां। होसी सर्वथा कृपाळू ॥
तुझे नामाचें प्रबळ बळ। माथा नुधविती कळिकाळ।
चारी मुक्ति केवळ। होती निश्चळ निजदासी ॥

आतां सद्‌गुरु वर्णवेना। जेथे माया स्पर्शों सकेना।
ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ॥
न कळे न कळे नेति नेति। ऐसें बोलतसे श्रुती।
तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठे ॥

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्तावना | एक |
| कर्मयोग | १ |
| भक्तीयोग | १०२ |

## आगामी प्रकाशने

श्रीदेवी भागवत

श्रीमद् भागवत

श्रीकृष्ण चरित्र

# । कर्मयोग ।

**नामधारक** प्रश्न विचारतात," आत्तापर्यंत आपण ज्ञानयोग सांगितलात. ज्ञान आहे, वैराग्य आहे. महाराजांनी स्वतः संन्यासदीक्षा घेतली म्हणजे ज्ञानयोगाचाच पुरस्कार केला आहे. काही सांसारिक घटनांचा उल्लेख आहे पण मुख्यतः ज्ञानयोगाचेच प्रगटीकरण आहे. असे सगळे असताना महाराज पुन्हा कर्मयोगाकडे कां वळले ? कर्माची जरूर काय ? ज्ञानप्राप्ती झाल्यावर अज्ञान नाहीसे झाले की संसारबंधनातून, कर्मबंधनातून जीव मुक्त होतो. आत्मज्ञान झाल्यावर सर्व संशय दूर होतात. सर्व कर्मांचा क्षय होतो. मग कर्मयोगाची जरुरी काय ? उपयोग काय ?"

भगवान् श्रीकृष्णांनी कर्मयोगाचा पुरस्कार केला आहे. ज्ञानयोगाचाही त्यांनी पुरस्कार केलेला आहे. मग ज्ञानयोग का घेऊ नये ? कर्मयोग कशाला पाहिजे असे जर अर्जुनासारख्याने विचारले तर काय बिघडले ? तीच शंका नामधारकाची आहे.

कारण कर्म हे अज्ञानापासून निर्माण झाले आहे. ' मी आत्मा आहे, असंग आहे, सच्चिदानंदघन आहे असे जर ज्ञान असेल तर कर्म कोणाची करायची ? मी अमुक वर्णाचा आहे, अमुक आश्रमाचा आहे, मी अमक्या ठिकाणी जन्माला आलो आहे; माझ्यावर अमुक अमुक जबाबदारी आहे ' अशी जर मनाची भूमिका असेल तर कर्मबंधन निर्माण करणारी कर्मे होणार. परंतु ,' माझा कोणाशी आणि कसलाच संबंध नाही, एकमेवाद्वितीयरुप मी आहे,' अशा भूमिकेवर जो स्थिरावला आहे त्याला कर्मबंधन कुठे आहे? अज्ञानावस्थेमध्ये कर्म आहे.

अविद्येपासून निर्माण होणारे कर्म अविद्या दूर करू शकते? ज्ञानच अज्ञान दूर करते. अविद्येला दूर करणारे कर्म नाही. कारण कर्म अविद्येपासूनच निर्माण झालेले आहे. ज्याच्यापासून उत्पन्न झाला त्याचा नाश करायचा का? असे कर्म कसे शक्य आहे, असे नामधारकांनी विचारल्यावर सिद्ध सांगताहेत-

अविद्येपासून निर्माण झालेले कर्म अविद्या दूर करते याचे उदाहरण खेकड्याचे आहे. खेकडीणीच्या गर्भातून पिल्ले जन्मली की खेकडीणीचा नाश होतो. मलीन झालेलं भांडं मातीने घासूनच स्वच्छ होते ना ! त्याप्रमाणे अविद्येपासून जरी कर्मं उत्पन्न झाली तरीसुध्दा शास्त्रांनी सांगितल्याप्रमाणे आचरण झाले तर अविद्यानाशाचा मार्ग पुष्कळसा मोकळा होतो. साक्षात अविद्यानाश कर्माने होत नाही हे खरे आहे. परंतु अविद्यानाश होण्याकरता ज्या ज्ञानाची आवश्यकता आहे ते ज्ञान कर्मानेच प्राप्त होते. उदा. बुद्धी शुद्ध होणं. कर्म हे काही शेवटपर्यंत करायचे असा त्याचा अर्थ नाही. ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय हा काही शास्त्राचा सिद्धांत नाही. शेतामध्ये उत्तम पीक येण्याकरता शेत नांगरले पाहिजे पण कुठपर्यंत ? पेरणी झाली तरी नांगरले पाहिजे असे जर म्हटले तर ? आरंभाला नांगरलंही पाहिजे आणि नंतर नांगर थांबवलाही पाहिजे. तशी, कर्मे केलीही पाहिजेत आणि शेवटी कर्मे सोडलीही पाहिजेत. कर्म व कर्मसंन्यास हे दोन्ही क्रमाक्रमाने केले पाहिजेत.

ज्ञानप्राप्तीचा अधिकार मिळवण्यासाठी शमदमादि साधने, साधनचतुष्ट्य शास्त्राने सांगितली आहेत. विवेक, वैराग्य, मोक्ष मिळेपर्यंत कर्मानुष्ठान करणे आवश्यक आहे. पण त्याचा अर्थ शेवटपर्यंत कर्मानुष्ठानच करीत बसले पाहिजे असे नाही. कर्मे

संस्कार करतात. संस्कार या शब्दाचा अर्थ बुद्धीमध्ये असलेले दोष दूर करणे. आणि बुद्धी गुणसंपन्न करणे. बुद्धीमध्ये दैवी शक्ती निर्माण झाली पाहिजे. आणि बुद्धीमध्ये असलेली असुरी संपत्ती गेली पाहिजे. हा संस्कार याचा अर्थ आहे. त्याकरता कर्म आहे.

श्रमसिध्दी आहे. सगळ्या इंद्रियांचा निग्रह झाल्यावर पुढे ज्ञानयोगाकडे जायचे आहे. कर्माच्या वेळेला भक्तीयोग पाहिजे आणि ज्ञानाच्या वेळेलाही भक्तीयोग हवा. भगवंतांनी कर्मयोगाचा पुरस्कार का केला ? स्वतः कर्मयोग आचरणात आणून दाखवला त्यांनी. कारण लोक त्यांचेच अनुकरण करणार ना ! त्यांच्या आचरणाचा जास्त परिणाम होतो. अधिक मार्गदर्शन होते. वस्तुतः ज्ञान झाल्यानंतर किंवा ज्ञानयोगी पुरुषाला कर्माची आवश्यकता नाही. उपयोग काय म्हणाले तर उपयोग हाच आहे. याची बुद्धी शुद्ध झालेली आहे. आत्मज्ञान झालेले आहे. सगळे आहे. पण लोकसंग आहे. हे कार्य आहे. श्रेष्ठ पुरुष कसा वागतो, त्याने जर सगळी कर्मे सोडून दिली, शास्त्र वगैरे काही मानायचे नाही ठरवले, देवपूजा वगैरे काही नको सगळे मिथ्या आहे असे म्हटले तर सगळ्यांना पटेल काय ? त्याला एक मिथ्या बुद्धी झालेली आहे, पण तशी सगळ्यांना कशी होऊ शकेल ? ( इथे मिथ्या हे सर्व जग अशाश्वत आहे अशा अर्थाने ) गुणातीत बुद्धी ज्याची झाली त्याने कर्म सोडले तरी हरकत नाही. पण तो सोडत नाही. सोडू नये म्हणून सांगितले आहे. लोकसंग्रह बिघडेल ना ! लोक आपला अधिकार नसताना कर्मत्याग करून भ्रष्ट होतील. हेही नाही आणि तेही नाही म्हणून हा कर्मयोग महाराजांनी सांगितला.

त्यावेळी म्हणजे सुमारे पाचशे वर्षांपूर्वी यवनांचे राज्य होते. यवन राजा बाहेरून विरोध दाखवायचा नाही. पण मनातून मात्र द्वेष करायचा. ब्राह्मणांना मुद्दाम बोलवून त्यांचा आदरसत्कार करायचा, आपल्याला वेद, धर्मशास्त्रात काय सांगितले आहे त्याबद्दल जिज्ञासा आहे असे दाखवायचा. आणि सगळे ऐकून घेतले की नास्तिकांच्या बुद्धीवादाने त्यांची श्रद्धा कमी करण्याचा प्रयत्न करायचा. नास्तिकांची संगती झाली म्हणजे आपल्या बुद्धीवर तसेच संस्कार होतात. शास्त्राने सांगितलेली दृष्टी आहे ती उत्पन्न होण्याकरता त्या परंपरेमध्ये जे ज्ञानपूर्वक श्रध्दा ठेवतात अशांची संगती घडली पाहिजे.

त्याकरता प्रथमतः जीवात्मा हा शरीरापेक्षा निराळा आहे हे समजले पाहिजे. त्याशिवाय बाकी काही कळणे शक्य नाही. म्हणून आरंभालाच गीतेमध्ये भगवंतांनी सांगितले आहे की देही निराळा आहे आणि देह निराळा आहे. देह विनाशी आहे. हे अगोदर सांगून मग गीताज्ञान सांगितले आहे. देह म्हणजे मी नाही. देहात आलेला मी आहे. या देहातून पुढे मला जायचे आहे. प्रवास माझा संपलेला नाही. अजून पुष्कळ प्रवास करायचा आहे. या प्रवासात सुखसोयींची कुठलीही व्यवस्था फोनने, तारेने किंवा पत्राने आगाऊ कळवून करता येणार नाही. अशा प्रवासाला जायचे आहे. हे सगळे आपण ऐकून घेतले पाहिजे. आणि त्याच्याबद्दलही काय युक्तिवाद आहेत ते ऐकून घेतले पाहिजेत. सश्रध्द, आस्तिक माणसाच्या सहवासात गेल्यावर तसे संस्कार बुद्धीवर होतात.

आपली बुद्धी काही पक्की झाली नाही. कोणी काही सांगितले तरी आपली बुद्धी कायम आहे असे होऊ शकत

नाही. आज हा पक्ष सोडा, उद्या त्या पक्षात जा, असं चाललेलं आहे. बुद्धीमान, श्रेष्ठ, मान्यताप्राप्त झालेले लोकही एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जातातच की नाही ! पहिल्यांदा ह्या पक्षात का आलात ? तर चांगला वाटला म्हणून. आता तोच पक्ष वाईट का दिसू लागला ? याचं काय कारण आहे ? तर स्वतःच्या बुद्धीने योग्य तो निर्णय घेऊ शकत नाही. म्हणून योग्य मार्गदर्शक महात्म्याची संगती व्हायला पाहिजे. मार्ग कसा आहे, त्याचे गुणदोष काय आहेत, ते कसे पहावेत ते अगोदर शिकायला पाहिजे. आमच्या बुद्धीला वाटणारा तो दोष व वाटेल तो गुण आहे असे म्हणता येणार नाही. कुठेही आम्ही गुणदोष पाहू. म्हणून बुद्धीने गुणदोष कसे पहावेत हे सुद्धा शिकावे लागते. आणि खरे गुणदोष आहेत की नाहीत, की दोषाचा नुसता आभास आहे हेही आपल्या बुध्दीने पटवून घ्यावे लागते. आणि त्याकरता असे हे मर्मज्ञानरहस्य ज्यांनी मिळवलं, ज्यांची श्रद्धा पूर्णपणे दृढ आहे अशांची संगती झाली पाहिजे.

परंतु अर्थाकडे लक्ष गेल्यावर अर्थ, काम हे दोनच पुरुषार्थ आहेत, अशी बुद्धी असणारी मंडळी त्या राजाकडे जाऊ लागली. ' पैसा मिळतोय. श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या तुमच्या वैदिक धर्मातही पुष्कळ दोष आहेत,' असे राजाने सांगून त्यांचा बुद्धीभेद करावा. राजाला सोईचे झाले. शत्रूच्या लोकांचीच बुद्धी फिरवून त्यांच्या लोकांचा बुद्धीभेद केला म्हणजे झाले. प्रत्यक्ष शत्रूचा नाश करण्याची जरुरी नाही. त्यांची बुद्धी भ्रष्ट केली म्हणजे त्यांचा नाश आपोआप होतो.

प्राचीन काळी बुध्दीचे संरक्षण व्हावे म्हणून मोठमोठ्या तपस्वी मुनींनी प्रयत्न केले. बुद्धीचे संरक्षण करण्यासाठीच

अर्जुनाला गीताज्ञानाचा उपदेश झाला आहे. अर्जुनाची मुळची चांगली बुद्धी जायला लागली. दैवी संपत्ती घेऊन आलेला अर्जुन भ्रष्ट होऊ नये असे श्रीकृष्णांना वाटले. बुद्धीचे संरक्षण झाले तर समाजाचे आणि पर्यायाने राष्ट्राचे संरक्षण होणार आहे. ही बुद्धी कशी पाहिजे हे सर्वही वेदशास्त्राप्रमाणे सांगितले आहे. भगवान श्रीकृष्णसुद्धा शास्त्रच प्रमाण मानताहेत.

द्रव्यलोभी माणसे सर्व काळात आहेत. राजा आपल्या धर्माची निंदा करतो पण पैसेही देतो. तिथे जाणारे पैशाच्या लोभापायी ही निंदा मुकाट्याने ऐकून घ्यायचे. पैसे दिल्यामुळे राजाला निंदा करायचा अधिकारच मिळाला की नाही. त्रिविक्रम भारतींना झालेला अहंकार महाराजांनी त्यांच्या गांवी जाऊन दूर केला. उद्धार कोणाचा करायचा आणि कोणाचा नाही हेही पाहिलं पाहिजे. महात्मे, अवतारी पुरुष आपली शक्ती कधीही वापरू शकतात. ते समर्थ असतात. आपल्या दोषांमुळे इतरांना उपसर्ग देणाऱ्यांचे दोष दूर करायचे की तसेच ठेवायचे. सगळ्या पापी लोकांचे दोष दूर करण्याचेच काम देवाने करावे. लोकांच्या कर्माकर्माचा विचार करायचा नाही का !

ज्ञानेश्वर महाराजांवर लोक असा आक्षेप घेतात की त्यांनी इतक्या लवकर कां समाधी घेतली ? अजून काही वर्षे उपदेश करत राहिले असते तर काय झाले असते ? त्यांनी जो केलेला उपदेश आहे त्यातला आपण किती घेतो ? सगळे ज्ञान त्यांनी आपल्या पुढे ज्ञानेश्वरीच्या रुपाने ठेवले आहे. त्यांना विचारण्याचा आम्हाला काय अधिकार आहे ? नृसिंह सरस्वतींनी वाटेल त्याचा उद्धार केला नाही. त्रिविक्रम भारतींना अहंकार असेल, पण त्यांनी खरा संन्यास घेतला आहे, त्याग केला आहे. ज्ञानाच्या

अहंकारामुळे त्यांच्या हातून निंदा घडली. पण त्यांनी आपली चूक कबूल केली.

अर्जुन देखिल सर्वार्थाने शरण आला तेव्हां त्याला गीता ज्ञानाचा उपदेश झाला. ' मला कर्माकर्माचे ज्ञान नाही, माझी बुद्धी विचार करू शकत नाही, मी आपला शिष्य आहे, मला मार्गदर्शन करा. ' आपलीच बुद्धी श्रेष्ठ आहे असा आग्रह त्याने जेव्हां सोडून दिला तेव्हांच त्याला गीता ज्ञानाचा उपदेश झाला. नाही तर कशाला सांगितली असती गीता ? श्रीकृष्ण म्हणाले असते,' तूही जा वनांत, मीही जातो द्वारकेला. काय व्हायचे असेल ते होईल. पांडव तरी कशाला पाहिजेत आणि कौरव तरी कशाला पाहिजेत ?' आपला अहंकार दूर व्हायला पाहिजे अशी जर खरी तळमळ निर्माण झाली तरच देव तो दूर करतो.

अत्यंत ज्ञानी, वेदशास्त्र संपन्न असे दोन ब्राह्मण या यवन राजाकडे आले. वादविवादात कोणीही त्यांच्यापुढे टिकत नव्हता. कोणालाही निरुत्तर करू शकतील एवढे शब्दज्ञान त्यांच्या जवळ होते. ते राजाला म्हणाले, "आम्ही सर्व वेदांचा अभ्यास केला असून आमच्याकडे पूर्ण ज्ञान आहे. तुमच्या राज्यात कोणी ज्ञानी असतील तर आणा आमच्या समोर, आम्ही त्यांच्या बरोबर वादविवाद करून त्यांना जिंकू. आणि असे कोणी नसेल तर आम्हाला जयपत्र लिहून द्या."

या दोन्ही ब्राह्मणांचा अधःपात व्हायची वेळ आली आहे. पण अधःपाताबद्दल विचारसुद्धा मनामध्ये नाही. राजाश्रय मिळाला, सन्मान मिळाल्यामुळे अहंकार आणखीनच वाढू लागला. बाणासुराची कथा आहे ना. ज्या शंकरांनी त्याला वर दिला त्यांच्याशीच युद्ध करायला निघाला तो. शंकरांना तो म्हणाला,'

देवा तुम्ही मला हजार हात दिलेत पण माझ्याबरोबर युद्धाला कोणीच तयार होत नाही. तुम्हीच एकटे तेवढे माझ्याबरोबर युद्ध करू शकाल.' म्हणजे आपल्या उपास्य देवतेलाच त्याने आव्हान केले. शंकर रागावून म्हणाले,' तुला लवकरच तुल्यबळ योद्धा भेटेल आणि तुझा सगळा मद दूर करील.'

महाराज त्या ब्राह्मणांना समजावून सांगताहेत "वादविवादाकरता ज्ञान नाहीये. दुसऱ्याला ज्ञानसंपन्न करण्याकरता ज्ञान आहे. दुर्जनच आपल्या विद्येचा उपयोग वादविवादाकरता करतात. त्यांना असे वाटते आपण तेवढे शहाणे आणि बाकीचे सगळे मूर्ख. त्यात आणखी दुर्जनांजवळ धन असेल तर त्यांचा अहंकार जास्ती जास्ती वाढत जातो. मी मोठा आहे. माझं सगळ्यांनी ऐकलं पाहिजे असा आग्रह ते धरतात आणि त्यांच्याजवळ शक्ती असेल तर त्याचा उपयोग दुसऱ्याला पीडा देण्यासाठीच केला जातो."

पण हे जे तीन गुण आहेत ते वापरणाऱ्याच्या बुद्धीप्रमाणे दोष ठरलेले आहेत. जर साधु पुरुषाकडे विद्या असेल तर तो दुसऱ्याला ज्ञानी करून सोडतो. निरनिराळ्या उपायांनी दुसऱ्याचे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न करतो. निष्कारण वादविवाद करत बसत नाही. साधूची भावना अशी असते की धन हे आपल्याला ईश्वराने दान देण्याकरता दिले आहे. त्याचा उपयोग सर्वांना झाला पाहिजे. धन फक्त स्वतःच्याच उपभोगाकरता किंवा मद निर्माण होण्यासाठी नाही. तीच गोष्ट शक्तीची. सर्वांचे रक्षण करण्यासाठी शक्तीचा उपयोग आहे. आणि साधुपुरूष शक्तीचा उपयोग दुर्बलांच्या रक्षणाकरता करतात.

विद्या निराळी आणि बुद्धी निराळी आहे. सद्गुरूंच्याजवळ

अभ्यास करणारे पुष्कळ असतात. पण त्या प्रत्येकाची बुद्धी मात्र हवी तशी सुधारत नाही. त्यांचे ते ज्ञान फक्त शब्दांपुरतेच मर्यादित राहाते. शब्दानेच आपले सामर्थ्य, ज्ञान, अज्ञानी लोक व्यक्त करतात. दुसऱ्यांना अज्ञानी ठरवितात.

हे दोन ब्राह्मण राजाजवळ येऊन म्हणाले,"आमच्या विद्वत्तेचा तुमच्या राज्यात काही उपयोग नाही. आता आम्ही सर्वत्र फिरून येतो म्हणजे कोणी आमच्याशी वादविवाद करायला तयार आहेत की नाहीत समजेल. जर कोणी आला तर आम्ही त्याचा वादविवाद करून पराजय करू, नाही तर जयपत्र लिहून घेऊ."

राजाला तेच पाहिजे होते. वैदिकांच्यातच एकवाक्यता नाही, असे धर्माचे स्वरूप आहे, हे आपोआप सिद्ध होईल. आपले वाभाडे निघताहेत हे यांना कळत नाहीये. राजाला आनंद झाला. या दोघांना पालख्या दिल्या, नोकर चाकर बरोबर दिले. अहंकारी वृत्तीने प्रत्येक गांवामध्ये जाऊन इथे कोणी विद्वान असेल तर त्यांना बोलवा असे सांगायचे. खरे ज्ञानी लोक कशाला यांच्या समोर येतील ? तरीही यांचा जयपत्र लिहून देण्याचा आग्रह कायमच. संपूर्ण विश्व अहंकाराने चाललंय म्हणतात. अहंकार तत्व फार मोठे आहे. समष्टी अहंकार, व्यष्टी अहंकार. खरी विद्वान मंडळी विचार करायची यांचा पराजय केला काय आणि नाही काय ! उपयोग आहे का काही? बुद्धीमान माणसे आग्रही प्रवृत्ती पाहून स्वतः बाजूला होतात. नको वाटते त्यांना. त्यांच्या ज्ञानाला, बुद्धीला जिथे किंमत नाहीये तिथं बुद्धीमान लोक कशाला जातील ! फार तर फार ते म्हणत, ' जयपत्रच हवे ना हे घ्या लिहून, पण या गांवातून जा.'

अशारीतीने अनेक विप्रांचा, ज्ञानी पुरुषांचा त्यांनी अपमान केला. फिरता फिरता त्रिविक्रम भारतींची कीर्ती त्यांच्या कानावर आली. वेदांचा, शास्त्रांचा अभ्यास करण्यातच त्यांचे आयुष्य गेले आहे. सतत चिंतन, मनन चालू आहे. हे दोघे त्यांना म्हणाले,

"राजाच्या आज्ञेने आम्ही सर्वत्र फिरत आहोत. तुम्ही ज्ञानी असाल तर आमच्या बरोबर वादविवाद करा. आमची तयारी आहे. पाहू तरी काय ज्ञान आहे तुमच्याकडे. आणि अज्ञानी असाल तर आम्हाला जयपत्र लिहून द्या." वास्तविक पहाता जयपत्र लिहून तरी काय त्यांच्याबरोबर ती पत्रं येणार होती का? सगळा वेदांत वाचून, एवढं ज्ञान मिळवून या दोघा ब्राह्मणांनी त्याचा काय उपयोग केला ?

त्रिविक्रम भारती म्हणाले," मला काही समजत नाही. तुम्ही ज्ञानी आहात. तुमच्यासारखे मला जर ज्ञान असते तर तुमच्यासारखा पालखीत बसून हिंडलो नसतो का? ज्ञान नाही, हे लिहून कशाला द्यायला पाहिजे. माझ्याकडे ज्ञान नाही हे मी कबूल करतो. दुसरं असं की मी संन्यासी आहे, मला जय आणि पराजय दोन्ही सारखंच आहे."

पण त्या दोघा ब्राह्मणांना काही पटले नाही. त्यांनी त्यांच्याजवळची सगळी जयपत्रे काढून त्रिविक्रम भारतींना दाखवली. ' इतक्या लोकांनी आम्हाला मान्यता दिली मग तुम्हाला लिहून द्यायला काय हरकत आहे,' असे म्हणाले. त्रिविक्रम भारतींनी त्यांची पुष्कळ समजूत काढायचा प्रयत्न केला परंतु त्यांची आग्रही बुद्धी कायम आहे.

अहंकारामुळे आग्रह निर्माण होतो. आपलेच बरोबर आहे

असे वाटते. रजोगुणाचं लक्षण सांगताना म्हणतात की रजोगुणाची वृद्धी कधी होते हे समजतच नाही. कामादि विकार आपल्याजवळ आहेत हे रजोगुणी माणसाच्या लक्षातच येत नाही. नकळत रजोगुणी माणसाचा नाश होतो. तमोगुणी माणसाला कोणी तशी जाणीव करून दिली तर निदान कळते तरी पण रजोगुणाचे तसे नाही.

त्रिविक्रम भारतींनी विचार केला, यांना काही तरी शिक्षा झाली पाहिजे. गाणगापूरमध्ये आपले गुरूमहाराज आहेत. त्यांच्याकडे यांना घेऊन जावे. ते समर्थ आहेत. काय योजना करायची, यांच्या बुद्धीचे परिवर्तन कसे करायचे याचा महाराजांना अनुभव आहे. आपली बुद्धी नाही का बदलली त्यांनी ! यांची बुद्धी बदलली तरी हरकत नाही. हे दोघे एक तर अहंकार सोडून देऊन महाराजांची क्षमा तरी मागतील नाही तर शासन भोगतील.

त्याप्रमाणे त्रिविक्रम भारतींनी या दोघांना सांगितले की आमचे गुरूमहाराज गाणगापुरामध्ये राहातात. तिकडे तुम्हाला यायचं असेल तर चला. मी तिथे येतो. त्यांच्या समक्ष ते काय सांगतील त्याप्रमाणे करू. म्हणजे त्यांनी माघार घेतली नाही. त्रिविक्रम भारती दंड कमंडलू घेऊन चालत निघाले गाणगापूरला आणि हे उन्मत्त पालखीमध्ये बसूनच निघाले. संन्यासी पुरुषाचा असा अवमान केला. आयुष्य कमी झालं म्हणतात त्यांचं.

गाणगापूरला आले मठात. महाराजांना अत्यंत भक्तीभावाने नमस्कार करून त्रिविक्रम भारतींनी महाराजांची स्तुती केली. "निर्गुण आणि गुणात्म सगुण आपणच आहात. संपूर्ण जगताला मार्गदर्शन करणारे गुरूस्वरूप आपण आहात. आनंदमूर्ती आपण

आहात. परंतु अज्ञान अंधःकारामध्ये सांपडलेल्या जीवाला मात्र हे समजत नाहीये. घुबडाला सूर्याची काय माहिती असणार ? त्याला काही कळत नाही. तशी परिस्थिती आज समाजामध्ये निर्माण झाली आहे. हे दोन विप्र, अत्यंत उन्मत्त झालेले, ज्ञानाचा अहंकार बाळगणारे, सर्व ठिकाणी जाऊन सर्वांचा अपमान यांनी केला. बाकी सगळे मूर्ख आणि आम्हीच तेवढे ज्ञानी आहोत अशी आपली बढाई मारतायत, यांच्याकडे आपण लक्ष द्या. यांना आपण शासन करा."

मग महाराजांनी त्या ब्राह्मणांना विचारले," त्रिविक्रम भारतींकडे तुम्ही कशाला गेलात ? काय तुमचं काम आहे ?"

ते ब्राह्मण म्हणाले,' काम म्हणजे राजाच्या आज्ञेने आम्ही आलो आहोत. राजाने आम्हाला वादविवाद करून सर्वांना जिंकायला सांगितले आहे. त्याकरता आम्ही आलो. आम्ही अत्यंत मोठे ज्ञानी आहोत. आम्ही यांच्याकडे( त्रिविक्रम भारतींकडे) गेलो. यांना तुमच्याकडे आणले. तुम्हाला काय ज्ञान असणार ? तुम्ही संन्यासी लोक, तुम्हाला वेद, शास्त्र काय कळणार ?' असे अगदी तोंडावर महाराजांना बोलले.

महाराज म्हणाले," तुमचं हे सगळं बोलणं गर्वाने आहे. तुमच्या मनात काय आहे याचा कधी विचार केलात का ? तिकडे लक्ष नाही तुमचं. गर्वाने सर्वांचा नाश होतो. राक्षस काय किंवा देव काय, कोणी कितीही मोठा असला तरी गर्वामुळे त्याचा नाश झालेला आहे. तुम्ही ज्ञानी आहोत असं म्हणता मग आम्हाला वेद किती आहेत सांगता का ?"

महाराजच पुढे म्हणाले," ऋग्वेदाच्या एकवीस शाखा आहेत. एकशेएक यजुर्वेदाच्या आहेत आणि सामवेदाच्या तर सहस्त्र

शाखा आहेत. अथर्ववेदाच्या नऊ शाखा आहेत. एकएक संहिता पुन्हा त्याच्या उपशाखा, त्या प्रत्येक शाखेची संहिता,प्रत्येक शाखेचा ब्राह्मण ग्रंथ, उपनिषद ग्रंथ असे कितीतरी आहे. अनंत वाङमय आहे. आणि हे सर्व तुम्ही जाणता असे जे तुम्ही म्हणता हे आम्ही खरे कसे मानायचं ? मग प्रत्यक्ष एखादा शास्त्र सिद्धांत घेऊन त्यावर चर्चा करणे हे पुढचे काम. सगळे वेद तुम्ही समजून घेतले ? सगळ्या शाखा उपशाखा तुम्हाला माहित आहेत ? सर्व संहिता तुम्ही म्हणू शकता ?"

आजपर्यंत कोणालाच हे शक्य झाले नाही याचे महाराजांनी उदाहरण दिले. भारद्वाज ऋषींना सर्व वेदांचा अभ्यास करायची इच्छा झाली. ब्रह्मचर्याश्रमामध्ये राहून त्यांनी सर्व वेदांचा अभ्यास करायचा ठरवले. त्यासाठी ते तपश्चर्या करु लागले. ब्रह्मदेव प्रसन्न झाले. भारद्वाज ऋषींना त्यांनी मागे वळून पहाण्यास सांगितले. त्यांना मागे पाहिल्यावर वेद, तेजोमय पर्वतांप्रमाणे प्रचंड दिसले. त्यातले फक्त तीन मुठी काढून त्यांनी भारद्वाजांना दिल्या. तेवढ्यांचा त्यांचा अभ्यास अजून संपला नाही म्हणतात. पैल, वैशंपायन, जैमिनी आणि सुमंतू या चार शिष्यांना वेदव्यासांनी उपदेश केलेला आहे.

ऋग्वेदाचेही पुन्हा प्रत्येक उपवेद वेगवेगळे आहेत. ऋग्वेदाचा उपवेद ' आयुर्वेद ' म्हणून आहे. संपूर्ण शरीरशास्त्राचा त्यात विचार केला आहे. या सगळ्या देवता आहेत. नुसते वेद म्हणजे वाङमयरुप नव्हे. धनुर्वेदामध्ये युद्धशास्त्राची संपूर्ण माहिती आहे. व्यूह रचना कशी करायची, जवळ असताना कोणते बाण मारायचे, वेगवेगळ्या शस्त्रांचा उपयोग कसा करायचा ते सर्व समजावले आहे. हे सर्व ज्ञान बुद्धीमध्ये साठवून ठेवणारे क्षत्रिय कसे

असतील ? आणि हे सगळे तुम्हाला माहित आहे म्हणता?

सामवेदाचा उपवेद गंधर्ववेद आहे. संपूर्ण गायनशास्त्र त्याच्यामध्ये आले आहे. शिवाय शिल्पशास्त्र किंवा तंत्रशास्त्राचाही उपवेदांमध्ये उल्लेख आहे. व्यक्तीच्या पर्यायाने समाजाच्या उन्नतीचा विचार वेदवाङमयात केलेला आहे. संपूर्ण एका वेदाचा अभ्यास कोणाही एका मनुष्याला करणे शक्य नाही. बुद्धीचं सामर्थ्यच कमी झालेलं आहे.

पूर्वीची ऋषी मंडळी, मेधाशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्नशील होती. मेधाशक्ती वाढवण्यासाठी शास्त्रकारांनी काही प्रयोग सांगितले आहेत. काही मंत्राचा जप, हवन वगैरे शास्त्रीय पद्धतीने केले म्हणजे बुद्धीची धारणाशक्ती वाढते. ती धारणाशक्ती असल्याशिवाय पुष्कळ वेद वाचले, ऐकले तरी मनामध्ये कसे राहातील? नुसती पुस्तके छापून वेदांचे संरक्षण होत नसते. वेदांचे पठण करायची पद्धती, अर्थ लावण्याची पद्धती यांचेही स्वतंत्र शास्त्र आहे. सर्व वेदांनी ज्याचे वर्णन केलेलं आहे, त्या परमात्म्याची प्राप्ती करुन घ्यायची आहे. किती मार्ग आहेत ! किती ज्ञान पाहिजे, केवढा अभ्यास पाहिजे ! आणि तुम्ही म्हणता आम्ही सर्व वेदांचा अभ्यास केला आहे ? तुम्ही तुमच्या आल्या मार्गाने जा. आम्ही संन्यासी आहोत, आम्हाला वादविवाद, जयपत्र वगैरे काही नको.

एवढं सगळं महाराजांनी सांगितलं खरं पण त्या दोघाही ब्राह्मणांना,' विनाशकाले विपरित बुद्धी ' झाली. ज्ञानी माणसे बिचारी आपले ज्ञानदानाचे काम करताहेत, सगळ्यांना मार्गदर्शन करताहेत. पण या दोघांनी सगळ्या ज्ञानी माणसांचा अपमान, द्वेष केला. निरनिराळ्या गावात जाऊन सर्वांचा बुद्धिभेद केला. ते उन्मत्त ब्राह्मण महाराजांना म्हणाले," हे ऐकायला आम्ही

आलेलो नाही. कोणाला ज्ञान झाले नाही, गर्वाने अमुक होते हे सर्व आम्हाला माहीत आहे."

प्रत्यक्ष चर्चा सुरू झाल्यावर किती टिकाव लागतो कोणास ठाऊक, पण अगोदर त्यांनीच बोलून त्यांना गार करायचे. आधीच म्हणायचे, हे सगळे माहित आहे. हे काय नवीन नाही आम्हाला. तुम्ही आम्हाला काही सांगू नका, असे, ही मंडळी म्हणतात. पण एखादा जर खंबीर माणूस भेटला तर तो यांना म्हणतो, काय माहीत आहे सांगा आम्हाला. मग चर्चेला सुरवात होते. पण हे उन्मत्त म्हणाले," हे ऐकण्यासाठी आम्ही आलो नाही. तुम्हाला शक्ती असेल तर वादविवाद करा. कोणचाही विषय काढा, आम्ही चर्चा करायला तयार आहोत. नाहीतर आम्ही अजिंक्य आहोत असे तुमच्या दोघांच्या सह्यांचे जयपत्र लिहून द्या."

आता इथे काही इलाजच नाही ना. साममार्गाने सगळा प्रयत्न झालेला आहे. आता दंड केल्याशिवाय चालणार नाही. यांची प्रकृतीच तशी आहे ना ! असुरी प्रकृती ! ज्ञानाचा काहीही उपयोग नाही. म्हणून महाराजांनी ठरवलं यांना आता शासन करायचे. म्हणाले, "बरंय. काही हरकत नाही. वादविवादच करायचा आहे ना ! करा."

गावातला एक अंत्यज बाहेरून रस्त्याने चालला होता. बोलवा म्हणाले त्याला. तो आला. नमस्कार करून उभा राहिला. महाराजांनी आपल्या हातातला दंड एका शिष्याच्या हातात देऊन सात रेषा जमिनीवर काढायला सांगितल्या. त्या अंत्यजाला ती एकेक रेषा ओलांडून येण्यास सांगितले. रेषा ओलांडायला सांगून त्याची बुद्धी पाठीमागे नेताहेत. पूर्वीच्या जन्मात या जीवाने

ज्ञानाचा विकास करून घेतला होता. पण पुढे त्या ज्ञानाचा ऱ्हास होत गेला. आणि तो या जन्मात आता आलेला आहे. भगवंतांच्या संकल्पाने त्याच्या पूर्व जन्मातील ज्ञानाचा विकास चाललेला आहे.

पहिली रेषा ओलांडल्यावर त्याला मागच्या (पहिल्या) जन्माचे स्मरण झाले.' विणकाम करणारा ब्रूड आहे मी ' म्हणाला. दुसऱ्या रेषेचे उल्लंघन करून आल्यावर, ' मी भिल्ल आहे, ' म्हणाला. तिसऱ्या रेषेचे उल्लंघन करून आल्यावर, ' नदी तीरावर राहाणारा गांगेय म्हणून शेतकरी आहे ' म्हणाला. चौथी रेषा ओलांडून आल्यावर, ' मी मोठा जमिनदार शेतकरी आहे, ' असे त्याने सांगितले. पांचव्या रेषेचे उल्लंघन केल्याबरोबर पांचव्या जन्माचे त्याला स्मरण झाले.' सोमदत्त नांवाचा मी वैश्य जातीचा व्यापारी आहे,' म्हणाला. सहावी रेषा ओलांडून आल्यावर,' गोवर्धन नांवाचा मी मोठा पराक्रमी क्षत्रिय आहे,' म्हणाला. आणि सातव्या रेषेचे उल्लंघन करून आल्यावर उत्तम 'वेदशास्त्राचं ज्ञान असणारा ब्राह्मण आहे, ' म्हणाला. महाराजांनी स्वतःच्या सामर्थ्याने त्याची बुद्धी तिथपर्यंत मागे नेली आहे. शरीर तेच आहे पण बुद्धी मात्र सात जन्मापर्यंत मागे गेलेली आहे.

त्याच्या अंगावरती महाराजांनी भस्म अभिमंत्रण करून टाकलं आणि म्हणाले," हे दोन ब्राह्मण वादविवादाकरता आलेले आहेत, यवन राजाच्या आज्ञेने. तुला वेदशास्त्राचे ज्ञान आहे ना ? मग यांच्याबरोबर वादविवाद करून यांचा पराजय कर." महाराजांची आज्ञा होताच तो संस्कृतमध्ये उत्तम वेदशास्त्रज्ञान बोलू लागला. शास्त्रांचे सगळे सिद्धांत सांगू लागला. आणि या

ब्राह्मणांच्या मनात भिती उत्पन्न होऊन ते थरथर कापू लागले. या गांवात राहाणारा हा अंत्यज मनुष्य नुसत्या रेषा ओलांडून येतो काय, आपल्या बरोबर वादविवाद करतो काय, उत्तम ज्ञान सांगतो काय !

हे दोघेही शास्त्रज्ञान संपन्न होते. त्यांच्या लक्षात महाराजांचे सामर्थ्य यायला वेळ लागला नाही. पण प्रत्यक्ष प्रयोग करून दाखविणारी ही शक्ती या ठिकाणी आहे. ही जाणीव झाल्यानंतर त्यांचा अहंकार गेला. सातव्या जन्माचं स्मरण करून देताहेत हे महाराज ! एखाद्याकडे शास्त्रांचं वाचन, ज्ञान असेल पण ते प्रयोग प्रत्यक्ष करून यशस्वी करून दाखवण्याची शक्ती असेलच असे नाही. प्रयोग वाचणं निराळं, सांगणं निराळं, प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवणं निराळं. पण तो अगदी अस्खलित संस्कृतमध्ये वेदांबद्दल बोलायला लागलेला पाहून हे दोघे घाबरले. महाराजांना शरण आले. चुकलो म्हणाले आम्ही, आम्हाला क्षमा करा. दुष्ट संगतीमुळे आम्ही या भ्रमात पडलो. आमचा उद्धार करा.

महाराज म्हणाले," नाही. त्या यवनांच्या जवळ तुम्ही वेदपठण केलं. सर्व ब्राह्मणांचा, विद्वानांचा धिक्कार केलात, अपमान केलात. या कर्माचं फळ तुम्हाला याच जन्मात भोगलं पाहिजे. या तुमच्या पापकर्माचं फळ म्हणजे तुम्ही ब्रह्मराक्षस व्हाल. बारा वर्षे तुम्हाला या योनीत रहावे लागेल. नंतर एक ब्राह्मण येईल तो तुम्हाला काही मंत्र विचारील, तो त्याला उपदेश केल्यावर मग तुम्ही या जन्मातून मुक्त व्हाल."

कर्माचा परिपाक त्वरित होतो. किंवा पुष्कळ काळानेही होतो. तसे जर भयंकर कर्म असेल तर विचार नाही. लगेच त्याचा निर्णय होऊन फळ भोगावे लागते, तेही सांगितले. ते

ब्राह्मण नदी तीरावर जायला निघाले आणि जाता जाता एकदम त्यांना हृदयशूळ उठून त्यांचं प्राणोत्क्रमण झालेलं आहे. आणि महाराजांच्या सांगण्याप्रमाणे ते ब्रह्मराक्षस झाले. बारा वर्षानंतर वेदाभ्यास करणाऱ्या एका ब्राह्मणाला मंत्राचे काही विस्मरण झालं. तो यांच्याकडे आला आणि यांनी त्याला तो मंत्र सांगितल्यावर हे मुक्त झाले म्हणे.

सिद्ध सांगताहेत नामधारकांना, ज्ञान मिळाल्यानंतर स्वधर्माचं आचरण केले पाहिजे. आचरण करणं हे ज्ञानाचं पुढचं फळ आहे ना. संपूर्ण मंत्रांचं ज्ञान, नंतर कर्मानुष्ठान. अनुष्ठानाला महत्व आहे. पण या ब्राह्मणांनी तर केवळ द्रव्यार्जनासाठी स्वधर्माचा त्याग केला. द्रव्य मिळतंय ना. मग यवनांचं काय. कोणाकडेही जायची तयारी आहे. आपल्या ज्ञानाच्या अहंकारापायी सर्वांचा अपमान केला त्यांनी, हे एक मोठे पाप आहे. कोणाचाही अपमान करायचा नाही.

**।। कोणाही जीवाचा न घडो मत्सर ।।**
**।। वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे ।।**

असा अभ्यास आहे महात्म्यांचा. कोणाचाही द्वेष करायचा नाही. सर्वत्र भगवान् एक आहे ही भूमिका आहे. त्यामुळे ते अपकार करणाऱ्याचा, द्वेष करणाऱ्याचा, निंदा करणाऱ्याचा द्वेष करीत नाहीत.ही भगवंताची खरी भक्ती आहे. ही ज्यांना कळलेली आहे त्यांचं त्याप्रमाणे आचरण चालू आहे. महात्म्यांना वेदशास्त्र ज्ञान नाही असे नाही.

' **वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा** ' म्हणतात. खरा वेदांचा अर्थ ' परमात्मा ' हा आहे. तो त्यांनी समजून घेतलेला आहे.

परंतु केवळ बाह्य अर्थाकडे लक्ष देऊन शास्त्रार्थ करणे, वादविवाद करणे आणि त्यामुळे कितीही लोकांचा अपमान झाला तरी तिकडे लक्ष न देणे, म्हणजे भक्ती सुटलेली आहे. द्वेष करणे म्हणजे अभक्ती आहे. ही भक्ती सोडून,स्वधर्म त्याग करून, केवळ अर्थकामासक्त असलेल्या लोकांना तात्काल शासन होते.

भगवान भक्तवत्सल आहेत. पण वाटेल त्याच्याबद्दल वात्सल्य दाखवत नाहीत. जनता जनार्दनाचा अपमान त्या ब्राह्मणांनी केला, त्यांची बुद्धी शुद्ध करण्यासाठी महाराजांनी त्यांना शासन केले. ही सुद्धा त्यांची एक दयाच आहे ना!अहंकारामध्येचहे गेले तर नरकात जातील. यमधर्माकडे दयाबिया काही नाही. ते फक्त ज्यांच्या त्यांच्या कर्माप्रमाणे शिक्षा करतात. मग ती भयंकर असो, काहीही असो. तिथे तक्रार चालायची नाही. त्यांच्याकडे अव्यवस्थाही नाही. यमधर्माच्या ताब्यात देण्यापेक्षा महाराजांनी स्वतःच त्या ब्राह्मणांना शिक्षा करायचे ठरवले. बारा वर्षात ते सगळं आटोपलं त्यांचं, नाहीतर ते जर नरकात गेले असते तर किती काळ गेला असता कोणास ठाऊक.त्याचा कायनेमआहे?

तेव्हां असे जे वागणारे लोक आहेत ते जरी ज्ञानी असले तरी त्या ज्ञानाला महत्व नाहीये, महाराज म्हणाले. ज्ञान झाल्यानंतर आणखी स्वधर्मानुष्ठान करणारे, ईश्वराची खरी भक्ती करणारे, कोणाबद्दलही द्वेषभाव न धरणारे, तेच श्रेष्ठ ठरताहेत. ईश्वरालासुद्धा तेच मान्य होत आहे. श्रीकृष्ण एकदा बोलत बसले असता रूक्मिणीचे पत्र घेऊन एक ब्राह्मण आला. श्रीकृष्णांनी त्यांचं '

भूदेव ' म्हणून स्वागत केलं. भूदेव कसे आहेत तर आपलं कर्तव्य कर्म करून जो लाभ होईल त्यात ते संतोषाने राहाणारे आहेत. जास्ती अपेक्षा नाही. वासना नाही काही. सर्वांबरोबर साधू वृत्तीने राहाणारे अजातशत्रू. धर्मराजांना अजातशत्रू म्हणत असत. सर्वही भूतांच्याबद्दल सौहर्द्रि भावना, मैत्री, प्रेम धारण करणारे निरहंकारी, ज्यांच्याजवळ सामर्थ्य आहे पण अहंकार नाही.

चांगदेव आकाशातून आले वाघावर बसून. ज्ञानेश्वर भिंतीवर बसले होते. ती भिंतच चालायला लागली. यात अभिमान कोणी बाळगायचा ? वास्तविक कोणाची शक्ती मोठी आहे ? चेतन वाघ, सिंहाचे कोणीही नियमन करू शकते. सर्कशीत सुद्धा त्यांच्याकडून हवी ती कामे करून घेतली जातात. वाघावर बसून येण्यात काय फार मोठेपणा नाहीये. पण दगडाची अचेतन भिंत ज्यांच्या संकल्पाने क्रियाशील झाली त्यांचं सामर्थ्य मोठं आहे. त्यांनी जर तसे म्हटले तर दोष नाहीये. पण ते स्वतःचे सामर्थ्य विसरून जातात. केवळ ज्ञान आहे म्हणून ' निरहंकारीणः शांतान् ' असे जे शांत विप्र आहेत त्यांना गोपालकृष्ण म्हणताहेत ' नमस्ये शिरसा असकृत ' वारंवार शिरसावंदन करतो.

तर ही दैवी संपत्ती आहे. दैवी संपत्तीची जाणीव होत नाही आपल्याला. अहंकारामुळे आपलीच बुद्धी मोठी आहे, सर्व कार्य आपल्याच बुद्धीने होत आहे हा बुद्धिवाद आमचा सध्या आहे. संतांनी या बुद्धिवादाला बाजूला केलं. "जे खळांची व्यंकटी सांडो..." देवाजवळ प्रार्थना करताहेत. सांगायला जात नाहीत लोकांना. सांगून काही उपयोग नाही. हे एवढं ज्ञान द्या म्हणताहेत ज्ञानेश्वर महाराज. त्यांची दुर्बुद्धी जाऊ दे, सुधारणा करा. आणि

" सत्कर्मी रती वाढो " एवढं देवाजवळ मागताहेत, प्रार्थना करताहेत.

तर अशा प्रकारचे जे आहेत त्यांना राक्षसयोनी प्राप्त होते, म्हणाले. महाराजांनी त्यांचा उद्धारच केला. अनुताप झाला पाहिजे, पश्चात्ताप झाला पाहिजे. पश्चात्ताप झाल्यानंतर, शिक्षण कमी असले, ज्ञान कमी असले तरी सुद्धा आणखी त्याचा उद्धार होतो आहे.

ही दोन चरित्रे इथे सांगितली आहेत. त्रिविक्रम भारतींचेही चरित्र सांगितलेले आहे आणि या दोन्हीही वेदशास्त्रज्ञ विप्रांचे चरित्र सिद्धांनी नामधारकाला सांगितले आहे. त्रिविक्रम भारतींचा अहंकार दूर केला. त्यांची बुद्धी शुद्ध केलेली आहे. कर्मनिष्ठ आहेत. स्वधर्माने वागताहेत. फक्त आपल्याला बोलले असतील ते. देवाला बोलले. पण तो दोष नाही मानला त्यांनी. त्यांची खरी योग्यता मोठी आहे. वैराग्य संपन्नता आहे. सगळे आहे. हा अहंकार तेवढा दूर केला. स्वतः त्यांची बुद्धी शुद्ध केली. त्यांना काही शाप दिला नाही काही नाही. पण ज्या अहंकारामुळे समाजातील सर्वांतर्यामी परमेश्वराचाच द्वेष ज्यांनी केला, सर्वांना तुच्छ लेखले तो अहंकार दूर करण्यासाठी महाराजांनी त्यांना शासन केले.

हा देह सोडायलाच पाहिजे, म्हणाले, तुम्हाला. या देहात राहून आणखी काय अनर्थ तुम्ही कराल सांगता येत नाही. सगळे विद्वान गेले. त्रिविक्रम भारतींसारख्या संन्याशाच्याही मागे लागलात तुम्ही. नाही, हा तुमचा देह राहाणार नाही. म्हणून अनुताप ज्या ठिकाणी झाला तिथं क्षमा आहे, आणि ज्या ठिकाणी अनुताप नाही, तिथं शासन आहे. ईश्वराचे शासन म्हणजे सर्व

लोक महेश्वरम् म्हणतात. ते शासन कुणीही चुकवू शकणार नाही. अशा दोन कथा सांगितल्या आहेत.

याच्या नंतर आता पुढची कथा आहे. मोठा विचार ! गुरूचरित्रामध्ये एकेक विषय मांडले आहेत नामधारकांनी. सिद्धांच्या मुखातून त्यांना हे चरित्र ऐकायला मिळालेले आहे. कसं वागावं माणसांनी, बुद्धी कशी ठेवावी, कोणची बुद्धी योग्य आहे, कोणची अयोग्य आहे हे काही स्वतःच्या बुद्धीने समजत नाही आपल्याला. तेव्हां हे सगळं समजावून देण्याकरता ही चरित्रं आहेत. त्या पतिताला आपल्या सातव्या मागच्या जन्माचे ज्ञान झाल्यावर त्याच्याही बुद्धीत अभिमान निर्माण झालेला आहे. तो अभिमान वास्तविक दूर व्हायला पाहिजे, कारण त्या गर्विष्ठ ब्राह्मणांची काय अवस्था झाली हे त्याने डोळ्याने पाहिले आहे. ह्रदयक्रिया बंद पडून त्यांना मृत्यू आला. ते ब्रह्मराक्षस झाले. तो यवन राजा त्यांचे संरक्षण करू शकला नाही. हेही त्याने पाहिले. परंतु त्याच्याही मनात अशा प्रकारचा एक अहंकार निर्माण झाला.

खरं आहे. कारण त्याला ज्ञान मिळाले आहे ना ! त्यांच्याशी वादविवाद करायला तयार झाल्यावर हा पतित जेव्हां त्या दोन ब्राह्मणांना म्हणाला की मला सगळं समजतंय, ज्ञान आहे तेव्हां ते दोघे घाबरले. याच्याजवळ जर खरे ज्ञान नसते तर ते कशाला घाबरले असते ? पण ते ज्ञान या देहातले नाहीये. हा देह वेगळा आहे. बुद्धीचा संबंध वेगळा आहे. तेव्हां बुद्धीच्या संबंधाने तसा देहही जर असेल तर त्या देहाला विशेष महत्व आहे. परंतु देहाला तो विसरून गेलेला आहे. आणि आपली बुद्धी श्रेष्ठ आहे असे तो सांगतोय. तसा आग्रह धरतोय. युक्तीवादात तर तो आता तयारच झाला आहे. त्या ब्राह्मणांच्या बरोबर

वादविवाद करण्यासाठी मिळालेल्या बुद्धीच्या जोरावर तो आता यांच्याशी वादविवाद करणार. ज्ञान झाल्यानंतर मला काही दोष नाही असे तो सांगतोय. मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पण शास्त्र सिद्धांत आपण समजून घेतले पाहिजेत.

शास्त्र किंवा शास्त्रज्ञ गुरू यांच्याजवळ काही पक्षपात नाहीये. न्यायाधीश, आरोपी दोषी असेल, सिद्ध झालं तर शासनही करतो, निर्दोष आहे असे सिद्ध झाले तर सोडूनही देतो. खरोखर आरोप सिद्ध झाल्यावर त्याने जर शिक्षा केली तर त्याने पक्षपात केला असे म्हणायचे नाही. खून केला म्हणून फाशीची शिक्षा दिली, ती काही न्यायाधीशाने द्वेषाने दिलेली नाही. चांगल्या कर्माचे चांगले फळ आहे. पण वाईट कर्माचे फळ भोगत असतानाही सन्मार्गाने जाऊन पुन्हा उन्नती होऊ शकते.

भगवत् भक्तीच्या मार्गाने जाणाऱ्यांना आपण हीन आहोत वगैरे कांही वाटत नाही. चोखामेळा, रोहीदास अशाप्रकारचे पुष्कळ भगवत् भक्त झाले आहेत. प्रल्हादजी म्हणतात, परमेश्वरापासून विन्मुख असणाऱ्या विप्रापेक्षा, भगवत् भक्त हरिजन अधिक श्रेष्ठ आहे. ईश्वराला अधिक प्रिय आहे. हा देखील निर्णय शास्त्रकारांचा आहे. शास्त्राची आज्ञा म्हणजे ईश्वराचीच आज्ञा आहे. ती आज्ञा चुकीची आहे असे आम्ही आमच्या बुद्धीने सांगू शकत नाही. कोणीही सांगू शकणार नाही. चूक कशी दाखवायची ते केवळ युक्तीवादाने सिद्ध करता येत नाही. युक्तीवादसुद्धा पुष्कळ आहेत.

उन्नती शब्दाचा अर्थ काय ? तो अगोदर समजावून घेतला पाहिजे. पैसा मिळणं, कीर्ती मिळणं, सत्ता मिळणं म्हणजे उन्नती झाली म्हणायचं का? खरी उन्नती कोणती आहे? शास्त्रीय उन्नती

कोणती आहे ? प्रिय कोणते आणि हित कोणते आहे हा विवेक झाला पाहिजे. आपल्या मनाला वाटते ते प्रिय आहे, पण हित त्याच्यापेक्षा निराळं आहे. या प्रियाचा आणि हिताचा आपण आपल्या बुद्धीने विचार केला तर तो बरोबर होत नाही, आपल्या बुद्धीच्या आधारे योग्य निर्णय घेता येत नाही. शाळेत न जाण्यात आपलं हित आहे, तेच आपलं प्रिय आहे असे वाटते मुलाला. पण त्यात मुलाचे खरे हित नाहीये. मग त्यावेळी त्या मुलाला दया दाखवायची का ? मुलगा रडतोय पण त्याकडे दुर्लक्ष करून त्याला मारून मुटकून शाळेत नेऊन सोडणारे आईबाप किती निर्दय आहेत असं म्हणायचं का ?

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,“ श्रुती ही जगाचे हित दाखवणारी माऊली आहे.” हिताचा विचार करण्याची बुद्धी आम्हाला मिळावी एवढीच प्रार्थना भगवंताजवळ करायची आहे.

वेदशास्त्रज्ञान मिळूनही, अहंकारामुळे त्या दोघा ब्राह्मणांनी इतरांचा अपमान केला. त्यांना काय शासन झाले ते सिद्धांनी नामधारकाला सांगितलं. स्वतः त्रिविक्रम भारती किंवा गुरूमहाराजांनी त्यांना काही उत्तर दिले नाही. वादविवाद करायचा नाही आणि संन्याशाने तर नाहीच नाही. ग्रंथाभ्यास नाही, वादविवाद नाही. त्रिविक्रम भारतींनी त्या दोघा ब्राह्मणांना गुरूमहाराजांच्या जवळ आणले. तिथे जाऊ या, ते सांगतील तसे करता येईल, म्हणाले.

मग त्या पतिताला बोलावून त्या दंडाने काढलेल्या सप्तरेषा आणि त्या त्याला ओलांडायला लावून त्याचे सातव्या जन्मात जे कमी कमी होत गेलेले ज्ञान आहे ते त्याला पुन्हा दिले. सातव्या जन्मापर्यंत मागे त्याची बुद्धी नेली. शरीर हेच आहे.

शरीर बदलत नाही. परंतु प्रत्येक जन्मामध्ये जे शरीर मिळालेले असेल, त्या शरीराचा अभिमान हा प्रत्येक जीवाला असतो. ही देहात्म बुद्धी प्रत्येक जन्मामध्ये आहे.

कोणता का देह असो, तो देह म्हणजेच ' मी ' आहे अशी बुद्धी घेऊनच, तो जन्माला आलेला आहे. त्याची ती बुद्धी पूर्वीच्या जन्मामध्ये त्या शरीरामध्ये होती. ज्ञान मिळालेले होते. परंतु ते ज्ञान दोषामुळे, सगळे गेले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा सगळ्या जन्मात ज्ञान कमी कमी होता होता या ठिकाणी तो आला आहे. पण पुन्हा त्याचे पूर्वीचे ज्ञान महाराजांनी त्याला मिळवून दिले. आता ते ज्ञान मिळाल्यानंतर पुढची हकीकत काय झाली, असं नामधारकाने विचारले. ज्ञान म्हटलें की अभिमान आला. सर्व वेदशास्त्रांचं ज्ञान त्याला झालेलं आहे म्हणून तर स्वतःला विद्वान समजणारे ते दोघेही ब्राह्मण घाबरून गेले आणि त्यांना शिक्षा झाली. याने महाराजांना विचारले, ब्राह्मण असताना माझा अधःपात का झाला ?

ब्राह्मण आहे म्हणजे आता ज्ञान तर आहेच आहे. ज्ञानामुळे तो ब्राह्मण आहोत असे समजतोय. त्या जन्मातली स्मृती आहे ती. तो देहाभिमान उत्पन्न झाला त्याला. आणि त्या ब्राह्मण देहात असताना ज्ञान मिळवल्याचाही अभिमान त्याला उत्पन्न झाला. मी असा जर ज्ञानी आहे मग हे ज्ञान गेलं कसं ? आता मिळाले पण मध्येच कसं गेलं ? असं त्याने विचारले.

मग महाराजांनी त्याला सांगितलं," याला कारण तुझं कर्म" पुण्य आणि पाप हे कर्माचे दोन भाग आहेत. त्याला धर्म आणि अधर्म म्हणतात. शरीराने होणारे, वाणीने होणारे, मनाने होणारे, स्वतः केलेले किंवा दुसऱ्याकडून करविलेले, अनुमोदन दिले

असलेले पुण्य अथवा पाप कर्म म्हणून धरले जाते. स्वतः न करता, दुसऱ्याकडून करविलं तरीसुद्धा दोष येतो.'कारयिता' असे कर्माचे अनेक प्रकार आहेत. सर्वही कर्मांचं फल शास्त्रप्रमाणाने सांगितलेलं आहे.

सृष्टी निर्माण करताना प्रत्येक जीवाची कर्मं हे एक कारण सृष्टी निर्मितीला आहे. ईश्वराला काही काम नाहीये का ? कशाला सृष्टी रचायची ? ही सृष्टीची रचना अशी का झाली ? वैषम्य, सृष्टीत का आहे हाही प्रश्न आहेच ना ! ईश्वर जर समर्थ आहे तर सगळेच जीव त्याने सुखी, श्रीमंत, ज्ञानी का करू नये ? तो असमर्थ तर नाही ना ! ईश्वराला इच्छाशक्ती जरी असली तरी स्वतःच्या इच्छेने काही सृष्टी रचना झाली नाही. जीवांचं कर्म हे सृष्टीला निमित्त आहे. प्रलयानंतर सृष्टी, सृष्टी नंतर पुन्हा प्रलय असं सारखं चालू आहे ना. जीव हे सृष्टीच्या उत्पत्तीपासून आहेत.

आधुनिक बुद्धीवादाला हे प्रलय, सृष्टीची निर्मिती वगैरे काही पटत नाही म्हणतात. परंतु कोणच्याही शक्तीचा ऱ्हास होतो, पुन्हा वृद्धी होते. बुद्धीच्या विकासासाठी कायदे वगैरे केले जातात. शिक्षणक्रम आखले जातात आधुनिक काळात. सर्वही लोकांना जास्तीत जास्त सुख मिळावं हा त्यात उद्देश असतो. पण तसे घडते का ? सर्वांची कर्मे जर सारखी असतील तरच तसे घडेल. सर्वांना सारखं सुख मिळेल. पण तशी सारखी कर्मं होऊ शकत नाहीत. शिक्षणामध्ये विविधता आहे. प्रत्येक शिक्षणाप्रमाणे, योग्यतेप्रमाणे नोकरी द्यायची हे वैषम्य आधुनिक बुद्धीवादाने मान्य केले आहेच ना ! काहीही शिक्षण न घेतलेल्या माणसाला लठ्ठ पगाराची नोकरी द्यायची असे शक्यच नाहीये.

कार्यच होणार नाही. नोकरी देताना त्याच्याकडून अपेक्षित जे कार्य आहे ते करण्याचे त्याला ज्ञान आहे की नाही ते पाहिले जाते. त्याप्रमाणे तो माणूस कार्य करतो. त्यातही पुष्कळ विषमता होते पण तो विचार आत्ता करायचा नाहीये. पण बुद्धीचं हे वैषम्य आधुनिक बुद्धीवादालासुद्धा मान्य करावे लागते कारण तसे कार्य चालले आहे ना ! सगळेच प्रधान मंत्री होत नाहीत किंवा सगळेच राष्ट्रपती होत नाहीत. शक्यच नाहीये ते.

प्रत्येकाला काही तरी कर्तव्याची जाणीव व्हायला पाहिजे की आपली उन्नती करून घेण्याकरता ही योग्यता आपण मिळवली पाहिजे. महाराजांनी हे सर्व समजावले. प्रत्येकाची वेगवेगळी कर्तव्ये वर्णाश्रमाप्रमाणे शास्त्राने नेमून दिली आहेत. त्यात पुण्यकर्म आहेत, पापकर्म आहेत. त्या सर्वही कर्मांचं फल म्हणजे सृष्टीची रचना आहे. ती सृष्टी रचना विषमच असली पाहिजे. सर्व कर्मं सारखी नाहीत, पुण्यंही सारखी नाहीत आणि सगळी पापंही सारखी नाहीत. कर्मांमध्येसुद्धा पुष्कळ फरक आहे. उत्तम पदवीधर झालेल्या प्रत्येकाची नैसर्गिक बुद्धी वेगळी आहे. सर्वच पदवीधर काही मोठ्या पदावर जाऊ शकत नाहीत. स्वतःच्या नैसर्गिक व अधिक बुद्धीमत्तेच्या जोरावर एखादा पुढे जातो. तर विविधता अपरिहार्य आहे. त्याशिवाय याचं उत्तरच देता येत नाही. नाहीतर ईश्वराला हुकुमशहा म्हणावं लागेल, वगैरे काही तरी नांवे ठेवायची आणि गप्प बसायचे असे करावे लागेल. सर्व शक्तीसंपन्न, सर्वज्ञ ईश्वर आहे ही अगोदर जाणीव व्हायला पाहिजे. सृष्टीचा विचार करताना हे सगळं लक्षात घेतलं पाहिजे. प्रत्येक गोष्टीला कायदा आहे ना ! त्याचप्रमाणे ईश्वराला जो कायदा आहे तो वेदशास्त्ररुप कायदा आहे. त्याचंही ज्ञान आणखी आपण करून घेतलं पाहिजे.

क्रियमाण कर्मं कशी करावीत, याकरिता हा विचार आहे. पूर्वी काय झालेलं आहे, त्याचा परिपाक कसा होईल, असा विचार आपल्याला करता येत नाही. पूर्व कर्मांचे आपल्याला स्मरण नाहीये. ते काय होईल ते होईल. पण यापुढे आपल्यात सुधारणा कशी करायची, दुःखाचा प्रतिकार कसा करायचा ते योगशास्त्रकार सांगतात. सध्या ज्याला पीडा आहे त्याला औषध घेतलंच पाहिजे. जितके दिवस बरे व्हायला लागतील तितके दिवस ते सोसलं पाहिजे. त्याला काही इलाज नाही. पण पुढे दुःख येऊ नयेत, त्यांचा परिहार व्हावा याबद्दल इथे मुख्य विचार मांडला आहे.

आता आपल्याला दुःख येऊ नयेत म्हणून दुःखाचे कारण काय, सुखाचे कारण काय हे समजून घेतले पाहिजे. ते समजल्यानंतर त्याप्रमाणे वागले पाहिजे. सुखाला पुण्यकर्म कारण असते, तर पापकर्मापासून दुःख उत्पन्न होते, असे शास्त्रकार सांगतात. आपण जर ते ज्ञान संपादन करून व्यवस्थित वागलो, या जन्मामध्ये चांगले क्रियमाण निर्माण केले, तर पुढे उन्नती होऊ शकेल, चांगले सुख मिळू शकेल. पापकर्मापासून बुद्धीला परावृत्त करायचे हा खरा ज्ञानाचा उपयोग आहे. कारण त्याची फळे पण सांगितली आहेत ना सगळी ! नुसतेच नरकामध्ये जावे लागते असे नाही तर नरकवास संपल्यावर शिल्लक राहिलेल्या पापकर्माचे फळ भोगण्याकरता पुन्हा जन्म घ्यावा लागणार. आता तो जन्म कोणता येईल याचा नेम नाही. कोणच्याही शरीरामध्ये आले की दुःखाचा संबंध आलाच. नरकामध्ये काही दुःख असेल, स्वर्गामध्ये काही सुख असेल परंतु ती सुखं दुःखं संपली, म्हणजे जन्म संपला असे नव्हे. अनंत जन्मांच्या कर्माचे

फळ म्हणजे सृष्टी जोपर्यंत आहे तोपर्यंत हे चक्र चालूच राहाणार. प्रलयाच्या वेळेस ती सगळी कर्मे स्थगित होतात. सर्वही सृष्टीचं कार्य थांबलेले आहे. कर्मांचं फळ म्हणजे सृष्टी अगदी थांबली सध्या. पुन्हा सृष्टीच्या रचनेच्या वेळेस ती सगळी कर्मे पाहून सृष्टी करण्याचे कार्य चाललेले आहे.

तर त्या पतिताला सांगताहेत महाराज- कर्म हे कारण आहे. हे जे सारखं भ्रमण चाललेलं आहे, संसार म्हणजे सारखं भ्रमण चाललेलं आहे. या जन्मातून पुढच्या जन्मात. हा देह सोडायचा दुसरा देह धारण करायचा, हे एखाद्या यंत्राप्रमाणे सतत चालू आहे. त्या पुण्यपापाने तशा प्रकारची कर्मं पुन्हा पुन्हा होत आहेत. शास्त्रज्ञान संपादन करून शास्त्रज्ञ पुरुष, महात्मे यांची संगती मिळून ज्ञान मिळालं तरी संगतीही चांगली मिळाली पाहिजे. त्यांचं आचरण पहायला मिळायला पाहिजे, उपदेश ऐकायला मिळाला पाहिजे. प्रकृतीच्या आधीन जीवाची सर्व कर्मे आहेत.

अर्जुनाने आरंभाला पुष्कळ सांगितले, मला हे पसंत नाही, हे युद्धकर्म भयंकर आहे, सगळ्यांना मारायचं, हिंसा करायची, हा काय धर्म झाला ? असला कसला क्षत्रियांचा धर्म ? म्हणजे त्याला शास्त्रही मान्य नाही किंवा भीष्माचार्यांसारखे मोठे धर्मज्ञ युद्ध करायला आले तेही पसंत नाही. शास्त्रज्ञ पुरुषांचा आचारही त्याला मान्य नाही. आपल्या बुद्धीनेच त्याने धर्माधर्माचा विचार करून, ' मला युद्ध करायचे नाही ' असे ठरविल्यावर भगवान् म्हणाले,' नाही, तू युद्ध सोडून जाऊ शकणार नाहीस. ' हेही त्याला मुद्दाम बजावलेलं आहे.

उपदेश अनेक प्रकारचे आहेत. जीव जो आहे त्याची कर्मं

त्याच्या बुद्धीने होतात असे नाहीये. त्याची जशी प्रकृती असेल, जसे संस्कार बुद्धीमध्ये असतील, वासना असतील त्याच्या आधीन त्याची कर्मं आहेत म्हणून बुद्धीमध्ये चांगले संस्कार करावेत, सात्विक बुद्धी बनवावी. राजस, तामस बुद्धी जर असेल तर त्याचं निरसन करावं. याकरता तर मनुष्य जन्मामध्ये प्रयत्न करायला सांगितला आहे ना ! सगळे पुढे मांडून ठेवलेले आहे. आणि समजून घेण्याकरता बुद्धी दिलेली आहे. त्या बुद्धीने ते समजून घेऊन त्याच्यातले काय सोडायचे आणि काय घ्यायचे हे समजले पाहिजे आणि त्याकरता मार्गदर्शक महात्म्यांची संगती घडली पाहिजे. प्रत्यक्ष महात्म्यांची संगती घडण्यासाठी पुष्कळ पुण्य पाहिजे.

ज्ञानेश्वर, एकनाथ महाराजांची संगती आपल्याला कशी घडायची आणि त्यांच्या काळात ज्यांना ती संगती घडली ते सगळे थोडेच मुक्त झाले ! सर्वांची बुद्धी सुधारणे शक्य नाहीये. सज्जनांच्या संगतीने बुद्धीचे संवर्धन होते, हे मान्य करायला पाहिजे आपल्याला, ' संसर्गजा दोषगुणा भवन्ति ' हा सिद्धान्त कोणत्याही काळात मान्य केला पाहिजे. दोषी पुरुषाचा जर संसर्ग असेल तर दोष वाढतील. ज्ञानेश्वर, एकनाथांचा सत्संग घडूनही ज्यांचा उद्धार झाला नाही त्याबद्दल त्या संतांना दोषी धरायचे का ? वास्तविक त्यांनी किती तरी उपदेश करून ठेवलेला आहे. तो उपदेश ऐकणे, त्यावर चर्चा करणे, ही सोयही त्यावेळेला होती. ज्याला खरोखर जिज्ञासा असेल, त्याने ज्ञानेश्वरी वाचून आपल्या शंकांचे समाधान प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराजांना विचारून सुद्धा तो करू शकला असता. पण हे असे घडते कुठे ? जिज्ञासाच उत्पन्न होत नाही. वाचून काय

करायचे, सोडून द्यायचे. हे आपल्या बुद्धीमधले दोष आहेत. आपले कर्म सुधारण्यासाठी आधी आपल्याला ज्ञान व्हायला पाहिजे. पण हे ज्ञानच अगोदर होत नाही आणि त्यामुळे कर्म सुधारत नाही. म्हणून प्रकृती बदलायची आहे.

राजस, तामस अशी जी आमची प्रकृती झाली आहे त्या प्रकृतीचे रुपांतर म्हणजे बुद्धीतत्व आहे. ही जी बुद्धी आहे, तीच प्रकृतीचं रूप आहे. त्या बुद्धीची सुधारणा करायची आहे. तो बुद्धीविकास कसा करून घ्यावा हे समजण्याकरता सज्जनांचा आश्रय सांगितला आहे. कायद्याचे ज्ञान काही सगळ्यांना नसते. वकील आपल्याला कायद्याचा अभिप्राय काय आहे, अनुकूल आहे की प्रतिकूल आहे, हे संदर्भाप्रमाणे सांगू शकतो. आपल्याला त्याची मदत घ्यावी लागते. वकील आपली बाजू मांडतो आणि मग न्यायाधीश त्याप्रमाणे निर्णय देतो. आरोप खरा आहे की खोटा हे सिद्ध करायचे काम वकिलाचे आणि तो ते कायद्याप्रमाणे करत असतो.

तशी महात्म्यांची संगती आपल्या बुद्धीची सुधारणा व्हावी, विकास व्हावा म्हणून जरुरीची आहे. पुण्य पापात्मक कर्म समजून घेतलं पाहिजे. ती समजूत, तो निश्चय पक्का व्हायला पाहिजे. योग्य रीतीने वागलो नाही, तर नरकात जावे लागेल, हे सुद्धा पक्के समजले पाहिजे. आणि त्याप्रमाणे आपल्या बुद्धीवर संस्कार व्हायला पाहिजेत, म्हणजे आपोआप आपलं अंतःकरण, इंद्रिये वगैरे चांगल्या कर्माकडे प्रवृत्त होतात. सज्जनांच्या कृपेने, जीवाच्या जिज्ञासेने, त्याच्या प्रयत्नांनी आपली बुद्धी चांगली रहावी म्हणून प्रयत्नशील असतात, मोठे मोठे लोक. तेव्हां उर्ध्वगती किंवा अधोगती ही जीवाच्या कर्माचं फल आहे. जीव

हा कर्मामुळे त्याच्या बुद्धीवर झालेल्या संस्कारांच्या आधीन आहे. त्यामुळे तीच कर्मे पुन्हा होतात. त्या संस्कारांची सुधारणा झाली म्हणजे कर्मामध्येही सुधारणा होते. अशा रीतीने महाराजांनी त्याला निरनिराळ्या कर्मांची काय फले आहेत, समजावले.

८४ लक्ष योनी आहेत. सृष्टी इतकी प्रचंड आहे. धान्य म्हणतो आपण नुसतं पण धान्यातसुद्धा किती जाती आहेत. आंब्याच्या किती जाती आहेत. तांदुळाच्या, गव्हाच्या किती जाती आहेत. आणि हे सगळेही स्थावर जीव आहेत असे म्हणतात. अत्यंत परतंत्रता या स्थावर योनीत आहे. वृक्ष हीसुद्धा एक योनी आहे. वृक्ष हा सुद्धा एक जीव आहे. सर्व योनींमध्ये स्थावर योनी ही शेवटची योनी आहे. ईश्वराच्या सृष्टीचा हा एक विशेष आहे. जेवढे दोष झाले असतील, पापे झाली असतील त्या सर्वही पातकांचं फल त्याला मिळतं.

व्यवहारात एक खून करणाऱ्याला फाशीची शिक्षा दिली की झाले असे समजतात. पण मग ज्यांनी ५/१० खून केले असतील त्यांना बाकीच्या खुनांबद्दल माफ केले असे समजायचे का ? काय उत्तर देणार ? बाकीच्या खुनांबद्दल शिक्षा कधी देणार ? आणि कशी देणार ? पहिल्यांदा फाशी देऊन त्याचे ते दोष गेले असे मानावे लागेल.

ईश्वराच्या सृष्टीमध्ये जी कर्मशक्ती मानली आहे तिच्यामुळे जीवाला जन्म मिळतो. नरकामध्ये जाणे हे तर पापकर्माचं फळ आहेच, पण त्यातूनही पुन्हा उरलेले दोष आहेत ते भोगण्याकरता, पुन्हा जन्माला जावे लागते. अशा जन्मात काय भोग भोगावे लागतात, कोणते रोग होतात त्याचंही वर्णन शास्त्रामध्ये केलेलं आहे. प्रत्येक पापकर्माचे वर्णन केलेले आहे.

महाराज स्वतः सांगताहेत, १. ब्रह्महत्या करणारा क्षयरोगी होतो. २. सुवर्ण चोरी करणारा कुष्ठरोगी होतो, ३. पुस्तकांची चोरी करणारा जन्मांध होतो, ४. विश्वासघातकी जन्मांध होतो, ५. ट्रस्टी होणं फार कठीण काम आहे. सर्वांच्या गणद्रव्याची व्यवस्था पहावी लागते. ती अत्यंत अर्थशुचित्वाने झाली पाहिजे. अर्थशुद्धी ही सर्वात महत्वाची आहे असे स्मृतिकार सांगतात. अर्थशुद्धी ज्याच्याजवळ आहे तोच खरा शुद्ध आहे. नुसतं बाहेरून शरीराला साबण लावणं ही शुद्धी नाही. तर गणद्रव्य चोरणाऱ्याला गंडमाळा होतात. औषधाने सगळेच रोग बरे होतात असे नाही. औषध देणारा ज्ञानी असताना जेव्हां एखादा रोगी बरा होत नाही पण बाकीचे मात्र बरे होतात तेव्हां डॉक्टर चुकला असे म्हणता येत नाही. ते औषधाचं शास्त्र चुकलं, असं म्हणता येत नाही. ज्या औषधाने एक रोगी बरा झाला, त्याच औषधाने तशाच प्रकारचा दुसरा रोगी का बरा होऊ नये ? म्हणजे हे त्याच्या पूर्व कर्माचं काही तरी फळ आहे असेच मानावे लागेल.

असे अनेक दोष सांगितले महाराजांनी आणि शेवटी त्या पतिताला सांगितले की कनक आणि कांता यांच्या संबंधांनी फार मोठा दोष उत्पन्न होतो. त्रिविक्रम भारतींनी विचारले, ' हे दोष दूर होण्याकरता काय उपाय आहे ? ' महाराज म्हणाले, 'आहेत त्याला काही प्रायश्चित्तं सांगितली आहेत शास्त्राने. अवताराचे हेच प्रयोजन आहे. आचार, व्यवहार आणि प्रायश्चित्त.' आचार कसा असावा हे महाराज शिकवीत आहेत. व्यवहार कसा करावा हे शिकवीत आहेत. ते प्रायश्चित्त कोणतं घ्यावं, काय घ्यावं हे समजावण्यासाठी अवतार झाले आहेत.

आपण केलेल्या अपराधाबद्दल जर आपल्याला पश्चाताप

झाला, तर आपण शुद्ध होतो. संसारासक्त माणसाला संतांची भेट होऊन त्यांच्या उपदेशाचा मनावर परिणाम झाला आणि, 'आपलं आयुष्य फुकट गेलं, आता माझा उद्धार कसा होईल,' वगैरे विचारांनी पश्चाताप होऊन वैराग्य उत्पन्न झालं तर त्याचे संस्कार बदलतात आणि तो चांगल्या मार्गाने जातो. अजामेळाने विष्णुदूत आणि यमदूतांचा संवाद ऐकला. संतांची संगती लाभली आणि मनावर परिणाम होऊन वैराग्य उत्पन्न झालं. हरिद्वारला तो गेला आणि भगवंतांचे नामस्मरण करून, तपश्चर्या करून तो मुक्त झाला. त्याचा सगळा जन्म पापकर्म करण्यामध्ये गेला होता. पण प्रायश्चित्ताने त्याची शुद्धी झाली. प्रायश्चित्ते निरनिराळ्या प्रकारची आहेत. प्राणायाम करणे, तीर्थस्नान करणे, निरनिराळी दाने देणे, गायत्री जप, यज्ञ याग वगैरे अनेक प्रकारची प्रायश्चित्ते आहेत.

मद्यपान हा भयंकर दोष शास्त्रकारांनी महापापांमध्ये एक सांगितला आहे. पण आता तर सुरापान करणे एवढं अंगवळणी पडलय लोकांच्या की त्याला पाप कोणी समजतच नाही. त्याचा ज्या अवयवाला स्पर्श होईल तो अवयव तोडून टाकावा असं शास्त्रात सांगितलं आहे. एक लक्ष गायत्रीच्या जपाने तो दोष जातो पण त्याचबरोबर पश्चात्तापही पाहिजे. नाहीतर जप करून पुन्हा सुरापान करायला मोकळे असं होऊ नये.

सात लक्ष जप केला तर सुवर्ण चोरीचा दोष जातो. दोष परिहारासाठी अनेक वेदमंत्र आहेत. त्या मंत्राचा जप विधिपूर्वक झाला, तर निश्चित फल मिळते. शरीराची आसक्ती कमी झाल्याशिवाय प्रायश्चित्त कमी होऊ शकत नाही. त्यासाठी चांद्रायण व्रत सांगितलय. शुक्लपक्षाच्या प्रतिपदेला एक घास घ्यायचा,

द्वितीयेला दोन घास घ्यायचे, तृतीयेला तीन असे पौर्णिमेला १५ पर्यंत न्यायचे मग कृष्णपक्षात पंधरा, चौदा, तेरा या उलट्या क्रमाने कमी कमी करीत आणायचे. याच्या योगानेही शुद्धी होते. आमच्या शरीराला आहाराची किती सवय झाली आहे ! दर दोन तीन तासांनी आम्हाला काही तरी खायला लागते.

त्यानंतर पंचगव्य प्रायश्चित्त आहे. गोमय, गोमूत्र, दूध, दही आणि तूप एकत्र केले की पंचगव्य होते. त्यात दर्भोदक मिसळून हवन करायचे आणि पंचगव्य प्राशन करायचे. त्यामुळे सर्वही पातकांची शांती होते. अशा सगळ्या पातकांचे महाराजांनी त्याला वर्णन करून सांगितले आणि शेवटी म्हणाले की ही सर्व प्रायश्चित्त कर्मं वेदांनीच सांगितली आहेत. पण प्रायश्चित्त घेणारा जर हरिचा भक्त नसेल तर त्याला ही कर्मे पवित्र करू शकणार नाहीत. कर्मकांडालासुद्धा भक्तीचं सहाय्य सांगितलं आहे. कर्म आणि भक्ती यांचा समुच्चय असला पाहिजे. असा शास्त्र सिध्दांत आहे. याप्रमाणे त्रिविक्रम भारतींना हे सगळे विधी, महाराजांनी समजावले.

आता तो जो पतित होता-स्वतःला ब्राह्मण, ज्ञानी समजणारा त्याने जो प्रश्न विचारला होता त्याला महाराज उत्तर देत आहेत. ते म्हणाले, पूर्वीच्या जन्मात आईवडिलांचा त्याग करून तू दुसरीकडे जाऊन राहिलास. ह्या तुझ्या दोषामुळे तुला हा पतिताचा जन्म मिळाला. त्याच्याकरता प्रायश्चित्त म्हणजे भीमा अमरजा संगमावर महिनाभर श्रध्देने तू स्नान कर म्हणजे पुढच्या जन्मात तू विप्र होशील.

आता याला ते कसं पटणार ? त्याला आता सर्व वेदशास्त्राचे ज्ञान प्राप्त झालंय. वास्तविक महाराज त्याला जे काही सांगताहेत

ते काही आपल्या बुद्धीनं, स्वतंत्र कल्पनेने न सांगता वेदशास्त्राप्रमाणे सांगताहेत. तरीही स्वतःच्या सोयीकरिता त्याने महाराजांनाच उलट प्रश्न केला," तुमच्या दर्शनाने, कृपादृष्टीने मी जर पवित्र झालोय, इतकी योग्यता मला मिळालीये, मग मला ब्राह्मण म्हणायला काय हरकत आहे?"

त्या वेळी,“ तुला सगळं माहीत आहे, तू सगळं समजतो आहेस,” असं काही सांगितलं नाही महाराजांनी. ‘ तुझा देह हा वेगळा आहे,’ ते म्हणाले,“ देहाच्या आश्रयाने जात वगैरे सगळं असतं. आत्मस्वरुपाला काही जात नाही, काही नाही. परंतु आत्म्याने जो देह धारण केला आहे त्या देहाप्रमाणे त्याला वागावे लागते. तेव्हा ज्या जातीत तू जन्मला आहेस, वाढला आहेस त्याप्रमाणे तुला वागलं पाहिजे.” या संबंधात महाराजांनी त्याला विश्वामित्राची कथा सांगितली.

विश्वामित्राला ब्रह्मर्षी व्हायची इच्छा निर्माण झाली.“ मी तपश्चर्या करून, प्रयत्न करून ब्रह्मर्षी होणार"असे तो म्हणाला. तो मोठा निग्रही होता. सर्व देवांनी त्याला सांगितले की जर वसिष्ठांनी तुला ब्रह्मर्षी म्हटलं तरच आम्ही मान्य करु. मग तो वसिष्ठांकडे आला. वसिष्ठ म्हणाले,“ या जन्मात तपश्चर्या कर म्हणजे पुढचा जन्म ब्राह्मणाचा मिळेल.”हे ऐकल्यावर तो रागवला. त्याने वसिष्ठांची सर्व मुले मारली आणि वसिष्ठांना मारायला तो आला. पण त्याच्या मनात विचार आला की यांना जर मारलं तर आपल्या हातून ब्रह्महत्या घडेल आणि मग आपल्याला ब्रह्मर्षी कोण म्हणणार? म्हणून तो शेवटी तपश्चर्येला निघून गेला. पण साठ हजार वर्षे तप झाल्यावर इंद्राने मेनकेकरवी त्याचा तपोभंग केला. मग त्याने निश्चयाने परत तपश्चर्या

करून आपले क्षात्र शरीर दग्ध करून टाकलं आणि नवीन शुद्ध शरीर धारण केलं आणि मग वसिष्ठांनी त्याला ब्रह्मर्षी म्हटलं.

महाराज त्याला म्हणाले," जा घरी. पुढच्या जन्मात तू ब्राह्मण होशील." तरी तो ऐकत नाहीये. त्याने विचारले," लोखंडाचे परिसाने एकदा सोने झाल्यानंतर, त्याचे पुन्हा लोखंड कसे होईल?" युक्तिवाद काय कोणालाही करता येतो. हा युक्तिवादाचा विषय नाही. कर्माची अशी शक्ती आहे. त्यानुसार हे सगळे घडणे ठरलेले आहे ना ! जन्मांतराचा हा सगळा विषय आहे. कोणत्या कर्माने काय होते, हे सगळे अतींद्रिय आहे. आपल्या इंद्रियांनी आपला दृष्टांत देऊन ते काही समजावून घेण्याचा विषय नाहीये.

तो ऐकत नाही पाहिले महाराजांनी. मग सांगितले आपल्या शिष्यांना,"गांवातल्या कोणी दुकानदाराला पाणी घेऊन येऊन ते पाणी याच्या अंगावर ओता." ते पाणी त्याप्रमाणे त्याच्या डोक्यावरून ओतले आणि एकदम त्याची बुद्धी बदलली. इतका वेळ हा महाराजांशी वादविवाद घालत होता. बायका मुले बोलवायला आली तर हा म्हणतो," मला शिवू नका, तुमचा माझा काही संबंध नाही." ती मंडळी महाराजांना विनवू लागली याला काहीतरी समजावून सांगा. महाराज म्हणाले,"अरे तुझा विवाह झाला आहे, त्यांच्याबरोबर जाणार नाही असं कसं म्हणतोस?" पण पाणी अंगावर ओतल्यावर, त्याचे ज्ञान नाहीसे झाल्यावर मात्र तो आपल्या बायको मुलांबरोबर घरी निघून गेला.

त्रिविक्रम भारतींना आश्र्चर्य वाटले. ते महाराजांना म्हणाले,"महाराज केवढं दिव्य ज्ञान आपण त्याला दिलं होतं !"

पण ही सुद्धा शक्तीच आहे ना ! ‘ ज्ञान दिले ’ याचा अर्थ त्याचे स्मरण करून दिले. प्रलयाच्या वेळेला सगळा प्रलय होतो. पुन्हा सृष्टी रचना करण्याच्या वेळेला ब्रह्मदेवांना संपूर्ण वेदांचे ज्ञान आणखी भगवंतांपासून प्राप्त होते. नवीन उत्पन्न होत नाही. वेद नवीन केले नाहीत. पूर्वी जशी सृष्टी होती तशीच सृष्टी पुन्हा होते.

तर हे ज्ञान त्या पतिताला मान्य होईना ! महाराजांनी त्याला सांगितले,“ एक महिन्यानंतर तू मुक्त होशील.” पण तो ऐकेना. शास्त्र मर्यादा बुद्धीवादाच्या पलिकडच्या आहेत. बुद्धीनेच निर्णय करायचा म्हटला तरी, आपल्या बुद्धीला जे वाटतं तेच बरोबर आहे, असे वाटले, तर काय ? सांगणारे सज्जन महात्मे, ज्यांना अतिंद्रिय ज्ञान आहे त्यांची सुद्धा बुद्धी आम्हाला मान्य होत नाही. एक आग्रह असतो. आमच्या बुद्धीला वाटतं तेच बरोबर आहे असं वाटतं आम्हाला.

वास्तविक पाहता त्या पतिताचा उद्धार होण्याची वेळ आली होती. महाराजांनी त्याला, ‘ तू मुक्त होशील, ’ असे सांगितले होते. शास्त्रीय दृष्टीने तो या जन्मातून कायमचा मुक्त होणार होता. परंतु त्याची बुद्धी फिरली. स्त्री पुत्रांना तो सोडायला लागला. म्हणजे विचित्रच परिस्थिती निर्माण झाली. त्या दोन ब्राह्मणांना याच्या द्वाराने शासन केले, तर हा घरदार सोडायला लागला. म्हणून महाराजांना ते करावे लागले. त्रिविक्रम भारतींनी महाराजांना विचारले,“ महाराज, इतकं ज्ञान मिळालं असता नुसतं स्नान घातल्यावर ते गेलं कसं ?”

महाराजांनी त्यांना काही त्याचे कारण सांगितले नाही. त्यांनी एक वेगळाच विषय मांडला. महाराजांनी स्वतःकडे काही श्रेय

घेतले नाही. ते म्हणाले,"आम्ही भस्म अभिमंत्रण करून त्याच्या अंगावर टाकलं. त्या भस्माच्या प्रभावामुळे त्याला हे ज्ञान झालं." मागे सुद्धा कुरवपुरातील त्या स्त्रीला शनिप्रदोष व्रत करण्यास सांगितले. कर्म त्या जीवाकडून करवून घ्यायचे आणि फल मिळाले की ते ईश्वरकृपेने त्याला मिळाले असं दाखवायचे. महात्म्यांच्या कृपेचे फल आहे. अशी बुद्धी होऊ देत नाहीत ते. हीच त्यांची माया मोठी विलक्षण आहे.

पण महाराजांनी त्रिविक्रम भारतींना सांगितले की,"हा सगळा भस्माचा परिणाम आहे." भस्माचे महात्म्य शास्त्रामध्ये वर्णन केले आहे. त्याची एक कथा महाराजांनी सांगितली. वामदेव नावाचे एक मोठे ऋषी क्रौंच वनामध्ये संचार करीत होते. त्या वनामध्ये एक भयंकर ब्रह्मराक्षस रहात होता. त्याची तहान भूक कधीच शांत व्हायची नाही. जे काही मिळेल ते तो भक्षण करायचा. वामदेवांना पाहिल्यावर त्यांना खायला आला तो. पण त्यांच्या शरीराचा स्पर्श झाल्याबरोबर त्याची एकदम बुद्धी पालटली. सृष्टीमध्ये असेही काही पदार्थ आहेत. असेही महात्मे जगामध्ये आहेत की ज्यांच्या शरीराचा स्पर्श किंवा केवळ त्यांच्या दृष्टीपातानेही बुद्धीचे परिवर्तन होऊ शकते. हे सगळे धर्माचरणाचे, त्यांच्या तपाचे सामर्थ्य आहे.

तेव्हा वामदेवांच्या शरीराचा स्पर्श झाल्यावर तो राक्षस एकदम शांत झाला. त्याची क्षुधा, तृषा गेली. त्याला त्याच्या पूर्वजन्माचे स्मरण झाले. जसे त्या पतिताला आपल्या सात जन्माचे स्मरण महाराजांनी करून दिले तसे या राक्षसाला त्याच्या पंचवीस जन्मांचे स्मरण ऋषी महाराजांनी करून दिले. तो म्हणाला," पंचविसाव्या जन्मात मी दुर्जेय नावाचा राजा आहे."

अमर्याद सत्ता व संपत्ती आहे. निग्रह वगैरे काही नाही. सत्ता संपत्ती असल्यानंतर निग्रहाकडे बुद्धी जाईल कशी ? देवांचा उद्धार होतो की नाही, देवांना परमार्थाचा अधिकार आहे की नाही असा एक विचार मांडला आहे, सूक्त भाष्यामध्ये. अधिकार आहे पण फार कमी. कारण सगळी अनुकूलता आहे ना ! पुण्याचं फल भोगण्याकरताच ते देव आलेले आहेत. सगळी अनुकूलता असल्यामुळे ते भक्तीमार्गाकडे वळतीलच कशाला? या सुखापेक्षा दुसरे सुख आहे याची त्यांना कल्पनाच येत नाही. या सुखाबद्दल वैराग्यही उत्पन्न होत नाही. मनुष्यांच्या आणि देवांच्या सुखामध्ये कितीतरी अंतर आहे.

स्वर्ग सुखाची व्याख्या शास्त्रकारांनी केली ' दुःख बिलकुल नाही. उत्तम सुख आहे. दुःखाचा काळच येणार नाही.' दुसरे असे की कोणतीही इच्छा मनात यायचा अवकाश की ती लगेच पूर्ण होतेय. असे असताना हे सुख चांगले नाही, नश्वर आहे हे सोडून ईश्वराचे भजन करावे अशी इच्छा होईलच कशी ? सर्व अनुकूल परिस्थिती असताना वैराग्य उत्पन्न होणं ही एक स्वतंत्र ईश्वराची कृपा आहे. सुदामजींना पूर्वी वैराग्य प्राप्त झालेलेच होते. घरात अत्यंत दारिद्र्य. पुढे भगवान् श्रीकृष्णांच्या प्रसादाने सगळी अनुकूलता मिळाली. सर्व ऐश्वर्य मिळाले पण त्यांच्या मनातले वैराग्य गेले नाही ही खरी कृपा आहे.

**सगुण सुंदर पतिव्रता अनुकूल मिळालीया कांता ।**
**जो विसंबेना भगवत् कथा ।**
**भागवत् मुख्यतः त्यासी होवो ।**
**झालीया ही राज्य संपत्ती ।**
**जो विसंबेना भगवत् भक्ती ।**

नाथ महाराज सांगताहेत. राज्य संपत्ती मिळूनसुद्धा जो भगवंतापासून दूर होत नाही. तो खरा कृपावंत आहे.

हा ब्रह्मराक्षस सांगतोय की माझा अनेक स्त्रियांशी संबंध आला. माझ्या भीतीने राज्यातले लोक आपल्या स्त्रियांना घेऊन दुसऱ्या राज्यात गेले. तारुण्यामध्ये विषयासक्त मन झाले की काळाचे भान रहात नाही. पुढे काय होणार याची कल्पना येत नाही. पुढे मला अनेक रोग झाले. शत्रूने हल्ला करून राज्य हिरावून घेतले, नंतर मला मृत्यू आला. नरकवास भोगावा लागला. निरनिराळे जन्म मिळाले- प्रेत, वाघ, अजगर, लांडगा, डुक्कर, सरडा, कुत्रा, असे भोगता भोगता हा शेवटचा जन्म ब्रह्मराक्षसाचा मिळाला.

क्षुधा, तृषा मला इतकी होती की ती कधीही शांत होत नसे. आपल्याला खाण्याकरिता म्हणून मी आलो आणि माझी चित्तवृत्ती, क्षुधा, तृषा एकदम शांत झाली. हे कसे झाले महाराज ?

‘ मी मोठा आहे, हे माझे सामर्थ्य आहे, ’ असे वामदेवांनी त्याला उत्तर दिले नाही. समर्थ लोक आपले काही सांगत नसतात. वामदेव त्याला म्हणाले, हा सगळा भस्माचा प्रभाव आहे. माझ्या शरीराला लावलेल्या भस्माचा तुला स्पर्श झाला आणि त्यामुळे तुला हे ज्ञान झाले.

इतके स्मरण राहू शकते. पंचवीस जन्माचे ज्ञान त्याला झालेले आहे. भस्मधारण जरी यथाविधी झाले तर कुंठीत झालेली स्मरणशक्ती परत मिळणे शक्य आहे. हे सगळे शास्त्रीय प्रयोग आहेत. तो प्रयोग व्यवस्थित झाला तर जीवाच्या स्मृतीशक्तीचा विकास होऊ शकतो. पंचवीस जन्मांचे स्मरण होणे म्हणजे

काय सामान्य गोष्ट आहे ! आपल्या मागच्या आजाराचे स्मरण आपल्याला रहात नाही, त्यावेळी आम्हाला काय झाले होते, याची आम्हाला आठवण नसते. एकदा आजार बरा झाला की परत येणार नाही अशी आमची समजूत असते ना !

हे जे बुद्धीत स्मरण आहे ते स्मरण कर्मानेसुद्धा होऊ शकते. ईश्वराचे सामर्थ्य आहे. गीतेमध्ये भगवान् म्हणतात, 'स्मृती किंवा अस्मृती माझ्यापासूनच होते.' भगवंताने सृष्टीमध्ये अशाप्रकारचे सामर्थ्य निर्माण करून ठेवले आहे. भगवान् शंकरसुद्धा भस्म धारण करतात इतके त्याचे महात्म्य आहे. याप्रमाणे सनत्कुमार आणि शंकर यांच्या मधला संवाद सांगितला आहे.

भगवान शंकर परमात्मा, सर्व गण, देव वगैरे सगळे जमले आहेत. त्यावेळी ब्रह्मदेवांचे मानसपुत्र ज्ञानी महात्मे ब्रह्मर्षी सनत्कुमार यांनी भगवान शंकरांना विचारले," पापक्षय कसा होतो, महाराज? सामान्य जीवांना करता येण्यासारखे साधन आहे का? मोठमोठे यज्ञ याग आहेत, योगाभ्यास आहेत, ठीक आहे, पण हे सर्वांना कसे जमणार?"

योगाभ्यास करणाऱ्याने सर्वप्रथम वाणीचा निरोध केला पाहिजे. खरेही नाही आणि खोटेही नाही. चांगलेही नाही आणि वाईटही नाही. बोलायचेच नाही मुळी काही. तेव्हां वाणीचा निरोध हा पहिला दरवाजा आहे योगाभ्यास करणाऱ्याला. त्याचप्रमाणे आहार. मित आहार घेणे वगैरे यमनियमादिंचे पालन करण्याचा ज्याचा निश्चय आहे तोच खरा योगाभ्यासाचा अधिकारी आहे. नाहीतर वाटेल तेवढा आहार घ्यायचा, हवी तेवढी झोप घ्यायची अशा माणसाला योगाभ्यास कधीच जमणार नाही.

म्हणून सनत्कुमार विचारताहेत," सर्वही जीवांची अशी काही

योग्य स्थिती नाही. त्यांना मोठ मोठी साधने करता येण्यासारखी नाहीत. तेव्हां पापक्षयाची सहज सुलभ साधने आपण आम्हाला सांगा."

सर्वसाधारण जीवांच्या बुध्दीचे सामर्थ्य, आयुष्य, धैर्य वगैरे आता कमी झाले आहे. त्यांच्याकडून पापक्षयाची मोठ मोठी साधने कशी होणार ? म्हणून संतांनी नामस्मरणाचा प्रचार केला. नामस्मरणासारखे साधन दिसायला जरी सोपे असले तरी त्याचे फल मात्र मोठे आहे. नामस्मरणाने " जळतील पापे जन्मांतरीची" असे म्हणतात. या जन्मातील तर जातीलच पण गतजन्मातीलही पापे नष्ट होतील. तसे या भस्मधारणाचे आहे. यथाविधी जर भस्म धारण केले तर तो जीवात्मा जीवन्मुक्त अवस्थेपर्यंत पोहचू शकतो.

गाणगापूरला भस्माचा डोंगर आहे. श्रीरामचंद्रांनी तिथे यज्ञ केला असे सांगतात. ते भस्म वापरण्यास हरकत नाही. किंवा गोमयाचे गोळे करून त्यांचे अग्नीत हवन करून जे भस्म मिळते; इतरही यज्ञयाग झाल्यावर मिळते ते धारण करावे. शरीराच्या निरनिराळ्या अवयवांना समंत्रक भस्म लावावे. त्याचा सर्व विधी शास्त्राने समजावून सांगितला आहे. ज्याला शास्त्राचे ज्ञान नाही अशा अज्ञानी माणसाने भक्तीने, श्रद्धेने जरी भस्मधारण केले तरी त्याच्या योगे पापक्षय होतो आहे. व्याधीनाश होतो. अनेक पातके नष्ट होतात. भस्मधारण हे तीर्थस्नान, जपजाप्य इत्यादी कर्मांपेक्षा अधिक फल देणारे आहे. भस्मधारण करणारा जीव स्वर्गात जातो आणि शेवटी शिवलोकात जाऊन भगवान शंकरांच्या सान्निध्यात जाऊन राहातो. हे सनत्कुमारांना सुलभ अशा प्रकारचे भस्मधारण सांगितले आहे.

सुलभ काय आणि दुर्लभ काय हे समजावून घ्यायला फार कठीण आहे. सांगणाऱ्यालासुद्धा सांगता येत नाही. शक्ती असेल त्याप्रमाणे करावे हे कसे सांगावे? म्हणणारा म्हणतो, आम्हाला इतके दान करायचे किंवा इतके कर्म करायचे आहे. उपाध्यायांनी सांगायचे शक्तीप्रमाणे करा. पैसा पुष्कळ आहे. तुमची शक्ती आहे किंवा नाही हा विचार तुम्ही करायचा आहे. सांगणाऱ्याने नाही. म्हणून धर्मशास्त्राचा अर्थ सांगणे फार कठीण आहे. जो खरा ज्ञानी महात्मा आहे तोच सांगू शकतो- हे सुलभ आहे, हे करायला हरकत नाही, श्रध्देने करा, यथाविधी करा, विधी करता आले नाही तर श्रद्धेने करा. जे खरे धर्मज्ञ असतील त्याच महात्म्यांनी सांगावे.

याप्रमाणे सनत्कुमार आणि भगवान् शंकर यांच्यातील हा संवाद झालेला आहे. गुरुमहाराज त्रिविक्रम भारतींना सांगताहेत. वामदेवांनी राक्षसाला हे भस्ममहात्म्य सांगून भस्म अभिमंत्रून लावायला दिले. त्याने ते भस्म धारण केल्यावर लगेच त्या राक्षसाचा देह पडला आणि दिव्य शरीर मिळाले. त्याच्याकरिता विमान आले आणि त्यात बसवून शिवदूत त्याला शिवलोकाला घेऊन गेले.

त्रिविक्रम भारतींना गुरूमहाराजांच्या जवळ येऊन राहावेसे वाटत होते ना ! त्याप्रमाणे ते इथे येऊन राहिल्यावर, महाराजांच्या शक्तीचे दर्शन त्यांना घडले. अनेक चमत्कार पहायला मिळाले. आणि हे सर्व सहज घडणारे चमत्कार आहेत, अहंकारपूर्वक नाहीत. महाराजांची ती स्वाभाविक वस्तूशक्ती आहे. ईश्वराच्या शक्तीचा हा चमत्कार पहायला मिळाल्यावर खरे भक्तीचे संस्कार ज्याच्या अंतःकरणात असतात ते जास्त जास्त वाढत जातात.

चिकित्सक बुद्धीवर मात्र या चमत्कारांच्या दर्शनाने काहीही परिणाम होणार नाही. अशी माणसे सतत काही तरी निराळेच तर्कवितर्क करीत राहाणार. म्हणून त्रिविक्रम भारतींना महाराज म्हणाले," तुम्ही तुमच्या गांवीच जाऊन राहा. अधून मधून तुम्हाला वाटेल तेव्हां येत जा."अशा तऱ्हेने कर्म आणि त्या कर्माचा विचार कसा होतो हे सर्वही सोदाहरण या ठिकाणी सांगितले आहे.

आता सिद्ध एक पतिव्रता महात्म्य सांगताहेत. कर्मयोग सांगायचा आहे ना ! या आधी भस्मधारण, पापकर्माचे विवेचन हे सर्व केले. आता प्रसंगाने स्त्रीधर्माचे वर्णन करणारी एक कथा सिद्ध सांगताहेत. "गुरु महाराजांचे चरित्र आणखी मला सांगा," अशी नामधारकाची प्रार्थना ऐकून सिध्दांना संतोष झाला आहे. सिद्ध म्हणाले," बाबा, गुरू महाराजांचे संपूर्ण चरित्र इतके अनंत आहे की ते सगळे कोणीच सांगू शकणार नाही. काय काय सांगू ? मूकं करोति वाचालं ही काही नुसती कविकल्पना नाही. श्रीपादवल्लभांनी आंधळ्याला दृष्टी दिली. आपल्या पंगू बंधूला चालण्याची शक्ती दिली. मृत्यूपासूनसुद्धा एकाला वाचवले असे दिव्य ज्यांचे चरित्र आहे त्या चरित्राबद्दल मी कसा विचार करणार? महाराजांचे असे अचिंत्य चरित्र पहायचे आणि शुद्ध भक्ती, ईशप्रेम, त्याचे स्मरण आपल्याला रहावे म्हणून प्रार्थना करायची."

सिद्ध पुढे सांगताहेत, माहूर क्षेत्रामध्ये गोपीनाथ नांवाचा एक धनिक ब्राह्मण राहात होता. त्याची मुले जगत नव्हती. तो दत्तात्रेयांचा मोठा भक्त होता. शेवटी दत्तात्रेयांच्या कृपेने त्याचा एक मुलगा जगला. त्या मुलाचे नांवही त्याने दत्तात्रेयांचे ठेवले.

या मुलाला पाहून आजपर्यंत झालेले सर्व दुःख दूर झाले आहे. संसारामध्ये आनंद झाला. तो थोडा मोठा झाल्यावर त्याचा उपनयन संस्कार आणि पुढे विवाहही झालेला आहे. श्रीमंत घराण्यातील मुलगी त्याला मिळाली. मदन आणि रतीप्रमाणे तो जोडा शोभू लागला. पतिपत्नींचे परस्परावरील प्रेम आणि उत्तम सून पाहून त्या गोपीनाथ ब्राह्मणालाही समाधान वाटते आहे.

संसारामध्येच सुख आहे असे आपल्याला अज्ञानामुळे वाटते कारण कर्माचे ज्ञान आपल्याला नाही ना. वेदधर्मा ऋषींनी आपले पूर्व कर्म ओळखले होते. तपश्चर्येने बऱ्याच कर्माचा त्यांनी नाश केला आणि जी काही थोडी शिल्लक राहिली ती त्यांनी भोगूनच टाकायचे ठरविले. त्यासाठी काशीवास पत्करला वगैरे.

सिद्ध नामधारकांना सांगताहेत, देवाची आठवण होण्याला दुःखाचा असाही उपयोग होतो. अर्थात तसे सुकृत असेल तरच, नाहीतर नाही. ईश्वराकडे जाणारे फार कमी लोक आहेत. इकडे आनंदात संसार चालला असताना, त्या मुलाला अचानक क्षयरोग झाला. घशाला एक सारखा शोष पडू लागला. कांती बदलत चालली. कृश झालेला आहे. कफ वगैरे वाढलेला आहे. अन्न जाईना, झोप लागेना, बोलता येईना इतकी अशक्तता झाली आहे. परंतु त्याची जी स्त्री आहे ती अत्यंत पतिव्रता स्त्री आहे. महाराजांनी त्या स्त्रीवर कृपा केलेली आहे. त्या स्त्रीची योग्यता ही तशीच असली पाहिजे. पंधरा, सोळा वर्षांचे वय आहे. सावित्री तिचे नांव. त्याला अन्न जाईना, पाच सहा घास तेवढे घ्यावे. हिनेही तेवढेच अन्न घ्यावे. झोप लागली लागली इतक्यात तो उठत असे. या पतिव्रता स्त्रीनेही लगेच उठावे तेवढीच झोप

घ्यावी. त्याच्याप्रमाणे हिचेही शरीर कृश झालेले आहे. अगदी सावलीप्रमाणे जवळ आहे. औषध वगैरे चालू आहे. परंतु पूर्व कर्मानुसार हे अशा प्रकारचे भोग प्राप्त झाले आहेत. कोणत्याही औषधांनी प्रतिकार होईना. शरीराला दुर्गंध येऊ लागला. वैद्यसुद्धा जवळ जाईना. नुसते आपले लांबून पहायचे. पण ही साध्वी स्त्री, अत्यंत शुद्ध मन आहे. त्यामुळे तिने केव्हांही पतीचा त्याग केलेला नाही. त्याला स्नान घालावे, सुगंधी द्रव्ये लावावीत, पाय चेपावे, औषध आणून द्यावे, ही सगळी सेवा करते आहे. मातापित्यांनीसुद्धा गृहशांती, देवतांचे पूजन, मृत्युंजय जप वगैरे सुरू केले आहेत. निरनिराळ्या प्रकारची दाने करताहेत. हा रोग म्हणजे पूर्व कर्माचे फळ आहे असे समजून त्याच्या क्षालनार्थ हे उपाय करायचे आहेत. पण काही उपयोग नाही. क्षय हा रोगांचा राजा, तो वाढत चाललेला आहे. आईवडिलांना दुःख झालेलं आहे. आपला मुलगा यातून बरा होत नाही असे त्यांना वाटले. आपल्या तरुण स्त्रीचे कष्ट बघूनही त्यांना दया आली. त्यांनी सगळ्यांनी सावित्रीला सांगितले की तिचा पती बरा होणे शक्य नाही. आपल्या हातात काही नाही तेव्हां तिने एवढे कष्ट घेऊ नये. पण नाही. तिने आपले कर्तव्य सोडले नाही.

एके दिवशी त्या मुलाने आपल्या आईवडिलांना सांगितले, "आजपर्यंत आपणही धैर्य धारण केलेत, मीही धैर्य धारण केले. मी जिवंत राहेन या आशेने तुम्ही कष्ट केलेत. मी मुलगा जरी असलो तरी तुमचा पूर्वजन्मीचा वैरी, शत्रू आहे असे मला वाटते, म्हणूनच माझ्याकरिता आपल्याला इतके कष्ट सोसावे लागलेले आहेत. माझ्या फंदात कशाला पडता ? तुमच्या जीवनाचे कल्याण करून घ्या," असे त्याने मातापितरांना

सांगितले आणि आपल्या स्त्रीलाही तो सांगतो आहे-"तू पतिव्रता स्त्री आहेस. परंतु माझ्या पूर्वकर्माने मला आता काही जीवन मिळणार नाही. तू आता इथे न रहाता माहेरी राहायला जा. हे कष्ट तुझे मला पहावत नाहीत."

त्यावर ती स्त्री म्हणाली,"काय बोलता आपण ! मी म्हणजे आपले अर्धे शरीर आहे. आपण जायची भाषा कशाला करता ? आपण जर गेलात तर मी आपली अर्धांगिनी असल्यामुळे मीही जिवंत राहाणार नाही. म्हणजेच तुम्ही असे गेलात तर माझी हत्या करण्याचा दोष लागेल ना तुम्हाला ! म्हणून असे काही बोलू नका." असे तिने त्याची पुष्कळ समजूत काढली. आपला निश्चय बोलून दाखवला. शारीरिक कष्टाचा तिला काहीच त्रास वाटत नाहीये. आळस नाही. माहेरची आठवण नाही. सासू सासरे, आप्तेष्ट सर्वही दुःखी झाले आहेत. मग तिने आपल्या सासू सासऱ्यांना विचारले," सत्पुरुषांची, महात्म्यांची कृपा झाली तरच हा रोग बरा होणे शक्य आहे. औषधाचा काही उपयोग नाही. सद्गुरू महाराज गाणगापूरामध्ये आहेत अशी त्यांची कीर्ती सर्व लोक वर्णन करताहेत. तेव्हां ह्यांना घेऊन जर मी तिथे गेले तर ह्यांना निश्चित आरोग्य प्राप्त होईल, असे मला वाटते. मग जाऊ का मी तिथे ? आपली अनुज्ञा आहे का ?"

सासू सासऱ्यांना आनंद झाला. ती स्त्री सगळे पहाते आहे, आपल्या पतीची शुश्रुषा करते आहे. शरीर कृश झाले आहे. हालचाल करण्याचे सामर्थ्य नाही. अन्न नाही, निद्रा नाही अशा स्थितीत धैर्याने ती घेऊन जाते आहे. ते म्हणाले," मुली, तुझी जी पुण्याई आहे त्यामुळे याला जीवदान मिळेल अशी आमची खात्री आहे. जा घेऊन तुझ्या इच्छेप्रमाणे." उत्तम डोली तयार

केली. गाद्याबिद्या घालून त्याला निजवले आहे. ती डोली वाहाण्याकरता मंडळी बरोबर घेतली. श्रीमंतच होते ते. त्या भोयांना हळूहळू चालण्यास सांगितले. डोलीत निजवलेल्या पतीच्या शरीराला हाताने धरून ती डोली बरोबर चालू लागली. माहूरपासून गाणगापूरपर्यंत चालत जायचे आहे. स्वतः श्रीमंताघरची असूनसुद्धा स्वतःच्या कष्टांकडे लक्ष नाहीये तिचे. शरीराबद्दल उदासिनता निर्माण झाल्याशिवाय धर्माचरण होऊ शकत नाही. तात्पुरते होत असेल पण खरे नाही. आणि तरीही आपण खरे धर्माचरण केले यावर समाधान मानतो आहोत. पण ते खरे धर्माचरण नाही.

हळूहळू ते गाणगापूरपर्यंत आले. वेशीमध्ये ते थांबले. तिथे तिने महाराजांची चौकशी केल्यावर तिथल्या लोकांनी तिला महाराज संगमावर असल्याचे सांगितले. मग तिने प्रथम महाराजांचे दर्शन करायचे ठरविले. सगळी नातेवाईक मंडळी दूर राहिली आहेत. ती एकटी सोळा वर्षांची मुलगी. केवळ महाराजांच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या दर्शनामुळे हे संकट दूर होईल असा पूर्ण विश्वास आहे. संगमावर जायला निघायचे म्हणून तिने डोलीचा पडदा दूर केला. दैवयोगाने आपल्या पतीचे प्राणोत्क्रमण झालेले तिच्या दृष्टीस पडले. काय झाली असेल तिची अवस्था ! शस्त्र घेऊन आपलाही घात करावा असे तिला वाटले. सगळ्या बायका पुरुषांनी तिची समजूत घालायचा प्रयत्न केला. अतिशय दुःख तिला झाले. पतीला हाक मारते आहे," उठा, आन्हिकाची वेळ झाली आहे आपल्या. आपण श्रेष्ठ विप्र आहात. आपल्या आन्हिकात कधीही खंड पडला नाही.' लवकर उठा. (आपले पती जिवंत आहेत अशीच तिची समजूत झालेली आहे) प्राण कुठे गेले, मन कुठे गेले ? हे सर्व पुन्हा या शरीरात आणा

आणि आपले आन्हिक वगैरे करा. आपण जर आला नाहीत तर आपले मातापिताही जिवंत राहाणार नाहीत आणि मीही जिवंत राहाणार नाही.या तीन हत्यांचे पातक तुम्हाला लागेल. तुम्ही लवकर या, आपण माझ्याबरोबर विवाह केला आणि आपण मला सोडून जाता ? पुत्र नाही, काही नाही अशा स्थितीत कुठे राहावे, काय करावे याचेही मार्गदर्शन आपण केलेले नाही. आपण जिवंत असेपर्यंत सगळे मला मानत होते. पवित्र होते मी, आता माझ्याकडे ढुंकूनही कोणी पहाणार नाही." आणि असा शोक करत ती परमेश्वरालाही हाक मारून म्हणते," आपण ईश्वर आहात. आपल्या जवळ सर्व सामर्थ्य असताना आपण हे काय केलेत महाराज ! पतीला इथपर्यंत आणायची बुद्धी तरी कशाला दिलीत ? तिथेच जर ह्यांचे प्राण गेले असते तर आम्ही इथपर्यंत आलोच नसतो. आपल्याला कोण जाब विचारणार? आपण जे केलेत ते चांगलेच आहे. पण मी मात्र या पतीच्या बरोबर सहगमन करून स्वर्गलोकाला जाणार आहे. आणि तिथे जाऊन मी तुमची कीर्ती सर्वांना सांगणार आहे. सौभाग्य प्राप्त व्हावे म्हणून मी गौरीचे पूजन केले ते कुठे गेले ? कर्मामध्ये जर शक्ती आहे तर ती गेली कुठे?"

इतक्यात महाराजांना दया आली. अत्यंत दुःख झाल्यावर आपले मन परमार्थाकडे जाते. पारमार्थिक, आत्मानात्म विचार करण्याची योग्यता येते. अधिकारी पुरुषाने अशा वेळेस केलेला उपदेश मनावर ठसतो. संसार कसा आहे हे समजून येते. म्हणून महाराजांनी एका तपस्वी पुरुषाचे रुप घेतले आणि ते तिच्याजवळ आले. त्यांनी तिला उपदेश करायला सुरवात केली. ते म्हणाले,"बाले, उगीच कशाला शोक करतेस ? शोक करून

मृत झालेला तुझा पती जिवंत होणार आहे का ? असं कधीतरी घडले आहे का ? शांत हो. देव असो किंवा दैत्य असो, मृत्यू कोणालाच सोडत नाही. त्याच्यापुढे कोणालाही जाता येत नाही. पती गेला असे तू समजतेस. पतीपत्नी, पितापुत्र हे संबंध अनियमित आहेत. हे संबंध जर खरे असतील तर पूर्व जन्मामध्ये तू कोण होतीस आणि हा कोण होता याची तुला आठवण पाहिजे. तूच याची पूर्व जन्मामध्ये स्त्री होतीस आणि हा तुझा पती होता काय? तसं नाहीये. आता या जन्मापुरता हा संबंध आलेला आहे. हा अस्थिर आहे. हा जीवात्मा चैतन्यरूप आहे. तो सर्वव्यापी आणि अजरामर आहे. पंचमहाभूतांपासून उत्पन्न झालेल्या या शरीरालाच तू पती समजते आहेस. पण हे शरीर टिकणारे नाही. सर्व काष्ठांमध्ये जसा अग्नी भरून राहिला आहे तसा हा चैतन्यघन परमात्मा सर्वव्यापी आहे. पुरुष, स्त्री वगैरे भेद त्याच्या ठिकाणी नाहीत. बाह्य शरीराच्या ठिकाणी पती पत्नी हा अध्यास झालेला आहे. हा सगळा विचार तू कर. कर्मामुळे जन्म प्राप्त होतो आणि जन्माला आल्यावर पुन्हा कर्म घडते आणि हे सगळे जन्म मृत्यूचे चक्र सतत फिरत राहाते. ' आवृत्तचक्षूः ' ज्याला म्हणतात असा खरा धीर पुरुष असतो. त्याची प्रवृत्ती अंतर्मुख झालेली असते. बाह्य जगाचा सगळा विचार बंद करून, अंतर्मुख वृत्तीने आपला आत्माराम कसा आहे हा जेव्हा तो विचार करू लागतो तेव्हा त्याचा सगळा भ्रम दूर होतो आणि खऱ्या आत्मस्वरुपाचे त्याला ज्ञान होते. हे सर्व कार्य अविद्येने झालेले आहे. या शरीराकरता शोक करू नकोस. विचार कर. शोक सोडून दे आणि चांगले धर्माचरण करून, संसार सागर तरून जाण्याचे तू साधन कर. मनुष्य जन्म किती प्रयासाने मिळाला

आहे, तो फुकट जाऊ नये म्हणून तू प्रयत्न कर."

महाराजांचा हा सगळा उपदेश ऐकल्यावर तिचे दुःख थोडे कमी झाले. महाराजांसारखे अधिकारी अत्यंत तळमळीने, प्रेमाने समजावताहेत. यावेळी आई वडील, सासूसासरे, आप्तेष्ट कोणी जवळ नाही. जवळ फक्त डोली वाहाणारे भोई होते. त्यांना काय वाटणार ? मग त्या स्त्रीने तपस्वी वेषातील महाराजांना विचारले," आपण मला उपदेश केलात परंतु असे दुःख किती जन्म भोगावे लागणार ? या दुःख सागरातून आपण माझा उद्धार करा. माझे मातापिता, आप्तेष्ट सर्व आपणच आहात. आपणच मला मार्गदर्शन करा."

त्यावेळी महाराजांनी तिला उपदेश केला, पती हाच तारक आहे साध्वी स्त्रीला ! पतिव्रता धर्म समजावून सांगताना त्यांनी लोपामुद्रेची कथा सांगितली. एकदा नारद मुनी विंध्य पर्वतावर फिरायला गेले. तेथील मोठमोठी अरण्ये, फळाफुलांनी बहरलेल्या बागा पाहून त्यांनी विंध्य पर्वताची स्तुती करून म्हटले, तुझ्याकडे सर्व समृद्धी आहे खरी, पण यात एकच उणीव आहे. इतर पर्वतांच्या मानाने तुझी उंची अगदीच कमी आहे. हे ऐकून विंध्य पर्वताला राग आला आणि त्याने आपला आकार एवढा वाढवत नेला की पृथ्वीवर सर्वत्र अंधःकार पसरला. स्नान संध्यादि कर्मे लोकांना करता येईनात.

मग सर्व देवांनी ब्रह्मदेवांना विनंती केली हे संकट दूर करण्याची. तेव्हा ब्रह्मदेव म्हणाले की तुम्ही अगस्ती मुनींना भेटायला चला. विंध्य अगस्तींचा शिष्य आहे. त्यांची आज्ञा तो ऐकेल. परत पूर्वीसारखा लहान होईल आणि हे संकट दूर होईल. सर्वजण त्याप्रमाणे अगस्ती मुनींच्या आश्रमात आले.

तिथे त्यांची स्त्री लोपामुद्रा होती. त्यावेळी बृहस्पतींनी सर्वांना स्त्रीधर्म समजावून सांगितले.

ते म्हणाले," पतीबद्दल पत्नीच्या मनात इतके प्रेम हवे की छायेप्रमाणे ती पतीबरोबर राहिली पाहिजे. पतीची सेवा केली पाहिजे. पतीपासून आपला काही फायदा व्हावा म्हणून त्याच्याबरोबर राहाणे वेगळे आणि छायेप्रमाणे सेवाभावाने पतीबरोबर राहाणे वेगळे. पतीचे पादतीर्थ घेणे आणि सेवा करणे हे स्त्रीचे खरे भूषण आहे. भूषण म्हणजे काही दुसरे अलंकार नाहीत. त्याला संतोष देणे, त्याची आज्ञा पाळणे हाच पतिव्रतेचा धर्म आहे. इतर कशातही तिचे लक्ष नसते. साधूसंतांविषयी मनात आदरभाव बाळगणे, पोष्य वर्गाचे पोषण करणे, आज्ञेशिवाय दुसरे काहीही न करणे असे सगळे धर्म आहेत." सध्याच्या काळात हे पतिव्रतेचे धर्म स्त्रियांना सांगणे किती कठीण आहे. सर्वांना आजकाल व्यक्तीस्वातंत्र्य, बुद्धीस्वातंत्र्य आहे म्हणतात.

स्मृतीकारांनी जे सांगितले आहे की पतीची झोप पूर्ण होण्यापूर्वी पत्नीने उठावे, घरातील सर्व व्यवस्था चोख पहाणे, उत्तम स्वयंपाक करून पतीला देणे वगैरे त्याबद्दलच सध्या वाद चालू आहे. स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या पुरस्कर्त्या म्हणतात, आम्हीच स्वयंपाक का करावयाचा? आम्हीच घर का सांभाळायचे? पुरुषांनी यातली काही जबाबदारी उचलली तर काय बिघडले?

पण इथे देवगुरु सांगताहेत, मन हे शरीरातील इतर इंद्रियांपेक्षा निराळे आहे. स्त्रियांना, पुरुषांना, बालकांना या मनाची शक्ती वाढविण्याकरता सगळी कर्तव्ये सांगितली आहेत. मानसिक शक्तीचा विकास झाला पाहिजे. उपनिषदात असे सांगितले आहे की आपण जे अन्न खातो त्याच्यापासून मन तयार होत असते.

ते अन्न जितके पवित्र असेल, शुद्ध बुद्धीने तयार केलेले असेल तर त्या अन्नाच्या सेवनाने तयार होणारे मनही शुद्ध, निर्भय आणि सात्विक होईल.

वेदांमध्ये गृहिणीला सम्राज्ञी म्हटले आहे. पति, सासूसासरे, दीर, वगैरे सर्वांची तू नियामक आहेस, सम्राज्ञी आहेस अशी तिची स्तुती केली आहे. स्त्रीने जर शुचितेने, पवित्र भावनेने स्वयंपाक केला आणि ते अन्न जर पोटात गेले तर त्या लोकांचे मन किती पवित्र होईल? आणि अशीच सर्वांची मने पवित्र व्हायला पाहिजेत. अन्न काही नुसते उदरभरणाकरताच नाही. ज्या शरीराकरता आपण अन्न खातो ते गेल्यावर काय रहाते? मन रहाते. वाटेल ते अन्न भक्षण करून मनाची तयारी होणार नाही, मन निर्भय होणार नाही.

तानाजी मालुसरे रायबाचे लग्न करायला निघाले होते एवढ्यात शिवाजी महाराजांचा निरोप आला की कोंढाणा ताबडतोब सर करायचा आहे. तानाजी मालुसरे क्षणाचाही विलंब न करता राजांच्या निरोपाप्रमाणे युद्धाला निघाले. ' आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे,' असे त्यांचे उद्‌गार सर्वांना माहीतच आहेत. युद्धात आपण जिवंत राहू की नाही याची शाश्वती नाही तरीही राष्ट्रसेवा प्रथम करण्याची मनाची तयारी आहे. राष्ट्राचा विकास नुसत्या पैशाने आणि सत्ता सामर्थ्याने होत नसतो. जनतेची तशी मने तयार व्हावी लागतात.

गृहिणी आणि लक्ष्मी यात मनुने काहीच फरक केलेला नाही. गृहिणीला राग आला तरी तो तिने लगेच शांत केला पाहिजे. संयम पाहिजे. सहनशीलता हा एक स्त्रियांचा स्थायीभाव आहे. त्याला अनुसरून स्मृतिकारांनी काही धर्म सांगितले आहेत.

पुरुषांजवळ इतका संयम नसतो. पुरुषांचा संयम बुद्धीचे सामर्थ्य वाढविण्यासाठी असतो.

पण आमच्यावर आजपर्यंत ज्यांनी राज्य केले ते या बुद्धीच्या ऱ्हासाला कारणीभूत आहेत. इंग्रजांनी शैक्षणिक सुधारणा आणि प्रसाराच्या नावाखाली आमचा असा काही बुद्धिभेद केला आहे की आमच्या बुद्धीतील शास्त्रप्रामाण्यच नाहीसे झाले आहे. आमच्या धर्मशास्त्राबद्दल बुध्दीस्वातंत्र्याच्या नावाखाली अनादर निर्माण केला आहे. गीतेमध्ये भगवान अर्जुनाला सांगतात की,' तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते —' शास्त्र काय सांगते ते ऐक, मी काय सांगतो तेच नुसते ऐकू नकोस. कारण शास्त्र हेच सर्वांना प्रमाण आहे. हे शास्त्रप्रामाण्य आम्ही सोडून दिले आणि त्या इंग्रजांनी जो भेद दाखवला आमच्या बुद्धीचा तो आम्ही करून घेतला. त्याचे परिणाम आपल्याला भोगावे लागताहेत. धर्माच्या बरोबरच आपल्या तपःसामर्थ्याचाही ऱ्हास झाला.

ही सोळा वर्षाची मुलगी माहूरहून आपल्या मरणोन्मुख पतीला गाणगापूरला घेऊन आली. कोणत्या धैर्याने आली असेल ती ! तिला उपदेश करायला, तिचे सांत्वन करायला स्वतः महाराज वेष बदलून आले. ही मुलगी उपदेश करायला योग्य आहे, हिच्या कडून धर्माचरण होऊ शकेल याची त्यांनाही खात्री आहे.

दौपदीदेखिल कधी धर्मराजांना विचारायची, काय तुमच्या धर्माचरणाचा उपयोग आहे? तुम्ही धर्म धर्म करीत बसलात आणि सगळे राज्य गेले. अधर्माने वागणारा दुर्योधन सम्राट झाला. त्यावर धर्मराज म्हणत, द्रौपदी, मी राज्यप्राप्तीकरता धर्माचरण केले नाही आणि करणार नाही. हा व्यापार होईल.

धर्माचे वाणिज्य केल्यासारखे होईल. धर्मपालन ही ईश्वराची आज्ञा आहे. आणि त्याच्या आज्ञेचे पालन करून माझे पूर्ण कल्याण व्हावे याकरता मी धर्माचरण करीत आहे. असे जरी ती म्हणाली, तरी ती शेवटपर्यंत पांडवांना अनुकूल अशीच वागली. त्यांच्याबरोबर वनात राहिली. जास्तीत जास्त दुःखं तिला सोसावी लागली.

कोणी अतिथी आला तर त्याला भोजन द्यायचे अशी धर्मराजांची वनांत गेले तरी रीत होती. तेवढ्यासाठी द्रौपदीने सूर्यनारायणांची प्रार्थना करून ती अन्न देणारी थाळी मिळवली. पण त्यावेळी सूर्यनारायणांनी सांगितले की द्रौपदीचे जेवण होईपर्यंत त्या थाळीतून अन्न मिळेल. एकदा का द्रौपदी जेवली की मग मात्र दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतरच अन्न मिळेल. बरे अतिथी कधी येईल सांगता यायचे नाही त्यामुळे दिवसभर सर्व कामे करून देखिल द्रौपदी आता कोणी येणार नाही याची खात्री पटली की रात्री कधीतरी जेवत असे. परंतु तिचा मनाचा संयम किती आहे ! ही सहनशीलता स्त्रियांच्या बुद्धीत नैसर्गिकच असते. पांडवांच्या राजसूय यज्ञामध्ये श्रीकृष्णांनी पंगतीत वाढायची जबाबदारी तिच्यावर सोपविली होती. लक्षावधी लोक जेवणार, कोणाला काय वाढायचे हे ओळखता आले पाहिजे. वाढू का नको असे आधी विचारायचे आणि दुसऱ्याने आग्रह केला की वाढायचे असे करून उपयोगी नाही. ज्याला जे पाहिजे आहे त्याला ते मिळाले पाहिजे. या धर्मपालनामुळे स्त्रियांच्या बुद्धीचं संरक्षण होते. शिवाय वैयक्तिक तप त्यांना सांगितलेच आहे. इतकी सगळी योजना स्मृतीकारांनी विचारपूर्वक केली असता स्त्रियांना पारतंत्र्य आहे(स्त्री मुक्त नाही) असे कसे म्हणायचे?

'स्वातंत्र्य' शब्दाचा अर्थ तरी काय? कोणी साठ-सत्तराव्या वर्षी लग्न केल्याची बातमी पेपरमध्ये छापून येते ती वाचायची लाज वाटते. विष्णवे नमः.

तर या प्रमाणे बृहस्पतींनी लोपामुद्रेला केलेला उपदेश महाराज त्या स्त्रीला सांगताहेत. जर पतीचा मृत्यू झाला तर सहगमनही करता येते. किती कठीण आहे ! पतीबद्दल एवढे प्रेम निर्माण व्हायला किती जन्म घालवावे लागतील? पती गेला की संपला, आपला काही संबंध नाही. लग्न ठरवितानाच विचारले जाते, आमच्या मुलीच्या नांवावर किती पैसे ठेवणार? काय याचा अर्थ घ्यायचा? तुम्ही जाताना हिला किती पैसे ठेवून जाणार असेच विचारल्यासारखे झाले की नाही ! अमंगल सगळे विचार आणि व्यवहार ! ही भूमी पाण्यात बुडून का गेली नाही? याचे कारण भूमीला सात आधार आहेत. गायी, विप्र, तपस्वी महात्मे, थोड्या प्रमाणात का होईना अद्यापि वेद आणि पतिव्रता वगैरे जगात आहेत म्हणून ही भूमी टिकून राहिली आहे. पतिव्रता स्त्रिया आजही इथे आहेत.

इथे पुण्यात घडलेले उदाहरण आहे. चिमण बागेजवळ पूर्वी शंकरराव दाते राहात होते. त्यांचा मुद्रण व्यवसाय होता. त्यांनी अकरा अतिरूद्र केले. ते गेल्यावर त्यांच्या पत्नींनी अन्न वर्ज्य करून फक्त गंगाजल घेण्यास सुरवात केली. त्यांचे चिरंजीव आमच्याकडे येऊन म्हणाले की त्यांच्या मातोश्रींची आम्ही काही समजूत काढावी. गेलो आम्ही आणि म्हटले, आईसाहेब, आपण फक्त गंगाजलच घेता. सगळ्या मुलाबाळांना दुःख होते. त्यांनी आम्हाला एकच प्रश्न विचारला, शास्त्रीबुवा, हे जे मी करतेय ते शास्त्राच्या विरुद्ध आहे काय?आम्ही लगेच त्यांना म्हटल,"नाही

तुमचेच बरोबर आहे. आम्ही तुम्हाला सांगायला आलो हे आमचे चुकलेले आहे." एक महिन्याच्या आंत त्या गेल्यासुद्धा. अशा सती स्त्रिया अद्यापि जगात आहेत. त्यांना आपल्या देहाचीसुध्दा पर्वा नाही. कारण पुढे चांगला देह मिळणार आहे. पुढे सुख मिळणार आहे ना !

गुरुमहाराज त्या स्त्रीला सांगताहेत, पुष्कळ स्त्रिया असतील रूपवान, सौंदर्यवान् परंतु साध्वी स्त्रीच सगळ्या कुळाला पवित्र करते. पंचमहाभूतांच्या देवतासुद्धा तिला भिऊन राहातात. मृत पतीच्या शरीराबरोबर सहगमनही करता येते. परंतु जिला महान मुलगा आहे किंवा जी गर्भिणी आहे तिने मात्र सहगमन करु नये. त्यागाचा आदर्श म्हणून स्त्रियांचेच उदाहरण देतात. धर्माचरण केले म्हणजे संसारात सुख नाही असा त्याचा अर्थ नाही. पण सध्या मात्र केवळ संसारसुखाकडेच लक्ष देऊन बाकीचा सगळा आचार धर्म कमीकमी होत चालला आहे. त्याचे वर्णन करण्याची आवश्यकता नाही.

मग ती स्त्री म्हणाली,"महाराज. वैधव्य धर्माचे पालन करणे फार कठीण आहे. मी तरुण आहे. या वयामध्ये काय लोकनिंदा होईल सांगता येत नाही. त्यापेक्षा पतीबरोबर सहगमन करायचे मी ठरविले आहे. आपली अनुज्ञा असावी."

महाराज म्हणाले," काही हरकत नाही. उत्तम आहे. देहाचेसुद्धा अध्यास टाकणे किती कठीण आहे ! ह्या सहगमनाला आत्महत्या म्हणत नाहीत. पतीच्या प्रेमामुळे पतीच्या शरीराबरोबर आपले शरीर अग्निला अर्पण करायचे ही काही आत्महत्या नाही. तुला उत्तम गती मिळेल. दुःख वगैरे सोडून दे. भीष्माचार्यांसारखे मोठे ज्ञानी महात्मेसुध्दा इच्छामरणी होते. त्यांनाही जावे लागले. रावणाने

किती आयुष्य मिळवले होते. तोही गेला. काळाला जिंकता येत नाही. तू ठरविले आहेस त्याप्रमाणे कर. गुरूमहाराजांचे तीर्थ आणून शिंपड याच्या देहावर आणि हे रुद्राक्ष बांध त्याला."असे सांगून तपस्वी वेषांतील महाराज तिथून निघून गेले. गुरुमहाराजांच्या दर्शनाला ती अजून गेली नव्हती. हेही सुचवले महाराजांनी.

रमाबाईने नाही का माधवरावांबरोबर अगदी अल्प वयात सहगमन केले यथाविधी ! तर या स्त्रीने इतर स्त्रियांना सौभाग्यवाणे दिली. इतक्या लहान वयात सती जाते म्हणून त्या हिची प्रशंसा करू लागल्या. मुलगा नाही किंवा इतर कोणतेही संसारसुख अनुभवलेले नाही. परंतु केवढा त्याग आहे ! सर्वजण स्मशानात निघाले. एवढ्यात तिला तपस्वी पुरुषाच्या आज्ञेचे स्मरण झाले. गुरूमहाराजांचे दर्शन घेऊन यायचे आहे. त्याच्या आज्ञेप्रमाणे प्रेताच्या सर्वांगाला भस्म लावले, कंठात रुद्राक्ष बांधले आणि महाराजांच्या दर्शनाला जाऊन यायची ब्राह्मणांजवळ अनुज्ञा मागितली. ते म्हणाले जा पण लवकर परत ये. सूर्यास्ताच्या आत अग्नीसंस्कार व्हायला हवा.

तिला अतिशय दुःख झाले. ईश्वराने जर उपेक्षा केली तर कसे वाटेल ? ज्यांना ईश्वराची काही कल्पना नाही त्यांना काही नाही. परंतु तो अत्यंत दयाळू आहे. भगवान स्वतः सांगताहेत, मी सर्वांचा सुहृद आहे बरं ! निरपेक्षतया उपकारिणम्- आचार्य महाराज सांगताहेत. मला कुणी काही द्यायला नको. ती स्त्री म्हणते,"सर्व दया शक्ती आपली आहे. सर्वांच्यावर उपकार करणे हा आपला धर्म आहे. त्याचप्रमाणे विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय करण्याचे सामर्थ्य आपले आहे. भक्तवत्सल आहात. आपण भक्तांची अनंत संकटे दूर करणारे आहात, दयासागर

आहात. ही सगळी बिरुदे आपली आहेत. माझ्यासारख्या प्रारब्ध कर्मामुळे दुःख भोगणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत.पण त्यांना मुले झाली. त्यांचे पती आरोग्य संपन्न झाले. पण हे माझ्या दैवात नाही. मला दैवाचे कारण पुढे करून आपण बाजूला झालात. काही हरकत नाही. तुमची इच्छा."

इथे दोन उदाहरणे आहेत. त्या शिरोळ ग्रामातली स्त्रीसुद्धा महाराजांची भक्त होती. आणि ही माहूरहून विश्वासाने आलेली आहे. भगवंतांनी तिला स्त्रीधर्म सांगून त्याप्रमाणे कर्तव्य करून सुख मिळवण्यास सांगितले. तिनेही सहगमन करण्याचा निश्चय केला. भगवंताची भक्ती केल्यावर ज्ञान, कर्म वगैरे काही लागत नाही इतके त्या भक्तीचे महात्म्य ऐकून मी आले आणि आपण मला पुन्हा माझ्या प्रारब्ध कर्माचा विचार करायला सांगता हे कसे काय. माझ्या कर्मानेच माझा उद्धार व्हावा अशी आपली इच्छा असेल तर तसेही हरकत नाही. हीच तुमची इच्छा आहे ना. मग मी सहगमन करायला तयार आहे. स्वर्गलोकात जाऊन मी आपली कीर्ती वर्णन करीन. असे विचार करीत ती महाराजांच्या दर्शनाला चालली होती. महाराज प्रत्यक्ष भेटल्यावर काय करणार आहेत याची तिला अजून कल्पना नाहीये.

पतीचा व माझा माझ्याच धर्माने, सत्कर्माने मी उद्धार करून घेणार आहे. वस्तुतः आपणच सर्व काही करणारे आहात. जीव काहीच करत नसतो. असे असताना आपण सांगता, तुमचे कर्तव्यकर्म तुम्ही करा. तो अभिमान परत आमच्या मागे लावलात तुम्ही. तोच अभिमान धारण करून ती आलेली आहे. परंतु भगवंताच्याबद्दल आत्यंतिक प्रेम आहे. जाताना शेवटचे दर्शन घ्यायचे आणि जायचे. देह अग्निमध्ये समर्पण करायचा

हा निश्चय आहे. देव कदाचित दया करील. आता दया कसली करायची? मृत्यू आल्यावर आता कसली दया? मृत्यूपूर्वी रोग बरा झाला असता तर त्याला दया म्हणता आली असती. पण मृत्यू आल्यानंतरसुध्दा दया होऊ शकते याची तिला अद्यापि कल्पना नाही. पण तीही दया महाराजांनी केली. संगमावर महाराजांचे दर्शन झाल्यावर तिने अत्यंत श्रद्धा भक्तीने त्यांना नमस्कार घातला त्याबरोबर महाराजांनी तिला,' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' असा आशीर्वाद दिला. ती चमकली. तिने विचारले, हा या जन्मासाठी आशीर्वाद आहे की पुढच्या. आणि तिने पुन्हा त्यांना तसाच नमस्कार केला. पुन्हा महाराजांनी तसाच आशीर्वाद दिला.

त्याबरोबर उपस्थित सर्व मंडळी तटस्थ झाली. त्यांनी महाराजांना विचारले की हा आशीर्वाद त्यांनी पुढच्या जन्मासाठी दिला का. कारण, त्यांनी सांगितले, हिचा तर पती मृत्यू पावला असून ही त्याच्याबरोबर सहगमन करणार आहे. महाराज म्हणाले आमच्या मुखातून असत्य कसे बाहेर पडेल. घेऊन या बघू हिच्या पतीचा देह. झालं. काही मंडळी ते प्रेत आणायला गेली. ब्राह्मण मंडळींनी रुद्राभिषेक करून महाराजांची पाद्यपूजा केली. ते प्रेत आणल्यावर महाराज म्हणाले, त्याला बांधलेले दोर सोडा व हे तीर्थ त्याच्या अंगावर प्रोक्षण करा. आणि त्यांनी आपल्या अमृतदृष्टीने फक्त त्याच्याकडे पाहिले मात्र, जणु काय झोपलेला माणूस जागा व्हावा तसा तो मृत झालेला मनुष्य उठून बसला. सर्वांना अतिशय आनंद झालेला आहे. नग्न म्हणून तो लाजला मग त्याला लोकांनी वस्त्र वगैरे नेसायला दिले. सर्वांना आश्र्चर्य वाटले, क्षय रोगाने मृत्यू पावलेल्या या मनुष्याला महाराजांनी

पुन्हा जिवंत केले !

थोरल्या महाराजांनी स्तोत्रात या प्रसंगाचे मोठे सुंदर वर्णन केले आहे-

**प्रददौ हि मृतप्रियस्त्रिया अपि सौभाग्यमु यन्नमस्क्रिया ।**
**स नृसिंह सरस्वति यतीर्भगवान्मेऽस्ति परावरा गति।।**

पातिव्रत्याचे आचरण त्या स्त्रीकडून परिपूर्ण झालेले आहे. त्यामुळे शुद्ध चित्त आहे. अंतःकरण शुद्ध झालेले आहे. महाराजांना तिच्यावर कृपा करायची आहे पण "कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे"ईश्वराने परीक्षा घ्यायची म्हणजे काय वेदना झाल्या असतील त्या स्त्रीला ! तिने महाराजांना फक्त नमस्कार केला. नमस्कार याचा अर्थ, आपण श्रेष्ठ आहात महाराज, मी काही बोलू शकत नाही, एवढंच ती म्हणाली. आपल्या इच्छेने सर्व झाले- सर्वस्व अर्पण करणे, अहंताही सर्व सोडून दिली आहे. आणि हा असा नमस्कार केल्याबद्दल तो आशीर्वाद मुखातून निघालेला आहे. सौभाग्यदान मिळाले त्या एका नमस्काराने.

पती हाच ईश्वर आहे या भावनेने ईश्वराची सेवा झालेली आहे. ईश्वरभक्ती झाली. शास्त्राच्या आज्ञेचे पालन झाले घरात राहून. मनामध्ये कुठल्याही प्रकारचा संदेह न येता ही ईश्वराची भक्ती घडली. त्याचे फळ तिला मिळाले. कर्माचे फळ या जन्मातही मिळू शकते याचे हे उदाहरण आहे. पुढच्याच जन्मी मिळेल असे नाही. म्हणून पती जरी मृत झाला तरी "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" हे महाराजांनी शब्द उच्चारताच तो मृत पती जिवंत झाला आहे.

त्या दोघांनीही महाराजांची पूजा करून पुष्कळ स्तुती केली आहे. " आपले स्मरण आजपर्यंत झाले नाही महाराज. अनेक जन्म आमचे असेच गेले. त्यामुळे आमची अशी अवस्था झाली. संसारदुःख झाले. पण आपण दयासागर आहात. आमच्या सर्वही अपराधांची आपण क्षमा केली आहे. विश्वाचे पालनकर्ते आपण आहात, आपण आमचे संरक्षण केले आहे."

दुसऱ्या दिवशी तिथल्या एका माणसाने महाराजांना विचारले," महाराज, क्षयरोगाने याला मृत्यू आला. हा काही अपमृत्यू नाही. पुष्कळ दिवस या रोगामुळे झिजला आणि शेवटी गेला. म्हणजे महामृत्यू आलेला आहे. महामृत्यू ब्रह्मदेवाने लिहून ठेवला आहे ना. मग ब्रह्मदेवाने लिहून ठेवलेले खोटे कसे झाले? हा जिवंत कसा झाला? "गंमत म्हणजे त्याच गाणगापूरात राहाणारा तो आहे. महाराजांच्या कृपेचे अनेक अनुभव त्याने पाहिले आहेत.

त्याच्या या प्रश्नाला काय उत्तर देणार? मी त्याला माझ्या सामर्थ्याने जिवंत केला असे सांगायचे? महाराज म्हणाले, ब्रह्मदेवाचे बरोबर आहे. ब्रह्मदेवाने या जन्मात तीस वर्षे आयुष्य ठरविले होते आणि पुढील जन्मात शंभर वर्षे होते. आम्ही त्याच्याजवळ एवढेच मागितले की पुढच्या जन्माचे आयुष्य या जन्मात द्या आणि या जन्माचे आयुष्य पुढच्या जन्मात घाला. एवढच केलं, बाकी काही केलं नाही. म्हणजे ब्रह्मदेवाने ठरविल्या प्रमाणे झाले आहे ना ! एवढेच त्याला हवे होते. त्याला वाटत होते की ब्रह्मदेव महाराजांपेक्षा श्रेष्ठ आहे. महाराजांनी तीच त्याची समजूत असे उत्तर देऊन कायम ठेवली.

त्या स्त्रीने मठात येऊन महाराजांचे दर्शन घेऊन

सांगितले,"महाराज,आम्हाला एका साधुपुरुषाने उपदेश केला. भस्म आणि रुद्राक्ष दिले. पतिव्रता धर्म सांगितला. आणि इच्छा असेल तर सहगमन करुन उत्तम गती प्राप्त करुन घे असे सांगितले. तीर्थाचा आणि रुद्राक्षाचा महिमा काय हे आपण आम्हाला सांगा."

गुरुमहाराज म्हणतात," तुला पतीनिधनामुळे अतिशय दुःख झाले होते. म्हणून तुझ्या मनाचे समाधान करण्याकरता आम्हीच वेष घेऊन आलो होतो. देवाची ही आत्मीयता आहे. या आत्मीयतेमुळे भगवान तिथे आले होते. महाराज म्हणतात, तुझा भाव कसा आहे ते पाहिले. धर्मबुद्धी कायम आहे की नाही, पतीबद्दलचे तुझे प्रेम कायम आहे की नाही हे पाहिले. नाहीतर पती जिवंत असेपर्यंत सेवा केली आणि पती गेला की सर्व प्रेम संपले असे व्हायचे. पण तुला पतीबरोबर सती जायला सांगितले तेही तू कबूल केलेस. शरीरापेक्षा जीवात्मा वेगळा आहे. पती आपला आहे आणि त्याच्याबरोबर आपले शरीर अग्नीत अर्पण केले तरी आत्म्याचा नाश होणार नाही याचे ज्ञान तुला झाले आहे. देहासक्तीचा तू त्याग केलास. आम्ही तुझ्या भावाची परीक्षा घेतली. आस्तिक्य बुद्धी ही मुख्य आहे त्याशिवाय धर्माचरण होत नाही."

आता महाराज तीर्थाचा, रुद्राक्षाचा महिमा काय आहे हे सांगताहेत. अनेक प्रकारचे रुद्राक्ष आहेत. गंगास्नानाचे जे पुण्य आहे ते रुद्राक्ष धारणाने प्राप्त होते. सहस्त्र रुद्राक्ष धारण करणारा साक्षात शिवरुप होतो. यासंदर्भात त्यांनी तिला एक कथा सांगितली. काश्मीर देशाच्या राजाला जो मुलगा होता आणि त्याच्या प्रधानाचा मुलगा होता, ते एकमेकांचे मित्र होते. त्यांना पूर्वसंचितानुसार

रुद्राक्ष धारण करण्याची आवड होती. इतर अलंकार घालणे त्यांना आवडत नसे. एके दिवशी पराशर ऋषी राजवाड्यात आले. त्यांची पाद्यपूजा झाल्यावर राजाने त्यांना विचारले,"ही दोन्ही मुले राजघराण्यातली असूनसुद्धा ह्यांना सुवर्णालंकार वगैरे न घालता रुद्राक्ष धारण करुन बसावेसे का वाटते?"

याचे उत्तर देताना पराशर ऋषींनी ह्या दोन्ही मुलांच्या पूर्व जन्माची कथा सांगितली.महत्व कशाला आहे- रुद्राक्षाला की सुवर्णालंकाराला? व्यवहारात ज्याला महत्व आहे तेच आपल्याला महत्वाचे वाटते. ज्या ज्या ठिकाणी गुण असेल तो पूज्य आहे. एका गांवात एक वेश्या राहात होती. तो तिचा जरी व्यवसाय असला तरी ती शिवभक्त होती. धर्मशास्त्राचे चांगले ज्ञान तिला होते. तिच्या नृत्यमंडपात तिने एक मर्कट आणि कुक्कुट पाळला होता. त्यांच्या गळ्यात रुद्राक्ष बांधले होते. एकदा तिची परीक्षा पहाण्यासाठी भगवान शंकर वेष पालटून तिथे आले. त्यांनी एक मोठे तेजस्वी शिवलिंग आपल्याबरोबर आणले. ती वेश्या शिवभक्त असल्याने तिच्या मनात ते शिवलिंग मिळवण्याची इच्छा निर्माण झाली. तिने आपली इच्छा आपल्या दासीकरवी शंकरांजवळ व्यक्त केली. त्यासाठी हवे तितके धन द्यायची तयारी दाखवली. अथवा हवे असल्यास तीन दिवस त्यांची पत्नी म्हणून पतिव्रता धर्माचे पालन करण्याची तयारी दाखविली. भारताचे केवढे सौभाग्य आहे. येथे होऊन गेलेल्या वेश्यासुद्धा पतिव्रता असू शकतात ! बाकीच्या असतील यात काय संशय आहे? त्यावेळेला त्यांची बुद्धी धर्मनिष्ठ होती.

तिने सांगितले,"सूर्य आणि चंद्र यांना साक्षी ठेवून मी पतिव्रता म्हणून आपली सेवा करते." शंकरांनी ते मान्य केले.

तिला शिवलिंग दिले. एक सुवर्ण कंकण आणले होते तेही तिला दिले. तिला अतिशय आनंद झाला. तिने ते शिवलिंग सभामंडपात ठेवून ती शंकरांबरोबर अंतःपुरात गेली. आणि इकडे अचानक सभामंडपाला आग लागली. आणि त्यात ते मर्कट, कुक्कुट आणि शिवलिंगही जळून गेले. वैश्यरुपी शंकर अतिशय दुःख करु लागले," हे शिवलिंग म्हणजे माझे प्राण आहेत. ते राहिले नाही तर मीही जिवंत राहाणार नाही." आणि त्यांनी अग्नीत उडी टाकली.

आपल्या पतीचा नाश झालेला पाहून तिने सहगमन करायचे ठरविले. तिचे भाऊ बहीण वगैरेंनी तिला समजावले," पातिव्रत्य हा काही आपला धर्म नाही, त्याचे नियम तुला लागू नाहीत. कुठला कोण वैश्य आणि कोण पती. असा अविचार करुन आत्मघात करु नकोस." वगैरे. पण तिचा निश्चय पक्का होता. ती म्हणाली," मी त्यांना शब्द दिला आहे." तिला असे सांगता आले असते. स्वार्थी देहासक्तीमुळे पुष्कळ पळवाटा सुचतात. तिने पुष्कळ दानधर्म केला आणि भगवान शंकरांचे ध्यान करुन तिने अग्नीत उडी घेतली. आणि असा चमत्कार घडला की भगवान शंकर तिथे प्रगट झाले आणि तिला वरचेवर झेलले. ते म्हणाले," हा अग्नी,शिवलिंग वगैरे सगळे माझ्याच मायेने मी तुझी परीक्षा पहाण्याकरता निर्माण केले होते. वेश्या असूनसुद्धा तू पतिव्रता धर्माने वागलीस त्यामुळे मला अतिशय संतोष झाला आहे. तुला काय हवा तो वर मागून घे."

वास्तविक ती वारांगना होती. पण उत्तम धार्मिक संस्कार तिच्या मनावर झाल्यामुळे ती देहासक्ती सोडू शकली.पतिव्रता धर्म तिने मान्य केला. तीन दिवस जरी झाला तरी तो पती

म्हणून आपण स्विकार केला आहे, त्याच्याकरता देहत्याग केला पाहिजे. हे जे धर्मधैर्य निर्माण झाले ते धर्माचरण चालू होतं म्हणून झाले. "सत्कर्म योगे वय घालवावे" म्हणतात. सत्कर्माचरण हे सतत यावज्जीव चालू राहिले पाहिजे. कोणत्या वेळेला कोणत्या कर्माचे फल मिळेल सांगता येत नाही. शुद्धबुद्धीने सत्कर्म करण्यात आयुष्य गेले पाहिजे.

हे संसारसुख नको. आप्तेष्ट, दासदासी या सर्वांसहवर्तमान आपल्याला कैलास पर्वतावर आपल्या सान्निध्यात राहायला मिळावे एवढीच तिची इच्छा होती. शंकरांनी तिला तसे वरदान दिले. तेव्हा राजा, तुझा व तुझ्या प्रधानाचा मुलगा हेच त्या वेश्येच्या सभामंडपातील गेल्या जन्मीचे मर्कट आणि कुक्कुट. त्यावेळेपासून यांना रुद्राक्ष धारण करायची वृत्ती आहे. आपल्या आप्तेष्टांसह वर्तमान कैलास पर्वतावर स्थान मागणाऱ्या वेश्येला, आपले म्हणून ज्यांना मानले त्यांच्या कल्याणाचा केवढा विचार असणार ! हे प्राणी नुसत्या करमणुकीसाठी बाळगले नव्हते. शंकरांच्या कृपेने यांचेही कल्याण व्हावे अशी तिची इच्छा होती.

"सर्वेपि सुखिनः सन्तु" ही भावना निर्माण होण्याकरता धर्माचरण झाले असावे लागते. स्वार्थबुध्दी गेली पाहिजे. आपल्या मनात विचार येतो धर्माचरणाचे काय फळ आहे? ' सर्वेपि सुखिनः सन्तु ' मध्ये आपण नाही का येत? देवाजवळ प्रार्थना करताना ' मलाच तेवढे द्या ' असे कशाला म्हणायचे? पण सर्वांना सुखी करा असे म्हटल्यावर आपलाही त्यात समावेश होतो ही जाणीव आपल्याला राहात नाही. आपल्याला एकट्यालाच सुख मिळावे ही बुद्धी जाण्याकरता धर्माचरण पाहिजे. ईश्वराची भक्ती याकरता करायची आहे. या वेश्यास्त्रीच्या धर्मबुध्दीने,

भगवतप्रीतीने तिच्या सर्व आप्तेष्ट, नोकरचाकर सर्वांचा उद्धार झाला. हे कुक्कुट, मर्कट, राजपुत्र, प्रधानपुत्र झाले. राजपुत्र होऊन सुद्धा त्यांची शिवभक्ती कायम राहिलेली आहे. हे संस्कारही त्यांचे त्या स्त्रीच्या संगतीने झालेले आहेत. त्यामुळे हे रुद्राक्ष धारण करतात. शिवभक्ती यांची मोठी आहे. हे धन्य होत !

राजाने हे सर्व ऐकल्यावर पराशर महर्षींना विचारले, हे सर्व ठीक, पण यांचे भविष्य काय? यांचे पुढील आयुष्य कसे जाणार ? हे राज्य करणार की नाही ? पराशर महर्षी म्हणाले,"यांचे भविष्य ऐकून तुला वाईट वाटेल." तेव्हा राजा म्हणाला," तरी हरकत नाही, पण तुम्ही सांगा. काही संकट येणार असल्यास ते दूर करायला आपण समर्थ आहात." तो असे म्हणाल्यावर महर्षींनी सांगितले," यांचे आयुष्य एकूण बारा वर्षांचे आहे. त्यातले फक्त सात दिवस शिल्लक राहिले आहेत. सातव्या दिवशी यांना मृत्यू येणार आहे." हे ऐकून राजाला साहाजिकच वाईट वाटले. तो शरण आला आणि त्याने पराशर महर्षींना हा मृत्यूयोग टाळण्याचा उपाय विचारला. पराशर महर्षी नुसतेच शास्त्रज्ञ नाहीत तर भगवंताच्या शक्तीवर पूर्ण विश्वास ठेवणारे शास्त्रज्ञ आहेत. ते म्हणाले," राजा, भिऊ नकोस. भगवान शंकर हे मृत्युंजय आहेत. मृत्यूला जिंकणारी जी देवता आहे ती सर्वांना तारण करील. जगत् सृष्ट्याने जगाचे संवर्धन होण्याकरता धर्म व अधर्म निर्माण केले. त्यापैकी धर्माचा स्वामी इंद्र आणि अधर्माचा स्वामी अंतक म्हणजे मृत्यू आहे. स्वर्गलोकाला नेणारा इंद्र आहे आणि नरकाला नेणारा तो अंतक आहे. तो जो अंतक-मृत्यू नेमलेला आहे त्याला सहाय्य करणारे काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर वगैरे त्याचेच मित्र आहेत. त्याचेच दूत

आहेत. अनेक पातके या विकारांमुळे उत्पन्न होतात. आणि ही पातके घडल्यावर यमधर्म त्यांना आपल्या लोकाला घेऊन जातो. यमदूत जीवाकडून या विकारांच्या सहाय्याने सगळी पापकर्मे करवितात. हे आपले सगळे दोष आहेत. ज्यांनी आपल्या मनाचा, इंद्रियांचा निग्रह केला आहे, नियमन केले आहे, जे भगवंताला शरण गेले आहेत, त्यांच्या बाबतीत या यमदूतांचे काही चालत नाही. हे विकार त्यांचे अहित करू शकत नाहीत.

त्याचप्रमाणे ब्रह्मदेवाच्या दक्षिण मुखातून जो वेद निर्माण झाला आहे त्यात रुद्राध्याय आहे. रुद्रपठणामुळे सर्वही पातकांचा क्षय होतो. सर्वही ऋषी मंडळी रुद्राध्यायाचे पठण करतात. जेव्हा सर्वच विप्रजन रुद्राध्यायाचे पठण करु लागली तेव्हा त्यांची सर्व पापे नाहीशी होऊ लागली. यमाला जीवांना यमलोकाला नेता येईना. नरकलोक ओस पडायची वेळ आली त्यावेळी यमंधर्माने जाऊन ब्रह्मदेवांना सांगितले, रुद्रपठणामुळे जीवांचे पाप नाहीसे व्हायला लागले त्यामुळे नरकलोकात आता कोणी जीव येत नाहीत. मग ब्रह्मदेवाने त्याला सांगितले, निजल्या निजल्या, उभ्याने, चालताना, भक्ती नसताना जे रुद्रपठण करतील किंवा ज्यांची इतरही अनेक पातके आहेत त्या जीवांना तू घेऊन जा. पण भक्तीने यथाविधी पठण करणारे जे आहेत त्यांना मात्र तू काही नेऊ शकणार नाहीस."

पराशर महर्षींनी राजाला सांगितले," तुझ्या मुलांचा हा अपमृत्यू टळण्यासाठी तू सात दिवस अखंड रुद्राभिषेक कर. आणि त्याचे तीर्थ या मुलांना दे म्हणजे यांचे आयुष्यवर्धन होईल." त्याप्रमाणे राजाने श्रध्दाभक्तीने यथाविधी रुद्राभिषेक करून ते तीर्थ या दोघांना दिले. तो मृत्यूचा दिवस आल्यावर ते दोघे

मूर्छित पडले आणि यमदूत त्यावेळी त्यांना नेण्यास आले. एवढ्यात शिवदूत तेथे प्रकट झाले आणि त्यांनी यमदूतांचा पराभव करून पिटाळून लावले. इकडे हे दोघेही सावध झाले. सर्वांना आनंद झाला. इतक्यात नारद मुनी तेथे आले. राजाने त्यांना उत्तम आसन देऊन त्यांचा योग्य तो आदर सत्कार केला. नारद म्हणाले," राजा या दोघांचे आयुष्य संपले म्हणून तो महामृत्यू आपले दूत घेऊन, यांचे प्राण हरण करण्यासाठी आला होता. पण एवढ्यात शिवदूत तेथे प्रकट झाले आणि त्यांनी यमदूतांना परत पाठवले. हे पाहून यमधर्म स्वतः शिवदूतांजवळ आले आणि विचारले, विधीलिखिताप्रमाणे त्यांचे आयुष्य संपल्यावर आम्ही यांना न्यायला आलो, यात आमची काय चूक झाली, तुम्ही आमच्या दूतांचा पराभव का केलात?"

शिवदूत म्हणाले," चित्रगुप्ताला बोलवा" त्याप्रमाणे तो आला. व त्याने सांगितले," यांचे नियत आयुष्य बाराच वर्षांचे आहे, पण अतिरुद्र झाला तर मात्र अधिक दहा हजार वर्षे यांना आयुष्य वाढवून मिळणार आहे. त्याप्रमाणे सर्व घडलेले आहे." हे ऐकून यमधर्म शांत झाले. आणि आपल्या लोकाला निघून गेले. म्हणजे ब्रह्मलिखित जरी ठरलेले असले तरी त्यापेक्षा अधिक पुण्यकर्म घडले तर त्याच्यायोगे आयुष्य ठरल्यापेक्षा वाढू शकते. पुण्यकर्माचे ते फल आहे. पूर्वीच्या पापकर्माने प्रथम आयुष्य कमी झाले पण पुण्यकर्माने ते वाढले.

नारदांनी सांगितले," राजा, पराशर महर्षींची आणि तुझी भेट झाली म्हणून या दोन कुमारांना जीवदान मिळाले. हेही तुझे दैवच आहे. ईश्वराची कृपा म्हणतात ती अशीच असते. महात्म्यांची भेट झाल्याने ऐहिक आणि पारलौकिक दोन्ही कार्यं सिद्ध होतात.

सांसारिक सुख पाहिजे असेल तर तेही ते देऊ शकतात. संसारातून मुक्त करायचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ आहे. तेव्हां मोठा भाग्यवान तू आहेस.पराशरांच्या कृपेने तुझे सगळे दुःख दूर झाले आणि तुझा पुत्र तुला मिळाला."

याप्रमाणे महाराजांनी त्या सावित्रीला रुद्राक्षाचा महिमा सांगितला. तसाच तीर्थाचा महिमा आहे. भगवंताच्या चरणावरून आलेले तीर्थ पापनाशक आहे. त्याचप्रमाणे भस्माचे महात्म्य आहे म्हणाले. भस्म किंवा अंगाऱ्याने आपले सर्वही दोष दूर होतात. भवरोग वैद्य परमात्मा आहे आणि तीर्थ अंगारा हे त्याचे औषध आहे. यानंतर ती सावित्री म्हणते," महाराज आपले दर्शन झाले, मी धन्य झाले. अदृष्ट न समजून येणारे जे कर्मभोग आहेत त्याचा प्रतिकार जीवाने कसा करावा?" पूर्वीच्या कर्माने पतीचे आयुष्य संपलेले आहे. रोगाचा प्रतिकार होऊ शकला नाही कारण त्याचे पूर्वकर्म होते. ते कर्म कसे नाहीसे करायचे याचा विचार करायला वेळ कुठे आहे. पूर्वकर्मामुळे तो रोग इतका वेगाने वाढत गेला की त्याला मृत्यू आला. म्हणजे जीव जरी बुद्धिवादी, प्रयत्नवादी असला आणि आपल्या बुद्धीने काही करू म्हटले तरी इथे त्याचा काय उपयोग आहे ? ' रोग झाला, वैद्यांना, डॉक्टरांना बोलवा ' एवढेच आम्ही म्हणतो. रोग कशामुळे झाला, हा प्रतिबंध कसा झाला हेच जिथे कळत नाही तिथे प्रतिकार करणार कसा ? इतका असमर्थ जीव आहे तरी त्याचा स्वतःच्या बुद्धीवर विश्वास आहे आणि आपल्या बुद्धीने मी सर्व काही करू शकतो असे तो म्हणतो. ती सावित्री म्हणते,'' पण केवळ आपल्या दर्शनाने माझ्या पतीला जीवदान मिळाले" स्वतःच्या पातिव्रत्याचा अभिमान तिला वाटलेला नाहीये. अभिमान

वाटला तर महाराजांच्या कृपेचे हे फळ आहे असे वाटणे खरे नाही. पुण्यकर्म स्वतःचे विसरून जाणे हे खरे पुण्यकर्म आहे. आणि मी हे पुण्यकर्म केले असा अभिमान धरून ते चार लोकांना सांगितले, मग तर पहायलाच नको. त्या पुण्यकर्माचे सर्व फल निघून जाते. शास्त्र म्हणते, आपण केलेल्या धर्माचे आपणच इतरांजवळ वर्णन केले तर तो धर्म नाहीसा होतो.

काही नद्यांच्या बाबत शास्त्र सांगते, गंडकी नदीतून पोहून जाऊ नये. करतोयाचे उल्लंघन करू नये. बाहुदाला जलस्पर्श करू नये कारण त्यामुळे धर्मनाश होतो. आणि आपल्या स्वतःच्या तोंडाने जर आपण आपल्या धर्माचे वर्णन केले तर तो धर्म नाहीसा होतो.पण तीच युक्ती पापाकरता सांगितली आहे. जर आपल्याकडून घडलेले पाप स्वतःच्या मुखाने इतरांना सांगितले तर ते पाप नष्ट होते. पण तेवढे धैर्य आपल्याजवळ नाहीये. आपण केलेले पाप झाकून ठेवायचे आणि पुण्य मात्र लोकांसमोर ठेवायचे असे चालते. आपण निरपराधी आहोत, आपण शुद्ध आहोत असे आपणच इतरांना सांगितल्यावर ते सर्व पुण्यकर्म नष्ट होते. पाप जाण्याकरताही स्वतः ते इतरांना सांगणे हाच एक उपाय आहे. तो उपाय उलट झाला आहे सध्या. पाप कंठात ठेवायचे आणि पुण्य मात्र सर्वांच्या पुढे ठेवायचे असे चालले आहे. अशा परिस्थितीमध्ये धर्माचरण कसे करायचे, तो धर्म टिकवायचा कसा, हे करणे फार कठीण आहे. ह्या पतिव्रतेचे वय जरी लहान असले तरी ईश्वर कृपेने धर्मबुद्धी फार मोठी आहे. ईश्वराची प्रेरणा असल्याशिवाय धर्मबुद्धी उत्पन्न होत नाही. धर्माकरता अनुकूल बुद्धी ईश्वराच्या इच्छेने उत्पन्न होते. भगवंताची भक्तीसुद्धा ईश्वराच्या प्रेरणेशिवाय होत नाही.

बहुत सुकृतांची जोडी... असे जरी ज्ञानेश्वर महाराज म्हणत असले तरी ती सुकृते निर्माण झाली कशी ? भगवंताची भक्ती करावी, भजन करावे अशी बुद्धी देणारी सुकृते निर्माण झाली कशी हाही विचार करायला पाहिजे. असे ज्ञानेश्वर महाराजांचे सांगणे आहे. सुकृत घडावे अशी बुद्धी देणारा तो परमात्मा आहे.

## ददामी बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते।

हा मुख्य सिद्धांत आहे. सर्वांनी सत्कर्म करावीत हे मार्गदर्शन करण्याकरता "बहुत सुकृतांची जोडी..." असं ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. तुम्ही सत्कर्म करा पण ती करताना ती बुद्धी देणारा परमात्मा आहे ही जाणीव ठेऊन सत्कर्म करा. मी करतो आहे असे समजू नका. अभिमान धरु नका. तशी या स्त्रीची भावना आहे. लहान वयात किती कष्ट सोसले तिने ! आईबाप सुद्धा त्याच्याजवळ जात नव्हते. एकटी होती ती. अंगाला दुर्गंधी सुटली होती आणि आता जास्ती जास्ती क्षीण होत चालला आहे, खंगत चालला आहे. धर्मबुध्दीमुळे तिला पतीची सेवा शुश्रूषा करताना घाण वाटली नाही. सेवाबुध्दी होणं म्हणजे मोठमोठ्या योग्यांना देखील कठीण आहे. पती खाईल तेवढच अन्न खायचं, स्वतः झोपायचे नाही वगैरे आणि इतकं धर्माचरण घडून सुद्धा त्याबद्दल कोणताही अभिमान नाहीये. ही केवढी मोठी योग्यता आहे !

अनेक स्त्रीपुरुष गाणगापुरामध्ये येत असतील. ते अर्थार्थी असतील. ही स्त्री जरी अर्थार्थी असली तरी तिची योग्यता फार

मोठी आहे. शरीराचा त्याग करायलाही तयार झाली. आपल्या हातून धर्माचरण घडले म्हणून आपली कीर्ती व्हावी अशी तिची अपेक्षा नाही. आपल्या धर्माचरणाचे फल म्हणून आपल्या पतीला जीवदान मिळाले पाहिजे अशीही अपेक्षा नाही. दया ईश्वराने करावी, तो समर्थ आहे म्हणून त्याच्या दारात जायचे आहे. तो समर्थ आहे, तो दया करु शकेल अशा विश्वासाने आली आहे. मी मोठी धर्मशील पतिव्रता आहे, माझं एवढं काम झालं पाहिजे अशा भावनेने ती आलेली नाही. आपल्या स्वतःचं सर्वही पुण्यकर्म विसरुन ती महाराजांना म्हणते आहे की आपल्या दर्शनाने मी धन्य झाले. हे ईश्वरार्पण कर्म झालेलं आहे. त्याचं फळ तिला मिळालेलं आहे. अत्युत्कट पुण्य आहे. आम्ही काही कायमचे इथे राहू शकत नाही. आमच्या घरी आम्हाला जावे लागेल. तिथेही आपले स्मरण आम्हाला राहावे यासाठी एखादा मंत्र आपण आम्हाला द्या. मंत्रजप करताना आम्हाला आपले स्मरण होईल, आपले ध्यानही घडेल.

त्यावेळी महाराज तिला म्हणाले,' स्त्रियांना मंत्राचा अधिकार नाही असे शास्त्र सांगते.' नामस्मरण वगैरे निराळे पण बहुतेक वेदमंत्र स्त्रियांना निषिद्ध सांगितले आहेत. नामस्मरण सगळे करु शकतात पण हिने मंत्रदीक्षा मागितली. मंत्र म्हणून जे काही आहेत ते देता येत नाही, म्हणाले. त्याकरता त्यांनी शुक्राचार्यांची गोष्ट सांगितली. शुक्राचार्य हे मोठे ज्ञानी मंत्रज्ञ आणि दैत्यांचे गुरु होते. दैत्यही त्यांची सेवा निःसीम भक्तीने करीत होते. शुक्राचार्यांच्या जवळ संजीवनी मंत्र होता. देवांशी युद्ध करताना दैत्यांना भीती वाटायची नाही कारण त्यांना जरी मरण आले तरी शुक्राचार्य त्यांना जिवंत करणार हे त्यांना माहीत होते.

असा प्रभावी मंत्र त्यांच्याजवळ होता. त्यामुळे देव निराश होऊ लागले. त्यांचे वर्चस्व कमी कमी होऊ लागले. देवांनी त्यांच्या गुरुंना यावर उपाय विचारला. गुरु म्हणाले, त्यांचा मंत्र तुम्हाला मिळविता आला तर पहा. म्हणजे तुम्हीसुद्धा मृत झालेल्या देवांना जिवंत करु शकाल. त्यामुळे युद्ध थांबणार नाही उलट ते लांबतच जाईल. पाच लाख वस्तीचे शहर( बॉंब टाकून ) पाच मिनिटात जाळून टाकता आले की दहा लाख वस्तीचे शहर पाच मिनिटात कसे नष्ट करता येईल याचा विचार चालू होतो.

देवगुरुंनी शेवटी तो मंत्र शुक्राचार्यांकडून मिळवण्याची कामगिरी आपल्या मुलावर, कचावरच सोपवली. " आपल्या शरीराचा, सुखसोयींचा कोणताही विचार न करता अनन्य भावाने तू शुक्राचार्यांची सेवा कर, म्हणजे तुझ्या सेवेने प्रसन्न होऊन तुला संजीवनी मंत्र देतील तो तू आत्मसात कर." सर्व देवांचे कार्य करायचे आहे ना. आणि त्यासाठी दैत्यांच्या राजधानीमध्ये जाऊन राहायचे आहे. हा तिथे गेल्यावर ते दैत्य याची चौकशी केल्याशिवाय राहाणार नाहीयेत. झालं. कच निघाला. शुक्राचार्यांकडे आला, वंदन करुन त्यांना म्हणाला,"महाराज, मी विद्याभ्यासाकरिता आपल्याकडे आलो आहे." शुक्राचार्यांसारख्या ज्ञानी महात्म्याने कचाला ओळखले नसेल काय ! ज्ञानशक्तीही पूर्ण पाहिजे, नुसत्या क्रियाशक्तीचा उपयोग नाही. शुक्राचार्य रणांगणावर दैत्य कुठे मरुन पडला आहे हे आपल्या दिव्य दृष्टीने पाहून बसल्या जागेवरुन त्याला जिवंत करीत होते. हा आलेला मुलगा कोण आहे हे त्यांना तत्क्षणी समजले आहे पण त्यांनी ते व्यक्त केले नाही. त्याचा उद्देशही समजला पण खऱ्या अर्थाने मोठे आहेत

ते, त्यांनी इतर दैत्यांना काही सांगितले नाही. कचाला म्हणाले,"राहा बरं बाळ. इतर विद्यार्थ्यांबरोबर तूही राहा."

शुक्राचार्यांना देवयानी नांवाची मुलगी होती. ती त्यांची अत्यंत लाडकी होती. कच देवयोनीतलाच असल्यामुळे अतिशय देखणा होता. देवयानीचे त्याच्यावर मन जडले. तिला वाटलं,' बर झालं, हा इथे राहिला तर याच्याबरोबर विवाह करुन इथेच राहू.' या दृष्टीने तिनेही आपल्या पित्याला, कचाला ठेवून घेऊन, त्याला विद्या देण्यास सांगितले. विद्येकरता प्राणसुद्धा अर्पण करायची तयारी पाहिजे.

फार पूर्वी शंकराचार्यांच्या अवताराच्या आधी कार्तिकस्वामींनी कुमारील भट्टाचार्य नांवाने अवतार धारण केला होता. त्यावेळी बौद्धांनी मंत्रविद्येच्या जोरावर राजे लोक वश करुन घेऊन सर्वत्र आपले वर्चस्व स्थापन केले. त्यावेळी कुमारील भट्टाचार्यांनी बुद्ध लोक आपला वैदिक धर्म कसा चुकीचा ठरवून बुद्धिभेद करताहेत हे त्यांच्या गोटात जाऊनच शिकलं पाहिजे असा विचार केला. म्हणून बौद्ध वेष धारण करुन त्या लोकांच्यात ते जाऊन राहिले. तिथे त्यांनी बौद्धांचा युक्तिवाद शिकून घेतला आणि मग बाहेर पडून बौद्ध मतांचे फार प्रभावीपणे खंडन त्यांनी केले. तिथे एकदा असा प्रसंग घडला की ते बौद्ध लोक वेदांची वाटेल तशी निंदा नालस्ती करु लागले तेव्हा ते असह्य होऊन बौद्ध वेषातील भट्टाचार्यांच्या डोळ्यात पाणी आले. ताबडतोब इतर बौद्ध भिक्षूंच्या लक्षात आले की हा आपल्यापैकी नाही. ज्या अर्थी वेदांची निंदा ऐकून याच्या डोळ्यात पाणी आले त्या अर्थी हा खरा बौद्ध नसला पाहिजे.

मग त्यांनी जेव्हां याची चौकशी केली तेव्हां याने स्पष्ट

सांगितले की " मी तुमच्या बौद्ध मतांचे खंडन करुन भारतातून घालवून देणार आहे व त्यासाठी त्याचा अभ्यास करण्यासाठी मी इथे आलो आहे." त्यांनी विचारले," तुझा वेद अगदी प्रमाण आहे? तसा प्रसंग आला तर तुला तो वाचवेल?" कुमारील भट्टाचार्यांने होकारार्थी उत्तर दिले. हे ऐकल्यावर त्यांनी ह्याला डोंगरावर नेऊन ह्याचा कडेलोट केला. कडेलोट करण्यापूर्वी तो म्हणाला," वेद हे जर प्रमाण असतील तर मला काहीही इजा होणार नाही. मी जिवंत राहीन."

त्याप्रमाणे त्यांचा कडेलोट झाला, हे खाली पडले पण यांच्या फक्त डोळ्याला थोडी दुखापत झाली आणि हे परत बौद्धांजवळ आले. त्या बौद्धांनी त्याला विचारले," काय तुझ्या देवाने केले? डोळ्याला तरी दुखापत का व्हावी?" कुमारील भट्टाचार्यांनी सांगितले," तो डोळा माझ्या दोषामुळे दुखावला गेला. त्याचे कारण कडेलोटापूर्वी बोलताना, मी जर तर ची भाषा करुन वेदांवर संशय दाखवला. अविश्वास दाखविला. नाही तर मला तेवढीदेखिल इजा झाली नसती. वेद प्रमाण आहेतच अशी निष्ठा मी दाखवायला पाहिजे होती ठामपणे." आणि मग कुमारील भट्टाचार्यांनी बौद्धमतांचे खंडन करुन बौद्धांचा पराभव केला.

काही दिवसांनी दैत्यांना संशय आला, हा दैत्य नसून, देवलोकातील कोणी तरी शुक्राचार्यांकडून संजीवनी मंत्र शिकण्यासाठी आला असला पाहिजे. याला जिवंत ठेवायचा नाही. एक दिवस कच वनामध्ये समिधा वगैरे आणायला गेला असता या दैत्यांनी त्याला ठार मारले आणि त्याची तिथेच विल्हेवाट लावली. प्रथम शुक्राचार्यांनी काही लक्ष दिले नाही.

त्यांना वाटले, असेल कुठे तरी, येईल. पण रात्र झाली तरीसुध्दा कच परत आला नाही हे पाहून देवयानी पिताजींकडे जाऊन म्हणाली,' कच का बरं आला नाही अजून, तुम्ही पहा एकदा.' शुक्राचार्यांनी ध्यान लावून पाहिल्यावर त्यांना खरा प्रकार लक्षात आला. मग त्यांनी आपल्या मंत्र सामर्थ्याने कचाला जिवंत केला आणि तो घरी आला.

आणखी काही दिवसांनी त्या दैत्यांनी पुन्हा एकदा कचाला ठार मारले, त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे केले आणि जंगलात ते फेकून दिले. पुन्हा देवयानी पित्याकडे गेली आणि तिने कचाचा शोध घेण्यास सांगितले. परत शुक्राचार्यांनी त्याला जिवंत केले. मग त्या दैत्यांनी विचार केला, ही देवयानी गुरुमहाराजांना सांगून कचाला परत जिवंत करते. आपण आता नविनच काही तरी युक्ती शोधून काढली पाहिजे. यावेळेस त्यांनी कचाला मारुन त्याला जाळले आणि त्याची राख काही पेयातून शुक्राचार्यांना प्यायला दिली. पुन्हा देवयानीने पित्याला कचाचा शोध घ्यायला विनवल्यावर शुक्राचार्यांच्या लक्षात आले की कच त्यांच्या पोटातच आहे. त्यांना वाईट वाटले फार आणि त्यांनी दैत्यांना ब्राह्मणाची हत्या केली म्हणून शाप दिला. त्यांनी देवयानीला सांगितले,"कच माझ्या पोटात असल्यामुळे मी जर त्याला जिवंत केले तर तो माझे पोट फाडून बाहेर येणार, म्हणजे मला मृत्यू नाही का येणार ?" पण देवयानीने आपला हट्ट कायम ठेवला. तिने शुक्राचार्यांना तिला तो मंत्र सांगण्याची विनंती केली. म्हणजे त्यांना जरी मृत्यू आला तरी देवयानी त्या मंत्राच्या सहाय्याने जिवंत करील.

त्याप्रमाणे शुक्राचार्यांनी तो देवयानीला सांगितला. कच

शुक्राचार्यांचे पोट फाडून बाहेर आला. शुक्राचार्यांना मृत्यू आला आणि देवयानीने मंत्राच्या सहाय्याने त्यांना जिवंत केले. पण या सगळ्यात कचाला तो मंत्र ऐकायला मिळाल्यामुळे समजला आणि त्याचा तिथे येण्याचा उद्देश सफल झाला. त्याने घरी जाण्याची गुरूजवळ अनुज्ञा मागितली, ती त्यांनी दिली. ब्रह्मज्ञानी महात्मे होते ते. त्यांना त्याच्या या कृत्याचे काहीच वाटले नाही. असे महात्मे दैत्यांकडे राहिले हे दैत्यांचे भाग्य. पण ती देवयानी म्हणाली कचाला, "तुला मी तीन वेळा जिवंत केला आहे. तू माझ्याबरोबर विवाह केला पाहिजेस." कचाने तिला समजावले, "मी जर गुरूकन्येशी विवाह केला तर ऋषीमंडळी मला काय म्हणतील? शिवाय तू मला जिवंत केल्यामुळे तू माझी माताच ठरली आहेस." कच जर तिथे विवाह करून राहिला असता तर त्या दैत्यांमध्ये एखादा मोठा अधिकारीच झाला असता. पण परकीय राष्ट्रामध्ये जाऊन आपली बुद्धी कशी ठेवली पाहिजे, आपल्या राष्ट्राचे हित कसे पाहिले पाहिजे हे या कचाच्या उदाहरणावरून शिकण्यासारखे आहे. त्या कथा कुठे आता आपल्याला ऐकायला मिळताहेत ! पुराणे बिराणे सगळी इतिहास जमा झाली. प्रमाण काहीच मानायचे नाहीये. कोणाला वाचायला वेळ आहे ! एकदा हिंदू कोड बिल झालं की ही प्रमाणं गुंडाळून ठेवायची. कोड बिल हेच प्रमाण आहे.

तर त्याने सांगितले, " नाही, हे होणार नाही. हे धर्माच्या विरुद्ध आहे." नाहीतर त्याने जर दैत्यांच्या गुरूंची मुलगी मिळते आहे, किती फायदा झाला असता ! आपल्या राष्ट्राचे, आपल्या समाजाचे अकल्याण कधीही करायचे नाही, प्राण गेला तरी हरकत नाही. विद्या मिळवताना दोन तीन वेळा प्राण गेले,

पण तो तेथेच राहिला. प्रथम ठार मारल्यानंतर घाबरून गेला नाही तो. देवयानीची मनातील इच्छा काय त्याला कळली नव्हती असे नाही. पण विद्या मिळवण्यासाठी राहिला तो.

झाले, कचाने नकार देताच देवयानी त्याच्यावर रागावली. त्याला मंत्राचा काहीही उपयोग होणार नाही असा तिने शाप दिला. त्यानेही तिला शाप दिला की तिला ब्राह्मण पती मिळणार नाही. आणि तो मंत्र षट्कर्णी झाल्यामुळे त्याचे सामर्थ्यही नष्ट झाले आहे. 'माझं काम झालं ' असे म्हणून तो देवलोकाला निघून गेला. म्हणजे इतका संयम आहे मनामध्ये. देवयानीसारखी सौंदर्यवती गुरूकन्या स्वतः होऊन त्याला वरते आहे, पण नाही. हा संयम आहे, ब्रह्मचर्य आहे म्हणून या विद्या सुरक्षित राहिल्या. विद्या संपादन करताना हेही गुण लक्षात ठेवायचे असतात. अस्त्रविद्या मिळवण्याकरता अर्जुन देवलोकात इंद्राजवळ जाऊन राहिला. एकदा इंद्रसभेत उर्वशीचे गायन चालले असता सारखा तिच्याकडे पाहू लागला. इंद्राला वाटले याला उर्वशीचा मोह पडलेला दिसतोय. मग इंद्राच्या सांगण्याप्रमाणे उर्वशी रात्री त्याला भेटायला आली. तीही अर्जुनावर मोहित झाली होती. अर्जुनाला तिचा उद्देश समजल्यावर त्याने खुलासा केला," तू आमच्या कुलाची जननी आहेस, तुझ्यापासून आमचे कुल निर्माण झालं त्या बुद्धीने मी तुझ्याकडे पाहात होतो." तेव्हां त्या उर्वशीने अर्जुनाला,' तू नपुंसक होशील,' असा शाप दिला. त्याचे ब्रह्मचर्य इतके होते म्हणून सर्व अस्त्रविद्या मिळाली. अश्वत्थाम्यालासुद्धा ब्रह्मास्त्र विद्या परिपूर्णपणे मिळविता आली नाही. ती संपूर्ण विद्या अर्जुनाने मिळवलेली आहे. कारण मनाचा संयम. भारताचा हा मोठा गुण आहे. संयम पाहिजे, वैराग्य पाहिजे, त्याग, निरहंकार

वृत्ती पाहिजे. या भारतीय संस्कृतीची वृद्धी करणे, संगोपन करणे याकरता प्रयत्न झाले पाहिजेत. ईश्वराच्या कृपेने जेव्हां होतील तेव्हां होतील.

तर या प्रमाणे ही कथा सावित्रीला सांगून महाराज म्हणाले,"याकरता तुला मंत्र देता येणार नाही. हा शास्त्रीय नियम आहे. तिथे आग्रह चालत नाही." मग तिने महाराजांना एखादे व्रत तरी सांगायची प्रार्थना केली. तेव्हा महाराजांनी तिला सोमवार व्रताचा उपदेश केलेला आहे. त्यासाठी सीमंतिनीचं चरित्र महाराजांनी तिला सांगितलं आहे. ईश्वरकृपेने आणि प्रयत्नाने प्रारब्धातही बदल होऊ शकतो हे सीमंतिनीच्या चरित्रात दाखवले आहे.

सद्गुरुंच्या आज्ञेने साधनानुष्ठान व्हावे. आपल्या इच्छेने ते करणं बरं नाही. जबाबदारी सद्गुरुंची आहे. आपली स्मृती निरंतर राहावी अशा प्रकारचे व्रत पाहिजे. महाराजांनी तिला सोमवार व्रत करुन शंकरांची उपासना करायला सांगितली आहे. पूर्वीसुद्धा कुरवपुरातील स्त्रीला शनिप्रदोष व्रत करायला सांगितले होते. याठिकाणी त्यांनी सांगितले, सोमवार व्रत हे श्रेष्ठ आहे. कोणीही करु शकते. या व्रतामुळे सीमंतिनीचा गेलेला पती सुद्धा परत मिळाला आहे. चित्रवर्म नावाचा मोठा एक समर्थ राजा होता. त्याला बऱ्याच वर्षांनी एक मुलगी झाली. ईश्वरसेवेचे फल म्हणून ही उत्तम, सुलक्षणी शीलवान मुलगी झाली. तिचे जातक पाहून ज्योतिष्यांनी सांगितले की दहा हजार वर्षे ही मुलगी राज्याचा उपभोग घेईल. पण एका ज्योतिषाने मात्र सांगितले की चौदाव्या वर्षी हिला वैधव्य प्राप्त होणार आहे. आता याने हे सांगितले हे ठीक झाले पण ज्योतिषाने किंवा वैद्याने, जरी असा निर्णय असला तरी सांगू नये म्हणतात.

ज्योतिष शास्त्रामध्ये अनेक प्रकार आहेत. थोरल्या महाराजांच्या चरित्रात एक गोष्ट आहेच की.

महाराज उत्तम ज्योतिर्विद होते. सावंतवाडीत कोणा एकाला मुलगा झाला. त्याची जन्मवेळ मांडून गणित केल्यावर हा मुलगा महिन्याच्या आत जाणार आहे असे त्यांना कळले. त्यांनी गणित मांडलेली पाटी उलटी ठेवली. तिथे उपस्थित असलेल्या एकाच्या अंगात अणावकर समंध येऊन बोलू लागला, शास्त्रीबुवा तुमची गणिताची पद्धत जरा बदलून तुम्ही गणित मांडा. त्याच्या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या पद्धतीने गणित केल्यावर त्या मुलाला उत्तम दीर्घायुष्य आहे असे निघाले.

तर इथे सीमंतिनीच्या बाबतीतही असे मत निर्माण झाले. राजा खिन्न झाला. याज्ञवल्क्यांची पत्नी मैत्रेयीही आत्मज्ञानाधिकारी होती. त्यांची दुसरी स्त्री कात्यायनी नावाची विद्वान होती. याज्ञवल्क्यांनी संन्यास घ्यायचं आणि आपलं सर्व या दोघी स्त्रियांमध्ये विभागून द्यायचं ठरविलं. मैत्रेयीने याज्ञवल्क्यांच्या इतर विद्वान ऋषीमंडळींबरोबर झालेले वादविवाद चर्चा अनेक वेळा ऐकल्या होत्या. याज्ञवल्क्यांनी जेव्हां संपत्तीतील तिचा वाटा देऊ केला तेव्हां ती त्यांना म्हणाली," मला या संपत्तीचा काय उपयोग आहे ? जन्ममृत्यू चुकेल का किंवा या संपत्तीमुळे अमरत्व मिळेल काय ?" तेव्हां याज्ञवल्क्य म्हणाले, नाही. तेव्हां ती, संपत्ती नको म्हणाली. मग तिला त्यांनी आत्मज्ञानाचा उपदेश केला. मैत्रेयी निरनिराळ्या राज्यात जाऊन राजघराण्यातील स्त्रियांना मार्गदर्शन करून त्यांची संकटे दूर करीत होती. अशी मैत्रेयी दैवयोगाने राजवाड्यात आली. तिला सीमंतिनीच्या अकाली वैधव्याची हकीकत समजली. तिने सांगितले," ज्योतिषशास्त्र

खरंच आहे पण त्याहीपेक्षा अधिक शक्ती भगवान् शंकरांच्याजवळ आहे. आणि हे देखिल शास्त्रकारच सांगताहेत. तू सोमवार व्रत कर. सोमवारी मन, वाणी इंद्रियांनी शंकरांचे जास्तीत जास्त स्मरण कर. उपोषण कर. दिवसा क्षणभर देखिल झोपू नकोस. म्हणजे तुझी भीती दूर होईल. आणि जरी दैववशात् संकट आले तरी तू त्यातून तरून जाशील. मात्र हे व्रत एकदा धरल्यानंतर सोडायचे नाही. अभिषेकाने पापक्षय होतो म्हणतात. अभिषेक भगवान् शंकरांना फार प्रिय आहे." तशीच धूप, दीप,नैवेद्य इ. ची फळे मैत्रेयीने समजावून सांगितली.

सीमंतिनीनेसुद्धा मैत्रेयीच्या आज्ञेप्रमाणे सोमवार व्रत करायला आरंभ केला. आता तिचा विवाह करायचा आहे. तिच्या पित्याने त्या ज्योतिषाचे फलित ऐकलेले आहे. कन्येची काय अवस्था होणार ? विवाह करावा की नाही ? काय व्हायचे असेल ते होईल असा विचार करून नळराजाचा नातू चंद्रांगद त्याला आपली मुलगी द्यायचे ठरविले. विवाहामध्ये पुष्कळ दानधर्म केला, जावयाला संपत्ती दिली आणि स्वतःला मुलगा नसल्यामुळे जावयाला त्याने आपल्या जवळच ठेवून घेतले. पुढे एके दिवशी तो राजपुत्र आपल्या मित्र मंडळींबरोबर कालिंदी नदीत पोहायला गेला. ज्योतिषांनी फक्त चौदाव्या वर्षी वैधव्य येईल एवढेच सांगितले पण ते कसे येईल, त्याचा प्रकार वगैरे काहीच खुलासा केला नव्हता. तो केला असता तर बरे झाले असते. कदाचित तो अपमृत्यू टाळण्यासाठी प्रयत्न केला असता. पोहता पोहता तो राजपुत्र अचानक बुडून दिसेनासा झाला. त्याचा, मित्रांनी पुष्कळ शोध घेतला पण सापडला नाही. मग त्यांनी राजाला येऊन सर्व हकीकत सांगितली. काही लोकांनी त्याच्या

आईवडिलांना हे जाऊन सांगितल्यावर, आपला एकुलता एक मुलगा गेल्यामुळे ते अत्यंत शोकाकुल झाले. आता यात मुलीचा काय दोष? खूप शोध करुन त्याचा देह सापडला नाही. सीमंतिनीची सहगमन करायची तयारी होती पण देहच सापडला नाही त्यामुळे ते कसे करणार? तो विधी शरीराशिवाय कसा करणार? सर्व शास्त्रज्ञ मंडळींचा निर्णय झाल्यावर चित्रवर्म राजाने आपल्या कन्येला आपल्याच घरी ठेवून घेतले. सासरी पाठवले नाही.

भगवंताची भक्ती हा सुद्धा एक प्रयत्नवादच आहे ना ! कोणाचीही नोकरी करुन, मानअपमान सहन करणे म्हणजेच प्रयत्नवाद नाहीये. संतांनी दाखविलेला भक्तीमार्ग हा मोठा प्रयत्नवाद आहे. तिथे काया वाचा मनाची अत्यंत शुध्दी आवश्यक आहे. हा फार श्रेष्ठ प्रयत्न आहे.

चंद्रांगदाच्या राज्यावर त्याच्या शत्रूंनी हल्ला करुन त्याचे राज्य ताब्यात घेतले व त्याच्या आईवडिलांना तुरुंगात टाकले. पण पुत्रशोकामुळे त्यांचे त्याकडेही लक्ष गेले नाही. इकडे सीमंतिनीचे सोमवार व्रत मात्र चालू आहे. तिच्या मनात अविश्वास निर्माण झालेला नाही. ईश्वराची कृपा आपल्यावर होणार आहे असा तिचा दृढ विश्वास आहे. आता ती काय होईल, कशी होईल हे सांगता येत नाही. पतीचा देह न मिळाल्याने तो गतप्राण झाला की काय झाले हे अद्यापि समजले नाही ना ! नदीत बुडाला एवढेच कळलेले आहे. त्यामुळे एक आशा वाटते आहे.

इकडे तो चंद्रांगद पोहोताना पाण्यात बुडाल्यावर नागकन्यांनी त्याला पाहिले आणि अमृत पाजून आपल्या पित्याजवळ म्हणजे पाताळात वासुकीजवळ आणले. तक्षकाचीही त्याच्यावर कृपा झाली. ते सर्पांचे राज्य त्याला प्रथमच पहायला मिळाले. इथे

भूतलावर राहून त्याची काय कल्पना येणार. हजार हजार फण्यांचे नाग आहेत, त्या फण्यांवर अत्यंत तेजस्वी असे मणि आहेत. त्यांचा प्रकाश सूर्यासारखा पडला आहे. त्या नागराजाने ह्याला तू कोणाचा मुलगा व कोणाचा भक्त आहेस असे विचारले. चंद्रांगदाने सांगितलत," अत्यंत कीर्तीसंपन्न, धर्मशील अशा नळराजाच्या वंशातील इंद्रसेन राजाच्या पोटी मी जन्मलो आहे. चंद्रांगद माझे नांव असून चित्रवर्म राजाचा मी जावई आहे. कालिंदी नदीत मी बुडालो एवढंच मला समजलं, आपल्या इथे मला कोणी आणले हे समजले नाही. सर्वेश्वर जो आहे; काहीही करणं त्याला शक्य आहे; सृष्टी, स्थिती, प्रलय ही कार्यं ज्याच्या शक्तीने चालू आहेत. सर्वेश्वर आणखी सर्वात्मक असा चिद्‌घन परमात्मा कैलास पर्वतावर आकार धारण करुन तो राहिलेला आहे. असा शंभु आमचे कुलदैवत आहे."

हे ऐकून नागराजाला संतोष झाला. हा मोठा भक्त आहे आणि मोठ्या सत्कुळातला राजपुत्र आहे, ह्याला आणले नागकन्यांनी बरे झाले. नागराज त्याला म्हणाला," बाळ, तू इथंच राहा की. इथे तुला सर्व प्रकारचे दिव्यभोग मिळतील. मनुष्याला भूतलावर अशा प्रकारचे भोग पहायला सुद्धा मिळणार नाहीत. इथे अमृताने भरलेली पात्रे आहेत. कल्पवृक्ष याठिकाणी आहेत. इथे भय नाही, शोक नाही.रोग नाही. झोप नाही. आळस नाही. काही नाही. अशी प्रसन्न स्थिती या पाताललोकामध्ये राहाणाऱ्या सर्वांची आहे."

त्याचा हा आग्रह ऐकून घेतल्यावर चंद्रांगदाने आपली मनःस्थिती नागराजाला सांगितली," महाराज, मी बुडालो हे समजल्यावर माझे मातापिता काही जिवंत राहाणार नाहीत.

नुकताच माझा विवाह झालेला आहे. मी बुडलो समजल्यावर माझी वधूसुद्धा अत्यंत शोकाकुल होऊन प्राणत्याग करील. म्हणून मला जाणे आवश्यक आहे. आपण परवानगी द्या."

नागराजाने त्याचे म्हणणे ऐकले आणि जायची परवानगी दिली. त्याला पुष्कळ धन, अलंकार आणि अमृतही दिले बरोबर, जाताना. आपल्या पुत्राला बरोबर देऊन त्याला व्यवस्थित घरी पोहोचवून येण्यास सांगितले. मनाप्रमाणे कुठेही घेऊन जातील असे दोन उत्तम अश्व दिले. ते दोघेही पाताललोकातून बाहेर आलेले आहेत. पाताललोकाचीच आम्हाला कल्पना नाही. आणि पाताललोकात हा गेला आणि आला कसा हे आम्हाला कसे पटणार ! अर्जुन इंद्रलोकात जाऊन आला होता हे खरं कोणाला वाटणार? त्यावेळी तरी कोणाला कसे खरं वाटणार? व्यासमहर्षिंनी धर्मराजाला आणि धर्मराजाने अर्जुनाला ती मंत्रदीक्षा दिली म्हणून अर्जुन जिथे भगवान शंकर राहात होते त्या तपोभूमिपर्यंत जाऊन येऊ शकला. शंकरांनाही त्याने प्रसन्न करुन घेतले. दीक्षादान करणारे महात्मे, त्यांची शक्ती आहे, मंत्राची शक्ती आहे. आणि मंत्रधारण करण्याचीसुद्धा श्रद्धाशक्ती आहे. ती सुद्धा एक शक्ती आहे.

त्या सर्पराजाचा मुलगा आणि हा चंद्रांगद नदीतून एकदम वर आलेले आहेत. त्यादिवशी सोमवार होता आणि सीमंतिनी व तिच्या मैत्रिणी नदीवर स्नान करण्याकरता आलेल्या आहेत. केव्हां भगवंताची कृपा होते. याची वाट पाहाताहेत. ' वाहू हा संसार देवा पायी ' हे निदान दुःख झाल्यावर तरी व्हायला पाहिजे. दुःख दूर करु शकत नाही. अशा स्थितीत तरी देवावर भार टाकणे हेही चांगलं पुण्य आहे. विवाह होऊन थोडाच काळ

झाला होता पण ती भगवान शंकरांची श्रध्दा भक्तीने पूजन करते आहे. चंद्रांगदाने तिला विचारले," तुझी प्रकृती अशी खराब का झाली? तू कोणाची स्त्री आहेस? तुला कसला शोक झाला आहे?" त्याला वाटले, ही आपल्या पत्नीसारखी दिसते आहे. सीमंतिनीने आपल्या मैत्रिणींना स्वतःची हकीकत सांगण्यास सांगितले.

त्या मैत्रिणीने सांगितले," ही चित्रवर्माराजाची कन्या आणि चंद्रांगदाची पत्नी सीमंतिनी आहे. हिचा पति नदीत बुडून गेल्यामुळे ही अशी अत्यंत शोकाने निराश झाली आहे. सौंदर्य गेलं हिचं सगळं. ही सोमवार व्रत करते आणि आज सोमवार असल्यामुळे ही इथे आली आहे. हिच्या सासुसासऱ्यांना शत्रूने तुरुंगात टाकून राज्य ताब्यात घेतले आहे. परंतु त्यांची मुक्तता व्हावी आणि आपल्या पतिची भेट व्हावी म्हणून ही सोमवार व्रत करते आहे." मग सीमंतिनीने चंद्रांगदाकडे पाहिल्यावर तिला वाटले हा आपल्या पतीसारखा दिसतो आहे. पण याला पती म्हणायचे कसे? कोणी तरी धूर्त मनुष्य आला नसेल कशावरुन? अनेक राक्षस आहेत, वाटेल ते रुप धारण करु शकणारे. इंद्राने अहिल्येकडे जाताना गौतमाचे रूप धारण केले. सामर्थ्याचा उपयोग वासना पूर्ण करण्याकरता केला त्याने. शिक्षा झाली त्याला.

किंवा आपल्याला भ्रम झाला असेल म्हणून आपल्या पतीसारखे रूप दिसत असेल याचे. आपल्या पतीची भेट होईल की सगळा जन्म असाच जाणार, असा ती शोक करु लागली. मग चंद्रांगदाने तिला आश्वासन दिले, तुझा पती जिवंत आहे. आणि तीन दिवसांनंतर तो तुला येऊन भेटेल. तुझ्या या व्रतामुळे भगवान् शंकरांची तुझ्यावर कृपा आहे. पण तिच्या मनात संशय

उत्पन्न झाला, पाण्यामध्ये बुडालेला आपला पती पुन्हा कसा भेटेल. ईश्वराची शक्ती पूर्ण आहे, तो काहीही करु शकतो. हे मान्य आहे पण पुन्हा दुसरे विचार मनात येतात ना. जीवभाव जोपर्यंत आहे तोपर्यंत सगळे संशय कधीही दूर होत नाहीत. ईश्वरशक्तीचा प्रत्यक्ष अनुभव आला असला तरीसुद्धा त्यालाच जीव म्हणतात. चंद्रांगदाने इथे आपली ओळख दिली नाही. फक्त तिचा पती जिवंत आहे असे सांगून समाधान केले. आपल्या मातापित्यांना तुरुंगातून मुक्त करायचं पहिले कर्तव्य करण्याकरता आपल्या राष्ट्रामध्ये प्रथम तो गेला. स्वतःचे सामर्थ्य तर त्याच्याजवळ होतंच पण नागराजाचे सहाय्यही त्याला मिळालं होतं. तो नागराजपुत्र त्याच्या बरोबरच होता. त्याने नागपुत्राला शत्रूकडे आपल्या आगमनाचा समाचार द्यायला पाठवला. चंद्रांगद आलाय म्हटल्यावरच त्याचे शत्रू घाबरले. नागपुत्र म्हणाला,"मीच तुम्हाला शासन करतो. नागराजाचा मी मुलगा आहे."

शत्रुपक्षाला भीती वाटली. अन्याय मार्गाने जाणारे जे आहेत, त्यांना निर्भयता कधीही नसते. अन्याय करतात ते. पण त्यांच्या मनात कायम भीती असते. आणि मनात भीती आली की संपलं, शत्रू नामोहरम झाला. चंद्रांगदाच्या मातापित्यांना तुरुंगातून बाहेर आणून सिंहासनावर बसवले. त्यांची क्षमा मागितली. चंद्रांगद आलाय ऐकल्यावर त्या मातापित्यांना आनंद झाला. नेत्रातून प्रेमाश्रू वाहाताहेत. सगळ्या नगरात ध्वज पताका लावल्या. आनंदोत्सव साजरा करायचे ठरविले. चंद्रांगदाने नगरात प्रवेश केला. आपल्या मातापित्याच्या चरणावर मस्तक ठेवले. आणि सर्व हकीकत त्यांना सांगितली. राजाने नागपुत्राचा सत्कार केला आणि त्याला आपल्या पाताललोकामध्ये पाठवून दिलेले आहे.

मग आपल्या मुलालाही राजाने श्वशुराच्या राष्ट्रात पाठवून दिलं. तिथेही आनंदोत्सव साजरा झालेला आहे. चंद्रांगदाची भेट झाल्यामुळे सीमंतिनीचा शोक दूर झाला. त्याचे स्वतःचे तर राज्य होतेच शिवाय सासऱ्याचेही राज्य त्याला मिळाले. नागराजाने सर्व ऐश्वर्य, धन, कल्पवृक्षाची फळे त्याला दिलेली होती.

तेव्हां गुरुमहाराज त्या सावित्रीला सांगताहेत. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्या दोघांनीही सोमवार व्रत करण्याचे ठरविलेले आहे. महाराजांचे स्मरण करुन सोमवारी ते दोघे देवाची म्हणजे महाराजांचीच पूजा करीत होते. शंकर भगवान् आणखी कुठे दिसणार? जे दिसतंय तेच शंकरांचं स्वरुप आहे(महाराजांच्या रुपाने) अशीच त्यांची धारणा होती. ही सुलभता आहे. भावना नाही नुसती. त्याकरता सर्वात्मा शंकरांचेच हे स्वरुप आहे असे मानून ते महाराजांची सोमवारी पूजा करीत होते. पुढे गुरुमहाराजांच्या आज्ञेनेच ते दोघे पतिपत्नी माहूरला गेले. तरीही दर वर्षी ते दर्शनाकरता गाणगापूरात येत असत. गुरुदर्शन करावं, पूजा करावी, अन्नदान वगैरे सर्वही करावं. संसारामध्ये जे काही पाहिजे ते सर्वही सौख्य त्यांना मिळालेलं आहे. आणि भगवत कृपेने ते मुक्त झालेले आहेत. याप्रमाणे सर्वांचे मंगल करणाऱ्या भगवानाने मनुष्य रुप जरी धारण केलं असलं तरी ती ईश्वरीशक्ती सुप्तावस्थेत कायम आहे. भक्त आला की त्याच्या भावनेच्या संबंधाने ती शक्ती व्यक्त होते. अशा प्रकारे अनेक भक्तांचा उद्धार केला, अनेक लीला केल्या.

नामधारक सिद्धांना महाराजांचे पुढचे चरित्र विचारताहेत. महाराज नरसोबावाडीहून गाणगापूरला आल्यावर इतर कुठेच गेले नाहीत.तिथेच राहिलेले आहेत. नामधारकांनी इतक्या श्रध्देने

विचारल्यावर सांगणाऱ्यांनाही उत्साह वाटतो आहे. सिद्ध म्हणाले, भगवान् श्रीहरिची कृपा तुझ्यावर आहे. त्यामुळे तुला महाराजांचे चरित्र जाणून घ्यायची उत्सुकता आहे. म्हणून तू सारखं हे सांगा, ते सांगा असं म्हणतोयस. ही ईश्वराची कृपा आहे. तुझी बुद्धी चांगली आहे. म्हणून, गाणगापूरामध्ये एक ब्राह्मण राहात होता त्याची कथा सांगायला त्यांनी आरंभ केला. गाणगापुरामध्ये एक ब्राह्मण राहात होता. त्याचा, परान्न घ्यायचे नाही असा नियम होता. विप्रांना मृत्यू किंवा संकटे का येतात त्याची कारणे स्मृतीकार सांगतात. वेदाध्ययन नाही, त्यामुळे त्या मंत्रोच्चारामुळे होणारा पापक्षय होत नाही. पापे तर होताहेत पण पापक्षालन होत नाहीये. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे अन्नदोष फार आहे. अन्नदोषांमुळेही विप्रांवर अशा प्रकारची अनेक संकटं येतात. या ब्राह्मणाच्या घरी शेतीवाडी नव्हती. भिक्षा मिळेल त्याच्यावर संतोषाने राहायचा. निर्वाहाला काही फार लागत नाही. ' निर्वाहा पुरते द्या ' असे संतांनीसुद्धा देवाजवळ मागितले आहे. क्षणो क्षणी आपले स्मरण घडावे, त्या व्यापांमध्ये आमचा वेळ जायला नको म्हणून निर्वाहापुरते संतांनी मागणे मागितले आहे. राहायला एखादी जागा आणि माध्यान्हकाली भिक्षा हे एवढंच मागणं आहे त्यांचं. पण ते मागणं देवाजवळ आहे. दुसऱ्या कोणाजवळ नाही. माणसे देताना एखादी गोष्ट देतात पण ती उपकाराच्या भावनेतून देतात त्यामुळे त्या संबंधांचे स्वरुप वेगळे येते. दात्याचा अहंकार वाढत जातो. अयाचित वृत्ती ही त्याकरिता आहे. ही वृत्ती धारण करुन राहाणाऱ्यांचे धैर्यही मोठे आहे. नाही. कोणाजवळही काही मागायचे नाही. ' दाता एक रघुनंदन ' ही फार मोठी निष्ठा आहे त्यांची.

हा ब्राह्मण सत्यवादी आणि शांत आहे. कुठेही आसक्ती नाही. ' हे पाहिजे ते पाहिजे ' असे काही नाही. मन शांत झालेलं आहे. मोठा अधिकारी आहे हा. महाराजांच्याबद्दल याच्या मनात भक्ती तर आहेच पण ज्ञानाचा हा अधिकारी आहे. गृहस्थाश्रमी असल्यामुळे कर्माचे आचरण करतो आहे. पंण त्याची पत्नी मात्र याच्या उलट स्वभावाची होती. अतिशय आसक्त होती. आसक्तीमुळे शांतता मिळत नाहीये. अनेक वासना मनामध्ये असताना शांतता कशी असणार ? शांतता याचा अर्थ वासनाक्षय झाला आहे. आचार्य महाराजांनी व्याख्या करताना सांगितलंय, वासना कमी कमी होत जाणं म्हणजे शम आहे, शांती आहे. आणि ही मुख्य आहे. साधनचतुष्टय संपत्तीमध्ये शमाला महत्व मुख्य आहे. जितक्या वासना कमी तितकं अधिक सुख आहे. बाकीची साधनं अंगभूत आहेत असं म्हणतात आचार्य महाराज. पूर्वांग आणि उत्तरांग यांच्या अनुष्ठानाने शमसिद्धी होते. वासनाक्षय होतो. साधनचतुष्ट्यामध्ये विरक्ती म्हणून जी सांगितली आहे. ती तीव्र विरक्ती पाहिजे. केव्हां एकदा या मायेतून सुटेन असे तीव्र वैराग्य निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी त्यांनी उदाहरण दिलेलं आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास अचानक घराला सर्व बाजूंनी आग लागलेली आहे. सगळे लोक खाली जमलेले आहेत. हा खिडकीमध्ये आलेला आहे. ' मला सोडवा ' म्हणतो आहे. खाली जमलेल्या लोकांनी चादर हातात धरुन त्याला खाली उडी मारण्यास सांगितली. याने लगेच उडी मारली. घरात आपली बायको आहे, मुलं आहेत, संपत्तीने भरलेली तिजोरी आहे पण याचं तिकडे लक्ष नाही. इथे स्वतःचा जीव वाचावा ही जशी उत्कट इच्छा आहे

तसे आपण या संसारातून सुटलो पाहिजे असे तीव्रतेने वाटले पाहिजे. हे शमेचे अंग आहे. त्याशिवाय शम साध्य होत नाही. वासना कमी कमी करण्यासाठी साधनाचतुष्ट्याची ही सगळी अंगं आहेत. शम हा प्रधान आहे.

त्याची पत्नी त्याच्या विरुद्ध स्वभावाची असतानाही तो शांतीने राहातो आहे याला महत्व आहे. राग जाण्याचे उपाय केल्यावर ज्याचा खरा राग गेला तेव्हा म्हणायचे, तो पर्यंत नाही.

महाराजांच्याकडे पुष्कळ भक्त मंडळी यायची,अन्नदान करायची. क्षेत्र असल्यामुळे श्राद्ध वगैरेच्या निमित्ताने अन्नदान करायची, गावातल्या ब्राह्मणांच्या स्त्रिया तिथे जेवायला जायच्या. त्यांना वस्त्र, दक्षिणा वगैरे मिळायचे ब्राह्मणांच्या बरोबर. ह्या ब्राह्मणाच्या स्त्रिला रोज हे सर्व पहायला मिळायचे. हा ब्राह्मण शांत आहे तर ती अशांत आहे. ह्याच्या सगळ्या वासना गेलेल्या आहेत तर हिच्या वासना हे सर्व पाहून वृद्धिंगत होत आहेत. हा परान्न घेत नव्हता त्यामुळे तिला जेवायला जाता येत नसे. ती म्हणे, जेवायला गेलं तर काय बिघडलं?

अन्नाचा मनाशी संबंध आहे. आपल्याजवळ शुचिता हवी. आपण शुद्ध राहिलं पाहिजे. ही त्या ब्राह्मणाला तळमळ असल्यामुळे तो कोणाकडे जेवायला जात नसे. त्यामुळे ती पतीची निंदा करु लागली. एकदा एक मोठा श्रीमंत गृहस्थ गाणगापूरात आला आणि गांवातल्या सर्वही ब्राह्मण स्त्रीपुरुषांना त्याने जेवायला बोलावले. ह्यांनाही बोलावणे आले. ह्या ब्राह्मणाने सांगितले आपण जायचे नाही. ती म्हणाली,' मी एकटी जाईन.' त्याने समजावले, ' मेहुण बोलावले आहे तुला एकटीला जाता येणार नाही.' तिला वाटले किती चांगली संधि आली आहे. सांसारिक

माणसाची संधि निराळी, पारमार्थिक माणसाची संधि निराळी. शेवटी तिला एक युक्ती सुचली. सोनाराकडूनच कान टोचलेले बरे. ती महाराजांच्याकडे आली आणि रडगाणे गाऊ लागली,"काय आमच्या घरात धान्य नाही, कपडालत्ता, वैभव नाही आणि त्या गृहस्थाने चांगले बोलावले असता हे नाही म्हणतात. हे कसलं आमच दैव. काय म्हणायचं याला !" हे सगळं ऐकल्यावर महाराजांनी तिच्या पतिला बोलावले. त्याला म्हणाले," अनायसे तुला घरी बोलावणे आले आहे व तुझ्या पत्नीची जायची इच्छा आहे. ती तू कां पूर्ण करीत नाहीस? जा जेवायला."

तो म्हणाला," महाराज, आजपर्यंत मी कुठेही जेवायला गेलो नाही. परान्न घ्यायचे नाही असा माझा नियम आहे. हा नियम मोडायचा का? आता आपली आज्ञा असेल तर जातो." सद्गुरुंची आज्ञा असेल जायची तर नियम बाजूला ठेवायची तयारी आहे. इथे, धर्माचरणाने मी श्रेष्ठ होईन नाही तर सद्गुरुंच्या आज्ञापालनाने मी श्रेष्ठ होईन, हा विचार आहे.

महाराजांची आज्ञा प्रमाण मानून तो गेला. त्या स्त्रिचे काम झाले, तिथे पंगती बसल्या आहेत. पक्वान्ने वाढली आहेत. स्त्रिया पुरुष जेवताहेत. पण हिला मात्र असं दिसलं की कुत्री डुक्कर प्रत्येकाच्या, हिच्या सुद्धा पानात जेवताहेत, तोंड घालताहेत. हे पाहिल्यावर ती एकदम उठली. आपण कशाला आलो इथे असं तिला वाटलं. पतिलाही तिने उठायला सांगितले. आणि दोघेही महाराजांच्या सन्निध मठामध्ये आलेले आहेत.

महाराजांनी तिला विचारले,' काय जेवण आवडले का?'. ती घाबरली. तिला पश्चात्ताप झालेला आहे. " माझी चूक झाली. मी पतीचा छळ केला. या माझ्या अपराधाची आता क्षमा

करा " महाराज म्हणाले,' पतीच्या आज्ञेचे उल्लंघन तू कधीही करु नकोस. पतीच्या आज्ञेप्रमाणे वागण्यात कल्याण आहे. स्वतःचा आग्रह असा चालवू नये.' त्या ब्राह्मणाला अतिशय वाईट वाटले. तो म्हणाला,' काय करु महाराज, या दुष्ट स्त्रीची संगती मला मिळाली आणि माझा नियमभंग झालेला आहे." संयमाला फार महत्व आहे. एकदा का संयम सुटला की गेलंच सर्व. आम्ही म्हणतो मन पवित्र असलं म्हणजे झालं. कुठेही काहीही खाल्लं तरी काय हरकत आहे ! अशी आम्ही आमचीच समजूत करून घ्यायची. आपलं मन पवित्र आहे, असे आपंल्याला वाटते. आणि एकदा का एखाद्याच्या संगतीने याला सुरवात झाली की संपले. एकदा पाय घसरला कड्यावरून की परत शिखर गाठता येत नाही तसे होते.

या ब्राह्मणाला ही भीती वाटली. काय करू महाराज ! जन्मापासून आजपर्यंत असं पाप माझ्या हातून घडलेलं नाही. आत्मविश्वासाने तो सांगतो आहे. अहंकार नाहीये. पण या स्त्रीच्या संगतीला लागून सर्व उष्टे घ्यावे लागले. महाराज होते त्याच्याजवळ. खरी धर्मश्रध्दा आहे त्याच्याजवळ म्हणून ते मार्ग दाखवताहेत. ते म्हणाले," बाबा, तुला दोष नाही. आपल्या पत्नीच्या मनाचे समाधान करावे लागते. कुलस्त्री नेहमी असमाधानामध्ये असणं हे बरं नाही. आज तिच्या मनाप्रमाणे तू वागलास. तिलाही पश्चात्ताप झालेला आहे. पुढे ती तुझ्या धर्माच्या आड येणार नाही. ही व्यवस्था झाली की नाही ? तसंच हे सगळे तू तिच्या मनाचे समाधान करण्याकरता केलेले आहेस. स्वतःच्या इच्छेने नाहीये. इच्छेने होणारा दोष हा अधिक दोष आहे. रागद्वेषपूर्वक होणारे जे कर्म आहे ते दोषपूर्ण आहे. अनिच्छेने बळजबरीने

करावा लागणाऱ्या कर्माचा दोष नाहीये."

आणि दुसरं शास्त्र सांगताहेत, एखाद्याच्या घरी श्राद्ध आहे आणि ब्राह्मण मिळत नाहीये. श्राध्द बंद होण्याची पाळी आली. त्याने जर बोलावले तर त्याला मी परान्न घेत नाही, असे सांगता येत नाही. उलट गेलं नाही तर दोष लागेल. श्राध्दघात केल्याचा दोष लागेल. प्रत्येक वेळेला श्राद्धाला जायचे असा याचा अर्थ नाही. पितरांचे कर्म आहे आणि कर्म करणारा श्रद्धेने श्राध्द करू इच्छितो आहे. अशा वेळी जायला हरकत नाही.

मग या ब्राह्मणाने शास्त्र जाणून घ्यायच्या उद्देशाने महाराजांना, कोणाचे अन्न घ्यावे व कोणाचे घेऊ नये, असे विचारले. तसेच दान कोणाचे घ्यावे कोणाचे घेऊ नये, हे सगळे मला सांगा, म्हणाला. महाराज म्हणाले, आचारसंपन्न विप्र, आपले गुरू, श्वशुर, शिष्य, आपले आजोबा वगैरे अशा ठिकाणी भोजन केले असता दोष नाही. आचारहीन जो आहे तिकडे मात्र अन्न घेऊ नये. आपले कर्म सोडून दुसऱ्या कर्मामध्ये प्रवृत्त झालेल्याचेही अन्न घेऊ नये. कन्येचा विवाह झाल्यावर तिला मुलगा होईपर्यंत तिच्याकडेही अन्न घ्यायचे नाही. नेहमी दुसऱ्याच्या घरी अन्न भक्षण करून राहिल्याने दोष उत्पन्न होतात. त्यामुळे आपले तेज नष्ट होते. तसेच शुद्ध द्रव्य असेल तर दान घ्यायला हरकत नाही. आधी काही अंश बाजूला काढून शुद्ध झालेल्या द्रव्याचे दान करावे. अशुद्ध द्रव्याचे दान होऊच शकत नाही. त्यावेळी घेणारा आणि देणारा दोघेही दोषी ठरतात. त्याचप्रमाणे ग्रहणाच्या वेळी तीर्थक्षेत्री असताना कोणाकडून दान घ्यायचे नाही.

पंचमहायज्ञांनी ज्यावर संस्कार झालेले आहेत ते अन्न घ्यावे. संन्याशी किंवा अग्निहोत्र्यालाही ते अन्न घ्यायला हरकत नाही.

त्याचप्रमाणे आपतकाली दान घ्यायला हरकत नाही. जपाने तो दोष दूर करता येतो. आपत्तीच्या वेळीच दान घेणे क्षम्य आहे आणि तो दोष गायत्रीच्या जपाने, नामस्मरणाने घालवता येतो. एरव्ही मात्र कोणाकडून काही, अन्न वगैरे घ्यायचे नाही. आपल्या धर्माप्रमाणे आचरण करणाऱ्याला कसलाही दोष लागत नाही. त्याला कोणचीही आसक्ती होत नाही. आचार त्याग करून दुसऱ्याचे कर्म करणारे जे आहेत त्यांच्यावर मात्र संकटे वगैरे येतात. तेव्हां वासना वगैरे सोडून आपले विहितकर्म तू करीत राहा म्हणजे तुझे कल्याण होईल.

मग त्या ब्राह्मणाला आचारधर्म जाणून घ्यायची अधिक इच्छा निर्माण झाली आणि महाराजांच्या सारखे सांगणारे आहेत. सर्वज्ञ परमात्माच त्याला गुरू भेटला आहे ना ! सांगणाराही चांगला पाहिजे. सांगणाऱ्याच्या मनातच संशय असेल तर तो दुसऱ्यांचा संशय काय दूर करणार ? मोठ्या महाराजांनी हे सर्व लिहून ठेवलेले आहे आणि त्यावर टीकाही लिहिलेली आहे. खुलासा केलेला आहे, स्पष्टीकरण केलेले आहे. नवीन नवीन विचार त्यावर केलेला आहे. मग महाराजांनी ब्राह्मणाचे सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतचे सर्व आचारधर्म सांगितले आहेत. ज्ञानात ज्ञानकांड फक्त चार भाग आणि बाकीचे ९६ भाग कर्मकांड आहे. उपासना हा कर्माचाच एक भाग आहे. कर्माविषयी अकर्मता ज्ञान होण्याकरता कर्मयोग सांगितला आहे. कर्म केलीच नाहीत तर कर्मांपासून मुक्ती मिळणार नाही. अर्जुनालासुद्धा मुद्दाम तोच उपदेश केला आहे. शौचमुखमार्जन, स्नान, संध्या वगैरे कसे करावे, वस्त्र कोणती कधी नेसावीत वगैरे सर्व त्याला समजावून सांगितले. कर्ममार्ग फार कठीण आहे. पण

ज्याला ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागायचंय त्याला काही कठीण नाही. सगळं शास्त्र समजून घ्यायचं आणि त्याप्रमाणे वागायचं. म्हणून असे जे शास्त्र समजून घेऊन त्याप्रमाणे वागणारे जे कर्मनिष्ठ लोक आहेत त्यांचे आचरण हे देखिल शास्त्राने प्रमाण मानले आहे. ते जसे वागतात त्याप्रमाणे वागायचे. पुस्तके वाचायला नकोत की काही नको. ते कसे वागतात, त्यांची वाणी कशी आहे, त्यांची मनोवृत्ती कशी आहे, त्यांच्या शरीराने काय काय कर्म होतात, हे सगळं पाहून त्याप्रमाणे आपण आपलं आचरण ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे. पूर्वी लहान वयात मुलींचे लग्न होत असे. सासरी आल्यावर वडिलधाऱ्या मंडळींच्या वागणुकीवरुन कसे वागायचे ते ती आपोआप शिकत असे. अगदी लहान मुलगा- वर्षा दोन वर्षांचा- असतो त्याला काय प्रत्येक गोष्ट थोडीच शिकवावी लागते. मोठ्यांचे व्यवहार पाहून त्याला शब्दज्ञान, शब्दांचा अर्थ समजायला लागतो. ही व्यवस्था आपोआपच होते आहे. थोडं समजायला लागल्यानंतर मॉंटेसरीत वगैरे तो जात असेल.

तर परंपरा हे एक ज्ञानाचे साधन आहे. ज्येष्ठ मंडळी घरात आहेत, वागताहेत ती, ती पाहून आपण वागायचे. म्हणून शिष्टाचार, सदाचार हे एक स्वतंत्र प्रमाण आहे शास्त्रकारांनी मानलेले. त्यानंतर संध्या वंदनाचेही पुष्कळ वर्णन केलेलं आहे. संध्या केल्याशिवाय कोणचंही कर्म करण्याचा अधिकारच नाही. सूर्योदयापूर्वी संध्येला सुरवात करावी. सूर्योदय होऊन बराच वेळ झाला तर ती अधम संध्या होते. काळही पाहिला पाहिजे आणि जी क्रिया(किंवा कृत्य) करायचे त्याचे स्वरुप समजावून घेऊन ती केली पाहिजे. हे किती कठीण आहे. कर्मयोग काही

सोपा नाहीये. कोणतेही कर्म झाल्यावर त्याच्याच शक्तीने, स्मरणाने कृपेने हे कर्म पूर्ण होऊ दे अशी प्रार्थना करायची आहे. समजून घेऊन जरी कर्म केले तरी पुष्कळ चुका त्यात राहातात. मग गायत्री मंत्राचे महत्व सांगितले आहे. १०८ नाही तर निदान २८ तरी करावा आणि तेवढाही शक्य नसेल तर १० तरी करावाच असे सांगितले आहे. पण ही शास्त्राने दिलेली सवलत आहे. शास्त्र म्हणजे काही लष्करी आज्ञेसारखे नाही. आज्ञा आहे पण तसे करता आले नाही तर असे करा, हेही सांगितले आहे.

त्यानंतर भस्मधारण विधी सांगितला आहे. गायत्री जप वगैरे सर्व कर्म पवित्र होण्याकरता सांगितली आहेत. पुढे पूजाविधीचेही सविस्तर वर्णन केले आहे. गुरुचरित्राच्या दोन अध्यायात जवळ जवळ सात आठशे ओव्या तेवढ्यासाठी घातल्या आहेत. अघमर्षण म्हणजे काय, सूर्य उपस्थान म्हणजे काय वगैरे सविस्तर विवरण त्यात केले आहे. आणि नंतर पूजाविधी सांगितला आहे. पुरुष सूक्ताच्या सोळा ऋचा आहेत. त्या सोळा ऋचांनी सोळा उपचार भगवंतांना अर्पण करायचे आहेत. आपल्या चित्तामध्ये त्या जीवकलेचे ध्यान करुन(परमात्म्याची कला) ती पुष्पामध्ये ग्रहण करुन ती मूर्तीला अर्पण करायची, त्या मूर्तीमध्ये ती ईश्वरकला प्राप्त झालेली आहे, अशा भावनेने नंतर पूजेला सुरवात आहे. प्रत्यक्ष मूर्ती नाही." नाही घडविली, नाही बसवली" नामदेवराय म्हणताहेत. ही त्यांची भावना आहे. मूर्ती म्हणजे देवाचा एक अवतार, एक प्रतीक आहे, देवाचं रुप आहे ही भावना धारण करुन पूजा करायला सांगितली आहे. अशा रीतीने हे सर्व उपचार यथाविधी समर्पण करावे.

पूजाविधी संपल्यानंतर माध्यान्ह संध्या पुन्हा आहे, वैश्वदेव

आहे, नैवेद्य आहे. घरामध्ये जी हिंसा होते नकळत, तिकडे आपले लक्ष नसते. वैश्वदेव कशाला सांगितला आहे? ' पंचसूनाजनितदोष परिहार्थम् ' म्हणतात. जाते, उखळ, चूल आहे, लाकडे पेटवतो आपण किती हत्या होते या ठिकाणी. हवेत किती तरी जंतू असतात त्यांची या ठिकाणी हत्या होते. झाडून काढतानासुध्दा कुंच्यामुळे किती तरी जंतूंचा नाश होतो. गृहस्थाच्या घरात हे दोष निर्माण होतात ते वैश्वदेव केल्यामुळे दूर होतात. तो झाल्यावर अतिथीची वाट पहावी. आज असं होतं, आधी कोणी आला तर,' स्वयंपाक व्हायचा आहे ', अशी पाटी लागते, नंतर आला तर जेवणे झाल्याची पाटी लागते. कशाला येईल कोणी भिक्षा मागायला ! इच्छाच नाही आम्हाला अतिथी यावेत अशी. एखादेवेळी दत्तात्रेयांसारखे अतिथी येतात, सुमतीने त्यांना भिक्षा घातली.तिचे पुत्र त्यांना व्हावे लागले. देवसुद्धा योग्य कर्म करणारा जो असेल त्याच्याकडे स्वतः होऊन जातात आणि त्याच्या कर्माचे फळ त्याला देऊन टाकतात. नैवेद्य देवाला अर्पण करुन मग त्याचा प्रसाद म्हणून आपण तो ग्रहण करावा. भोजनाच्या वेळेला कोणत्या दिशेला तोंड करुन, कसे बसावे वगैरे सर्व नियम सांगितले आहेत. डाव्या हाताने पाणी प्यायचे नाही, एकदा घेतलेला घास अर्धवट टाकायचा नाही. हे सगळं होतं हे गृहीत धरुनच त्यांनी नियम सांगितलेत ना ! किती जेवण घ्यावे यालाही नियम आहे. मुनीने आठ घास, वानप्रस्थ स्वीकारलेल्याने सोळा घास आणि गृहस्थाला बत्तीस घास घ्यायची परवानगी आहे. गृहस्थाला इतके तरी घास लागतात की नाही कोणास ठाऊक. पानांत निरनिराळे पदार्थ असतात त्या सर्वांचे मिळून हे धरले आहेत. वेदाध्ययन करणाऱ्या

ब्रह्मचाऱ्याला मात्र यथेष्ट खायची परवानगी आहे. असे आहाराबद्दलही नियम आहेत. आणि याप्रमाणे पंचमहायज्ञ, नैवेद्य वगैरे शास्त्राप्रमाणे करणारे मुक्त होतात, सर्व पातकांपासून ! जेवणाकरता स्वयंपाक करायचा नाहीये. स्वयंपाक झाल्यावर अतिथीला, देवाला, आपल्या पोष्यवर्गाला अर्पण करुन मग आपण जेवायचे आहे. त्यांचा त्यात वाटा आहे. या सगळ्याला धर्म म्हणतात. सध्या या सगळ्याला बंधन, कटकट वगैरे म्हणतात. इच्छाच नाहीशी झालेली आहे ना !

या नंतर वेदाध्ययन, शिष्यवर्गाला शिकवणे वगैरे सांगितले आहे. अध्ययन आपण केले आहे, दुसऱ्याला आपण ज्ञानदान करावे. त्याचा योगक्षेमास उपयोग होत आहे. इच्छा नसेल तर ते काही करायची जरुरी नाही. अध्ययन, यजन आणि दान. प्रतिग्रह घेतलाच पाहिजे असे नाही. पुन्हा सायंसंध्या, देवाची आरती वगैरे सांगितले आहे. सूक्तपठण आहे. भक्तीमार्गही यात आहे ना सगळा. प्रत्येक कर्माच्या शेवटी भगवंताचे स्मरण म्हणजे भक्तीशिवाय पूर्तता नाहीये. शास्त्राने पुष्कळ सांगितले आहे, पण आपली श्रद्धा पाहिजे शास्त्रावर आणि त्याप्रमाणे आचरण करण्याची उत्कंठा पाहिजे. याप्रमाणे वागणारा जो आहे तो परब्रह्मापर्यंत जाऊ शकतो. या सर्व कर्मांपासून(धर्माचरणामुळे) उत्पन्न होणारे पुण्य जीवात्म्याला शेवटपर्यंत उपयोगी पडते. सद्‌गुरुंची भेट होते, ज्ञानप्राप्ती होते, ज्ञानप्राप्तीच्या मार्गातील सर्व विघ्ने दूर होतात. आणि शेवटी आत्मज्ञान संपन्न होऊन तो मुक्त होतो. असा हा कर्मयोगाचा विषय सांगितला आहे. द्विसाहस्त्रीमध्ये पांच अध्याय कर्मयोगाकरता लिहिले आहेत थोरल्या महाराजांनी. सोमवार व्रत सांगितलं,

पातिव्रत्य सांगितलं, स्त्रीधर्म सांगितले, ब्राह्मणधर्म वगैरे सांगितले. शेवटी भक्तीयोग सांगितलेला आहे. अत्यंत श्रेष्ठ भक्तीयोग आहे. सर्वांना- ज्ञानयोग, कर्मयोग वगैरेंना- भक्तीयोग सहाय्य करणारा आहे.

# । भक्तीयोग ।

**नामधारकाने** सिद्धांना असा प्रश्न केला की ज्ञानयोग आणि कर्मयोग सांगितल्यावर भक्तीयोगाची काय आवश्यकता आहे? कर्मयोगाने काय उद्धार होणार नाही का ? ज्ञानयोगाने तर निश्चितच उद्धार आहे. त्याला सिद्ध उत्तर देताहेत – एखादा जीव उत्तम कर्म करतोय परंतु मनामध्ये ईश्वराची भक्ती नाही. मग कर्माचं फळ मिळेल. तामस कर्माचे काही फळ नसते. राजस कर्म म्हणजे उत्तम रीतीने ज्ञान मिळवणे, व्यवस्थित कर्म करणे. आपल्याला कीर्ती मिळते, यश मिळते. परंतु मुख्य फळ मिळत नाही. मुख्य फळ म्हणजे वासनाक्षय होऊन सगुण निर्गुणाच्या भक्तीमध्ये, ज्ञानामध्ये निमग्न होण्याकरता चित्ताची जी तयारी पाहिजे ती होण्याकरता मन निर्वासन होऊन जाणे. हे जे मुख्य फळ आहे ते मात्र राजस कर्माने मिळणार नाही. त्याला भक्तीची जरुरी आहे. म्हणून कर्मज्ञ-कर्म करणारा अभक्त जर असेल तर त्याचे कर्म फुकट आहे. याचा अर्थ त्याला मुख्य फळ मिळत नाही. तीन योगमार्ग आहेत. योग म्हणजे उपाय. कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग. हे तीन उपाय जिवाचा उद्धार होण्यासाठी शास्त्रकारांनी सांगितले आहेत. या तिन्ही योगांची आवश्यकता आहे आणि त्यांचे एकमेकांना सहाय्य झाले म्हणजे अद्वितीय ब्रह्माची प्राप्ती होते. म्हणून भक्तीयोगाचे प्रतिपादन करण्याकरता इथून पुढच्या सगळ्या कथा आहेत.

गाणगापुरामध्ये गांवातलीही भक्त मंडळी असायची, रोज परगावचीही यायची. रोज येताहेत. कीर्ती महाराजांची सर्वत्र

पसरलेली आहे. आपली कामना पूर्ण झाली म्हणजेही यायचे. भगवंताच्या कृपेने इच्छा पूर्ण झाली की महाराजांची पूजा करावी असं चाललेलं आहे. एके दिवशी भास्कर नावाचा ब्राह्मण परगांवहून तिथे आला. महाराजांना आपण भिक्षा करायची असे त्याने मनामध्ये ठरविले होते. घरातून त्याने काही शिधा बांधून आणलेला होता. तीन माणसांना पुरेल एवढा त्याच्याजवळ होता. तीन माणसांना किती लागणार? त्यादिवशी एका धनिकाची भिक्षा होती. गावातल्या सर्वांनाही त्या धनिकाने जेवायला बोलावले होते. या भास्कर ब्राह्मणालाही आमंत्रण होते. हा जेवायला गेला आणि जेवण झाल्यावर मठातच आपले शिधेचे गाठोडे उशाला घेऊन झोपला. तो दिवस गेला. आता याला कोण विचारणार ? दुसरे दिवशी दुसऱ्याची भिक्षेची पाळी, तारखा लागलेल्या आहेत. ते लोक यालाही जेवायला बोलवायचे, हा जेवायला जायचा असे तीन महिने गेले. याला काही दिवस मिळाला नाही. याने काय करावे. काय भांडण करायचे? रोज जेवण करायचे तिथेच निजायचे. लोक निंदा करू लागले. मठामध्ये आयती राहायची सोय आहे म्हणून पोट भरण्याकरता हा इथे आलेला दिसतोय. भिक्षा करायच्या नुसत्या गोष्टी करतोय. बाकीचे लोक त्याचा उपहास करताहेत, अवमान करताहेत, केव्हां तुझी भिक्षा आहे विचारताहेत आणि कशी करणार भिक्षा तू? महाराजांचे शिष्य किती आहेत? एवढ्या गाठोड्यातला शिधा एवढ्या शिष्यांना जेवण घालायला पुरेल कां?

हे सर्व महाराजांच्या कानावर गेलं आहे. तो ब्राह्मण बिचारा नमस्कार करायचा आणि गप्प बसायचा. बोलायचा नाही काही नाही. मग खरी भक्ती कशी आहे हे दाखवायचं आहे महाराजांना.

त्याकरता एके दिवशी त्या भास्कर ब्राह्मणाला बोलावून म्हणाले,"तुम्ही मुद्दाम भिक्षा करण्याकरता आला आहात. आजपर्यंत तुम्हाला कोणी वेळ दिला नाही. आज आम्हाला तुमची भिक्षा घ्यायची आहे, तुम्ही आम्हाला भिक्षा द्या. सर्व शिष्यांना अन्नदान करा." भास्कर ब्राह्मणाला हे ऐकून फार आनंद झाला. सर्वांना भिक्षा द्या म्हणताहेत महाराज. सर्वांना अन्नदान झालं पाहिजे. पण महाराजांच्या या आज्ञेची त्याला भीती वाटली नाही. आपण भिक्षा करणार आहोत, आपल्याजवळ फक्त दोघा तिघांना पुरेल एवढाच शिधा आहे, त्यातून एवढ्या सगळ्या शिष्यांना भिक्षा कशी करणार असा विचार मनात आला असता तर भीती वाटली असती. महाराजांनी आज्ञा केली आहे. त्याला काही काळजी नाही. तो निश्चिंत आहे.

आवश्यक ती शिधा सामुग्री जमवून त्या भास्कराने स्वयंपाक करायला सुरवात केली. आता दुसऱ्या कोणाची तरी भिक्षाही ठरली असेल ना त्या दिवशी. त्या दुसऱ्या लोकांना बोलावून त्यांची भिक्षा दुसऱ्या दिवशी करण्यास महाराजांनी सांगितले आज भास्कर ब्राह्मणाची भिक्षा आहे म्हणाले. इथे एक विचार केला आहे महाराजांनी मुद्दाम. संन्यासी होते ना महाराज. एकाची भिक्षा ठरलेली आहे आज. त्याला कबूल केलंय आणि दुसऱ्याला भिक्षा कर म्हणून सांगताहेत आणि ' तू उद्या कर ', म्हणून सांगताहेत. हे संन्यास धर्माला शोभून दिसतं का? एकदा एकाला भिक्षा घेतो म्हणून कबूल केल्यावर दुसऱ्याला कसे सांगितले? तर याचे उत्तर त्यांनी दिलेले आहे. महाराज हे साक्षात ईश्वर आहेत. त्यांनी असं म्हटलंय की 'आमच्या चरित्राबद्दल जर कोणाला संदेह उत्पन्न झाला, हे चांगले आणि हे वाईट आहे तर

वाईट सोडून चांगले जेवढं आचरण असेल ते घ्या ', असा आदेश आहे त्यांचा. ते कुठे मागे लागलेत असं वागा म्हणून सांगायला. हाही विचार मांडला आहे आणि शास्त्रानेही तसंच सांगितलं आहे. श्रेष्ठ पुरुषाच्या आचरणाप्रमाणे आपलं आचरण करायचं, ते सांगतील त्याप्रमाणे वागायचं. त्यांचे आचरण पाहून आचरण आपले तसे करावेसे वाटत असेल तर तसे करा पण मग मनात त्याबद्दल (योग्य अयोग्यतेबद्दल) संदेह आणू नका. महात्म्यांना त्याचा काहीच निर्बंध नाहीये. चांगलं काय आणि वाईट काय, द्वंद्वातीत अवस्था त्यांना मिळाल्यामुळे पण ज्याला मार्गदर्शन करायचंय त्यालाही त्यांनी मार्गदर्शन करून ठेवलेले आहे.

गावातील सर्व मंडळी भास्कर ब्राह्मणाकडे गेली आणि म्हणाली,"सगळ्यांना तुम्ही जेवायला बोलावणार, शीत तरी येईल का आमच्या वाट्याला? महाराज तुम्हाला सांगतात काय, तुम्ही कबूल करता काय" वगैरे. भास्कर ब्राह्मण महाराजांच्याकडे गेला आणि लोक काय म्हणतात ते सांगितले. महाराजांनी त्यांना सांगितले,"तुम्ही आज इथंच जेवायला या. तुम्हाला सोडून आम्हाला भिक्षा घ्यायची नाही." ब्राह्मण मंडळी भिक्षेला आली. त्यांना काही समजेना. ह्याचा स्वैपाक किती थोडा आहे ! तरीही सगळे लोक आले. महाराजांनी स्वयंपाकपात्र अन्नासह आपल्या जवळ आणून ठेवायला सांगितलं. तीन पात्र अन्न फक्त होतं. महाराजांनी त्या पात्रांवर आपली छाटी झाकण्यास दिली. मंत्र म्हणून महाराजांनी त्यावर जल प्रोक्षण केलं. प्राकान्न सिद्धी ज्याला म्हणतात. एक वस्त्र द्रौपदी नेसलेली आहे. पण भगवंतांचा संकल्प झाला, तिला हवी तेवढी वस्त्र द्यायचा. दुःशासन जेवढी

वस्त्रे ओढतोय तेवढी तिच्या भोवतालून येतातच आहेत. वस्त्र संपत नाहीयेत.

महाराजांनी सांगितले, त्या पात्रातून वाढायला अन्न काढून घ्या आणि ती पात्रे छाटीने तशीच झाकून ठेवा. सर्वांना जेवायला बसवले. गावांतले स्त्री-पुरुष, मुलं बाळं सर्व जेवायला आली. हा भास्कर ब्राह्मण आपला पहातोय. ईश्वराच्या लीलेबद्दल संशय असून उपयोग नाही. फक्त ती पहायची. त्यात आनंद आहे. भास्कर ब्राह्मण महाराजांच्या आज्ञेप्रमाणे वागतोय. त्यांनी सर्वांना बोलवायला सांगितलं, याने बोलावलं."आपण तीनच पात्रांचा स्वैपाक केलाय तो सर्व गावातल्या लोकांना कसा पुरणार," असा विकल्प त्याच्या मनांत आला नाही. महाराजांच्यावर पूर्ण विश्वास ही मोठी दैवी संपत्ती त्याच्या जवळ आहे. भास्कर ब्राह्मणही ह्या पंगतीवर उठणाऱ्या पंगती पहातोय आणि पंगतीत बसलेले ब्राह्मणही हे सर्व निरीक्षण करताहेत पण दोघांची मनःस्थिती अगदी निराळी आहे. 'अन्न मिळेल की नाही ', अशा संशयी स्थितीत ते जेवताहेत पण अन्न मिळतंय. पण भास्कराच्या मनांत काहीही संशय नाहीये. सर्वांना जेवायला घालायचे असा महाराजांचा संकल्प आहे. माझा स्वयंपाक कुठला? माझं अन्न, माझं मन, माझं शरीर सर्वच त्या परमेश्वराने निर्माण केलेलं आहे. माझं असं म्हणायचं कसं? विचार परिपक्व असल्यामुळे महाराजांवर पूर्ण विश्वास आहे. तो सगळं पहातो आहे.

सर्वांची जेवणे झालेली आहेत. मग महाराजांनी गावातल्या इतर शूद्र वगैरे मंडळीना जेवायला बोलावण्यास सांगितले. तीही मंडळी जेवून गेली. ईश्वरावर विश्वास ठेवल्यावर काही कमी पडेल अशी शंका मनात आणणे म्हणजे खरा विश्वास नाही तो.

हा भास्कर ब्राह्मण त्या भूमिकेवर गेलेला आहे. कमी पडणारच नाहीये. म्हणून सगळ्यांना त्याने आमंत्रण दिले. तीनच पात्रांचा स्वयंपाक आहे इतकी माणसे कशी जेवतील हा संशय मनामध्ये आलेला नाहीये. व्यवहार सगळा सुटलेला आहे. ईश्वरावर पूर्ण निष्ठा असल्यामुळे व्यवहारातील अनुकूल प्रतिकूल गोष्टी मनातच येत नाहीत. ही भक्ताची योग्यता आहे.

सगळ्यांची जेवणं झाली. महाराजांनी भास्कराला जेवण करण्यास सांगितले. तोही जेवला. मग महाराजांनी अन्नावरची छाटी काढण्यास सांगितले. भांडी तशीच भरलेली. मग एवढ्या लोकांना पुरेल एवढं अन्न या तीन पात्रातून कसं आलं याचं उत्तर कुठला बुद्धिवादी देऊ शकेल का? कसं होईल, काय होईल या फक्त शंका आम्ही मनात घेतो. पण हे झालं कसं याचा विचारच करता येत नाही. अचिंत्य शक्ती आहे ईश्वराची. तर्क करायचा झाला तर ज्याच्याबद्दल तर्क करता येईल त्याच्याबद्दल करावा. कालिदास झाला की नाही विचार सुरू झाला म्हणे आणि शेवटी कालिदास झालाच नाही हे सिद्ध झालं म्हणे. शिवाजी राजे आणि समर्थांची भेट झालीच नाही. काय ह्या विचाराचा उपयोग आहे? ज्या विचारांनी ' नाही ' हेच पदरात पडते त्या बुद्धीचा काय उपयोग आहे? तीन महिने मठात राहून महाराजांची सेवा केली त्याचे फळ त्याला मिळाले.

तीन महिने तो महाराजांच्या जवळ मठात जाऊन बसत असे. मोठ्या महाराजांनी एका अभंगात म्हटले आहे - ' उपदेश ते न देती तरी ऐकाव्या त्या गोष्टी। ' ऐकतो आहे बिचारा. स्वतःची बुद्धी काहीही त्यात नाही. "असमर्थ मी आहे महाराज. सामान्य जीव आहे मी. अनंत जन्म फिरता फिरता आपल्या

जवळ आज मी आलो ही आपली कृपा आहे. आपल्या इच्छेप्रमाणे होऊ दे." हा त्याचा भक्तिभाव पाहून निर्गुण पादुकांची पूजा त्यालाच करायला सांगितली महाराजांनी. आज पाचशे वर्षे होऊन गेली, त्या भास्कर ब्राह्मणाच्या वंशातील मंडळी गाणगापुरातील निर्गुण पादुकांची पुजारी म्हणून पूजा करताहेत. त्या भास्कर ब्राह्मणाच्या श्रद्धा, भक्ती आणि विश्वासाचे फळ ५०० वर्ष सर्वांना मिळते आहे. त्याची पूजा महाराजांना मान्य झालेली आहे.

ते उरलेले अन्न महाराजांनी नदीत टाकायला सांगितले, म्हणजे त्या जलचर प्राण्यांनासुद्धा प्रसाद मिळाला आहे. अशा रीतीने महाराजांच्या कृपेने अन्नदान झाले. गावातल्या लोकांना हे सगळं केवळ महाराजांच्या शक्तीनेच झालं हे कबूल करावेच लागले कारण याच्याजवळ तर फक्त तिघांना पुरेल एवढाच शिधा होता हे त्यांनी पाहिले होते. अनुभव घेऊनसुद्धा ही शक्ती मान्य न करणाऱ्याला प्रत्यक्ष ब्रह्मदेवही पटवून देऊ शकणार नाही.

पांडव वनवासात असताना द्रौपदीचे जेवण झाल्यावर दुर्वास ऋषी आले. सूर्य नारायणाने ते पात्र देतानाच अट घातली होती की द्रौपदीचे जेवण झाल्यावर थाळीतून अन्न मिळणार नाही. आता मध्यरात्री कुठून अन्न आणणार? मग केवळ भक्तीने कार्य झालं. धर्मराजाचे धर्म सामर्थ्यही कमी पडले त्या वेळेला. तो काय करणार? भीती सगळ्यांना वाटती आहे, दुर्वास ऋषी शाप देऊन जातील. द्रौपदीने गोपालकृष्णांचे स्मरण केलेले आहे. भगवान आलेले आहेत आणि त्यांनी फक्त ते भाजीचं पान घेतलं आणि त्यांची तृप्ती झाली. दुर्वास ऋषींच्या परिवारासह

सर्वांची तृप्ती झाली आणि ते निघून गेले. त्याप्रमाणे आज, ही स्थिती झालेली आहे. गाणगापुरातल्या सगळ्या लोकांना जेवण मिळाले आहे. आता ते फळ कोणाला मिळाले, हा एक विचार आहे. भास्कर ब्राह्मण म्हणतो महाराजांनीच अन्न निर्माण केलं, आम्ही ते वाढलं. आम्ही फक्त निमित्त आहोत. तुम्ही फळ घ्यायला तयार नाही. मग देव फळ घ्यायला तयार आहे काय? देवाला काय जरूर आहे? तो नित्य तृप्त आहे. असे जे दिव्य कर्म झालेले आहे त्यामुळे सर्व जगाचे संरक्षण होते. शुद्ध धर्म आहे हा. निरहंकार भावाने, भक्तिभावाने हे अन्नदान झाले, सर्वांची तृप्ती झाली. याचीही निरहंकार बुद्धी कायम राहिलेली आहे. राहाणारंच. तीन माणसांच्या अन्नात एवढी माणसं कशी जेवतील? ' मी अन्न दान केलं ', असे हा म्हणेल कसा? शक्य आहे काय? अहंकार होईल कसा? त्यामुळे निरहंकार वृत्तीने सगळं घडलं आहे. महाराजांची लीला पहायची आहे.

सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय ही परमेश्वराची लीला खरे भक्तगण पहातात फक्त आणि आनंदात राहातात. काय लीला आहे ! अशा एका भक्ताचा उद्धार झालेला आहे. आता दुसरी एक कथा सांगितली आहे. महाराज तिथे असताना किती अर्थार्थी लोक यायचे. काहीही इच्छा करून यावे. बाकीचे सगळे मानवी प्रयत्न निष्फळ झाल्यावर निराश होऊन यावे महाराजांच्याकडे.

त्याच गावात सोमनाथ नावाचा एक ब्राह्मण गंगा नावाच्या आपल्या स्त्रीसह राहात होता. साठ वर्षांची होऊन सुद्धा तिला मुलगा मुलगी काही नाही. तिने रोज महाराजांच्या दर्शनाला यावे, ओवाळावे महाराजांना निरांजनाने आणि जावे. एक दिवस

महाराजांनी तिला विचारले,"बाई, रोज तुम्ही येता, निरांजन ओवाळता. काय तुमची इच्छा आहे?" ती म्हणाली," महाराज, मी असं शास्त्र ऐकलंय की ज्याला पुत्र संतती नाही त्याला स्वर्गादी चांगला लोक मिळत नाही. एवढंच काय पण त्याच्या पितरांचेही पुढे श्राद्ध वगैरे करायला कोणी नसल्यामुळे पिंडदान बंद होते ना. त्यामुळे पितरांचाही अधःपात होतो. त्या मनःस्थितीमध्ये सध्या आहे मी. आमचा आणि आमच्या पितरांचा अधःपात होणार. ही भीती माझ्या मनामध्ये आहे." म्हणजेच आपल्याला मुलगा नाही हे तिला सुचवायचे आहे. " या जन्मातली मुलाची आशा माझी संपलेली आहे. आता हे जे सगळे मी करतेय ते निदान पुढच्या जन्मात तरी मुलगा व्हावा या आशेने करतेय तेव्हां पुढच्या जन्मात तरी मला मुलगा होईल एवढी कृपा करा, महाराज. चांगली गती आम्हाला मिळेल. तेव्हां माझ्यावर दया करा, महाराज. एवढी इच्छा पुढच्या जन्मी तरी पूर्ण होऊ द्या."

व्यावहारिक दृष्टीने तिचा काल संपलेला आहे. साठ वर्षे होऊन गेलेली आहेत. या जन्मात आता संतती होणार नाहीच. पुढच्या जन्मासाठी वर, आशीर्वाद ती महाराजांच्या जवळ मागते आहे. महाराज म्हणाले,"बाई, पुढचा जन्म आहे नाही कोणी सांगितलंय. त्याचा विचार आत्ता कुठे करायचा. कुठे जावे लागेल जिवाला काही सांगता येत नाही आणि पुन्हा ही आठवण कशी राहाणार? तेव्हां याच जन्मात तुम्हाला मुलगा आणि मुलगी होणार आहे." महाराजांचे हे वाक्य स्मरणात राहाण्याकरता तिने पदराला गाठ मारली. ती म्हणाली,"महाराज, कसं शक्य आहे? आता मी ऋतुमतीही होत नाही. जन्मापासून मी वंध्या आहे. एकदाही कधी मला संतती झालेली नाही. परंतु आपला

संकल्प. आपला प्रसाद झाला तर होईल. आजपर्यंत पुत्राच्या इच्छेने अनेक व्रतवैकल्य, तीर्थयात्रा, दानधर्म वगैरे केला, अश्वत्थ वृक्षाला पुष्कळ प्रदक्षिणा घातल्या. मूर्खपणा माझा झाला असे मी समजते. लोक अश्वत्थ वृक्षाचे महात्म्य उगीच सांगतात. इतकी सेवा करून माझ्या पदरात मात्र काहीच फळ पडले नाही."

तिने सेवा पुष्कळ केली पण त्या अश्वत्थ वृक्षाबद्दल तिच्या मनांत अश्रद्धा निर्माण झाली. आता निंदा करून केलेल्या सेवेचे सर्व फळ फुकट जाणार की नाही? त्या वेळी सर्व सेवा श्रद्धेने केली पण आता निराश होऊन म्हणते त्या सेवेचा काही उपयोग नाही. महाराजांनी विचार केला तिच्या कर्माचं फळ तिला मिळालं पाहिजे. म्हणून,"अश्वत्थ वृक्षाचीच सेवा तू पुन्हा कर"असे महाराजांनी तिला सांगितले. ब्रह्मदेव आणि नारद यांच्यात अश्वत्थ वृक्षाच्या महात्म्यासंबंधी झालेला संवाद आणि पूजाविधी सर्व सांगितला.

अश्वत्थ वृक्ष म्हणजे भगवंतांची विभूती आहे. त्रिमूर्ती त्या अश्वत्थ वृक्षामध्ये राहातात. नारदाला अश्वत्थ पूजेचा विधी ब्रह्मदेवांनी स्वतः सांगितला आहे आणि नारदांकडून सर्व ऋषीकामना त्याच्या पूजनाने पूर्ण होत आहेत. त्याला प्रदक्षिणा घातल्या म्हणजेही पुष्कळ फल मिळतं. अश्वत्थ वृक्षाची स्थापना करणे, त्याचे व्रत करून उद्यापन, हवन वगैरे करणे हेही मोठं पुण्यकर्म आहे. म्हणून आता अश्वत्थाची सेवा पुन्हा करायला लाग. त्याच्यापासूनच तुला सिद्धी मिळेल, काही काळजी करू नकोस. भीमा अमरजा संगमावर जो अश्वत्थ वृक्ष आहे त्याची पूजा तू सुरू कर. आम्हीही अनुष्ठान तिथेच करतो. त्याच्याबद्दल

अविश्वास बाळगू नकोस. निश्चित तुला कन्या, पुत्र होतील."

ती म्हणाली," बरंय महाराज, आपली आज्ञा आहे तर मी सेवा करते." त्याप्रमाणे तिने तीन दिवस अश्वत्थाची सेवा केली. चौथ्या दिवशी रात्री तिच्या स्वप्नात एक ब्राह्मण आला. अश्वत्थ देवता ब्राह्मण वेषाने आली म्हणा. त्याने तिला सांगितले,"उद्या प्रदक्षिणा झाल्यावर गावातल्या मठात तू महाराजांच्या दर्शनाला जा आणि ते देतील ती फळे तू भक्षण कर. म्हणजे तुला मुलगा होईल."

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी प्रदक्षिणा झाल्यावर गुरू महाराजांच्या दर्शनाकरता मठामध्ये ती आलेली आहे. महाराजांना नमस्कार केल्यावर त्यांनी दोन फळे तिच्या ओटीमध्ये टाकली. त्यांनी सांगितले,"उद्यापन करून तू दान दे आणि ही फळे भक्षण कर. तुझी इष्टसिद्धी होईल. पूर्वीच्या युगांमध्ये पुत्राचे अनेक प्रकार सांगितले आहेत. औरस पुत्र नसेल तर दत्तकही घ्यायला सांगितलेले आहे. पण सर्वांमध्ये औरस पुत्र हा मुख्य आहे. त्या मुलाच्या नुसत्या दर्शनाने पितरांना मुक्ती मिळते. म्हणून तुम्हा दोघांना तारणारा खास औरस पुत्र होईल. संशय वगैरे काही बाळगू नकोस."

ती घरी गेली. सर्व विधी केले. ब्राह्मण भोजन वगैरे झाले आणि वयाच्या साठाव्या वर्षी ती ऋतुमती झाली. हा प्रभूचा महिमा आहे. चौथ्या दिवशी शुद्ध झाल्यावर आपल्या पतीसह ती महाराजांच्या दर्शनाला आली. महाराजांची पूजा केली. त्यानंतर तिला गर्भधारणा झाली.

सिद्ध सांगतात, नामधारका, प्रभूच चरित्र हे स्वतंत्र आहे. परतंत्र, कोणाच्या सांगण्यावरून, कोणाच्या आश्रयाने ते नाहीये.

त्यांची इच्छाशक्तीच मोठी आहे. दोन हजार जिव्हा ज्याला आहेत, असा शेषसुद्धा त्यांची स्तुती करू शकत नाही. वार्धक्यामुळे जर्जर झालेल्या देहाच्या गंगेला गर्भधारणा झाली. लोक आश्चर्य करताहेत. तिच्या पतीने सोमनाथाने तिसऱ्या महिन्यापासून पुंसवन वगैरे संस्कार केले आहेत. पुढे नऊ महिने पूर्ण झाल्यावर तिला कन्या झालेली आहे. ज्योतिषशास्त्राप्रमाणे तिची लक्षणे उत्तम होती. ज्योतिषांनी तिला सांगितले,"ही तुझी कन्या कुळाचा उद्धार करणारी आहे. तिलाही उत्तम पुत्र वगैरे होतील." सोमनाथ ब्राह्मणाने दानधर्म केलेला आहे.

बाराव्या दिवशी आपली कन्या बरोबर घेऊन हे दोघेही मठात आलेले आहेत आणी तिला महाराजांच्या चरणाजवळ ठेवली त्यांनी. नमस्कार करून ती म्हणाली,' म्हाताऱ्या झालेल्या ह्या वंध्य देहाला हे फळ मिळाले. (हा एक अर्थ आहे मुख्य अर्थ निराळा आहे.) पण जरी फळ मिळाले तरी ही कन्या आहे. सर्वांना आनंद देणारा पुत्र झाला असता तर बरं झालं असतं. सर्वांना समाधान मिळालं असतं. फळ मिळालं पण या फळाचा काही उपयोग नाही असं मला वाटतं.'

महाराजांना थोडा विस्मय वाटला. आश्चर्य वाटले. अजून इच्छा आहे हिची. महाराज ह्या मुलीचे वर्णन करताहेत. मुलगी झालेली तिला पसंत पडली नाही पण मुलगी तरी हिच्या नशिबात कुठं होती? मुलीला जवळ घेऊन महाराज म्हणताहेत– "ही मुलगी उत्तम बुद्धीची गुणवान, शीलसंपन्न अशा प्रकारची आहे. हिला उत्तम संतती होईल. सर्व लोक हिला वंदन करतील, स्तुती करतील. अशी उत्तम कन्या तुला मिळालेली आहे. असं असताना तुला समाधान का नाही?"

तिला आता मुलाची इच्छा आहे. माणासाचा स्वभाव असा असतो की त्याच्या इच्छा कधीही संपत नाहीत. एक इच्छा पूर्ण झाली की लगेच दुसरी इच्छा तयारच आहे. त्यामुळे समाधान नाहीये.

महाराज तिला म्हणाले," कसा मुलगा पाहिजे? दीर्घायुषी पाहिजे असेल तर मूर्ख मुलगा होईल आणि बुद्धिमान हवा असेल तर अल्पायुषी होईल." ती स्त्री मोठी चतुर होती. ती म्हणाली,"चांगला बुद्धिमान मुलगा असावा आणि त्याला पाच मुले व्हावीत." महाराजांची तिला वर द्यायची इच्छा आहे. अल्पायुषी असला तरी चालेल. तिला तसा वर दिला आहे. पुढे लवकरच तिला चांगला मुलगा झाला. याप्रमाणे ती वांझ असताना सुद्धा तिला मुलगा व मुलगी महाराजांच्या वरप्रसादाने झाली. त्या मुलाने पुढे माता पितरांची सेवा केली हे मोठे भाग्य आहे. तो मोठा धार्मिक होता. त्याला पाच मुले झाली. त्या कन्येला मोठेपणी आत्मानात्म ज्ञान झाले, वेदांत शास्त्रात ती निष्णात झाली. एक याज्ञिक पती मिळाला. गुरू महाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे ब्रह्मविचार करण्यास योग्य अशी ती झाली. यज्ञ करणाऱ्याच्या पत्नीला काही मंत्र श्रवण करण्याचा अधिकार मिळतो. इष्टीच्या वेळेस ती बाजूला बसू शकते. काही मंत्र उच्चारावे लागतात तिला. अर्थात तेवढ्या पुरतेच. आत्मानात्म विचार करणारी ती पतिव्रता स्त्री इतरांना मार्गदर्शनही करू शकत होती. सिद्ध म्हणाले, नामधारका, गुरू महाराजांचा प्रभाव आहे.

श्रद्धारूप दृष्टी पाहिजे. सद्भक्तांजवळ श्रद्धा असल्यामुळे हा सद्गुरूचा प्रभाव काय आहे हे त्यांना पहायला मिळते.

अभक्तांना मात्र काही पहायला मिळत नाही. जन्मांध मनुष्याला सूर्याचा प्रकाश कधी तरी दिसतो का? तो म्हणतो सूर्यप्रकाश नाहीच आहे.

ते दोघेही पती पत्नी महाराजांची सेवा करताहेत. संसारातील सर्व सुख त्यांना मिळालेले आहे. त्यांच्या मुलांचंही कल्याण झाले आहे. ते दोघे आता महाराजांचे ध्यान करताहेत. दर्शनाला यावे, नामस्मरण करावे, ध्यान करावे, त्यामुळे त्यांना उत्तम गती मिळून पुढे ते मुक्त झाले आहेत.

संसार आणि परमार्थ या दोघांचीही सिद्धी, श्रद्धा आणि भक्तीनेच प्राप्त होते. गुरूच्या आज्ञेप्रमाणे वागणारे जे आहेत त्यांना पुढे सिद्धी प्राप्त होते.

हे एक चरित्र सांगितले. आता दुसरे एक चरित्र सांगताहेत.एके दिवशी एक कुष्ठी ब्राह्मण महाराजांच्याकडे आला. सगळ्या शरीराला त्याच्या कोड झालेले आहे. नरहरी त्याचे नाव. वेदांचा अभ्यास केला होता त्याने. महाराजांच्या दर्शनाला आला आणि साष्टांग नमस्कार घातला. तो महाराजांना विनंती करतो आहे,"महाराज, आपली कीर्ती ऐकली मी. कर्तुमकर्तुम असे ईश्वरी सामर्थ्य आपल्या ठिकाणी आहे असे ऐकून माझ्या मनाची खात्री झालेली आहे. म्हणून मी आलेलो आहे. यजुर्वेदाचा अभ्यास मी केलेला आहे. परंतु माझ्या शरीराला हा कुष्ठरोग झाल्यामुळे पत्नी, आप्तेष्ट वगैरे कोणीही मला विचारत नाहीत, माझे तोंडसुद्धा पहात नाहीत. पुष्कळ उपाय केले. शास्त्राने सांगितल्याप्रमाणे, तीर्थस्नाने केली, देवतांचे अर्चन केले, जपजाप्य केले आहे.सगळं काही केलं पण हे माझे कुष्ठ काही गेले नाही. शेवटी आपली कृपा झाली म्हणजे हा माझा कुष्ठरोग जाईल अशा आशेने मी

आलो आहे.

याचा प्रतिकार होणार नाही असे आपल्याला वाटत असेल तर तसं सांगा." वास्तविक पहाता महाराजांना त्याने,' प्रतिकार होणार नसेल तर ,' असे म्हणायला नको होते. पण निराश झाला होता बिचारा म्हणून असे उद्‌गार त्याच्या तोंडून बाहेर पडले. तो पुढे म्हणाला," नाही तर आपल्या समोरच इथे प्राण देतो. आता आयुष्य नको. या जन्मात काही या रोगाचा प्रतिकार होणार नाही मग हे भोग संपविण्यासाठी देहत्याग करतो मी." असे बोलून गेला बिचारा.

महाराज त्याला म्हणाले, ' पूर्वी तुझ्या हातून पापकर्म घडल्यामुळे हे तुला कुष्ठ झाले आहे. पण ते जाईल. काही काळजी करू नकोस.' त्या ब्राह्मणाला थोडे समाधान वाटले. काय करायला पाहिजे हे देखील महाराज सांगताहेत. एक शेतकरी त्याच्या शेतातील वाळलेल्या औदुंबराचे एक काष्ठ तोडून खांद्यावर ठेवून चालला होता. या ब्राह्मणाला महाराज म्हणाले,' त्या शेतकऱ्याकडून ते वाळलेले काष्ठ घे, संगमावर जाऊन ते रोव, त्याला आळं करून रोज पाणी घाल, ज्या दिवशी या काष्ठाला नवीन पाने फुटतील, त्या दिवशी तुझे कुष्ठ जाईल.'

याच्या मनामध्ये कोणताही संशय नाहीये. दुसरा कोणताही उपाय आपला हा रोग बरा करु शकणार नाही, हे त्याला अनुभवाने पटलेले आहे. महाराजांची कीर्ती ऐकलेली आहे त्याने. प्रत्यक्ष अनुभव अजून यायचांय. परंतु गावांतले काय, बाहेरचे काय कितीतरी लोक संकटमुक्त झाले, व्याधिमुक्त झाले असे पुष्कळ त्याने ऐकले आहे. बाकीच्या उपायांप्रमाणेच महाराजांचे सामर्थ्य आहे असे मात्र त्याला वाटले नाही. तसे वाटले असते

तर मात्र सर्व संपले असते. पण ती मात्र निष्ठा त्याची कायम आहे. पूर्वीच्या पापाचे फळ भोगतो आहे पण काही पुण्यही त्याचे आहे असे मानावे लागेल."बहुत सुकृतांची जोडी। म्हणूनी विठ्ठली आवडी।" हे सांगताहेत ज्ञानराज. सुकृतही आहेत. मनुष्यजन्मात केवळ पापच होतं, असं नाही. पापही आहे, पुण्यही आहे. त्यामुळे पुढचे जन्म मानावे लागतात ना. सगळीच पापे घडली की नरकात जायचे, पापाची फळे भोगायची की संपले. पुन्हा जन्म कशाला येतोय? पण दुसरीही कर्मं आहेत काही. कर्मशेष आहे. त्या कर्मशेषामुळे पुन्हा जन्म येतो.

ह्या ब्राह्मणाला त्याचे जिथे आप्तेष्ट विचारत नाहीत तर गावातले इतर लोक काय विचारणार? गांवाबाहेर कुठे तरी झोपडी बांधून राहातो आहे, अशी स्थिती आहे. परंतु महाराजांच्या वचनावर त्याची श्रद्धा पूर्णपणे दृढ झालेली आहे. इतर उपाय आपण करून थकलो. हाही (महाराजांना भेटण्याचा) उपाय करून पाहूया म्हणून तो आलेला नाही. महाराजांना तो म्हणतोय, 'मी आशेने आलेलो आहे. माझं जे काही होणार असेल ते तुम्ही सांगा.' ही जी त्याच्या मनात महाराजांच्या बद्दल दृढ श्रद्धा निर्माण झाली हे त्याचे पूर्वजन्माचे काही तरी पुण्य मानावे लागेल.

महाराजांच्या सांगण्याप्रमाणे तो ते वाळलेले काष्ठ घेऊन संगमावर गेला. त्याला आळे करून पाणी घालायला सुरवात केली. तिन्ही त्रिकाळ पाणी घालू लागला. सहा सात दिवस अन्न पाणी न घेता वाळलेल्या काष्ठाला पाणी घालतोय. हे पाहून गावातल्या बुद्धिवादी लोकांना दया आली म्हणतात. ते म्हणाले, 'बिचारा ब्राह्मण मरतो आहे. आपण जाऊन सांगू या त्याला.'

वस्तुतः त्या लोकांना काय नडलं होतं का? महाराजांनी त्या ब्राह्मणाला सांगितले होते आणि तो करत होता. तो जगतो का मरतो. तुम्हाला याचा विचार करून काय करायचंय? पण असं वाटलं त्यांना आणि ते संगमावर गेले म्हणाले,' काय, भूदेवा? हे तुम्ही काय चालवलंय? तुम्हाला हे जे महाराजांनी करायला सांगितले याचाच अर्थ असा आहे की तुमचा रोग जाणार नाही.'

हे बुद्धिभेद करणारे जे लोक असतात त्यांचा युक्तिवाद कसा असतो हे पहाण्यासारखे असते आणि जर का समोरच्या माणसाची श्रद्धा, विश्वास कमी असेल तर त्याच्या बुद्धीवर लगेच परिणाम होतो. कैकेयीच्या मनावर मंथरेच्या भाषणाचा अगोदर परिणाम झाला नाही. ज्यावेळेस मंथरेने कैकेयीला प्रथम रामाला अभिषेक होणार असल्याची बातमी सांगितली त्यावेळी तिला एवढा आनंद झाला की स्वतःच्या गळ्यातील सोन्याचा हार तिने मंथरेला बक्षीस दिला. पण मंथरा काही गप्प बसणारी नव्हती. कैकेयीकडूनच हे काम केले पाहिजे. पण आरंभाला जी रामावर प्रेम करणारी कैकेयी होती, तिचा अनेक प्रकारे मंथरेने बुद्धिभेद केला आहे. ती म्हणाली,' महाराणी, रामाला अभिषेक झाल्यावर कौसल्येच्या ताब्यात सर्व सत्ता येणार नाही का? तुमच्या मनात हा विचार कसा आला नाही? ' झाले. मात्रा लागू पडली लगेच. रामाबद्दलचं सर्व प्रेम गेले तिच्या मनांतून आणि रामाने चौदा वर्ष वनवासात गेले पाहिजे, हा पहिला वर मागितला तिने. तिथेच राम राहिले असते तर काय झाले असते? भरताला राज्य द्यायची तयारी रामांची होतीच पण रामांना वनवासात पाठविल्यामुळे दशरथाचे प्राण गेलेले आहेत. पण विचार नाहीये. ही जी बुद्धी आहे. दृढ प्रेम बसणे, दृढ श्रद्धा भगवंतावर बसणे

यालाही पूर्व सुकृतांची जोडी आहे आणि ती सुद्धा ईश्वराची कृपाच आहे.

'हे सांगितल्याप्रमाणे कर म्हणजे तुझा रोग जाईल,' असे म्हणालेत महाराज पण हे लोक सांगताहेत, तुझा रोग जाणार नाही. म्हणूनच महाराजांनी असे करायला सांगितले."असंभवनीय गोष्ट आहे ! वाळलेल्या काष्ठाला पाणी घालून कधी तरी त्याला पालवी फुटते का? याचा विचार करा. वाळलेली फांदी असेल तर एखादे वेळेस त्याला पालवी फुटेल. ज्याअर्थी व्यवहारामधील असा असंभवनीय उपाय तुम्हाला महाराजांनी सांगितला त्याअर्थी तुमचा रोग जाणारा नाही. हेच महाराज स्पष्ट बोलले नसतील. पुन्हा आणखी महाराजांवर श्रद्धा दाखवायची. या भानगडीत तुम्ही पडू नका. सात दिवस झाले, अन्न नाही पाणी नाही. जिवंत कसे राहाल तुम्ही?" ही पुन्हा भीती आहे. मरणाची भीती घातली आहे. त्या ब्राह्मणाची सगळी मनाची तयारी आहे ना. महाराजांनाच त्याने अगोदर सांगितले, या कुष्ठावर काही उपाय नसेल तर तसे सांगा. मी आत्ताच्या आत्ता इथे प्राण देतो. देहाबद्दल आस्था त्याला राहिलेलीच नाही. अत्यंत निंदा त्याला सहन झालेली नाही आणि प्राण देण्याची त्याची तयारी आहे. पण महाराजांची आज्ञा पालन करीत असताना जर कमी जास्त काही झालं तर आत्महत्या हा दोष त्याच्याकडे येणार नाही आणि त्यावेळी संरक्षण करण्याची जबाबदारी महाराजांची आहे हा त्याचा विचार पक्का आहे.

सगळ्या लोकांनी त्याला सांगितलं,"तुझी सिद्धी होणार नाही. हे करू नकोस तू." तो म्हणाला,"महाराजांनी जसं मला सांगितलं तसं मी करणार आहे. मी जिवंत राहिलो काय आणि

मेलो काय. सारखंच आहे." पण महाराजांचे वचन आहे."तुझी सिद्धी होईल म्हणताहेत ते, त्यावर माझा विश्वास आहे." इथे काही बुद्धिभेद करणाऱ्या लोकांचं काही चालेना. मग ते गावात आले. अशा मंडळींची काही योजना असते. तिथे काही साधले नाही, आता इथे प्रयत्न करायचा आणि पुन्हा आपण त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला असा अहंकार धरायचाच. मठात येऊन महाराजांना सांगितले,"महाराज, काय सांगितलं तुम्ही त्या ब्राह्मणाला? वाळलेले लाकूड जमिनीत रोवून त्याला आपलं तो पाणी घालतोय. उपोषण करतो आहे. पाणीसुद्धा पीत नाही. मरून गेला तर काय करायचं?" हे सगळं ते महाराजांना सांगताहेत.

मग महाराजांनी त्यांना एक कथा सांगितली"श्रद्धा भावनेचं फळ मिळतं." तो ब्राह्मण म्हणतोय महाराजांचं वचन आहे. त्याची श्रद्धा महाराजांच्या वाक्यावर आहे आणि त्यांच्या शब्दाने या शुष्क काष्ठालासुद्धा पल्लव येतील. महाराज श्रेय आपल्याकडे घेत नाहीयेत. ते म्हणतात," त्याची श्रद्धा आहे त्या श्रद्धेचे फळ मिळतं. श्रद्धा असेल त्याप्रमाणे फळ मिळतं. सामर्थ्य नाही म्हटलं तर सामर्थ्य नाही. फळ मिळत नाही. आहे सामर्थ्य म्हटल्यावर फळ मिळते. भवसिंधूत बुडणाऱ्याला भक्तीही तारक आहे. तो ब्राह्मण वाईट काय करतोय? तहान भूक विसरून जाऊन आज्ञा पालन करतो आहे. अर्थात त्याची दृढ भक्ती आहे. त्यामुळे तो या संकटातून तरून जाणार आहे."

महाराजांनी इथे एक महत्त्वाचा सिद्धान्त सांगितला.- मंत्रावर दृढ श्रद्धा पाहिजे. फळ मिळेल की नाही असा संशय मनांत आणला की काही मिळायचं नाही. शेवटी ती अश्रद्धाच वाढत जाते. फळ अश्रध्देने मिळत नाही हे त्याला कळतच नाही.

मिळेल की नाही, मिळेल की नाही अशी अश्रद्धा निर्माण होऊन केलेल्या कर्माचे फळ मिळाले नाही की यात काही अर्थ नाही असं म्हणून मोकळं व्हायचं. मंत्रशास्त्र खोटं आहे असं म्हणायचं. तीर्थस्थानात पापनाश करण्याचे सामर्थ्य आहे म्हणूनच त्याला तीर्थ म्हणतात. ब्राह्मणावर, देवावर, ज्योतिषावर, औषधावर ज्याची जशी भावना असते तसे त्याला फळ मिळते. म्हणजे यांचेही सामर्थ्य आहे त्याच्या जोडीला, भावनेचेही सामर्थ्य पाहिजे असे सांगायचे आहे. म्हणजे मंत्रात सामर्थ्य नाही पण याच्या भावनेमुळे त्याला सामर्थ्य येते असा त्याचा अर्थ नाही. गुरूवरती भावना पाहिजे म्हणजे गुरूचे सामर्थ्यही आहे. पण गुरूचे सामर्थ्य आहे ही भावना भक्ताची पाहिजे. या दोन्हींचे मिळून त्याला फळ मिळते. कर्म कर्तृत्व आपल्याकडे घेणारा जीवात्मा आहे ना ! मी कर्म करतो हे त्याला जे वाटते ते समाधान त्याला द्यायचंय.

मी इतके कर्म केले म्हणून मला फळ मिळालं. तसं का समजेनास तू? कर्म कर मात्र. चांगलं कर्म कर. कर्तृत्वाभिमान असला तरी तुला त्याचे फळ मिळेल. पण तेच फळ गुरूंच्या आज्ञेचे आहे, औषधाचे आहे, देवाचे आहे असे समजलास तर त्याचं फळ जास्ती आहे. याकरीता महाराजांनी एक सुत आणि ऋषीचे आख्यान सांगितले आहे.

सिंहकेतु राजाचा मुलगा धनंजय म्हणून होता. तो राजपुत्र सैन्य व काही शबरांसह वनात शिकारीला गेला. त्यातल्या एका शबराला फिरता फिरता एका पडझड झालेल्या देवालयात शिवलिंग मिळाले. तो शबर राजपुत्राकडे जाऊन म्हणाला,"महाराज, हे शिवलिंग मला मिळालंय. घरी नेऊन त्याची पूजा करावी अशी माझा इच्छा आहे. त्याच्या पूजेचे विधान आपण मला सांगा"

त्या राजपुत्राने सांगितले,"घरात चांगल्या भूमीवर हे शिवलिंग ठेव, हा साक्षात शंकर परमात्मा आहे अशा भावनेने आपल्या स्त्रीसह स्नान करून याची पूजा कर आणि रोज नैवेद्यासाठी चिताभस्म देत जा. अन्नाचा वगैरेही नैवेद्य दाखवून भोजन कर." त्याप्रमाणे त्या शबराने घरी येऊन शिवलिंगाची स्थापना केली आणि पत्नीला पूजेचा सर्व विधी सांगितला.

रोज पूजा करू लागला. या गावात नाही तर दुसऱ्या गावातून चिताभस्म आणून नैवेद्य दाखवायचा. पण एक दिवस मात्र त्याच्या परीक्षेची वेळ आली. त्याच्या गावात किंवा आसपासच्या पांच सहा गावात कोणालाच मृत्यू आला नाही. परत आला बिचारा. आता आपण पूजा कशी करणार, या विचारात पडला. आम्ही आपले सगळे 'यथाशक्ती, तथाशक्तीच' पूजा करीत असतो. सर्व उपचारांसाठी आम्ही एक तर अक्षता समर्पण करतो किंवा नमस्कार करतो. अक्षता आणि नमस्कार यांच्यासारखे प्रतिनिधी आपल्याला पुष्कळ वेळा सापडतात आणि आपण ते पुष्कळ वेळा वापरतो. पण हा तसा नाही. गुरूंनी सांगितल्याप्रमाणे पूजा झाली पाहिजे. चिताभस्म कुठून आणायचं? काय करायचं आता? पूजा राहिली आज आपली बहुतेक. पण त्याला पत्नी मात्र उत्तम भेटलेली आहे. सहधर्मचारिणी म्हणतात पत्नीला. हे नांव तिला शास्त्राने दिले आहे. बरोबरच धर्माचरण करणारी. पतीला जे धर्माचरण करायचंय त्याच्यामध्ये पूर्ण सहाय्य करणारी. धर्मपत्नी तिचे नाव आहे.

ती पतीला म्हणाली,"महाराज, यात खिन्न होण्यासारखे काय आहे?मी आत जाते. बाहेरून आग लावून द्या. माझे शरीर दग्ध होऊन जाईल. त्याचे चिताभस्म द्या की शंकरांना

काय हरकत आहे? शरीर हे क्षणभंगुर आहे. केव्हां पडेल याचा नियम नाही."

खाली बसलेला मनुष्य खुंटीला अडकवलेली टोपी घेण्यासाठी उठला आणि लगेच खाली कोसळला गेला. असे हे जीवन क्षणभंगुर आहे. हा विचार धर्माचरण करताना मनामध्ये पाहिजे. आपण अजरामर आहोत असे समजायचे नाही.

विद्यार्जनाच्या वेळेस मी अजरामर आहे. हे ज्ञान मी मिळविनच अशा बुद्धीने अभ्यास करायचा. त्यावेळेला,' माझं शरीर विनाशी आहे, काय करायचंय विद्या शिकून ' असा विचार नाही करायचा, तसा केला तर विद्या कधीच मिळणार नाही. अर्थार्जन करण्याच्या वेळेससुद्धा मी अजरामर आहे अशी भावना पाहिजे. ' व्यापारात दहा हजार रुपये मिळाल्याशिवाय भात खायचा नाही.' 'अमुक एक रुपये फायदा कमावल्याशिवाय अमुक एक पदार्थ खायचा नाही.' असा मारवाडी लोक निश्चय करतात. त्याशिवाय पैसा मिळत नाही. त्याकरता का होईना नियमाने वागतात. ह्या विद्या आणि अर्थार्जनाकरता अजरामर बुद्धी पाहिजे. परंतु नरसिंहसरस्वतींनी आपल्या आईला सांगितले,"आई, तू म्हणतेस त्याप्रमाणे गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थाश्रम आणि मग संन्यास घ्यावा पण तसे करून नाही चालणार. मृत्यूने आपले केस एका हातात धरलेले आहेत आणि आपल्यावर तलवार उपसलेली आहे. ही बुद्धी ठेवून जेवढे होईल तेवढं धर्माचरण केलेलं पाहिजे. शुभ कर्माबद्दल विचार करायचा नाही. जेवढं लवकर ते करता येईल तेवढं करून घ्यावे म्हणतात."

तेव्हां ती शबर स्त्री म्हणते,"माझे हे रक्त मांसाने भरलेले अपवित्र व क्षणभंगुर शरीर ईश्वराला अर्पण केले तर किती बरे

होईल. हे घ्या आपण काही काळजी करू नका."तिला स्वतःच्या शरीराची आसक्ती नाही, मृत्यूची भीती नाही. पण हा पूजा करणारा मोहात पडलेला आहे. तो म्हणतो,"तुझं शरीर कसं दग्ध करायचं? अग्निसूर्य वगैरे सर्वांच्या साक्षीने मी तुझ्या बरोबर विवाह केला. आता तुला मीच अग्नीत दग्ध करायचं? हे लोक काय म्हणतील? तू अजून लहान आहेस वयाने. अजून तर तू संसारातील कोणतेच सुख अनुभवले नाहीस."

आता इथे ती स्त्री स्वतःच्या शरीराची आसक्ती सोडायला तयार आहे. पतीला युक्तीने पटवून देण्याचा प्रयत्न करते आहे. ती म्हणते,"महाराज, काय तुमच्या मनात मोह उत्पन्न झाला. माझं शरीर म्हणून तुम्ही बसलात? हे शरीर टिकणारे आहे का? अजरामर आहे का हे ? केव्हां तरी पडणारे हे नश्वर शरीर आहे मग याच्याबद्दल तुम्हाला मोह का पडतो? त्यापेक्षा ईश्वराच्या सेवेसाठी पडले तर अधिक पुण्यप्रद नाही का? तुमची मी अर्धांगिनी आहे. या शरीरावर तुमचाही अधिकार आहे. हे शरीर दग्ध करण्यात कोणत्याही प्रकारे शास्त्रविरोध होत नाही."

त्याला भीती वाटते ही हिंसा नाही कां होणार? पण ती म्हणते," मी स्वेच्छेने दग्ध करण्यासाठी शरीर दिल्यावर त्यात हिंसा कुठली? किंवा त्यात हे शरीर देवासाठी दिल्यानंतर त्यात आत्महत्या हा दोष नाही." अशा रीतीने पतीच्या मनात उत्पन्न झालेला मोह दूर करण्याचा ती प्रयत्न करते आहे."आता उशीर करून नका. हे शरीर दग्ध करा आणि देवाला चिताभस्म द्या."

शेवटी त्याला पटले. काय ईश्वरावरती भक्ती आहे ! नुसते शिवलिंग आहे समोर. प्रत्यक्ष शंकर भगवान तर अजून दिसायचे आहेत. पण दिसले नसताना सुद्धा इतका विश्वास

आहे. गुरूची आज्ञा पाळायची बुद्धी आहे. आपल्या स्वतःच्या पत्नीच्या देहाचे चिताभस्म देण्याची त्याने तयारी केली.

‘ देवाच्या सख्यत्वासाठी पडाव्या जिवलगाच्या गाठी प्राण तोही अर्पावा ’ असे समर्थ म्हणतात. त्याशिवाय देवाचे सख्यत्व प्राप्त होणार नाही असे समर्थ म्हणतात.

त्या शबराने त्या स्त्रीसह सर्व घराला आग लावली. सगळे भस्मसात झाले. त्याचे मन शांत आहे. देवाला ठरल्याप्रमाणे चिताभस्माचा नैवेद्य दाखवल्यामुळे त्याला समाधान झालेले आहे. ‘ माझे घरदार, स्त्री गेली ’ असे दुःख करीत, देवाला चिताभस्म दिलेले नाही.

महिम्न स्तोत्रामध्ये पुष्पदंताने, श्रीहरिने भगवान् शंकरांची कशी भक्ती केली याचे वर्णन केले आहे. भगवान् महाविष्णू शंकरांची पूजा करीत होते आणि एकेक नाम घेऊन एकेक कमळ अर्पण करण्याचा त्यांचा नियम होता. एके दिवशी असं झालं, ९९९ च कमळे झाली. शेवटचे नाम उच्चारायला आणि कमळ संपायला एकच गाठ पडली. आता काय थांबवायची पूजा? असे म्हणतात पूजेची सर्व तयारी झाल्यावर पूजेला आरंभ करावा. भगवान तिथे आल्यानंतर थांबायचे नाही. कमळे संपली पाहिल्यावर भगवान् श्रीहरिंनी एकदम डोळ्यात बोट घातले आणि आपले नेत्रकमळ काढून अर्पण केले. भगवान् शंकर प्रसन्न झाले आणि त्यांनी ते सुदर्शन चक्र सर्व विश्वाच्या संरक्षणासाठी श्रीहरिला दिले म्हणतात. आता ही शंकरांची कृपा की श्रीहरिची भक्ती हे सांगता यायचे नाही, ज्याला जसा अर्थ त्यातून घ्यायचाय त्याने तसा अर्थ घ्यावा.

महाराज त्या ब्रह्मवृंद मंडळाला मुद्दाम ही गोष्ट सांगताहेत.

हा शबर रोज त्याची पूजा संपल्यानंतर आपल्या पत्नीला हाक मारीत असे प्रसाद घेण्याकरता. त्यादिवशी त्या शबराची पूजा इतकी चांगली झाली की त्याला आपले घर, पत्नी वगैरे जळून गेल्याचे काहीच स्मरण नव्हते. रोजच्या प्रमाणे तीर्थप्रसाद घेण्याकरता त्या पत्नीला त्याने हाक मारली आणि ती आली. देवाला दिलं म्हणजे संपेल, आपण दरिद्री राहू असं वाटू देऊन उपयोगी नाही. देवाला दिलेले कधीही संपत नाही. इथे सर्व घरदार जळून गेलेलं आहे ते त्याला पूर्वी प्रमाणेच परत मिळाले. एवढंच काय, पण ती स्त्रीसुद्धा प्रसाद ग्रहण करायला आलेली आहे. मग याला आठवण झाली. घरासकट तुला दग्ध केलं होत मग आलीस कशी तू? असे त्याने विचारले ती म्हणाली,"घरात गेल्यावर मला झोप आली आणि आता तुमची हाक ऐकून आले मी."

अग्नी पेटल्यावर झोप लागणे शक्य आहे का? शबर जातीत जन्मलेले ते दोघे आहेत. कोणत्याही प्रकारचे शिक्षण किंवा ज्ञान त्यांना मिळालेले नाही. परंतु भगवान् शंकरांचा हा कृपाप्रसाद आहे अशी त्या दोघांची खात्री झाली. एवढ्यात भगवान शंकर प्रगट झाले तिथे. जरी शबराच्या कुळात ते जन्माला आले असले तरी तो दोष दूर झालेला आहे. शंकरांनी त्यांना मुक्ती दिलेली आहे.

म्हणून महाराज सांगतात हा दृढ भक्तीचा प्रभाव आहे. त्या शबर पती पत्नीच्या भक्तीमुळे हा आत्मानात्म विवेक आपोआप झाला. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक होणं फार कठीण आहे. चांगदेवांनाही ते शक्य झाले नाही."चौदाशे वर्षांचा मी मोठा आहे. ज्ञानेश्वर माझ्यापेक्षा लहान आहेत त्यांना नमस्कार मी कसा लिहू?"

असा त्यांना संभ्रम पडला. म्हणजे अद्यापि त्यांना क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक झालेला नाही. शरीर म्हणजेच मी आहे आणि शरीराला चौदाशे वर्षे झाली आहेत. ज्ञानेश्वरांच्या शरीराला वीस वर्षे झालेली आहेत. शरीराला काय गुरू म्हणायचं का? गुरूतत्व हे वेगळे आहे. आपण चौदाशे वर्षं योगसामर्थ्याने जिवंत राहिले, मेलेल्यांना जिवंत केले त्यांनी पण ' शरीरापेक्षा मी निराळा आहे', हा क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक त्यांना झाला नाही. त्याकरिता गुरूभक्ती पाहिजे, ईश्वर भक्ती पाहिजे. त्या भक्तीने आत्मानात्म विचार होऊन जातो. शरीराची आसक्ती संपते आणि अशा प्रकारचे धर्मकार्य त्यामुळे होते. ' शरीरच मी आहे ', असे जर त्या स्त्रिला वाटलं असतं तर असं झालं असतं का? शबराने तरी तिचे दहन कसे केले असते? भगवंताच्या भक्तीचा प्रभाव आहे आणि त्यामुळे ही बुद्धी इतकी विवेकसंपन्न झालेली आहे. भक्तीशिवाय काहीही फळ सिद्धी नाही.

महाराज त्यानंतर संगमावर आलेले आहेत. ह्या बाकीच्या लोकांनीच उपद्व्याप केला, त्या कुष्ठरोग झालेल्या ब्राह्मणाला जाऊन भेटले. महाराजांना भेटले. महाराज संगमावर रोज जात होतेच की ! तोही येऊन दर्शन करून जात असे. झाडाला पाणी घालायचे काम त्याचे चालू आहे. फळ मिळणार आहे, अशी खात्री असल्यावर 'आत्ता मला फळ पाहिजे मी मरायला लागलो असे त्याने सांगायचे का? डॉक्टरांना आताच्या आत्ता मला बरं करा, असे म्हटल्यावर लगेच डॉक्टर बरं करतात का?औषध घे म्हणजे बरा होशील ' असच ते सांगणार. डॉक्टरला ज्ञान आहे. रोग्याला समजत नाही. तो ब्राह्मण आपला महाराजांच्या सांगण्याप्रमाणे त्या वाळलेल्या झाडाला पाणी घालतो आहे.

इतरांनी कितीही प्रयत्न केला तरी त्याने त्याचा बुद्धिभेद होऊ दिला नाही. हा बुद्धीचा प्रभाव आहे. बुद्धीने मन आवरावे असे शास्त्रकार सांगतात. बुद्धीच्या बलाने मनाची सुधारणा करायची आहे. मनामध्ये जरी निरनिराळे विचार आले तरी बुद्धीच्या सहाय्याने मनाचा निग्रह केला पाहिजे. तसा या ब्राह्मणाचा निश्चय झालेला आहे. त्याचे प्रारब्ध भोगून पूर्ण झालेले आहे. त्याच्या निष्ठेचं फळ मिळण्याची वेळ आली आहे.

महाराजांच्या बरोबर इतरही सर्व मंडळी तिथे संगमावर आली. महाराज त्या ब्राह्मणाला काय सांगतात, तिथे काय चमत्कार घडतो ते पहाण्याची त्या सर्वांना उत्सुकता होती. महाराजांच्या आज्ञेचे तो दृढ बुद्धीने पालन करतो आहे.

सिद्ध सांगताहेत, नामधारका, त्या ब्राह्मणाचे शरीर कृश झालेले आहे, शक्ती क्षीण होत चालली आहे. शरीर पडणार आहे अशा स्थितीत असून सुद्धा त्याचे अंतःकरण प्रसन्न आहे. अन्न नाही पाणी नाही, पण कशाचीच चिंता त्याच्या मनांत नाहीये. महाराजांच्या आज्ञेचे आपल्या हातून पालन होतंय याचे त्याला समाधान असल्यामुळे तहान भुकेकडं सुद्धा त्याचे लक्ष नाहीये. गंगा नदीमध्ये स्नान नुसते केले तरी अनंत पातकांचा नाश होतो. त्याच भगवंतांनी आपल्या हाताने आपल्या कमंडलूतील पाणी त्या शुष्क काष्ठावर प्रोक्षण केले. लगेच त्याला अंकुर फुटून पालवी आलेली आहे आणि या ब्राह्मणाच्या शरीरावरील कुष्ठही लगेच निघून गेले. ते कसं गेलं? महाराजांनी त्याला सांगितले होते, ज्या दिवशी त्या शुष्क काष्ठाला पालवी फुटेल त्या दिवशी तुझे कुष्ठ जाईल. पाने फुटल्यामुळे कुष्ठ रोग गेला असं म्हणायचं का? लाकडाला पाने आली कशामुळे? आणि

पाने येणं आणि कुष्ठ रोग जाणं याचा काय संबंध? त्यामुळे कुष्ठरोग गेला असे नाही."मतः सर्व प्रवर्तते"असं सांगताहेत भगवान. सर्व कर्तृत्व ईश्वराचे आहे. जरी अशा प्रकारचे विपरीत प्रारब्ध असले तरी त्याचा परिहार होऊ शकतो. त्याच्यावर महाराजांनी भक्तीचं महात्म्य सांगितले आहे. त्याची भक्ती आहे, त्याची भावना आहे त्याचे फळ त्याला मिळणार वगैरे बाकीची माणसं काळजी करीत होते ही कसली दया? या दयेत काही अर्थ आहे का? भगवंतांनी अर्जुनाला सांगितले,"तुला दया बिया विचार करायचं कारण नाही. तू तुझे कर्तव्य कर. त्या सगळ्यांचं आयुष्य संपलेलं आहे. तू क्षत्रिय आहेस, युद्ध कर. तुझं कर्तव्य आहे, तेवढं कर म्हणजे झालं."

म्हणून महाराजांनी दोन्ही दाखवलं. शुद्ध भक्तीचं फळ काय मिळतं, तेही दाखवलं आणि ते फळ लगेच मिळणं ही ईश्वराची कृपा आहे. लाकडामध्ये सामर्थ्य नाही. वाळलेलं आहे ते. जीवही नाहीये त्या लाकडात. जीव असता तर कदाचित पाने आली असती. हा ब्राह्मण पाणी घालतोय त्या पाण्यामध्येही सामर्थ्य नाही. पाण्याने काही लाकडाला पाने फुटत नाहीत, इथे त्याचा संबंधच नाही कारण पाणी घालून सुद्धा वाळलेल्या लाकडाला पाने येणार नाहीत. असा अनुभव आहे सगळ्या लोकांचा. अनुभवामुळे आम्ही खोट सांगतो असं म्हणाले तरी चूक आहे. तुम्हाला अनुभव बाकीच्या लाकडांचा आला असेल. ह्या लाकडाला पाने येत नाहीत हा अनुभव आत्ता आहे का तुम्हाला? पाहिलयं का आत्ता काही दिवस तरी? येणार आहेत की नाही, पुढचं सांगता येतं का आम्हाला? पाने येणार नाहीत म्हणून. त्या लाकडाला येणार नाहीत तशी या लाकडालाही येणार नाहीत '

असा बुद्धिवाद करायचा. भविष्यामध्ये काय घडणार आहे याची कल्पना बुद्धीला कशी असणार? शक्य आहे काय? भविष्यातही असं होणार नाही हा जो बुद्धिवाद आम्ही वापरतो तो बरोबर नाही. श्रद्धेने भविष्यही सुधारलं जात आहे. हे महाराजांना दाखवायचं आहे.

याचं सर्व शरीर निर्मल झालं. सगळा कुष्ठरोग त्याचा गेला. साष्टांग नमस्कार त्याने महाराजांना घातला आणि लगेच त्याने महाराजांची स्तुती केली. कवित्व शक्ती उत्पन्न झाली."इंदु कोटी तेज किरण सिंधू भक्त वत्सलम्...." हे स्तोत्र त्याने रचले. हे गाणगापूर, नरसोबावाडीला म्हणत असतात, पालखी नसेल त्या दिवशी

तो ब्राह्मण त्या स्तुतीत म्हणतो,"कोटी चंद्र सूर्यासारखी आपली कांती आहे. सर्व विश्वाला आपण आधार आहात महाराज. सर्व देव आपली पूजा करताहेत. आपण भक्तांवर प्रेम करणारे अत्रिपुत्र आहात. आपण माझं संरक्षण करा." याप्रमाणे या स्तोत्रात उत्तम भक्तिभाव व्यक्त झालेला आहे. अनेक सिद्धांत या अष्टकामध्ये व्यक्त केलेले आहेत आणि मी असमर्थ आहे असं शेवटी म्हटलंय.

महाराजांनी संतुष्ट होऊन त्याला आशीर्वाद दिलेला आहे - तुझी कीर्ती वाढेल. तुला धनधान्यादि पुत्रपौत्रादि संपत्ती मिळेल. योगमार्गामध्ये तू श्रेष्ठ होशील. तुझ्या कुळामध्ये माझी भक्ती राहील. त्याला महाराजांनी ' विद्यासरस्वती ' मंत्राचा उपदेश केला. पुढे महाराजांच्या आज्ञेप्रमाणे तो आपले कुटुंब घेऊन गाणगापुरात महाराजांची सेवा करण्याकरिता येऊन राहिला. म्हणजे योगमार्गही मिळाला त्याला महाराजांच्याकडून. भक्तीच्या

क्षमा करा." भगवान् म्हणाले,"तुझ्या सारखा भक्त ज्या कुळात जन्मला त्या २१ पिढ्या उद्धरून गेल्या आहेत." म्हणजे भगवत् भक्तीने आधीच्या पिढ्या उद्धरून गेल्या आहेत. म्हणजे भगवत् भक्तीने आधीच्या पिढ्यांचा उद्धार होतो. तेव्हां सिद्ध म्हणाले, नामधारका, तुला काळजी करण्याचे कारण नाही. भगवत् भक्ताच्या कुळात तू जन्माला आलेला आहेत. प्रल्हादाला भगवंतांनी वचन दिलं होतं की तुझ्या वंशामध्ये कोणालाही मी मारणार नाही. त्याप्रमाणे प्रल्हादाच्या वंशात जन्मला म्हणून बाणासुराला मारलं नाही त्यांनी.

' परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दुष्कृताम् ' अस जरी असलं तरी केवळ भक्ताच्या कुळामध्ये जन्मलाय म्हणून तो कसाही असला तरी त्याचा नाश होत नाही. तो भक्त जरी नसला, तरी त्याच्यावर भगवंतांची कृपा असते. आपल्या भक्ताचा म्हणजे आपलाच आहे, अशी भावना असते देवाची. त्याप्रमाणे तुझ्याबद्दलही महाराजांची भावना आहे. तू कसलीही काळजी करू नकोस, असे सिद्धांनी नामधारकाला आश्वासन दिले आहे. मग नामधारकांनी सिद्धांना आपल्या पूर्वजांची माहिती विचारली आहे. तेव्हां नामधारकाला सिद्धांनी त्याच्या पूर्वजांचा सर्व वृत्तांत सांगितला आहे.

सिद्धांच्या मुखातून सद्‌गुरूचं बरचसं चरित्र ऐकलं नामधारकांनी. सिद्धांनी हे सांगता सांगता, तुझे पूर्वजही असेच भक्त होऊन गेले, असा उल्लेख केला. नामधारक म्हणाला, 'माझे पूर्वज कोण होते आणि त्यांनी सद्‌गुरूची सेवा कशी केली ते मला सांगा.' पूर्वजांचं चरित्र ऐकल्यानंतर आपल्या मनात विशेष भक्ती उत्पन्न होऊ शकते. तसेच त्याचे पूर्वज भक्त होऊन

गेले. सिद्ध सांगताहेत -

पूर्वी संचार करीत असताना महाराज गोदावरीच्या तीरावर आले त्यावेळी सायंदेव नावाचा ब्राह्मण त्यांच्या दर्शनाला आला. त्याच गांवातील पोटशुळाची व्यथा झालेला ब्राह्मण देहत्याग करायला निघाला असता, वाचविलं महाराजांनी (त्याला) आणि त्याचा शूलरोगही बरा केला. सायंदेवाघरी ही घटना घडलेली आहे. हे सायंदेव म्हणजे तुझे पूर्वज. सायंदेव आपल्या गावाला -कडगंजीला राहायला आले. तिथे त्यांनी महाराजांची कीर्ती ऐकली. महाराजांच्याकडे येऊन अनेक भक्त कृतकृत्य होत आहेत असे त्यांना समजले. कोणाची कामना असो, संकट असो, त्याचा परिहार तिथे होणार. संतती नसली तरी महाराजांच्या कृपेने संतती झाली आहे अशा अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही तिथे घडलेल्या आहेत. हे सायंदेवांच्या कानावर पडलेलं आहे.

सायंदेव आचारसंपन्न होते आणि पूर्वीपासूनच महाराजांचे भक्त होते. महाराज गाणगापुरात राहात आहेत हे समजल्यावर लगेच ते इकडे आले. गाणगापूर दिसायला लागल्यावर ते दंडवत घालीतच गावात आले. मठामध्ये भगवान नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे दर्शन झाले. प्रणाम केलेला आहे आणि स्तुतीही पुष्कळ केलेली आहे. संस्कृतज्ञ होते. वेदांचं श्रवणही त्यांना घडलं असलं पाहिजे. वेदांचा अभ्यास श्रवणाने होतो. सायंदेव स्तुती करताहेत. बाह्यरूप जे दिसतं आहे ते मनुष्याचं रूप आहे. पण आपण मनुष्य नाही आहात. ही बुद्धी म्हणजे शास्त्रीय दृष्टी आहे. ' पंढरपूर म्हणजे साक्षात वैकुंठ आहे.' असे साक्षात्कारी सर्व संत महात्मे सांगताहेत पण आम्हाला ते तसं दिसत नाही, ते त्यांना दिसतंय. ब्रह्मा विष्णू महेश हेच

आपलं रूप आहे. आपण मनुष्य आकार धारण केला आहे पण ते आपलं खरं रूप नाहीये. महाराजांच्या कमंडलूचं सायंदेव वर्णन करताहेत.

ब्रह्मदेवांच्या कमंडलूमध्ये अनेक जल असतात. असा कमंडलू आपण घेऊन आलेले आहात. यातले जल म्हणजे प्राणदान करणारं आहे. याचा प्रभाव असा आहे की गेलेला प्राण परत आणून देते हे जल. म्हणजे ब्रह्मरूप आपण आहात. दुष्टांचा निग्रह आणि भक्तांचं संरक्षण करण्यासाठी दंड आपण हाती घेतला आहे. असे आपण भगवान् विष्णू आहात. आपण साक्षात शिवरूप आहात. भगवान् शंकर तारक मंत्राचा उपदेश करतात. प्रणवाचा किंवा रामनामाचा उपदेश करून त्याच्या पातकांचा, दुःखाचा नाश करणारे असे आपण शिव आहात. म्हणजे संन्यासी रूप आहे. मानवरूप आहे. परंतु हा जो कवी आहे -भगवंतांनी ज्याला बुद्धी दिलेली आहे त्या काव्यातून महाराज म्हणजे साक्षात ब्रह्मा विष्णू महेश आहेत हे सांगताहेत सायंदेव आणि आपलं चरित्रही तसंच आहे. आपल्या चरित्राचं वर्णन करणं किंवा यथार्थ ज्ञान करून घेणं हे देखील कोणाला शक्य नाही.

मृताला आपण जिवंत केलंत. प्रत्यक्ष घडलेली घटना आहे. वंध्या महिषीने दूध दिलेले आहे. शुष्क काष्ठाचा तरू केलेला आहे आणि अंत्यजाचा उद्धार आपण एका क्षणात केलात. बुद्धी दान त्याला केलंत. आपल्या या चरित्राचं वर्णन करणं आणि त्याचं यथार्थ ज्ञान करून घेणेसुद्धा कठीण आहे. आचार्य किंवा गुरूंच्याकडे मनुष्यदृष्टीने पाहू नये म्हणतात. सायंदेवाला तशी गुरू महाराजांच्याकडे ईश्वरदृष्टीने पहाण्याची

बुद्धी झाली आणि त्याप्रमाणे त्यांनी महाराजांची स्तुती केली. महाराज संतुष्ट झाले आणि त्यांनी वर प्रदान केला.

महाराज म्हणाले,"तुझी ही दृष्टी, श्रद्धा आणि भक्ती पाहून मी संतुष्ट झालो. तुझ्या वंशोवंशी माझ्यावरची श्रद्धा आणि भक्ती दृढ राहील." नामधारकाची पिढी आहे. सायंदेव, नागनाथ, देवराव, गंगाधर. पाचव्या पिढीपर्यंत ती भक्ती महाराजांच्या वराप्रमाणे चालत आलेली आहे. महाराजांनी त्याला पुढे विचारले,"कुठे राहातोस तू? तुझी स्त्री पुत्र वगैरे कुशल आहेत ना सगळे? खूप दिवसांनी भेट झाली."

नामधारकांनी उत्तर दिले, आपल्या प्रसादाने आहे. क्षेम आहे. संसारामध्ये क्षेम आहेच आहे. भक्तांची दृष्टी संसारामध्ये अनुकूलता असली म्हणजे क्षेम आहे अशी नसते. "ठेवले अनंते तैसेची रहावे" म्हणजे अनंत हा जे जे करतो ते कल्याणाकरताच करतो, ही भावना असल्यामुळे खरे भक्त आपल्या चित्तात समाधान ठेवून राहात असतात. सायंदेव मोठे भगवत् भक्त होते आणि त्यांना भगवंताच्या प्रसादाने सगळी अनुकूलता मिळाली होती. ते म्हणाले," महाराज, सर्वांचे कुशल आहे. या कडगंचीमध्ये आम्ही राहातो. बंधू, मुलं सगळी आहेत, क्षेम पहाताहेत संसारातील. परंतु संसारामध्ये माझं काही आता काम उरलेलं नाही. आपली काही सेवा घडावी अशी इच्छा आहे. ही संसार वासना संपणंसुद्धा कठीण आहे." आचार्य महाराज म्हणतात, वृद्धावस्थेमध्ये जास्ती जास्ती चिंता उत्पन्न होते - संसारातली. पारमार्थिक चिंता उत्पन्न झाली तर उलट चांगलं ! पण तसं होत नाही. संसारातीलच अनेक चिंता उत्पन्न होतात.

सायंदेव सांगताहेत, मुलबाळं, आप्तेष्ट संसाराकडे बघणारी

असल्यामुळे मला काहीच पहावं लागत नाही. (म्हणजे ही जी निवृत्ती त्यांची झालेली आहे हा मोठा प्रसाद आहे. ) आणि आता मला फक्त आपल्या चरणांची सेवा करायची इच्छा आहे म्हणून मी आलेलो आहे.

महाराज म्हणतात,"सद्गुरूंची सेवा कशी करावी हे समजणं फार कठीण आहे, बाबा. त्या वेदधर्माची सेवा दीपकाने किती केली ! शेवटपर्यंत आपल्याला गुरूभक्तीचं ज्ञान झालंच नाही असं त्याने दाखवलं. विष्णूंनी ' वर मागून घे ' असा आग्रह केल्यावर ' गुरूभक्ती ' अधिक कशी करावी हे ज्ञान तुम्ही द्या." असे म्हणाला. गुरू प्रतिकूल आहे अशी भावना झाली तर गुरूभक्ती वाढणार कशी? बोलतात, वाटेल तसं मारतात, वागवतात ही जर भावना झाली तर गुरूभक्ती वाढणार कशी? म्हणून आतापर्यंत जशी गुरूभक्ती राहिली ती अधिकाधिक वाढण्यासाठी जे ज्ञान लागतं ते मला द्या असे म्हणाला तो.

महाराज सांगताहेत,"सेवाधर्म जाणणारा कोणी नाही बाबा. आम्ही काय कधी नदीतीरावर राहातो तर कधी अरण्यामध्ये राहातो."

सायंदेवाने सांगितले,"महाराज, कायावाचामनाने आपली सेवा करायची आहे मला. मी आपल्याबरोबर येऊन राहातो." सायंदेवाची मर्त्य दृष्टी गेली आणि गुरूसेवा करणाऱ्याची दृष्टी लागते ती उत्पन्न झाली. सद्गुरू म्हणजे मर्त्य - मनुष्य नाहीये. ही दृष्टी ज्याला आली त्याला सेवाधर्माचे ज्ञान झालेले आहे असे म्हणायला हरकत नाही. तो म्हणाला,"मी कुठंही यायला तयार आहे." महाराज म्हणाले, ' ठीक आहे. '

काही दिवसांनी महाराजांनी त्याची परीक्षा बघायचे ठरवले.

याची बुद्धी खरोखरच सेवाधर्मामध्ये निमग्न आहे की नाही हे पहायचं ठरवलं त्यांनी. सायंदेवालाच फक्त बरोबर घेऊन एक दिवस महाराज संगमावर येण्यासाठी निघाले. अश्वत्थ वृक्षाखाली येऊन बसले. संध्याकाळची वेळ आणि महाराजांच्या संकल्पाने अचानक भयंकर पर्जन्य वृष्टी सुरू झाली. सगळीकडे अंधार झाला. जोराचा वारा सुटला. सायंदेवाने जवळच्या वस्त्रांनी महाराजांच्या भोवती लावून त्यांना पाऊस लागू नये म्हणून प्रयत्न केले. विजा चमकताहेत. शेवटी काही वेळाने पाऊस थांबलेला आहे. सायंदेव स्वतः भिजले पण महाराज़ भिजू नयेत म्हणून त्यांनी प्रयत्न केला. पाऊस थांबला तरी थंडी वाजू लागली.

गुरूमहाराज म्हणाले," बाबा, तू कुठून तरी शेकण्यासाठी अग्नी घेऊन ये. आम्हाला फार थंडी वाजते आहे." सायंदेव गांवातून विस्तव आणण्यासाठी शेतातल्या वाटेने निघाले. महाराजांनी त्यांना सांगितले,"तू सरळ जा आणि सरळ ये, आजुबाजूला पाहू नकोस."

निघाले सायंदेव. अंधारात थोडी वीज चमकली की रस्ता दिसावा मग पुढे जावे. वेशीमध्ये येऊन द्वारपालाला सर्व हकीकत सांगितली, भांड्यात अग्नी घेतला आणि संगमावर परत येण्यासाठी सायंदेव निघाले. त्यांच्या मनांत आले, महाराजांनी आपल्याला दोन्ही बाजूंना पाहू नका असे कां बरं सांगितले असेल? याची आता परीक्षा करायची. वास्तविक पहाता जसे गेले तसे आले असते इकडे तिकडे न पहाता तर काय हरकत होती? पण मनामध्ये चिकित्सा उत्पन्न झाली. गुरूमहाराजांनी आपल्याला असे कां सांगितले असेल? दोन्ही बाजूंना पहाताच मोठ्या

फण्यांचे दोन मोठे नाग त्यांना दिसले. घाबरले ते आणि संगमाच्या दिशेने धावू लागले. तसे ते नागही त्यांच्याबरोबर धावू लागले. त्यांना वाटले, आता काय होत कोणास ठाऊक ! गुरू महाराजांचं दर्शन तरी होतंय की नाही कोणास ठाऊक !

ते महाराजांचे स्मरण करू लागले. एवढ्यात संगमावरून त्यांना वेदध्वनी ऐकू येऊ लागला. सगळा अंधार दूर झाला, मेघ दूर झाले आणि चंद्रोदय झाल्याचे त्यांना दिसून आले. कसे तरी घाबरत आले. महाराजांचे दर्शन झालेले आहे. तसेच उभे राहिले.

महाराजांनी विचारले,"सायंदेवा, तुम्ही घाबरलात ? हे दोन सर्प तुमच्या संरक्षणाकरता पाठवले होते. प्रल्हादाची दृष्टी अशी होती की जे जे काही दिसतंय ते सर्व हरिस्वरूपच आहे त्यामुळे त्याला मारण्यासाठी सर्प, वाघ, हत्ती सोडले तरी त्यांनी प्रल्हादाला काही अपाय केला नाही. उलट त्यांचं संरक्षणच झालं. पण तुमची दृष्टी अशी राहिली नाही. तेही सर्व येऊन महाराजांना नमस्कार करून गेले. गुरूसेवा अशी कठीण आहे. देवयोनीत गेलेल्या जिवांना पुष्कळ सामर्थ्य आहे. त्यांना सगळं ज्ञान आहे. पण गुरूसेवा अतिशय कठीण आहे. कोणच्या वेळेला मनामध्ये काय विचार येतील, वाणीने काय बोललं जाईल, शरीराने काय घडेल काही सांगता येत नाही."

सायंदेवाने विनंती केली,"महाराज गुरूसेवा कशी करावी हे आपण मला सांगा. गुरूची सेवा म्हणजे काय?"

गुरूमहाराजांनी दृष्टांत दिला,"छाया आपली सावली असते. ती आपल्याला केंव्हाही सोडत नाही. सतत आपल्याबरोबर असते. त्याप्रमाणे नेहमी आपण गुरूंच्या दृष्टीसमोर असावे, त्यांच्या सन्निध असावे. त्यांच्या जवळ राहून जे काही कार्य

असेल ते करावे. ही बुद्धी उत्पन्न होणे म्हणजेच सेवातत्व आहे. सद्‌गुरूचा प्रसाद त्यामुळे मिळतो. सद्‌गुरूचं ध्यान हेच त्या भक्ताचं जीवन आहे. खाण्यापिण्याकडे लक्ष नाही. सद्‌गुरूच्या चरणांचे तीर्थ घेणे, त्यांच्याच कथा सांगणे, ऐकणे अशी सगळी इंद्रिये सद्‌गुरूना अर्पण केली आहेत तो खरा भक्त."

कल्याणस्वामी विहिरीवरच्या झाडावर बसले होते. समर्थांनी उडी मार सांगितल्यावर तत्क्षणी त्यांनी उडी मारली. त्यांना काहीही अपाय झाला नाही. समर्थांची आज्ञा होती ती. कोणचंही दुःसाध्य कार्य करायची गुरूनी आज्ञा केल्यावर त्या आज्ञेवर विश्वास ठेवून ते कार्य करावे. कारण त्यांनी आज्ञा केलेली आहे. अर्थात त्या कार्याची सिद्धी त्यांच्याच सामर्थ्याने होणारी आहे. हा विश्वास मनामध्ये असेल तो भक्त त्यांच्या आज्ञेचे उल्लंघन कधीच करणार नाही. गुरूभक्ताला काळसुद्धा भित असतो. याबद्दल शंकर पार्वतीचा संवाद ऐक.

ब्रह्मदेवांचा पुत्र त्वष्टा हा आपल्या गुरूच्या आश्रमात राहिलेला होता. गुरूची सेवा करीत होता. शरीराकडे लक्ष नाही, मानापमानाकडे लक्ष नाही. सद्‌गुरूची आज्ञा होईल त्याप्रमाणे वागतो आहे. पाऊस पडला एक दिवस आणि त्यांचा आश्रम गळू लागला. गुरू महाराज त्याला म्हणाले,"बाबा, दरवर्षी पावसाळ्यात असे गळते, सगळा आश्रम भिजून जातो. दर वर्षी असा त्रास होतो. तेव्हां ज्या घरात कधीही पाणी गळणार नाही असे घर बांध. ते नेहमी नवीन दिसावे. कधी जुने होऊच नये."

त्याने गुरूमहाराजांची आज्ञा ऐकली आणि तो निघाला. कुठं जायचं, काय करायचंय हा काही विचार नाही. आठ दहा वर्षांचा मुलगा काय घर बांधून देणार? आज्ञा झाल्याबरोबर

निघालेला आहे. गुरुपत्नीने सांगितले,‘ मला एक उत्तम प्रकारची चोळी पाहिजे. ती कोणी तयार केलेली असता कामा नये.’ गुरूपुत्र म्हणाला,‘ माझ्या पायाला येतील अशा पादुका आणून दे. त्या पादुकांनी मला पाण्यावर चालता आलं पाहिजे आणि मनात येईल त्या स्थानी त्यांनी मला नेलं पाहिजे.’ गुरूकन्या म्हणाली,‘ मला उत्तम हस्तिदंताची कुंडले आणून दे. खेळण्याकरता चांगले घर, बाहुल्या वगैरे पाहिजेत. त्या बाहुल्या सचेतन हव्यात आणि स्वयंपाकासाठी जी भांडी आणशील त्या भांड्यात केलेला स्वयंपाक कधी गार होता कामा नये. ती भांडी विस्तवावर ठेवली तरी त्यांना खालच्या बाजूने काजळी धरता कामा नये.’

तो वनात जायला निघाला. पाहूया नशिबाने काय घडेल ते. गुरू महाराजांची आज्ञा पाळायची, नाही तर आपला शरीरत्याग करायचा असा त्याचा निश्चय आहे. कार्यसिद्धी झाल्याशिवाय परत जायचं नाही. खिन्न होऊन चाललेला असताना त्या वनांत एक अवधूत त्याच्या दृष्टीस पडले. कुठे जाऊ या निर्जन वनांत, कोणाचा सल्ला घेऊ असा विचार संचित झाला होता आणि त्याला हे अवधूत भेटले. आनंद झाला. सद्‌गुरू महाराजच या रुपाने आले आहेत अशी भावना त्याच्या मनामध्ये झाली. त्याने त्या अवधूतांना सर्व हकीकत सांगितली. असा असा मी संकटात आहे म्हणाला. गुरुपत्नी, गुरूपुत्र, गुरूकन्यांची आज्ञा म्हणजे गुरुजींचीच आज्ञा आहे. काय कसं करावं ? अशक्य सगळ्या गोष्टी आहेत.

त्यावेळी अवधूत म्हणाले,“बाबा, तू घाबरू नकोस. काशी क्षेत्रामध्ये तू जा. विश्वेश्वर तिथे आहेत. तिथे तुझ्या इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी घडून येतील. अत्यंत पुण्यकारक ते क्षेत्र आहे.

काशी क्षेत्रामध्ये नित्य राहाणारा जो आहे त्याचं जरी दर्शन झालं तरी पापक्षय होतो. अशा काशी क्षेत्रात ज्याला राहायला मिळालं त्याला किती आनंद होईल? मोक्ष देणारे विश्वेश्वर त्या ठिकाणी आहेत. ते तारक मंत्राचा उपदेश करतात. प्रणवाचा किंवा रामनामाचा उपदेश करतात त्याने तो जीव मुक्त होतो."

त्या लहान मुलाने विचारले,"काशी क्षेत्र कुठे आहे? या भूमंडळावर आहे की आणखी कुठे आहे? मला आपण दाखवाल काय? माझ्यावर उपकार होतील. मला काही माहिती नाही."

अवधूत म्हणाले," चल, मलाही तुझ्या योगाने काशी क्षेत्राचे दर्शन होईल." त्याला घेऊन योगसामर्थ्याने ते अवधूत काशीमध्ये आलेले आहेत आणि सगळी तीर्थयात्रा त्याला सांगितली. त्या ब्रह्मचाऱ्याने आपल्या मेधाशक्तीने सर्व तीर्थयात्रा लक्षात ठेवली. सर्वही देवतांचं निवेदन केलं आणि स्वतःच्या नांवाने तिथे शिवलिंगाची स्थापना करावी असे त्याला सांगितले.' विश्वेश्वर तुझ्यावर प्रसन्न होतील, तुझी इच्छा पूर्ण होईल.' असे सांगून ते अवधूत गुप्त झाले.

याची खात्री झाली की गुरूमहाराजांनीच निश्चितपणे अवधूतांच्या रुपानं मला दर्शन दिलं आहे. माझी परीक्षा पाहिली. मला सर्व सहाय्य केलेलं आहे. अवधूतांच्या आज्ञेप्रमाणे काशीयात्रा केली, स्वनामांकित शिवलिंगाची स्थापना केली. विश्वेश्वरांनी विचारले,"सद्‌गुरूंचं कार्य व्हावं म्हणून तळमळ तुझ्या चित्ताला लागली आहे. तुझी काय इच्छा आहे?" मग त्याने सर्व सांगितले.

त्यानंतर विश्वेश्वरांनी त्याला सर्वज्ञान दिलेलं आहे. तुला सर्व पदार्थ तयार करण्याचे ज्ञान होईल. तू मोठा प्रसिद्ध होशील, असा आशीर्वाद त्याला दिला. मग विश्वेश्वरांच्या कृपेने याने

सर्वांच्या इच्छेप्रमाणे त्यांना ते ते दिले. सद्गुरूही संतुष्ट झाले. या तारक मंडळात तू चिरंजीव होऊन राहाशील. तुझे चातुर्य मोठे आहे. तुझ्यावर विश्वेश्वरांचाही प्रसाद झालेला आहे आणि आमचाही प्रसाद झालेला आहे. तुला सगळ्या सिद्धी मिळतील. असा आशीर्वाद देऊन त्याला त्याच्या घरी पाठवून दिलं.

हा कथाभाग शंकरांनी पार्वतीला सांगितला आहे. सद्गुरूंची सेवा आपल्या हातून घडली नाही तर प्राण द्यायचा त्याने ठरविले. म्हणून अवधूतांची व त्याची गाठ पडली आणि त्याचे कार्य झाले. गुरूच ईश्वर आहेत या भावनेने त्यांचे अर्चन करून त्यांच्या आज्ञेचे पालन करणे हे भक्ताचे कर्तव्य आहे.

यांप्रमाणे सायंदेवांना गुरूमहाराजांनी हे सर्व सांगितले आहे. रात्रीची वेळ आहे. सायंदेवही समाधी अवस्थेतच होते. ते म्हणाले, महाराज मला काशी क्षेत्राचे दर्शन झाल्यासारखे वाटले. आपणही तिथे होतात. अशा रीतीने त्यांना महाराजांचे दर्शन झाले. पुढे त्यांनी महाराजांचं स्तोत्र केलेले आहे. संस्कृत भाषेमध्ये आहे. त्याचं रूपांतर मोठ्या महाराजांनी केलं आहे.

कलियुगात जन्मलेले लोक कलीच्या प्रभावाने सर्वही आचार सोडून देतात. काहीही धर्माचरण करीत नाहीत. त्यांचं कल्याण करण्याकरता आपण अवतार घेऊन आलात, महाराज. आनंद निधान आपण आहात. सर्व आनंद आपल्या ठिकाणी आहे. असं आपलं स्वरूप आहे. आनंदमूर्ती आपण आहात. त्याचप्रमाणे संसाररूपी गर्तेमध्ये सापडलेल्यांचा उद्धार करणारे आपण आहात. हेही सामर्थ्य आपल्याजवळ आहे. मूकाला वाणी देणारे, अंधाला दृष्टी देणारे, वंध्याला तनय देणारे, गतप्राण झालेल्याला पुन्हा जिवंत करणारे, सतीला सौभाग्य देणारे, शुष्क काष्ठाला पल्लव

उत्पन्न करणारे आपण आहात. असा आपला महिमा आहे. याची उपपत्ती, याचा विचार, हे कसं झालं हे कोणीही सांगू शकणार नाही. झालं, एवढं खरं मात्र. अशी पुष्कळ स्तुती या स्तोत्रात केली आहे.

सद्‌गुरू नृसिंहसरस्वती स्वामीमहाराज प्रसन्न झाले. त्यांनी आशीर्वाद दिला,"तुला अहेतुकी भक्ती प्राप्त होईल." ही भक्ती मिळणे किती कठीण आहे. धर्माचरण करण्याची बुद्धी अनेक जन्मांच्या पुण्याईनेच उत्पन्न होते. अनेक जिवांमध्ये एखाद्यालाच आपण धर्मशील व्हावे, धर्माचरण करावे अशी बुद्धी उत्पन्न होते.

धर्माचरण करणाऱ्यांमध्येसुद्धा ज्ञानाकरिता प्रयत्न करणारे फारच थोडे आहेत. त्यातही ईश्वर भक्तीचा प्रयत्न करणारे तर अगदी अल्प आहेत.

ती अहेतुक भक्ती सायंदेवाला मिळाली महाराजांच्या प्रसादाने."वंशोवंशी तुझ्या वंशातले लोक माझीच भक्ती करून कृतार्थ होतील, त्यांचा सर्वतोपरी उत्कर्ष होईल," असा त्याला आशीर्वाद दिला आणि शेवटी सांगितलं,"ही आता म्लेंच्छांची सेवा पुरी कर. संपीव आता. करू नकोस." तो त्याच सेवेत होता ना !

एकनाथ महाराजांचे गुरू जनार्दन स्वामी महाराज हे म्लेंच्छांचेच सुभेदार होते. पण सायंदेवाला महाराजांनी सांगितले आता पुढे सेवा करायची नाही. तुझ्या स्त्रियांना, मुलांना घेऊन इथे गाणगापुरात येऊन राहा. सायंदेव त्याप्रमाणे घरी जाऊन स्त्रिला, मुलांना घेऊन गाणगापुरामध्ये आलेले आहेत आणि महाराजांची निरंतर स्तुती करताहेत. काय महाराजांचे गुण आहेत याचा विचार नेहमी चाललेला आहे.

सायंदेव म्हणतात,"महाराज, आपल्या चरणांचे दर्शन झाले, माझं सगळं पाप गेलं. संसारतापाने तप्त असतानासुद्धा शांती मला मिळाली, आपल्या दर्शनाने म्लेंच्छांची सेवा करताना अत्यंत दीनपणे मला वागावं लागत होतं. पण मी आता धन्य झालो आहे. आपली सेवा करायला मिळणार आहे यातच मला संतोष आहे." सायंदेव कर्नाटक प्रांतातले होते त्यामुळे त्यांना कानडी भाषेचेही ज्ञान होते. कानडी भाषेमध्येही त्यांनी स्तुती केली आहे. देवाला काय सगळ्याच भाषा माहीत आहेत ना ! सर्व ज्ञान त्याला आहे. भगवान् नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज संतुष्ट झाले. सायंदेवांचे ज्येष्ठ पुत्र नागनाथ यांच्यावर महाराजांची फार कृपा. ते मोठे योगी होते. महाराजांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला आणि नागनाथ उत्तम ज्ञानसंपन्न झाले आहेत. संकेश्वर जवळ ' हत्तरवाडा ' म्हणून एक लहान खेडेगांव आहे तिथे नागनाथांची जिवंत समाधी आहे. तिथली कुलकर्णी मंडळी भाद्रपद महिन्याच्या सप्तमी अष्टमीला उत्सव करतात. त्यांचे पूर्वज नागनाथांना भेटले. त्यांना एक समाधीला स्थान पाहिजे होते, कुठे तरी जिवंत समाधी घ्यायला. हे कुलकर्णी, आमच्या गांवात चला, म्हणाले आणि त्यांना घेऊन आले, तिथे ती जिवंत समाधी आहे. अगदी लहान गांव आहे. एका खोलगट भागात खालच्या बाजूला ते समाधी मंदिर आहे.

महाराजांनी सांगितले,"सायंदेवा, म्लेंच्छांची नोकरी सोडून दे. काय करायचंय त्यांचे पैसे घेऊन? आपल्या बायकामुलांना घेऊन इथे येऊन राहा." त्याप्रमाणे ज्या दिवशी सायंदेव आपल्या कुटुंबाला घेऊन गाणगापुरात आले त्यादिवशी अनंतचतुर्दशी होती. महाराज त्यांना म्हणाले,"आज अनंताची पूजा तुम्ही करा."

सायंदेव म्हणाले,"महाराज, सगळे आमचे देव म्हणजेच आपणच आहात, आपली सेवा, आपली पूजा झाली, बाकी कशाला पाहिजे? तरी पण आपण सांगा अनंत कोण आहे, कसं व्रत आहे ?"

मग महाराजांनी सायंदेवांना या व्रताच्या संबंधाने पांडवांची कथा सांगितली - धृतराष्ट्राने पांडवांना इंद्रप्रस्थामध्ये राहायला सांगितले. अग्नी नारायणाने अर्जुनाला दिव्य धनुष्य, घोडे, रथ दिला. नंतर पांडवांनी राजसूय यज्ञ केला. कृष्णांच्या सांगण्याप्रमाणे मयासुराला त्यांनी खांडव वनांत सोडून दिले. अर्जुनाने त्याला काही अग्नीमध्ये टाकले नाही. तो संतुष्ट झाला आणि त्याने एक उत्तम प्रकारची स्वतःच्या नांवाने मयसभा बांधून दिली धर्मराजाला.

राजसूय यज्ञ झाल्यावर धर्मराजा सम्राट झाला. सर्व पृथ्वी जिंकून राजसूय यज्ञ करायचा असतो. यज्ञ उत्तम प्रकारे पार पडलेला आहे. सिंहासनावरती मयसभेमध्ये राजा बसलेला आहे. श्रीकृष्ण परमात्मा, भीम, अर्जुन वगैरे सर्वजण तिथे आहेत. त्या मयसभेचे ज्ञान या दुर्योधनाला नव्हते. जिथे जमीन होती तिथे पाणी आहे असे त्याला वाटले आणि तिथे तो फसला. जिथे पाणी आहे तिथे जमिनीचा आभास होत होता तिथून तो जायला लागला आणि पाण्यात पडला. त्या मयासुराची सगळी माया होती. दुर्योधन पडल्यावर सगळे लोक हसायला लागले. दुर्योधनाला तो मोठा अपमान वाटला. तिथून तो हस्तिनापूरला गेला. धर्मराजाला बोलावून कपटद्यूत करून पांडवांचे सर्व राज्य हरण केले आणि त्यांना वनवासात पाठवले.

वनवासात पांडव दुःख भोगताहेत. तेव्हां श्रीकृष्ण एकदा

त्यांच्या भेटीला आले असता धर्मराजा म्हणतात,"देवा, आपण आमचं संरक्षण करणारे आहात असा आमचा विश्वास आहे. आम्हाला या संकटातून कधी तारणार?" श्रीकृष्ण भगवान् म्हणाले,"बाबा, सर्वही जिवांना सुख दुःख जे प्राप्त होतं ते दैवाने प्राप्त होतं, हा सिद्धांत आहे. सृष्टीमध्ये हे ठरलेलं आहे. पण ते दैव जरी बलवत्तर असलं तरी माझी भक्ती करणारा जो आहे त्याला त्या दैवाची बाधा होत नाही." "एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा। हरिकृपे त्याचा नाश आहे" म्हणताहेत नाथमहाराज. श्रीकृष्ण म्हणाले,"धर्मराजा, अनंतव्रत तूं कर. त्या अनंताच्या कृपेने तुला तुझे राज्य परत प्राप्त होईल."

धर्मराजांनी ते अनंतव्रत काय आहे, कसं करावं वगैरे सर्व विचारलं. त्यावेळी श्रीकृष्ण परमात्मा म्हणतात,"अंत म्हणजे मर्यादा. जगामध्ये सर्वही पदार्थ मर्यादायुक्त आहे. देशाची मर्यादा. सर्व देशांमध्ये राहाणारा पदार्थ कोणीही नाही जगामध्ये. काही विशिष्ट देशापुरताच तो राहील. अनंत शब्दाचा एक अर्थ म्हणजे देशमर्यादा ज्याला नाही. विभू म्हणजे सर्वव्यापी जो आहे. त्यानंतर दुसरी कालाची मर्यादा आहे. ठराविक काळच राहाणारे पदार्थ आहेत. सर्वही काळात राहाणारे कोणचेच पदार्थ आहेत. काल मर्यादा आहे. ती ज्याला नाही. म्हणजे सर्व काल राहाणारा तो नित्य आहे. तो अनंत. आणि वस्तू परिच्छेद त्याला नाही. प्रत्येक वस्तू आपापल्या नांवारुपापुरतीच आहे. हे नांव आणि हे आकार. परंतु सर्व वस्तू स्वरूप आणि सर्व आकार ज्याचे आहेत, तो एक अनंत आहे. सर्व स्वरूप तो आहे. तोच कार्यरूप झालेला आहे. असा मी अनंत आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्दशीच्या दिवशी हे अनंताचे व्रत करावे. म्हणजे इष्ट प्राप्ती होते." त्याबद्दल

एक कथा सांगताहेत श्रीकृष्ण.

वसिष्ठ गोत्रातले सुमंतु नांवाचे एक चांगले प्रसिद्ध ऋषी होऊन गेले. त्यांच्या स्त्रिने एका कन्येला जन्म दिला आणि तिला मृत्यू आला. गृहस्थाश्रमाची सगळी कार्ये स्त्री घरात असल्याशिवाय कशी होणार? अतिथी धर्माचे कार्य आहे वगैरे म्हणून त्यांनी दुसऱ्या स्त्रिबरोबर विवाह केला. ती दुसरी स्त्री अत्यंत रागीट आहे. आपल्या पतीला आणि सावत्र मुलीला अत्यंत त्रास द्यावा तिने. ती सावत्र मुलगी -' सुशीला ' कशी तरी आपली छळ सहन करून राहिली. बापाने तिची समजूत काढावी. चित्रकला, रांगोळ्या काढणे वगैरेत ती अत्यंत निपुण होती.

एके दिवशी कौंडिण्य महर्षि तिच्या घरी आले. सुमंतुने आपली कन्या सुशीला त्या कौंडिण्य ऋषींना अर्पण केली. त्यांचा ब्राह्मविवाह झालेला आहे. विवाहानंतर एक दोन महिने कौंडिण्य ऋषी आपल्या सासऱ्यांच्या घरी राहिले. ती सासू त्यांना त्रास देत असे. कौंडिण्य ऋषी सुमंतुची आज्ञा घेऊन दुसरीकडे जायला निघाले. आता जावई, मुलगी चालली आहेत त्यांना काही भेट द्यायला हवी की नको? ती सावत्र आई दारं खिडक्या बंद करून बसली. शेवटी सुमंतूना घरात कोंडा मिळाला थोडा तोच देऊन सुमंतूंनी त्यांची बोळवण केली. मध्यान्ह काळी एका नदी तीरावर ते रथातून येऊन थांबले. ऋषी आपले स्नानसंध्या करताहेत.त्या सुशीलेने पाहिले की तिथे काही स्त्रिया पूजाबिजा करीत आहेत. तिने त्या स्त्रियांना विचारले,'तुम्ही काय, कसली पूजा करीत आहात?' त्या स्त्रियांनी सांगितले,'आज भाद्रपद शुद्ध चतुर्दशी आहे, आज जर अनंताची पूजा केली तर

सर्व संकटे दूर होतात आणि आपल्या इच्छा पूर्ण होतात म्हणून आम्ही त्या अनंताची पूजा करीत आहोत.' नंतर त्या स्त्रियांनी सुशीलेला अनंताच्या पूजेचा सर्वविधी समजावून सांगितला. तिला अनंताचा दोरा दिला. तिलाही पूजा करायला सांगितले.

आपले आन्हिक आटपून कौंडिण्य ऋषी जायला निघाले. सुशीलाही तिची पूजा आटपून त्यांच्याबरोबर जायला निघाली. पुढे एका गावामध्ये त्यांना एक धनिक भेटला. त्याने कौंडिण्य ऋषींना पुष्कळ संपत्ती दिली. पुढे त्याच गावात ते पती पत्नी अगदी सुखाने राहिले. एक दिवस ते दोघे सहज बोलत बसले असता त्या ऋषीचे लक्ष पत्नीच्या हाताला बांधलेल्या लाल (अनंताच्या) दोऱ्याकडे गेले. त्यांनी संशयाने विचारले,"हा कसला दोरा? मला ताब्यात घेण्याकरता तू हे काही वशीकरण केले आहेस काय?"

महाभारतातसुद्धा असा प्रसंग दिला आहे. पांडवांना भेटायला श्रीकृष्ण आणि सत्यभामा आली. द्रौपदीचे सगळ्या कामावर लक्ष होते. द्रौपदी सांगेल तसे सगळे पांडव ऐकत होते. ते पाहून सत्यभामा तिला म्हणाली,"पती ताब्यात राहाण्यासाठी काही मंत्र तंत्र उपाय मला तरी सांग." द्रौपदी म्हणाली,"मंत्र तंत्र असला काही उपाय नाही याला. फक्त कर्तव्य म्हणून त्यांना काय हवं नको याकडे आपलं लक्ष द्यायचं. पतीचे सर्वही कार्य आपण आत्मीयतेने केले म्हणजे झाले." असा द्रौपदीने सत्यभामेला सल्ला दिला.

कौंडिण्य ऋषी वास्तविक वेदशास्त्र जाणणारे आहेत परंतु अनंताच्या व्रताची त्यांना माहिती नव्हती. पौराणिक व्रत आहे अशी समजूत झालेली आहे. वास्तविक पुराणातसुद्धा सर्व विधिवत

पूजा आहेत. पण त्यांची बुद्धी एकदम बदललेली आहे. त्यांनी तिला सांगितले की मला वश करण्यासाठी हा दोरा तू बांधलेला आहेस. असे म्हणून त्यांनी तिच्या हातातला दोरा एकदम तोडून अग्नीत टाकला. सुशीला गडबडीने त्या अग्नीजवळ गेली आणि त्यात दूध घातले पण तो दोरा अर्धवट जळला होता. या कृत्याचं फळ त्या ऋषीला मिळाले. चोरांनी संपत्ती लुटली. घरदार अग्नीत जळून गेलं. मग अनंताचे दर्शन झाल्याशिवाय अन्नग्रहण करायचे नाही असे ठरवून कौंडिण्य ऋषी अनंताच्या शोधात निघाले.

वाटेत त्यांना एक आंब्याचं झाड दिसलं, पुष्कळ फळं त्याला लागली होती पण एकही पक्षी त्या झाडाकडे जात नव्हता. एक बैल भेटला, त्याला समोर असूनसुद्धा गवत खाता येत नव्हते. असा प्रत्येकाला भेटत अनंताची माहिती विचारत फिरत होता पण त्यांना कोणालाच अनंताची माहिती नव्हती. उलट त्यांनीच ह्याला सांगितले की तुम्हाला अनंत भेटला तर आम्हाला त्याची माहिती सांगा. अत्यंत निराश होऊन अनंत काही आपल्याला भेटत नाही तेव्हां आपण आता प्राणत्याग करू अशा विचारात असताना स्वतः अनंतच एका वृद्ध विप्राच्या वेषात त्यांच्याकडे आले. ते कौंडिण्यांना घेऊन एका नगरात आले. तिथे एका महालात सिंहासनावर अनंत बसले होते. कौंडिण्य ऋषींनी आपल्या अपराधाची क्षमा मागितली. अनंतांची स्तुती केली आणि अनंतांनीही त्यांना वर प्रदान केला.

"माझ्या दर्शनाने तुमचे दुरित संपलेले आहे. इहलोकात तर तुम्ही सर्व सुखांचा उपभोग घ्यालच पण नंतरही नक्षत्रात पुनर्वसू नक्षत्र बनून तुम्ही राहाल." मग कौंडिण्यांनी अनंतांना

त्यांना भेटलेल्या झाड, वृषभ वगैरेंची स्थिती सांगून ते कोण आहेत असे विचारले. अनंत म्हणाले," पूर्व जन्मात एक विद्वान मनुष्य होता. पण आपली विद्या त्याने कोणालाही दिली नाही. त्यामुळे तो ते आंब्याचे झाड झाला आहे. त्याच्याकडे कोणीही जात नाही. ज्या स्त्रिने कसे तरी, अयोग्य दान केले म्हणून तिला गोरूप मिळाले. ज्या धनिकाने एका पैशाचे दान केले नाही तो त्या बैलाच्या रूपाने आला आहे. दोघी बहिणी होत्या. त्यांनी आपापसातच दानधर्म केला म्हणून त्यांची तशी स्थिती झाली." (त्यांचे पाणी एकमेकांच्यात मिसळले. पण कोणी जनावरे देखील ते पाणी पीत नव्हते.)कौंडिण्यांनी पुढे अनंतांची उपासना करून उत्तम गती प्राप्त करून घेतली.

गुरूमहाराज सायंदेवांना सांगताहेत,"हे व्रत कृष्णाने धर्मराजाला सांगितले. पांडवांनी श्रद्धा भक्तीने हे व्रत केले आणि पुढे त्यांना युद्धात जय मिळाला. ते व्रत, सायंदेवा, तुम्ही करा. ते सौख्यदायक तर आहेच पण पारमार्थिक दृष्टयाही चांगलं आहे." मग सायंदेवांनी अनंतांची पूजा केली. सायंदेव आपल्या कुटुंबासह गाणगापुरात राहिले आणि भगवंतांच्या कृपेने मुक्त झाले आहेत. एवढेच नव्हे तर त्याच्या वंशात पुढे उत्पन्न झालेलेसुद्धा गुरूमहाराजांच्या वरप्रसादाने मुक्त झाले."तेव्हां नामधारका, त्यांच्याच वंशातला तू आहेस. तुझ्याही चित्तामध्ये सद्‌गुरूची भक्ती उत्पन्न झालेली आहे. सद्‌गुरूचं चरित्र ऐकण्यात तुला अत्यंत प्रेम वाटत आहे. तेव्हां काही भिण्याचे कारण नाही तुला. संसार संसार म्हणजे काय? तुझ्यासारख्या गुरूभक्ताला संसाराची भीती बाळगण्याचे काही कारण नाही. मृगजळासारखा संसार आहे. तो नाहीच. हे एकदम समजून येतं. ही दृष्टी सद्‌गुरूच्या कृपेने मिळाल्यावर

संसारच नाही तर दुःख कसले? तेव्हां तूं काही घाबरू नकोस." असे सिद्धांनी नामधारकाला आश्वासन दिले आहे.

नामधारक सिद्धांना म्हणाले, महाराज, असेच सद्गुरूंचे चरित्र ऐकत राहावे अशी मला अधिकाधिक इच्छा होते आहे. आपल्या सहवासात माझा काल फार चांगला गेला आहे. मग सिद्धांनी पुढचे चरित्र सांगितले.

गाणगापुरामध्ये एक तंतूक नावाचा भक्त होता. कोष्टी होता. गृहस्थाश्रमी होता. दिवसाचे तीन प्रहर आपल्या संसारासाठी घालवत असे आणि एक प्रहर मठामध्ये येऊन झाडलोट वगैरे सेवा करीत असे. जरी तो कोष्टी जातीत जन्मला होता, तरी ईश्वराच्या प्रसादाने फार मोठी गुरूभक्ती त्याला मिळाली होती. एखादा मोठा भक्त उत्पन्न झाला. त्याला वर मिळाला म्हणजेही त्याच्या कुळामध्ये अशा भक्तीचा अंकुर उत्पन्न होतो आहे किंवा त्याच्या पूर्वपुण्याईमुळे महाराजांच्यावर त्याची मोठी निष्ठा आहे. त्याच्या मनात दानधर्माची, तीर्थयात्रेची कसलीही इच्छा नाही काही नाही.

पुढे शिवरात्र आल्यावर त्याची आप्तेष्ट मंडळी श्रीशैल्यम्च्या यात्रेला जायला निघाली. जाता जाता त्यांनी ह्या तंतुकालाही त्यांच्याबरोबर श्रीशैल्यम्च्या यात्रेला येतो का विचारले. तंतूक म्हणाला,"महाराज, जिथे राहात आहेत तो मठ श्रीशैल्य पर्वत आहे आणि सद्गुरू महाराज हे मल्लिकार्जुन म्हणजे साक्षात शंकर भगवान् आहेत. मला काही यायचं नाही." आता या आप्तेष्टांची दृष्टी निराळी आहे. तेही त्या गांवात राहात होते. महाराजांचे अद्भुत सामर्थ्य त्यांनीही पाहिले असेलच की पण तंतुकाच्याच मनामध्ये अशी दृष्टी उत्पन्न का व्हावी? सगळे

लोक म्हणाले, शिवरात्रीच्या दिवशी श्रीशैल्य मल्लिकार्जुनाचे दर्शन घ्यायचे नाही म्हणतो. हा मूर्ख आहे. जाऊं दे. याच्या नादाला लागण्यात काही अर्थ नाही. राहा, म्हणाले, तू एकटाच इथे. गेली सगळी मंडळी.

शिवरात्रीच्या दिवशी हा तंतूक दर्शनाला आला. नमस्कार करून उभा राहिला. महाराजांनी विचारले,"कां रे, तुझी सगळी आप्तेष्ट मंडळी शिवरात्रीच्या निमित्ताने श्रीशैल्याला गेली असताना तू का गेला नाहीस?" तो म्हणाला,"महाराज, तुम्हीच मल्लिकार्जुन आहात. तुम्ही इतक्या जवळ असताना कशाला इतक्या लांब जायचे आणि जरूर काय? कशाकरता जायचे? तो मल्लिकार्जुन काय बोलतो का? आपण साक्षात बोलणारे चालणारे मल्लिकार्जुन आहात. तुम्हाला सोडून तिकडे कशाला जायचे?" त्याने पूर्वी प्रमाणेच महाराजांना आपला निर्धार दाखवला आहे.

महाराज त्याला म्हणाले,"अरे बाळ, आज शिवरात्रीच्या निमित्ताने श्रीशैल्यावर किती मोठी यात्रा जमली असेल !" तंतुकाने सांगितले,"महाराज, माझा सगळा उत्सव आपल्या चरणाजवळ आहे. त्यापेक्षा मला काहीही उत्सव पहाण्याची इच्छा नाही. ते सगळे लोक आपले दर्शन घ्यायचे सोडून मूर्खासारखे श्रीशैल्यम्ला जात आहेत." म्हणजे हा श्रीशैल्यम्ला यात्रेला आला नाही म्हणून ते याला मूर्ख म्हणताहेत आणि महाराजांना सोडून तिकडे गेले म्हणून हा त्यांना मूर्ख म्हणतोय. पण भगवान् नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज म्हणाले,"बाबा, असं बोलू नये. परमात्मा सर्व ठिकाणी आहे. इथेही आहे. तिथेही आहे आणि त्यातल्या त्यात क्षेत्राचं एक महात्म्य आहे. कारण काय तर शिवलिंग स्वरूपाने महाराजांचा तिथे निवास झाल्यामुळे मोठ

मोठे तपस्वी पुरुष त्या ठिकाणी जाऊन राहातात, तप करतात. त्यामुळेही ते क्षेत्र पवित्र होऊन गेलेले असते आणि त्यांनी तिथे येऊन अनुष्ठान केल्यामुळे परमात्मा तिथे जागृत आहे. म्हणून अशा मोठ्या तीर्थक्षेत्रात जाऊन काही अनुष्ठान केले तर आपली कार्यसिद्धी लवकर होते. असं क्षेत्राचं महात्म्य आहे. ज्याच दैव चांगले असेल अशा माणसाला तिथे महात्मे भेटतात आणि त्याला मार्गदर्शन वगैरे करून कृतार्थ करतात.

म्हणून सगळे लोक जे जाताहेत ते योग्यच आहे. तुला श्रीशैल्य मल्लिकार्जुनाच्या दर्शनाला यायचं असेल तर चल. डोळे झाकून माझ्या पादुका धर आणि नंतर डोळे उघड." त्याने डोळे उघडल्यावर त्याला एकदम श्रीशैल्य पर्वतच दिसू लागला. गाणगापुरातून कधी आलो समजलेच नाही. एका क्षणामध्ये तिथे आलेले आहेत. महाराज स्वतः एका झाडाखाली बसले. तंतूकाला सांगितले, तीर्थस्नान पूजा वगैरे सर्व आटोपून ये. त्याप्रमाणे हा स्नान करून आला. पूजा सामुग्री घेताना त्याला गाणगापूरची मंडळी भेटली. त्यांनी विचारले,"आम्ही तुला चल म्हटलं तर आम्हाला सांगितलंस महाराज म्हणजेच मल्लिकार्जुन आहेत व गाणगापूर म्हणजेच श्रीशैल्य पर्वत आहे मग आता कशाला आलास?"

तो म्हणाला,"मी डोळे झांकले आणि डोळे उघडले तो इथे येऊन पोहोचलेलो." ते लोक म्हणाले," हे असलं वाटेल ते बोलू नकोस, तू आमच्या मागे लपून आला आहेस. तुझ्यावर विश्वास ठेवण्यात अर्थ नाही." तो म्हणाला,"कशाला यांच्या नादाला लागायचे. आपण आपली देवाची पूजा करू आणि जाऊ." मंदिरात पुष्कळ गर्दी होती. थोड्या वेळाने त्याला मंदिरात प्रवेश

मिळाला. तो आंत जाऊन पहातो तो तिथे शिवलिंग नाही. कोणचाच देव नाही. लोक आपले गुरूमहाराजांचीच पूजा करताहेत. गुरूमहाराज तिथे बसलेले आहेत. त्यांना बिल्वपत्र वाहाताहेत. त्यांची आरती करताहेत. ह्यानेही महाराजांची पूजा केली. त्याच्या मनांत आले, गुरूमहाराजांची पूजा मला गाणगापूरातही करता आली असती की. महाराजांनी मला इथे कशासाठी आणले? पण महाराजच आहेत म्हणून त्याने पूजा केली. नंतर जिथे महाराज झाडाखाली बसले होते तिथे आला.

तो म्हणाला,“महाराज, या गांवातल्या लोकांना मी मूर्ख म्हणू नको तर काय म्हणू. ते मल्लिकार्जुनाची म्हणजे आपलीच पूजा करताहेत. मी प्रत्यक्ष डोळ्याने पाहिले. सगळे लोक आपली पूजा करताहेत. मीही आपली पूजा केली. आपण गावांत इतक्या जवळ असताना हे अज्ञानी लोक इतक्या लांब कशासाठी आले. संपूर्ण विश्वाला व्यापून राहाणारे आपण आहात. आपली पूजा करायची सोडून इथे कशाला आले?”

महाराज म्हणाले,“बाबा, तुला सांगितले ना, क्षेत्राचा महिमा आहे. परमेश्वर एकच आहे. तो सर्वव्यापी आहे. पण स्थानाचा एक प्रभाव आहे. हे स्थानही अनेक सज्जनांच्या तपश्चर्येमुळे पुनीत झाले आहे ना ! हे स्थान मोक्षदायक आहे. या संबंधात पूर्वीचा एक वृत्तांत ऐक. विमर्षण नांवाचा एक मोठा पराक्रमी, प्रजेचे उत्तम पालन करणारा मोठा धार्मिक असा राजा होता. तो सज्जनांच्या संगतीत आला. पण तो अत्यंत स्त्रीलंपट होता आणि वाटेल ते भक्षण करायचा. युक्तायुक्त, योग्य, अयोग्य काहीही विचार करायचा नाही. काहीही खावं प्यावं आणि कोणत्याही स्त्रिशी संबंध ठेवावा.. शिवभक्त होता उत्तम.

त्याच्या राणीने एक दिवस धीर करून विचारले,"महाराज, शंकरांची एवढी मोठी भक्ती आपल्या ठिकाणी आहे आणि वागतांना मात्र आपण अगदी विरुद्ध वागता. हे कसं काय? याला काय म्हणायचे?" मग राजाने तिला आपल्या पूर्व जन्माचा वृत्तांत सांगितला."पूर्व जन्मी मी श्वान होतो. एकदा मला भूक लागली म्हणून मी मंदिरात गेलो. सगळ्या लोकांनी मला मारून हाकलून दिले. मी मंदिरात गेलो तेव्हां पूजा व आरती चालू असलेली पाहिली मी. पळताना प्रदक्षिणा घडली. त्या दिवशी शिवरात्र होती. म्हणून मरताना मला भगवान् शंकरांचे दर्शन झाले. श्वान योनीत असताना काय कुठंही लक्ष जातं. ते संस्कार माझ्या चित्तात या जन्मीही राहिले त्यामुळे माझे वर्तन असे आहे."

त्या राणीने विचारले, मी कोण पूर्व जन्मात होते? त्या राजाने सांगितले,"तू एक कपोत पक्षिणी होतीस. तू आकाशात उडत असताना एका घारीने तुझ्यावर झडप घातली. श्रीशैल्य पर्वतावर तुझे प्राण अर्पण झाल्यामुळे तू माझी स्त्री झालीस." म्हणजे पशुपक्षांच्या जन्मात असताना जर पुण्यकर्म घडले तर त्याचे एवढे फळ मिळते मग माणसाच्या जन्मात जाणीव पूर्वक पुण्यकर्म घडले तर त्याचे केवढे फळ मिळेल ! त्या भक्तीचं महत्त्व जाणून आपण पुण्य केलं पाहिजे. त्याकरता या कथा आहेत.

त्या राणीने विचारले, महाराज पुढे तुमचा जन्म कोणता असेल आणि त्यावेळी मी तुमच्याबरोबर असेन काय? त्यावर त्या राजाने त्याला व तिला पुढचे जन्म कसे मिळतील, त्यांचे संबंध कसे येतील ते तिला समजावून सांगितले.

एका जन्मामध्ये पापही संपत नाही. एका जन्मामध्ये पुण्यही संपत नाही. एकच जन्मापुरतं कर्म असतं अस नाहीये. मृत्यू आला की सगळं कर्म संपलं असं म्हणता येत नाही. शंकरांच्या मंदिरामध्ये श्वानयोनीत असताना काही त्याने स्वतःच्या बुद्धीने प्राण अर्पण केले नाहीत, लोकांनी त्याला तिथे मारला तरी भगवान् शंकरांच्या कृपेने त्याला उत्तम गती मिळाली. असं भगवान नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी त्या तंतुकाला श्रीशैल्याचे महात्म्य सांगितले. स्वयंभू लिंग आहे.. मल्लिकार्जुनाचे दर्शन झालेला जीव मोठा अधिकारी होतो म्हणतात. मग त्याला परत डोळे झांकून पादुका धरायला सांगितल्या आणि क्षणार्धात संगमावर आले. जा, म्हणाले, गांवात जाऊन सांग.

लोकांनी त्याला विचारले, काय रे क्षौर केलेस? तो म्हणाला,"महाराज मला श्रीशैल्यम्‌ला घेऊन गेले तिथे मी क्षौर, पूजा वगैरे केली. आत्ता त्यांच्याबरोबरच मी परत आलो." ते लोक म्हणाले, हे खरं कशावरून? सकाळी तर तूं दिसला होतास इथे आणि इतक्या लांब जाऊन आलास कधी? त्यांना हे कसं खरं वाटणार? त्यांना वाटलं हा काही तरी खोटं सांगतोय. तो म्हणाला, महाराज इथे आलेले आहेत, त्यांच्या दर्शनाला जायचं असेल तर जा, मला काही खरं खोटं माहीत नाही.

मग काही दिवसांनी गावातली बाकीची यात्रेला गेलेली मंडळी परत आली. त्यांना विचारले, हा श्रीशैल्यम्‌ला आला होता काय? लोक म्हणाले,"हो, हा आला होता. आम्हाला दिसला होता. पूजा बीजा केली याने. शिवरात्रीच्या दिवशी हा तिथे होता खरा." आता गाणगापुरातल्या लोकांना शिवरात्रीच्या दिवशी हा तंतुक इथे गांवात होता हे माहीत होते आणि त्याच

दिवशी तो श्रीशैल्याला दिसला होता, असे यात्रेला जाऊन आलेले लोक सांगताहेत. तेंव्हा तंतुकाच्या सांगण्यावर कोणाचाच विश्वास बसला नाही. म्हणजे जो प्रत्यक्ष अनुभव घेऊन आलाय ईश्वरशक्तीचा, त्याच्या भाषणावर विश्वास बसत नाहीये. तो सांगतोय,"मी श्रीशैल्याला जाऊन आलो, दर्शन घेऊन आलो." पण अशा भक्ताच्या वचनावर विश्वास नाहीये. काही तरी शंका मनामध्ये येत आहेत.

यांप्रमाणे तंतुकाच्या चित्तामध्ये अतिशय आनंद झालेला आहे. महाराज हेच सर्वरूपी आहेत. सर्व तीर्थस्थानांचं जे काही आणखी महात्म्य आहे ते यांचंच आहे. यांचीच पूजा सर्वत्र होती आहे. ही त्याची बुद्धी दृढ झाली. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे क्षेत्र महिमाही असेल म्हणाला. महाराजांच्या वास्तव्यामुळे क्षेत्राचा महिमा आहे असे तो समजला. नंतर बोलायचं बंद केलं त्याने. महाराज म्हणाले,"क्षेत्र महिमा असताना त्या क्षेत्राची निंदा करू नकोस. हेच लोक तुला विचारतील, महाराजच जर तिथे देवस्थानी होते तर इतक्या लांब जाण्याचे तुला कारणच काय?"

तो म्हणतो सर्वांनी तिथे महाराजांचीच पूजा केली, हे त्याने पाहिले. आता हे त्या लोकांना खरं वाटलं असेल की नाही कोणास ठाऊक. तरी महाराजांच्या सांगण्याप्रमाणे तंतुकाने आपला आग्रह सोडून दिला आहे.

आग्रह खरा आहे. पण तो आग्रह अज्ञानी लोकांच्या पुढे करून उपयोग नाहीये. त्यांचा बुद्धिभेद होईल ना ! श्रीशैल्य यात्रेला कोणी जाणारच नाही. अगोदर सगळ्यांना पटणारही नाही म्हणा. कारण हा तिथेही दिसला आणि इथेही दिसला त्या दिवशी आणि हाच जर सांगत बसला,'महाराजांचे दर्शन झाले'

म्हणजे झालंच. यात्रा नको की काही नको अशीच सगळ्यांची समजूत होणार. मग बुद्धिभेद कोणाचा करू नये यासाठी महाराजांनी त्या लोकांना क्षेत्र महिमा सांगून त्यांची समजूत काढली.

यानंतर महाराजांच्या दोन कवीभक्तांची ते कथा सांगताहेत. नंदीशर्मा नांवाचा एक ब्राह्मण, त्याच्या सर्वांगाला कुष्ठरोग झाला होता तो जावा म्हणून तुळजापुरामध्ये राहून देवीची सेवा करीत होता. त्याच्या बसण्याची जागा प्रदक्षिणेच्या वाटेवर असून ती अद्यापि दाखवतात. तीन वर्षे सेवा केल्यानंतर तुळजाभवानीने त्याला चंदला परमेश्वरीकडे जाऊन तिची सेवा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे नंदीशर्मांनी इथे येऊन सेवा करण्यास सुरवात केली. सात महिन्यानंतर चंदला परमेश्वरीने त्याला सांगितले की भीमा अमरजा संगमावर मोठे महात्मा राहातात त्यांच्याकडे तू जा. त्यांच्या दर्शनाने तुझी इच्छा पूर्ण होईल.

नंदीशर्माला राग आला. तो देवीलाच बोलू लागला, "तुम्ही देव सामर्थ्यवान आहात तुमच्या कृपेने माझा रोग बरा होईल या आशेने मी तुमच्याकडे आलो. असं असता तुम्ही मला एका मनुष्याकडे जा म्हणता? कळलं तुमचं सामर्थ्य काय ते. हे पूर्वीच कां सांगितले नाही? व्यर्थ कष्ट तरी केले नसते. मी काही इथून जाणार नाही. प्राण गेले तरी हरकत नाही. इथे राहूनच तपश्चर्या करणार."

मग त्या देवीने आपल्या पुजाऱ्यांना दृष्टांत देऊन त्याला घालवून देण्याची आज्ञा केली. महाराजांच्याकडे जायला देवीने सांगितले. याला जायला काय हरकत होती? परंतु त्याच्या मनामध्ये संदेह निर्माण झाला. देवीवर विश्वास आहे म्हणावं तर तिच्याशी भांडतो आहे. "इतके कष्ट का मला दिले, तुमच्या

सामर्थ्याची परीक्षा झाली." असंही म्हणतोय. पण त्यानं केलेल्या सत्कर्माचे, तपश्चर्येचे फळ त्याला मिळायचंय. सेवकांनी बाहेर घालवल्यावर, निघाला महाराजांच्याकडे यायला. म्हणाला, काय व्हायचे असेल ते होईल. रोग बरा व्हायचा असेल देवीच्या इच्छेने तर ठीक नाही तर शरीर ठेवायचं नाही.

नंदीशर्मा गाणगापुरामध्ये आलेला आहे. महाराजांची चौकशी करू लागला. प्रथम कोणी काही बोलले नाही. एवढ्यात एकाने सांगितले,"कालच शिवरात्र झाली. संगमावर स्नान, आन्हिक उरकून महाराज येतील तोपर्यंत वाट पहायची असली तर पहा." इतक्यात महाराज आलेच. कोणी तरी महाराजांना जाऊन सांगितले, अगदी पांढरं शरीर झालेला एक कुष्ठरोगी ब्राह्मण आपल्या दर्शनाला आला आहे. महाराज म्हणाले,"बोलवा त्याला इकडे." नंदीशर्मा आला. महाराज म्हणाले,"देव सोडून आमच्यासारख्या माणसाकडे कशासाठी आलास बाबा? माणसाजवळ काही सामर्थ्य आहे का? तुझ्या पूर्वजन्माच्या दोषांमुळे उत्पन्न झालेला हा रोग मनुष्याला बरा करता येतो का? औषध देणारा वैद्य, पूर्वजन्मातल्या दोषांमुळे उत्पन्न झालेला रोग बरा करू शकतो का? माणसाजवळ इतकं सामर्थ्य कुठून असणार?"

महाराजांच्या या शब्दांचा तत्क्षणी त्याच्या बुद्धीवर परिणाम झाला. पश्चात्ताप झाला त्याला संशय घेतल्याचा. महाराज मनुष्य नसून विश्वसाक्षी परमेश्वर स्वरूप आहेत याची कल्पना आली. महाराजांची त्याने क्षमा मागितली. म्हणाला," महाराज, माझी बुद्धी अत्यंत दुष्ट आहे. माझ्या बुद्धीमध्ये पुष्कळ दोष भरलेले आहेत. पापापासून मी जन्माला आलो. पापी आहे मी. शरण आलेलो आहे मी आपल्याला. दयासागर आहात आपण. भक्त

वत्सल आहात. काही जरी दोष असले तरी तिकडे लक्ष न देता माझा आपण उद्धार करा. विवाह झाल्यावर हा कुष्ठरोग मला झाला. आई,बाप, स्त्री,पुत्र सर्वांनी मला टाकून दिले. कोणीही माझ्याकडे पहात नाही. कोणालाही माझ्याबद्दल सहानुभूती नाही. देवांना शरण गेलो मी. निराश झालो. देव तरी बरं करतील अशी आशा होती. पण त्यांनीही मला घालवून दिलं. तिथे सेवासुद्धा करू दिली नाही. तेव्हा माझ्या बुद्धीमध्ये जी निराशा उत्पन्न झाली, त्यामुळे आपल्याबद्दल शंका आली. अपराध घडला. असं मनात येऊ नये पण मन फारच निराश झालं म्हणून असं घडलं खरं ! आपण जर माझा स्वीकार केला नाही तर मी देहत्याग करीन. पूर्वजन्मातल्या दोषामुळे हा रोग झालेला आहे आणि या जन्मातही परमेश्वराबद्दल मी संशय व्यक्त केला. आपल्याला मनुष्य म्हटलं मी. या सर्व दोषांमुळे मला आणखी किती शासन भोगावे लागेल त्यापेक्षा शरीर टाकलं म्हणजे झालं."

महाराज म्हणाले,"बाबा, भिऊ नकोस. ज्या पापामुळे तुझा हा रोग उत्पन्न झालेला आहे त्या पापाचं फळ तू आतापर्यंत भोगलंस. आता तुझे प्रारब्धभोग संपले. तुझ्या मनातली संशय भावनाही दूर झाली. आता तुझ्या मनात भक्ती उत्पन्न झालेली आहे.इथे भीमाअमरजेचा पुण्यपावन संगम आहे. इथे स्नान केल्यामुळे सर्व पातकांचा क्षय होतो. त्या तीर्थात जाऊन तू स्नान कर."

आपल्या स्वतःच्या सामर्थ्याबद्दल महात्मे हे कधी कोणाला काही सांगत नाहीत. महाराजांनी त्याच्या मनातले विचार ओळखले. त्यावरून महाराज परमेश्वर असल्याची जाणीव नंदीशर्माला झाली.

महाराजांनी उपाय सांगितला तो असाच आहे. या ठिकाणी जो तीर्थराज संगम आहे त्यात स्नान केलं की तुझं पाप जाईल असे त्याला सांगितले. वास्तविक त्याचं कुष्ठ महाराजांच्या कृपेने गेलं पण महाराजांनी सर्व श्रेय तीर्थाला दिलं. अर्थात स्नान करणाऱ्याचीही तशीच निष्ठा पाहिजे.

पांडुरंगांना नामदेवांनी सांगितले की संत लोक त्याला कच्चं मडकं म्हणतात."तुम्ही तर प्रत्यक्ष माझ्या बरोबर बोलता, जेवता आणि मी कच्चं मडकं कसं?" पांडुरंग म्हणाले,"खरं आहे. पांडुरंग फक्त राऊळातच आहे एवढंच माहीत आहे तुला. पण पांडुरंग सर्वत्र भरलेला आहे याची जाणीव नाही. हे समजण्याकरिता तुला पक्कं व्हावं लागेल." जा, म्हणाले,"तेवढ्यासाठी विसोबा खेचरांकडे जा."

आले नामदेव विसोबा खेचरांकडे . पहातो तो विसोबा शिवलिंगावर आपले पाय टाकून बसलेले. नामदेव मनांत म्हणाले, कोणाशी पांडुरंगानी गांठ घालून दिली आहे ! हे काय मला पक्कं करणार? वास्तविक पहाता पांडुरंगांनी ज्यांच्याकडे आपल्याला पाठवलं त्यांच्याबद्दल मनांत संशय यायला नकोय. तरीही नामदेवांच्या मनांत संशय आला. नामदेव विसोबांना म्हणाले, देवावर पाय ठेवून निजलात तुम्ही? निदान डोकं तरी ठेवायचं होतंत, उशाला तरी घ्यायचंत. त्यावर विसोबा खेचर म्हणाले,"जिथे देव नसेल तिथे माझे पाय उचलून ठेव."

झालं, ज्ञान व्हायला वेळ लागला नाही. सर्वत्र शिवलिंग दिसायला लागली. सर्वत्र परमात्मा भरून राहिला आहे हे ज्ञान व्हायला वेळ लागला नाही. कारण सगुण भक्तीच त्यांची तेवढी मोठी होती. पांडुरंगांबद्दल विलक्षण प्रेम होतं. ज्ञानेश्वरांनासुद्धा

नामदेवांची संगती घडावी अस वाटलं. त्यांनी तीर्थयात्रेला जाताना नामदेवांना मुद्दाम बरोबर नेलं. ज्ञानाला काही दुरिते प्रतिबंध निर्माण करीत असतात.याप्रमाणेच नंदीशर्मानेही देवाची भक्ती केली, तपश्चर्या केली, देवीवर विश्वास ठेवला.

एकनाथ महाराजांची बुद्धी गुरूची आज्ञा पालन करण्याची. गुरू महाराजांनी नाथमहाराजांना जमाखर्च लिहून ठेवण्याची आज्ञा केली. एकदा त्या जमाखर्चात एक पैशाची चूक लागली. ती सापडेना. बारा वाजून गेले, नाथ महाराज ती चूक शोधण्यात दंग झालेले. जनार्दन स्वामी पहायला आले पण नाथांना त्याचही भान नाही आणि अचानक ती चूक सापडली. नाथमहाराजांनी आनंदाने टाळी वाजवली. जमाखर्चातसुद्धा नाथांची बुद्धी इतकी स्थिर होती. जनार्दन स्वामींनी त्यांची ही स्थिरबुद्धी पाहून तिला दुसरा विषय - ईश्वर भक्ती - दिला. जनार्दन स्वामींचा संकल्प झाला आणि ते नाथमहाराज पुढे प्रसिद्ध झाले.

बुद्धीची परीक्षा महात्मेच करू शकतात. नंदीशर्माचा उद्धार करायचे महाराजांनी ठरविले. कोणी त्यांना मनुष्य म्हणा किंवा देव म्हणा. शरण आलेल्याचा उद्धार झालाच पाहिजे. त्यांना कुठला राग आणि कुठलं काय ! जीव कोणच्याही बुद्धीने आला तरी त्याचा उद्धार होतो. सोमनाथ ब्राह्मणांना महाराजांनी सांगितले, याला संगमावर घेऊन जा, संकल्पपूर्वक सचैल स्नान करून आणा. याची जुनी वस्त्रं टाकून नवीन वस्त्रे याला द्या. स्नानानंतर याला अश्वत्थाची पूजा करायला लावून मग इकडे घेऊन या.

दोघेही संगमावर आले. नंदीशर्माने स्नान केले. सोमनाथांनी सांगितल्याप्रमाणे अश्वत्थाची पूजा केली आणि मठात महाराजांच्या

दर्शनाला परत आले. महाराज त्याला म्हणाले,"तुझं शरीर पूर्णपणे निरोगी झालं की नाही ते तपासून घे अगोदर." कारण हा आधीच मनांत संशय घेऊन आला होता. त्याची संशय निवृत्ती पूर्ण झाली पाहिजे. नंदीशर्मा म्हणाला,"महाराज आपल्या कृपेने सगळे कुष्ठ गेले पण थोडे जांघेत कसे शिल्लक राहिले? संपूर्ण कुष्ठ रोग ज्यांच्या कृपेने गेला त्यांच्या कृपेने हे सुद्धा जायला नको का?" आता हा विश्वास दाखवायला लागला. महाराज म्हणाले,"तुझ्या संशयाचं फळ आहे. माणसाकडे मला का पाठविता असं देवाला विचारलंस ना तू?त्यामुळे हे असं झालं. माणसं सगळं बरं करीत नाहीत. आम्ही मनुष्य आहोत."

नंदीशर्माही आता वादविवाद करायला लागला. तो म्हणाला,"अमृत जरी असलं तरी जर एखाद्याने ते पाणी म्हणून प्राशन केले तर मरण येईल का? अमृताला पाणी समजलं तरी मृत्यू टळला पाहिजे. तुम्हाला मी मनुष्य समजलो म्हणून काय झालं? हे एवढं तरी तुमची कृपा होऊनही शिल्लक कां राहिलं? तुमची कृपा, ज्ञान, तुमचं सामर्थ्य हे पूर्ण आहे महाराज. मग हे सामर्थ्य इथे अपूर्ण कसं झालं?" म्हणजे अजूनही आपला अपराध तो कबूल करत नाहीये.

महाराज म्हणाले,"ईश्वर पूर्ण आहे. त्याने पूर्णपणे बरं केलं पाहिजे, असा तुझा आग्रह आहे ना? पण तसा भाव आहे का तुझा? या (माझ्या) ठिकाणी ईश्वराचे पूर्णत्व तुला कां दिसलं नाही? इथे पूर्णत्व आहे हे तरी तुला पूर्णपणे मान्य कुठाय? आम्हांला तू अजून मर्त्य व अपूर्णच समजतोयस. त्याप्रमाणे अपूर्णच फळ मिळालं तुला. जसा भाव तसं फळ. जन्मांध मनुष्य सूर्याचे अस्तित्वच मान्य करीत नाही. सूर्य पहाण्याची

आपली योग्यता नाही हे मान्य न करता, तो सूर्यच नाही म्हणतो. माणसाकडून माझा रोग कसा बरा होणार असा संशय तुझ्या मनात आहे की नाही? तो पुरता गेलाय का? हे थोडं कसं शिल्लक राहिलं म्हणतोयस. एकीकडे ईश्वर आहे असं म्हणतोस, दुसरीकडे मनुष्यही म्हणतोस. ही द्विधा भक्ती उपयोगी नाही. या द्विधा भक्तीचं हे फळ आहे. ' संशयात्मा विनश्यति ' म्हणतात. संशयाला काही फळ ना अश्रद्धा, अज्ञान असलं तरी चालेल एक वेळ. असो.

या तुझ्या थोड्याशा कुष्ठावर एक उपाय आहे. आमची स्तुती कर. तू जर आमचं खरं स्वरूप जाणलं असलंस तर ते स्तुतीमध्ये तुला व्यक्त करता आलं पाहिजे. सर्व श्रुतींमध्ये ईश्वराचे जे वर्णन आलेलं आहे तशा प्रकारची स्तुती तू करावीस. म्हणजे सर्वही लोकांच्या मनामध्ये तुझ्या बोलण्यावरून जो बुद्धिभेद झाला आहे तो दूर होईल. तू कृतार्थ होशील."

हे ऐकून जास्तीच घाबरला तो. म्हणाला,"महाराज, आता काय बोलू मी? मला लिहायला वाचायला सुद्धा येत नाही. तिथे मी आपली स्तुती काय करणार? दुसरी काही आज्ञा करा. म्हणजे माझा हा रोग पूर्णपणे जाईल."

महाराज म्हणाले,"नाही, एकदा जे मुखातून निघालंय तेच करावं लागेल." अशा महात्म्यांना इतकं स्पष्ट व्हावं लागतं. कोणत्याही भक्ताला असं स्पष्ट बोलले नसतील महाराज. मग महाराजांनी थोडंसं भस्म घेऊन अभिमंत्रण करून त्याच्या मुखामध्ये टाकलं आणि त्याला एकदम कवित्व शक्ती प्राप्त झाली. त्याने एका स्तोत्रात महाराजांची उत्तम स्तुती केली आहे.

जो निंदा करणारा नास्तिक मनुष्य आहे त्याने सर्वत्र

नास्तिकतेचाच प्रचार केला आहे. त्याने जर ' देव आहे ' असे सांगितले तर जास्ती लोकांची बुद्धी लवकर सुधारेल म्हणून नास्तिकाकडूनच हे कार्य करवायचंय मुद्दाम. त्यांना पटलंय ना ईश्वराचे सामर्थ्य, अस्तित्व मग जाहीरपणे काय हरकत आहे? आजपर्यंत मी नास्तिक होतो, ईश्वराचे अस्तित्व नाही असे सांगितले आता असं कसं बोलू, ही भीती कशाला पाहिजे? म्हणून नास्तिकाकडूनच जगात ईश्वराच्या स्वरूपाचे वर्णन करून घ्यायचे. सर्वही विश्वाचे द्रष्टे, संरक्षक, संहारक सगळी आपली माया शक्ती आहे. पण हे ज्ञान फक्त मनुष्यालाच मिळू शकतं.

नंदीनामा म्हणतो,"ज्ञानाचा खरा अधिकारी मनुष्य आहे. पण तो आपल्या मायेने भ्रांत होऊन विचारतोय ईश्वर कुठे आहे? शास्त्र, भगवत् भक्त काय सांगतात हे ऐकून घ्यायची तयारी नाही त्याची. भ्रांत झाल्यामुळे त्याला अधोगती प्राप्त होते. आपल्या मूळ स्वरूपाला तो विसरून गेलेला आहे. सत्कर्माचरण जर घडलं तर कदाचित अनेक योनी भोगता भोगता या ठिकाणी जन्माला येतो. त्याला जन्म कसे प्राप्त होतात हे उपनिषदामध्ये सांगितल्याप्रमाणे कर्म करून जीवात्मा चंद्रमंडलापर्यंत जातो. तिथे पुण्यफळाचा उपभोग घेऊन झाल्यावर पुन्हा पृथ्वीवर येतो. मनुष्याच्याद्वारा स्त्रिच्या शरीरामध्ये प्रवेश करतो. गर्भ धारणा होते. महिन्यानंतर त्याला मस्तक उत्पन्न होत. दोन महिन्यानंतर कंठ वगैरे अवयव उत्पन्न होतात. त्वचा, रोम, नखे इ. चार महिन्यानंतर. सातव्या महिन्यात चलनवलनादि सुरू होते. नऊ महिन्यानंतर ती गर्भाची वाढ पूर्ण होते. नवव्या महिन्यात ईश्वर स्वरूपाचे ज्ञान, आपल्या कर्मांचे ज्ञान त्याला होतं आणि तो ईश्वराची स्तुती करू लागतो. तो जीवात्मा

ईश्वराला म्हणतो, पुन्हा पुन्हा मला जन्म येतो. पुन्हा पुन्हा मृत्यू येतो. अनेक योनी मी फिरलो. कारण आपल्या भक्तीपासून मी वंचित झालो. पराड्.मुख झालो. तेव्हां या गर्भवासापासून मला मुक्त करा. मी अतिशय त्रस्त झालो. आहे."

इतक्यात १० व्या महिन्यात प्रसूती वायू त्याला गर्भाच्या (मातेच्या शरीरा) बाहेर ढकलून देतो.आणि बाहेर आल्यावर त्या जीवात्म्याला गर्भावस्थेतील ज्ञानाचा विसर पडतो आणि तो माया मोहित होऊन रडू लागतो. त्याला स्वतःला काही हालचाल स्वतंत्रपणे करता येत नाही. पराधीन असतो. मग त्याचं बाळपण मित्र मंडळींबरोबर खेळण्यात जाते. प्रौढ/तारूण्यावस्थेत दुर्जन, विषयी लोकांच्या संगतीमुळे विषयासक्त तो होतो. विषय भोगामध्येच त्याचं वय जाते. नंतर वार्धक्य आल्यावर सर्वांबद्दल ममता उत्पन्न होते. आप्तेष्टांचे कसे होणार याची चिंता लागून राहाते. अनेक रोग होतात. अस्वस्थ होतो. शंभर वर्षे जरी आयुष्य मिळाले तरी अर्धे आयुष्य झोपेत जातंय आणि उरलेले आयुष्य हे बाल, तारुण्य, वार्धक्य अशा निरनिराळ्या व्यवहारामध्ये जाते.

शेवटी महाराजांना त्याने सांगितले,"ह्या दुर्लभ मनुष्य जन्माचे साफल्य कसे होईल याचा विचार केला पाहिजे. नवविधा भक्ती घडणें फार कठीण आहे. पण त्यातली एखादी तरी भक्ती घडावी. कोणाला पूजा करावी असं वाटतंच नाही. काही तरी नुसतं ऐकावं देवाचं, हे करावं असं वाटतं. श्रवणभक्ती घडली तरी हरकत नाही. नवविधा भक्ती जर उत्पन्न करता आली तर जन्माचे चांगलेच साफल्य होईल. ईश्वर भक्तांची संगती घडणं हेही जन्माचे साफल्य आहे. तेव्हां आपल्या भक्तांची संगती मला

घडावी आणि आपली भक्ती माझ्या चित्तामध्ये दृढ व्हावी."

सर्व लोकांना तो सांगतो आहे,"गुरूमहाराज हे साक्षात परमात्मा आहेत. परिचय झालेला आहे, तुमच्या गावात आहेत म्हणून त्यांना तुम्ही मनुष्य समजू नका. धर्माचे, सज्जनांचे रक्षण करण्याकरिता हा परमात्मा आलेला आहे. यांची सेवा करा आणि मोक्ष मिळवा. जे आपलं भजन करतील त्यांच्यावर कृपा करणारा हा परमात्मा आहे. याच्या कृपेने सर्व पापकर्मांचा नाश होतो आणि जीव कृतार्थ होतो."

असे म्हणून महाराजांना साष्टांग नमस्कार घातल्यावर जे काही त्याच थोडंस कुष्ठ होतं तेही गेले. मग महाराजांच्या आज्ञेप्रमाणे आपल्या स्त्री पुत्रांना घेऊन येऊन तो गाणगापुरातच राहिला. महाराजांच्यावर पुष्कळ काव्यरचना त्याने केली.

दुसरा एक कवी गाणगापुरात राहात होता. कल्लेश्वराची प्रत्यक्ष आणि मानस पूजा तो करीत असे. कल्लेश्वरावर रोज पांच काव्ये करून अर्पण करी. लोकांनी त्याला सांगितले,"महाराजांना काव्य आवडते, त्यांच्यावर काही काव्य कर तू. त्यांची स्तुती कर." पण तो म्हणाला,"मी माणसाची स्तुती करीत नाही. ज्ञान जरी असलं, ईश्वराची माया हीच आहे ना ! वसुदेवसुद्धा कृष्णांना परमेश्वरस्वरूप म्हणून बरीच वर्षे ओळखत नव्हते. ऋषीमंडळी वगैरे घरी आली की विचारायचे, संसारातून मी मुक्त कसा होईन? मला संसारातून मुक्त व्हायचा मार्ग दाखवा. नारद म्हणाले, असंच आहे. श्रीकृष्णांना तो आपला मुलगा समजतोय."

तर हा नरकेसरी कवी नित्याप्रमाणे कल्लेश्वराची पूजा करून ध्यान करीत असता त्याच्या ध्यानातून ते कल्लेश्वराचे

लिंग अदृश्य झाले आणि त्याठिकाणी त्याला महाराज बसले असून तो महाराजांची पूजा करतोय असे दृश्य दिसू लागले. महाराज त्याला म्हणाले,"कल्लेश्वराला सोडून आमची पूजा कशाला करतोस बाबा?" एकदम ध्यान विसर्जन करून तो उठला आणि महाराजांच्या दर्शनाला आला. त्यांना अत्यंत भक्तीभावाने नमस्कार करून काव्यात महाराजांची स्तुती केली. तो म्हणतो,"महाराज, अज्ञानामुळे माझ्या हातून हा अपराध घडलेला आहे. मी आपल्याला मनुष्य समजलो. माझे अज्ञान आपण दूर केलंत, खरं स्वरूप आपण मला दाखवलंत.माझा मोह गेलेला आहे. माझं जे काही पुण्य आजपर्यंत झालं त्याचं फळ मला आपल्या रुपानं मिळालं आहे. आपला शिष्य म्हणून आपल्या जवळ राहायची माझी इच्छा आहे."" महाराजांनी त्याला वस्त्र वगैरे देऊन त्याचा गौरव केला. म्हणाले,"कल्लेश्वराची म्हणजे आमचीच पूजा झाली तेव्हां गाणगापूरला कशाला येतोस, तिथेच राहून कल्लेश्वराची पूजा कर."

तो म्हणाला,"प्रत्यक्ष आपली पूजा करता येत असताना कल्लेश्वराची पूजा कशाला करायची? आता मी आपल्या चरणाजवळच येऊन राहाणार." आणि अशा रीतीने हाही कवी महाराजांच्या जवळ येऊन राहिलेला आहे.

आणखी काही कथा ऐकण्याची नामधारकाची इच्छा पाहून सिद्ध मुनी सांगताहेत. वस्तुतः परमात्म्याला आकार नाही, क्रिया नाही. शुद्ध सत्वात्मक परमात्मा आहे. परंतु ही जी त्रिगुणात्मक बुद्धी आहे त्या बुद्धीशी संबंध येऊन सर्व विश्वरूप त्यांनी धारण केलं आहे. महाराजांनी असा विचार केला की मी सर्व ठिकाणी आहे. याचा जे विचार, मनन करणारे लोक आहेत त्यांनाच हे

समजून येतं. सर्वांना हे कळणार नाही. सर्वत्र माझी व्याप्ती आहे. मग ब्रह्म, विष्णु, महेश, या रूपांनी ते राहिले. पुन्हा त्यांच्या मनांत विचार आला भूलोकावर आणखी पुष्कळ भक्त आहेत. त्यांना माझं ज्ञान कसं व्हायचं? म्हणून या भूलोकावरही येऊन त्या सर्वांना आपण दर्शन द्यावं. म्हणून भगवान हे या ठिकाणीही अनेक अवतार धारण करून येत आहेत. त्यांचं कार्य चाललेलं आहे. भगवंताच्या पुष्कळ लीला झाल्या आहेत. कलियुगामध्ये आपलं हे भाग्य आहे की भगवंतांचे हे कायमचे अवतार झाले आहेत, तर कधी गुप्त. पूर्ण स्मरण, दृढ स्मरण ज्याला होतं त्यालाच त्यांचं ज्ञान होतं. सिद्ध एक कथा सांगताहेत.

एकदा दिवाळीचा सण आला. सात गावातली भक्त मंडळी महाराजांना भेटायला आली. त्या सगळ्यांनी सांगितले,"महाराज, आम्ही आपल्याला आमंत्रण करायला आलो आहोत. दिवाळीत आपण आमच्याकडे येऊन राहायचे." विशेष म्हणजे प्रत्येक गावातला भक्त महाराजांना त्याच्या गावाला यायचा आग्रह करतोय. आता व्यवहाराप्रमाणे महाराज त्यांना म्हणाले,"तुम्ही सात जण आणि मी एकटा. एका मनुष्याला एका वेळी सात जणांच्या घरी कसे जाता येईल? तुम्हीच विचार करा. नाही तर आपण असं करू, या दिवाळीला मी तुमच्यापैकी एकाकडे येतो, पुढच्या दिवाळीला दुसऱ्याकडे किंवा एकेक दिवस एकेकाकडे येतो. म्हणजे सर्व व्यवस्थित होईल. पहा, काय करायचे ते तुम्ही आपसात ठरवा."

आता हे सगळे भक्त आपसात भांडायला लागले. प्रत्येक जण म्हणू लागला,मी नेणार महाराजांना माझ्या गावी. महाराजांनी यायला पाहिजे. हा गरीब हा श्रीमंत असा भेदभाव तुमच्याकडे

नाही, महाराज. आपली सर्वत्र समदृष्टी आहे. आपण माझ्याच गावी या. असा त्यांचा कलह सुरू होताच महाराज त्यांना म्हणाले, असे भांडू नका. सगळ्यांच्या घरी मी येतो. महाराजांनी विचार केला आता यांना शक्ती दाखवल्याशिवाय यांचे भांडण मिटणार नाही. नेता असा पाहिजे की त्याने सर्वांची भांडणे सोडवली पाहिजेत. महाराज म्हणाले सगळ्यांची इच्छा पूर्ण केली म्हणजे त्यांची भांडणे थांबतील. इच्छा पूर्ण करायची म्हणजे सातही जणांच्या घरी जायला पाहिजे. ही शक्ती असणारा नेता असू शकतो.

महाराज ईश्वर आहेत ही भावना कायम राहात नाही, हेच मोठे दुर्दैव आहे. अप्रतिहत भक्ती नाहीये. काही थोडासा चमत्कार झाला की आम्ही म्हणतो हो, महाराज म्हणजे साक्षात परमेश्वर. आपली भक्ती अहेतुकही नाही आणि अप्रतिहतही नाही. भास्कर ब्राह्मणाने तीन माणसांचा शिधा आणला आणि चार हजार लोक जेवले. हे ऐकल्यावर महाराज हे काही मनुष्य नाहीत, साक्षात परमेश्वर आहेत हे तेवढ्यापुरतं वाटतं. आज महाराज सांगताहेत मी सर्वांच्या गावी येतो. पण त्यांच्या शब्दावर ते सर्वजण किंवा इतर कोणी विश्वास ठेवायला तयार नाही.

मग महाराजांनी युक्ती केली. एकेकाला जवळ बोलावून त्याच्या कानांत सांगितले की मी तुझ्या गावी येतो पण कोणाला सांगू नकोस आणि लगेच निघ इथून. असं प्रत्येकाला सांगितल्यावर त्यांचा प्रत्येकाचा विश्वास बसला. प्रत्येकाला वाटलं महाराज फक्त आपल्याचकडे येणार आहेत. दुसऱ्याच्या घरी जाणार नाहीत. मग त्यांचा विश्वास बसला म्हणजे महाराज हे सामान्य मनुष्याप्रमाणे आहेत ही कल्पना. प्रत्येकाला वाटले माझ्या

एकट्याच्याच घरी येणार महाराज. माझ्या घरी आल्यावर बाकीच्यांच्या घरी कसे जातील? त्यांनी फक्त मलाच यायचं कबूल केलं आहे. म्हणजे या मंडळींचे महाराजांवर प्रेम आहे. पण महाराजांवर पूर्ण विश्वास नाहीये.

झालं. सगळेजण आपापल्या गावी गेले. गावातल्या लोकांना समजलं महाराज कुठेतरी बाहेर गावी जाणार आहेत. ते लगेच आले महाराजांच्याकडे आणि याबद्दल विचारू लागले. महाराजांनी त्यांचंही समाधान केलं. ते म्हणाले,"दिवाळीला आम्ही गाणगापूर सोडून कुठेही जाणार नाही." आणि त्याप्रमाणे भगवान नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज दिवाळीत गावामध्येच राहिले. महाराजांना कशाचीच अपेक्षा नाही. त्यांना फक्त भक्तांचे प्रेम,श्रद्धा तेवढी दिसते. जात, आचार,वय, विद्या, अर्थ वगैरेंची काही जरुरी नाही.

गावातल्या लोकांच्या समाधानासाठी महाराज गावातच राहिले आणि त्या सात भक्तांच्या समाधानासाठी महाराज सात रुपे धारण करून त्या प्रत्येकाच्या गावी/घरी गेले. प्रत्येकाला वाटले महाराज फक्त त्याच्याच घरी आहेत. त्या प्रत्येकाने महाराजांना शाल,खडावा वगैरे भेटवस्तू दिल्या. महाराजांची पूजा केली.

कार्तिक पौर्णिमेच्या निमित्ताने सगळी भक्त मंडळी गाणगापुरात जमली. त्यात ते सात गावचे सात भक्तही होते आणि मग जेव्हां एकेक जण सांगू लागला की महाराज त्याच्या घरी आले होते, त्याने महाराजांची पूजा करून अमुक एक वस्तूही भेट दिली, ती आत्ता महाराजांच्या जवळ आहे वगैरे. दुसरा म्हणू लागला, तुझ्याकडे महाराज येतीलच कसे? ते तर

त्यादिवशी माझ्या घरी होते. पुन्हा दुसरं भांडण निर्माण झालं. साक्षात्कार झाला तरी भांडण आहे. दुसऱ्याचे खोटे, माझे तेवढे खरे. पण यात महाराजांच्यावरचा विश्वास कमी झाला की नाही! प्रत्येकाच्या घरी गेले असतील महाराज असं म्हणायला काय हरकत आहे? पण हे पटत नाहीये.

गावातले लोक म्हणाले, तुम्ही सगळेही खोटं बोलताय. महाराज तर इथं गाणगापुरातच होते. शेवटी महाराजांना सांगावं लागलं, तुम्ही कोणीच खोटं बोलत नाही. मी इथंही होतो आणि या सातही जणांच्या घरी गेलो होतो. भांडू नका उगीच. म्हणजे भक्ती, प्रेम जरी उत्पन्न झाले तरी त्यात किती प्रतिबंध आहेत ! ईश्वरस्वरूप जाणायला जेवढी दृढ भक्ती लागते तेवढी नाही. महाराजांनी सांगेपर्यंत त्यांचा विश्वास बसला नाही, की महाराज इथेही होते आणि सात गावीही गेले होते. प्रेम काय कोणाचेही असू शकते. बाह्य व्यवहारातही आपण एकमेकांच्यावर प्रेम करतो. आमच्या गावी आपण या महाराज, असे सर्वच जण म्हणतो आपण. पण तशी श्रद्धा नसते आपली. महाराजांना स्वतःला सांगावे लागले. या लोकांची बुद्धी सुधारावी लागली, त्याशिवाय सुधारणा होत नाहीये. मग सगळ्यांना पटले. तेवढ्यापुरता पश्चात्ताप झाला, आपली चूक कबूल केली. नंतर ते आपापल्या गावी परत गेले. ज्याच्या बुद्धीमध्ये जसे जसे संस्कार असतील त्याप्रमाणे घडत असते.

आणखी एक कथा सांगताहेत सिद्ध. गाणगापुरात एक शूद्र शेतकरी महाराजांचा भक्त होता. त्याच्या दास्यभक्तीने त्याला सर्व ऐहिक भोग मिळाले आणि संसारही सुखाचा होऊन मुक्ती मिळाली. आपले कर्तव्य कर्म तो उत्तम करतोय. इकडे तिकडे

लक्ष न देता आपण बरं, आपली शेती बरी असे चाललंय. महाराज रोज त्याच्या शेतातून संगमावर जायचे. अद्यापि हे शेत दाखवतात. पहाटे तो रस्त्यावर येऊन महाराजांची वाट पहात उभा राहायचा. महाराज आले की साष्टांग नमस्कार घालायचा. काही बोलायचा नाही काही नाही. पुन्हा दुपारी १२ वा. रस्त्यावर उभं राहावं. महाराज परत गावात जायला निघाले की परत नमस्कार करावा. महाराजांचा संगमापर्यंतचा रस्ता साफ करायचा. त्यातले काटेकुटे काढायची सेवा करीत असे.

बरेच दिवस झाले. रोज जाताना नमस्कार, येताना नमस्कार. एके दिवशी महाराज तिथेच उभे राहिले. पहाटेची वेळ होती. महाराज म्हणाले,"काय रे बाबा ! रोज मी जाताना, येताना तू नमस्कार करतोस. काय तुझी इच्छा आहे? कशाला नमस्कार करतोस? स्पष्ट सांग." तो म्हणाला,"संसार चांगला व्हावा हीच माझी इच्छा आहे. शेतात चांगले धान्य पिकावे. दुसरी काय इच्छा असणार? शेतात पुष्कळ धान्य आलं आहे. आपली पावले एकदा शेताला लागू देत. आपण एकदा शेत येऊन पहा."

महाराज गेले शेतात. सगळीकडे उत्तम धान्य आलं आहे. कणसं आली आहेत. आठ पंधरा दिवसांनी मळणी होणार. महाराज म्हणाले,"बाबा, माझ्या सांगण्यावर तुझा विश्वास असेल तर मी संगमावरून परत येईपर्यंत हे सगळं शेत कापून टाक." यानेही काही विचार न करता महाराजांच्या आज्ञेप्रमाणे सगळं पीक कापायचे ठरविले. मालकाला जाऊन सांगितले. मालकाने काही लिहून वगैरे घेतले आणि कापायला परवानगी दिली. पण त्याची बायको मुले आडवी आली. ते म्हणू लागले,"अहो हे

काय करता तुम्ही? हे जर पीक कापून टाकले, तर तुम्ही मालकाला पैसे कुठून देणार? सामर्थ्य जाऊं दे. पुढचं एक वर्षभर आम्हाला खायला काय देणार तुम्ही?" याला राग आला. त्यांना हा दगड मारायला लागल्यावर ती पळून गेली.

महाराज म्हणाले, ईश्वराकरीता, सद्गुरूंच्या करता भरत, प्रल्हाद आणि बिभिषणाने आपल्या मातेचा त्याग केला. भरताने सांगितले, रामाला वनवासात पाठवणारी ही माता आदरणीय नाही. याचा अर्थ भरत काही उन्मत्त झालेला नाही. त्याची भक्ती श्रेष्ठ आहे. मातृदेवोभव असे जरी शास्त्र सांगत असले तरी अशा मातेला मानायला तो तयार नाही. अशा मातेला मी देव म्हणणार नाही.

प्रल्हादजींना पिता सांगतोय हरिभक्ती करायची नाही. प्रल्हादजी म्हणाले,"नाही, हरिभक्ती सोडणार नाही. हरिभक्तीने माझंही कल्याण आहे आणि तुमचंही. मी तुमच्या विरुद्ध जात नाही." पण जेव्हां पित्याने ऐकले नाही तेव्हां प्रल्हादांनी पित्याचा त्याग केला. प्रल्हादजी उन्मत्त नाहीयेत. पूर्ण विचारी आहेत. बिभीषण आपल्या बंधुचा त्याग करून रामचंद्रांना शरण आला आहे.

महाराज म्हणाले, या शेतकऱ्याला काही वेड लागले नाही, बायको मुलांचे ऐकलं नाही म्हणजे. त्याची बायकोमुले मालकाकडे जाऊन सांगू लागली,"त्यांना शेत कापू देऊ नका. सगळं पीक कापलं तर तुमचं धान्य काय देणार आणि आम्ही वर्षभर काय खाणार?" मग त्या मालकाने एका माणसाबरोबर शेतकऱ्याला निरोप पाठवला. पण शेतकरी म्हणाला,"मी कापणीला सुरवात केली आहे ती पूर्ण करणार आहे. मला कसली भीती?"

आणि त्याने जे पंधरा दिवसांनी तयार होणार होतं ते सर्व पीक कापून टाकलं. काहीच पीक शेतात उरले नाही. महाराजांच्या आज्ञेचे आपल्या हातून पालन झाले, याचा त्याला आनंद वाटला, समाधान झाले. रस्त्यावर येऊन महाराजांची वाट पहात उभा राहिला. आता त्याची परीक्षा आहे. आले महाराज. ह्याने सांगितले,"महाराज, पहा आपल्या आज्ञेप्रमाणे सर्व पीक कापले."

महाराज म्हणाले,"बाबा, मी सहज बोललो. अरे मी तुझी थट्टा केली. सहज मी म्हणालो आणि तू सर्व पीक कापलेस? हे कोणाच्या मनात सुद्धा येणार नाही. सगळे लोक तुझी निंदा करीत असतील? आता मालकाला काय धान्य देणार तू ? तुझं कसं होणार? सगळं पीक व्यर्थ गेलं."

केवढा निश्चय आहे त्याच्या मनाचा! तो म्हणतो,"महाराज, आपली वाणी थट्टा कशी समजायची? आपली वाणी म्हणजे साक्षात वेदशास्त्रवाणी आहे आणि त्या आज्ञेचे माझ्या हातून पालन झाल्यामुळे मला जे काही त्याचे फळ मिळायचे ते मिळेल. ज्याने जन्म दिला आहे तोच माझं जीवन सुखी करण्यास समर्थ आहे." महाराज म्हणाले,"तुझी दृढ भक्ती आहे, तुझ्या श्रद्धेप्रमाणे सगळं होईल."

तो शेतकरी महाराजांच्या चरणांचे स्मरण करीत घरी आला. त्याने सगळ्यांचे समाधान केले. पण बाकीचे सगळे काळजीत पडले आहेत. सगळ्यांनी त्या शेतकऱ्याला मूर्खात काढलेले आहे. वास्तविक पहाता गावात राहाणाऱ्या सर्वांनी महाराजांचे अलौकिक दिव्य चरित्र पाहिलेले आहे आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणे याने शेत कापले हे समजूनसुद्धा ते या शेतकऱ्याला मूर्ख म्हणताहेत.

अप्रतिहत भक्ती मिळत नाही. भक्ती मिळेल, तेवढ्यापुरतं काही अनुकूल घडलं की ईश्वराबद्दल प्रेम वाटतं पण ते तात्पुरतं. व्यवहारात सुद्धा एखादा अनुकूल झाला की आपल्याला त्याच्या बद्दल प्रेम वाटू लागते.

पण पुढे चार आठ दिवसातच इतका पाऊस पडला की बाकीच्यांच्या सगळ्या शेतातील पिकाची नासाडी झाली आणि याच्या शेतात मात्र नेहमी पेक्षा अधिक भरघोस पीक आले. झालं, काल परवापर्यंत निंदा करणारे त्याची आता स्तुती करू लागले. बायको मुलांना आनंद झाला. पण या शेतकऱ्याचे या निंदास्तुतीकडे लक्ष नाहीये. महाराजांची आज्ञा पालन करणं हाच मोठा सेवाधर्म आहे हे जाणणारा तो आहे. मग सर्वांनी येऊन क्षेत्र देवतेची पूजा केली. गुरूमहाराजांना पीक दाखवून म्हणाला,"आपल्या कृपेने हे सर्व मिळालं आहे. आपले चरण म्हणजे साक्षात चिंतामणी आहे. आपल्या वाणीचे सामर्थ्य अनेक जन्मांच्या पुण्याईने मला पहायला मिळालं. मी कृतार्थ झालो. आपण मला विसरू नका."आणि हेच मागणं देवाकडे मागावं, 'देवा तू मला विसरू नकोस.'

' श्रद्धावान् लभते ज्ञानम् ' भगवान् गीतेत सांगतात. सेतू बांधायच्या वेळेस वानर मंडळी मोठ मोठे दगड आणायची, त्याच्यावर रामनाम लिहायची आणि ते समुद्रात टाकायची. ते दगड तरंगून सेतू तयार झाला. रामचंद्रांनासुद्धा वानरांप्रमाणे दगड पाण्यात टाकायची इच्छा झाली. वानर मंडळी त्यावर काय लिहीत हे मात्र त्यांना माहीत नव्हते. त्यांनी एक दगड घेतला आणि समुद्रात टाकल्यावर तो बुडाला. रामचंद्रांना आश्चर्य वाटले. बाकीचे वानर म्हणाले, आपण ज्याला सोडलंत (म्हणजे

आपण ज्याचा त्याग केलात) तो कसा तरेल? म्हणून तो दगड बुडाला. तसे देवाने आपल्याला कधी सोडू नये हे सतत देवाजवळ मागणे मागायचे असते. देवाला आपले विस्मरण झाले नाही म्हणजे आपल्याला त्याचे स्मरण होते. ही त्याची मोठी खूण आहे.

इतकी संकटं आली तरी देवाचे आपल्याकडे लक्ष आहे हेच तो शेतकरी शेवटपर्यंत समजत होता. महाराजांची आज्ञा पालन करण्यात आपण कोणतीच चूक केली नाही याची खात्री होती त्याला. तो शेवटपर्यंत दृढ बुद्धीने राहिला. महाराजांनी त्याला आशीर्वाद दिला. "तुझ्या कुळामध्ये वंशोवंशी शुद्ध दास्य, शुद्ध भक्ती राहील. वंशोवंशी लक्ष्मी स्थिर राहील." म्हणजे शेतकऱ्याच्या कुळात जन्माला येऊनसुद्धा त्याला गुरूकृपेने केवढी भक्ती आणि असा मोठा वर मिळाला ! यानेच उलट सर्व गावाला त्या वर्षी धान्य पुरवलं.

तर अशा प्रकारे अनंत लीला सांगितल्या आहेत. नंतर महाराजांनी सर्वांना गाणगापूर क्षेत्राचे महात्म्य सांगितले. इथल्या अष्टतीर्थांचे वर्णन करून म्हणाले, या ठिकाणी श्रद्धा ठेवून तीर्थस्नान इतर विधी करा म्हणजे तुमचा उद्धार होईल. तुम्हाला इतर कुठे जायची गरज नाही.

आता शेवटी एक कथा सांगताहेत सिद्ध नामधारकांना. कुरवपुरात श्रीपाद श्रीवल्लभ राहात असताना त्यांची सेवा करणाऱ्या रजकाला राजाचे ऐश्वर्य भोगण्याची इच्छा झाली. महाराजांनी त्याला विचारले, "कसला विचार करतोस?" तो रजक म्हणाला, "काही नाही महाराज, राजा किती भाग्यवान आहे असे वाटले." महाराज म्हणाले, "तूही राजा होशील." तो म्हणाला, "नको

महाराज तुमच्या सेवेतच राहायची इच्छा आहे." महाराज म्हणाले,"तुला राजा मोठा वाटला आहे. आता राजऐश्वर्य भोगायचा योग आला आहे. वासनाक्षय झाल्याशिवाय खरा परमार्थ आपल्या हातून घडत नाही. पुढच्या जन्मात तू राजा होशील."

त्याप्रमाणे तो रजक पुढच्या जन्मांत बिदरचा बादशहा झाला. परंतु पूर्व संस्कारानुसार देवाब्राह्मणांबद्दल त्याच्या मनांत आदरबुद्धी होती. पुढे त्याच्या मांडीवर एक फोड झाला. आता राजा आहे तो. त्याला औषधाला काय कमी? निरनिराळे वैद्य येताहेत, औषधे देताहेत पण ह्याला काही गुण नाही. शेवटी त्याने ज्ञानी ब्राह्मण मंडळींना एकांतात बोलावून या स्फोटकाचे कारण विचारले. ते म्हणाले,"हा पूर्व पापकर्मामुळे झाला आहे. जर एखाद्या सत्पुरूषांची कृपादृष्टी तुझ्यावर पडली तर हा जाईल. सत्पुरूषांच्या कृपेने अनेक जन्मांची पातके नष्ट होतात. पापक्षय होतो. त्यांचं दर्शन तुला व्हायला पाहिजे."

या संदर्भात त्यांनी त्या यवनराजाला एक कथा सांगितली. एका राजाला दोन स्त्रिया होत्या. त्यातली एक गर्भिणी झाल्यावर दुसरीने सवती मत्सराने तिला विष दिले. पुढे ती राणी प्रसूत झाल्यावर तिला व तिच्या नवजात अर्भकाला विषबाधेचा असह्य त्रास होऊ लागला. तेव्हां राजाने तिचा त्याग केला. त्या दोघांना जंगलात सोडून दिले. तिथे एका वैश्याने त्यांना आपल्या घरी नेऊन रक्षण केले. पण त्या बालकाला मृत्यू आला. त्या स्त्रिला शोक अनावर झाला. तीही देहत्याग करायला निघाली. त्यावेळी वृषभयोगी तिथे आले. या वृषभयोग्यांची तिने पूर्वजन्मात सेवा केली होती. त्यांनी तिला प्रथम पुष्कळ उपदेश करून तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला पण तिचे काही समाधान झाले

नाही. शेवटी वृषभदेवांनी पूर्वकर्म स्मरून त्या मुलाला जिवंत केले.

ही कथा ऐकल्यावर बादशहाने विचारले,"असा सत्पुरुष मला कुठे भेटेल? त्या मंडळींनी सांगितले. भीमा-अमरजा संगमावर गुरूमहाराजांच्या रुपानं साक्षात परमेश्वर अवतरला आहे. त्यांना तू शरण जा म्हणजे तुझा हा रोग बरा होईल." त्याप्रमाणे तो राजा सर्व सैन्य घेऊन गाणगापूरला आला. महाराजांची चौकशी केली. गावातली मंडळी खरा प्रकार न समजून घाबरली. त्यांनी महाराज संगमावर असल्याचे सांगितले. राजा संगमावर गेल्यावर पालखीतून उतरला आणि महाराजांना साष्टांग नमस्कार घातला. त्याला पाहिल्याबरोबर महाराजांनी त्याला विचारले,"का रे रजका, कुठे होतास तू इतके दिवस? कुठे राहातोस? इतके दिवस कां आला नाहीस? सर्व कुशल आहे ना !"

रोग झाला म्हणून महाराजांची आठवण झाली. राजाला अतिशय आनंद झाला. आपल्या पूर्वजन्माचे स्मरण झाले. महाराजांच्या शक्तीमुळे आपण रजकाचे राजा झालो याची त्याला जाणीव झाली आणि त्यांनाच आपण विसरलो कसे? तो म्हणू लागला,"महाराज, आपण मला राज्य कशाला दिलंत?त्या राज्यामुळे मला आपला विसर पडला. आपल्याजवळ मी राहात होतो. आपली सेवा घडत होती. आपले नित्य स्मरण मला होते. माझ्यासारख्या रजकाला आपण सार्वभौम केलेत. आता आपण हे सर्व वैभव पहा. माझ्या नगराला भेट देऊन माझ्याकडून पूजा घ्या."

महाराज म्हणाले,"तुझ्या नगरात नित्य गोहत्या चालते. वाटेल तसे वागता तुम्ही. तुझ्या राज्यात यायची इच्छा नाही.

शिवाय तुझेच लोक तू एका संन्याशाला आणून पूजा केलीस तर तुझी निंदा करतील."

तो राजा म्हणाला,"महाराज, आता कोणाच्या निंदा स्तुतीची मला पर्वा नाही. मी एक परीट आहे आणि आपण माझे स्वामी आहात. मी आपल्याला माझ्या नगरात घेऊन जाणार आणि आपली पूजा करणार. लोक हसले तर हसतील."

त्याप्रमाणे महाराजांना त्याने आपल्या नगरात नेऊन आपल्या राजवाड्यात बायको मुलांसह महाराजांची पूजा केली. बाकीच्या म्लेंछांनी त्याची निंदा केली पण राजाने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. न्याय्य कर्म जे असतं ते निर्भयपणे करावं. हा निर्भयपणा त्याला ईश्वरकृपेने प्राप्त झाला होता. तो म्हणाला,"महाराज, हे सर्व राज्य मी आपल्या चरणी अर्पण करून आपल्या बरोबरच राहाण्यास येतो."

तेव्हां महाराजांनी त्याला सांगितले,"बाबा, आम्ही इथून प्रथम गाणगापुरात जाऊन नंतर पुढे श्रीशैल्य पर्वतावर जाऊन राहाणार आहोत, त्या ठिकाणी तू ये. तिथे तुला आमचे दर्शन होऊन तू मुक्त होशील."

असे त्याला आश्वासन देऊन महाराज गाणगापुरात आले. आता महाराजांनी विचार केला की कलिच्या प्रभावाने म्लेंच्छांचा उपद्रव आता वाढत जाणार तेव्हां आता आपण इथून श्रीशैल्याला प्रगट रुपानं जावे आणि गाणगापुरात गुप्तरूपाने स्वामीमहाराज आजही गाणगापुरामध्ये आहेत. पण जे अभक्त आहेत. त्यांना मात्र दर्शन नाही.

पुढे तो म्लेंच्छही महाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीशैल्य पर्वतावर गेला. महाराजांचे दर्शन त्याला झाले आणि उत्तम गती मिळाली

इतकाच कथा भाग सिद्धांनी नामधारकाला सांगितला.

कृष्णा पंचगंगा संगमावर महाराजांचे प्रातः स्नान आणि पूजा होते. नंतर महाराज भीमा- अमरजा संगमावर येऊन आन्हिक करून माध्यान्ह काळी ते गाणगापुरात भिक्षेला येतात आणि ते इथेच राहातात. भगवंताचे पुष्कळ अवतार आहेत पण कलियुगात जागृत अशा अवतारावर (नृसिंह सरस्वती) संशय सोडून श्रद्धा ठेवून त्यांचं तू भजन कर, असे सिद्धांनी नामधारकाला सांगितल्यावर त्याच्या मनांतले सर्व संशय दूर झाले. सिद्ध मुनीच्या मुखातून महाराजांचे सर्व चरित्र ऐकून तो कृतार्थ झाला. नामधारक म्हणजे सरस्वती गंगाधर या गुरूचरित्र ग्रंथ पठणाचे फल सांगताहेत –

हा नुसता ग्रंथ ज्या ठिकाणी पठण होत असेल तिथे भूत, प्रेत, राक्षस वगैरेंच्या कोणत्याही पीडा होऊ शकत नाहीत. या ग्रंथाचा सप्ताह पठण करणाऱ्या, श्रवण करणाऱ्याच्या सर्वही इच्छा भगवान् दत्तात्रेय पूर्ण करताहेत. या ग्रंथाला सतत भगवान् दत्तात्रेयांचे सान्निध्य लाभलेले आहे.

नामधारक सुरवातीला अत्यंत गोंधळलेल्या मनःस्थितीत होता. ईश्वराचे अस्तित्वसुद्धा संतप्त मनःस्थितीमुळे काही मानण्यास तयार नव्हता. आपल्या पूर्वजांचा ज्यांच्या कृपेने उद्धार झाला त्यांचे आपल्याकडे लक्ष नाही असे त्याला वाटू लागले. पण महाराजांनी त्याला प्रथम स्वप्नात दर्शन दिले आणि मग सिद्धांच्या रुपानं प्रत्यक्ष भेटले, आपले चरित्र स्वतःच त्यांनी सिद्धांच्या रुपानं नामधारकाला सांगितले आणि महाराजांच्या आज्ञेनेच नामधारकांनी मातृभाषा कानडी असूनसुद्धा मराठी श्रीगुरूचरित्र लिहिले. हा संपूर्ण ग्रंथ मंत्रमय आहे. याचे किती श्रद्धेने पठण

व्हायला पाहिजे हे निरनिराळ्या कथांच्या रुपानं समजावले. ज्याला ईश्वरकृपेने या ग्रंथाचे अधिकाधिक चिंतन, मनन करण्याची बुद्धी होईल त्यांनाच ईश्वरी लीलेचे या ग्रंथातील रहस्य समजून येईल.

सर्व लोकांनी यशोदेला येऊन सांगितले श्रीकृष्णांनी माती खाल्ली. तिने श्रीकृष्णांना विचारले तसे. तें नाही म्हणाले. ती म्हणाली,"हे सगळे गोपाळ काय खोटे सांगत आहेत, बघू तोंड उघड." आणि भगवंतांनी तोंड उघडताच यशोदा मातेला संपूर्ण विश्वच त्यांच्या मुखात दिसू लागले. इतकेच काय, पण ती स्वतः, बसलेले गोकुळ सुद्धा त्यांच्या मुखात तिने पाहिले. ती सुद्धा तिथे होती, म्हणजे खरे काय-माती खाल्ली हे खरे की नाही खाल्ली हे खरे? माती खायची म्हणजे बाहेरची माती तोंडात टाकायची का? पंचमहाभूते मुखात असताना माती कशाला खायला पाहिजे? पण हे एक रहस्य आहे. शुक्राचार्यांसारख्यांनी निर्विकल्प समाधीही सोडून दिली आणि भगवंतांच्या ध्यानात ते तन्मय होऊन गेले, भक्ती करण्यात रंगून गेले. भगवंतांच्या गुणांचे, लीलेचे चिंतन करताहेत. ही लीला कशी झाली हे समजून घेतले पाहिजे. ते समजून देण्याकरिता हे चरित्र झाले आहे. महाराजांच्याच कृपेने कलियुगामध्ये अशा प्रकारचं उद्धाराचं साधन म्हणून हे सांगितले आहे. महाराज अव्यक्त रुपानं अद्यापि आहेत हेच या चरित्रातून सांगितले आहे.

सद्गुरू वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी किती तरी संस्कृत ग्रंथांवरून मराठीत ग्रंथ करून दत्तात्रेयांचं महात्म्य व्यक्त केले आहे. त्यामुळे किती तरी जिज्ञासू सद्भक्तांना त्याचा उपयोग होतो आहे. सर्वांवर अशी आणखी श्रीपाद श्रीवल्लभ,

नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांची कृपा व्हावी, सत्कर्माकडे लक्ष जावं, सद्भक्ती आपल्या हातून अखंड घडावी, सर्वांचही कल्याण व्हावे अशी भगवान् दत्तात्रेय श्रीपाद श्रीवल्लभ नरसिंहसरस्वती स्वामी महाराजांच्या चरणाजवळ प्रार्थना करून ही यथामति सेवा त्यांना अर्पण केली आहे.

**।। कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा**
**बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात ।।**
**।। करोमि यद्यत्सकलं परस्मै**
**नारायणायेति समर्पयामि ।।**

**।। दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।।**